(सभापतीस्थानी माननीय सभापती)

सभापती : माझ्याकडे नियम 289 अन्वयेच्या दोन सूचना आलेल्या आहेत. प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर मी त्यासंबंधी थोडक्यात बोलण्याची संधी सन्माननीय सदस्यांना देईन.

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे.

मुंबईतील आग्रीपाडा येथील डीएमआरए संस्थेच्या मालकीचा टीडीआर बनावट करारनाम्याद्वारे विकल्याबाबत

(1) * 25443 श्री.किरण पावसकर , श्री.प्रकाश बिनसाळे, ॲड. उषाताई दराडे, श्री.हेमंत टकले , श्री.जयवंतराव जाधव : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबईतील आग्रीपाडा येथील डीएमआरए संस्थेच्या मालकीचा टीडीआर (विकास हस्तांतरण हक्क) विकण्याचे अधिकार नसतांनाही बनावट करारनामा करुन त्याची विक्री केल्याचे माहे जानेवारी, 2012 च्या दुसऱ्या सप्ताहात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार बनावट करारनामा करुन विक्री करणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. भास्कर जाधव, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता : (1) अशी बाब निदर्शनास आलेली नाही. तसेच मुंबई महानगरपालिकेच्या अभिलेखांवरुन डी.एम.आर.ए.संस्थेच्या नावाने विकास हक्क हस्तांतरण प्रमाणपत्र (डी.आर.सी.) मंजूर झाल्याचे दिसून येत नाही. सबब अशा प्रकारे प्रश्नाधीन संस्थेकडून हस्तांतरणीय विकास हक्क (टी.डी.आर.) विकत घेतल्याची कागदपत्रे जोडून हस्तांतरण विकास हक्क वापरण्यासंबंधीचा विकास प्रस्ताव बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे प्राप्त झाल्यास, या संदर्भात महानगरपालिकेकडून योग्य ती दक्षता घेण्यात येईल.

(2), (3) व (4) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. हेमंत टकले : अशा प्रकारचे गैरव्यवहार वारंवार घडत आहेत. तसाच प्रकार मुंबईतील आग्रीपाडा येथील डीएमआरए संस्थेच्या मालकीचा टीडीआर (विकास हस्तांतरण हक्क) विकण्याचे अधिकार नसतांनाही बनावट करारनामा करुन त्याची विक्री केल्याचे माहे जानेवारी, 2012 च्या दुसऱ्या सप्ताहात उघडकीस आला आहे. यासंदर्भात पोलिसांनी गुन्हाही नोंदविला आहे. या लोकांना अशा प्रकारे टीडीआर विकण्याचा कोणताही अधिकार नसताना बनावट करारनामा करुन संस्थेतील सदस्यांची फसवणूक केली आहे. या गुन्ह्यात पोलीस 10 आरोपींचा शोध घेत आहेत. हा तपास कधी पूर्ण होणार आणि त्याबाबत शासन कोणती कारवाई करणार आहे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 25443.....

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, या प्रकरणी पोलीस 10 लोकांचा शोध घेत आहेत. अशा प्रकारे उत्तरात कोठेही नमूद केलेले नाही. ज्या संबंधित संस्थेबद्दल हा प्रश्न उपस्थित करण्यात आला त्या ठिकाणी असा कोणताही प्रकार महापालिका किंवा अन्य बाबतीत तपासणी केली असता उघडकीस आलेला नाही अथवा निदर्शनास आलेला नाही. शासनाची जरी ही माहिती असली तरी सन्माननीय सदस्यांकडे जर यासंबंधी अधिक माहिती असेल तर ती तपासून योग्य ती कारवाई केली जाईल.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील एसटीच्या ताफ्यात असलेल्या जुन्याट गाडया व रिक्त पदांमुळे मंडळास होत असलेले नुकसान

(२) * २५४९० ***श्री.जयवंतराव जाधव , श्री.हेमंत टकले , श्रीमती उषाताई दराडे , श्री.विक्रम काळे , श्री.अनिल भोसले , श्री.किरण पावसकर , श्री.दिपकराव साळुंखे , श्री.प्रकाश बिनसाळे , श्री.रमेश शेंडगे , श्री.सतीश चव्हाण , श्री.धनंजय मुंडे , श्री.रामदास कदम , श्री.परशुराम उपरकर , श्री.चंद्रकांत पाटील, श्री.भगवान साळुंखे , श्री.विनोद तावडे , श्री.संजय केळकर, श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.सय्यद पाशा पटेल , श्री.दिवाकर रावते , श्री.गोपीकिसन बाजोरिया , श्रीमती विद्या चव्हाण , श्री. एस. क्यू. ज़मा , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री.मोहन जोशी , श्री.एम.एम.शेख , श्री.राजन तेली , श्री.नितीन गडकरी , श्री.नागो गाणार, डॉ.रणजित पाटील* : सन्माननीय ***मुख्य मंत्री*** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एसटीच्या ताफ्यातील जुन्याट गाडया आणि चालकांवरील डबल ड्यूटीच्या तणावामुळे एसटीच्या अपघातांचे प्रमाण वाढले असून वर्षभरात तब्बल ३४०० अपघाताच्या घटना घडून ३५ कोटी रुपयांची नुकसान भरपाई द्यावी लागल्याचे माहे जानेवारी, २०१२ च्या दुसऱ्या सप्ताहात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एसटीचे नुकसान होवू नये तसेच नवीन बसेस खरेदी करणे व चालकांची संख्या वाढावी म्हणून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव देवकर, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्या करिता : (१) हे खरे नाही.

जुनाट गाडयांमुळे व त्यामधील यांत्रिक दोषामुळे तसेच चालकांवरील डबल ड्यूटीच्या तणावामुळे अपघाताचे प्रमाण वाढलेले नाही. तथापि, माहे एप्रिल, २०१० ते मार्च, २०११ या कालावधीत राज्य परिवहन बसगाडयांना विविध कारणांमुळे एकूण ३४०७ अपघात झालेले असून या अपघातातील अपघातग्रस्तांचे अपघात नुकसान भरपाईसाठी एकूण रू.३५.१७ कोटीची रक्कम अपघात नुकसान भरपाईपोटी अदा करण्यात आलेली आहे.

(२) राज्य परिवहन महामंडळात आयुर्मान संपलेल्या जुन्या बसेस निकामी करून मोडीत काढणे व त्याऐवजी नवीन वाहनांचा महामंडळाच्या बसेसच्या ताफ्यात समावेश करणे ही प्रक्रिया सतत चालू असते. त्याचा परिणाम म्हणून महामंडळातील प्रवासी बसेसचे आयुर्मान हे २००१-०२ मध्ये जे सरासरी ६.७३ लाख कि.मी. होते ते सन २०११-१२ मध्ये डिसेंबर, २०११ अखेर ५.४५ कि.मी.पर्यंत कमी झाले आहे.

तसेच सन २००८ ते डिसेंबर, २०११ पर्यंत ६८२१ बसेस आयुर्मान संपलेल्या व निकामी करून मोडीत काढल्या असून महामंडळाच्या बस ताफ्यात ८३७१ नवीन बसेस समाविष्ट केलेल्या आहेत. राज्य परिवहन महामंडळामध्ये सन २०११-१२ या कालावधीसाठी सरळ सेवा भरतीप्रक्रियेद्वारे ८९४८ चालक पदांची भरती करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात जे छापील उत्तर मंत्री महोदयांनी दिलेले आहे त्याने माझे समाधान झालेले नाही. या ठिकाणी जे उत्तर देण्यात आलेले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयवंतराव जाधव

आहे त्याने सभागृहाची दिशाभूल केलेली आहे असे मला वाटते. मी असा प्रश्न विचारला होता की, चालकांना डबल ड्यूटीच्या ताणामुळे अपघातांचे प्रमाण वाढले असून त्यामुळे एस.टी. महामंडळा अनेक कोटी रुपयांची नुकसान भरपाई द्यावी लागली आहे काय ?या उत्तराला विभागाने "होय" असे उत्तर दिलेले आहे. परंतु अपघात ताणतणावामुळे झालेले नाही असे उत्तर मंत्रीमहोदयांकडून मिळालेले आहे. मला असे विचारावयाचे आहे की, डबल ड्यूटीच्या ताणतणावामुळे हा प्रश्न निर्माण झालेला नाही तर मग एस.टी. खात्याच्या अधिका-यांनी प्रशासनाला हे अपघात कशामुळे झालेले आहे हे कशाच्या निष्पन्नावर आलेले आहेत ? पुणे येथे चालकाकडून जो दुर्दैवी प्रकार घडला होता त्यासंदर्भात संबंधित चालकाची वैद्यकीय तपासणी करण्याची का गरज पडली ? या चालकाची वैद्यकीय तपासणी केल्यानंतर प्रशासन कोणत्या निर्णयाप्रत आलेले आहे ?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी डबल ड्युटीच्या ताणामुळे एस.टी.च्या अपघातात वाढ झालेली असून वर्षभरात ३४०० अपघात होऊन ३५ कोटी रुपयांची नुकसान भरपाई द्यावी लागली आहे काय असा प्रश्न विचारला असून या प्रश्नाला "हे खरे नाही" असे उत्तर देण्यात आलेले आहे. खरे म्हणजे वर्षभरात ३४०० अपघात झालेले नसून ३४०७ अपघात झालेले आहेत व त्यामुळे ३५१७ कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी डबल ड्युटीच्या ताणामुळे अपघात झाले नाही हे आपण कशावरुन म्हणत आहात असा प्रश्न विचारला असून त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, अपघातांची अनेक कारणे असतात. परंतु चालकांच्या डबल ड्युटीमुळे काही अपघात घडलेले आहेत ही वस्तुस्थिती आहे. परंतु पुढील काळात चालकांना डबल ड्युटी दिली जाणार नाही अशी काळजी परिवहन खात्याकडून घेतली जात आहे. आता परिवहन खात्यामध्ये नवीन ८९४८ चालकांची तसेच इतर कर्मचा-याची भरती करण्याची प्रक्रिया सुरु केलेली आहे. कोणत्याही चालकावर डबल ड्युटीची वेळ येऊ नसा असा आमचाही प्रयत्न आहे. अगोदर असलेल्या चालकांपैकी ८ ते १० टक्के चालकांना डबल ड्यूटी करावी लागत होती व ही गोष्ट टाळण्यासाठी विभागाने नवीन भरतीची प्रक्रिया सुरु केलेली असून चालकांची भरती झाल्यानंतर या प्रकाराला निश्चितपणे आळा बसणार आहे.

..३...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : २५४९० .....

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, एक ते दीड वर्षापूर्वी मी एस.टी. महामंडळाच्या गाडयांची तपासणी केली होती व तपासणीमध्ये गाडयांना स्टेपनी, लिव्हर, जॅक नसल्याचे दिसून आले होते तसेच गाडयांचे टायर रिमोल्ड केलेले असल्यामुळे त्यांचे धागे निघालेले आढळले होते. काही ठिकाणी तर मर्जीतील चालकांनाच चांगल्या गाडया दिल्या जात होत्या व ही सर्व परिस्थिती एस.पी. यांना सांगितली होती. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, एस.टी. महामंडळाच्या सर्व गाडयांना स्टेपनी, लिव्हर, जॅक व जी काही आवश्यक सामुग्री आहे त्या पुरवण्यात येणार आहेत काय ? फर्स्ट एड बॉक्सची किल्ली व्यवस्थापकाकडे व फर्स्ट एड बॉक्स गाडीमध्ये अशी परिस्थिती असतांना या फर्स्ट एड बॉक्सचा उपयोग अपघात झाल्यानंतर चालक कसा करु शकणार आहे ? त्यामुळे चालकांना सर्व गोष्टी पुरवण्यात येणार आहेत काय ? तसेच चालकांना चांगल्या गाडया व एकच ड्युटी करावी लागेल यासाठी फेर तपासणी करण्यात येणार आहे काय ?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, ज्यावेळी बस ड्यूटीसाठी अगारातून बाहेर काढली जाते त्यावेळेस प्रत्येक गाडयांची वेगवेगळया तपासण्या केल्या जात असतात. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे जर कोठे त्रुटी राहिल्या असतील तर निश्चितपणे त्या दूर केल्या जातील. पुढील काळात गाडयांच्या संदर्भात बारकाईने लक्ष घातले जाईल एवढे मी या निमित्ताने मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली : सभापती महोदय, एस.टी.म्हणजे ग्रामीण भागाची वाहिनी आहे. बऱ्याच बसगाड्या नादुरूस्त असल्यामुळे त्या रस्त्यावर थांबलेल्या असतात. कोकणात पावसाळ्यात तर एस.टी.बसगाड्यांमध्ये छत्री घेऊन बसावे लागते. एवढी वाईट परिस्थिती एस.टी.बसगाड्यांची आहे. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, या बसगाड्यांचे एकूण आयुर्मान किती असते, आपल्या राज्यात एकूण किती बसगाड्या आहेत, नवीस बसगाड्या घेण्यासाठी काय प्रयत्न करण्यात येणार आहेत ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, चालक व वाहकांची किती पदे रिक्त आहेत ? भरती प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे असे मंत्रिमहोदयांनी सांगितल आहे. तेव्हा स्थानिक उमेदवारांना प्राधान्य देण्याबाबत शासन उपाययोजना करणार आहे काय ?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, राज्यामध्ये 16828 बसगाड्या आहेत. त्यापैकी 15292 बसगाड्या ह्या 8 वर्षाच्या आतील आयुर्मानाच्या आहेत. एस.टी.महामंडळाची बस 8 वर्षापेक्षा जास्त आयुर्मानाची असणार नाही असा आपण नियम केला आहे. 16828 बसगाड्यांपैकी 15292 बसगाड्या ह्या 8 वर्षाच्या आतील आयुर्मानाच्या आहेत. फक्त 1536 बसगाड्या ह्या 8 वर्षापेक्षा जास्त आयुर्मानाच्या आहेत. येत्या दोन वर्षाच्या कालावधीत ह्या गाड्या देखील निर्लेखित करण्यात येणार आहेत. म्हणजे पुढच्या काळामध्ये 8 वर्षाच्या आतील आयुर्मानाच्या बसगाड्या राष्ट्रीय महामार्गावर धावणार आहेत. आपल्याकडे जवळपास 12689 कर्मचाऱ्यांच्या मागच्या वर्षी भरती करण्यात आली आहे. चालू वर्षामध्ये 8948 चालक व 6247 वाहकांची भरती करण्यात येणार आहे. बसेस दुरूस्ती व देखभालीसाठी सहाय्यभूत ठरणारे सहायक 2658 नियुक्त करणार आहोत. लिपिक वगैरे कर्मचारी लागतील. अशी एकूण जवळपास 19789 कर्मचाऱ्यांची भरती आपण तात्काळ करण्यासाठी प्रक्रिया सुरू केलेली आहे. येथे स्थानिक उमेदवारांना प्राधान्य देण्यात येणार आहे काय, असा प्रश्न विचारला आहे. या संबंधी विचार केला जाईल.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे : सभापती महोदय, लेखी उत्तरामध्ये नमूद करण्यात आले आहे की, प्रवासी बसेसचे आयुर्मान हे 2001-2002 मध्ये 6.73 कि.मी.होते. आता चालू वर्षामध्ये आयुर्मान 5.45 कि.मी.पर्यंत आले आहे. म्हणजे 1 लाखाने आयुर्मान कमी आले आहे. तेव्हा माझा प्रश्न असा आहे की, कमी दर्जाच्या गाड्या खरेदी केल्या जात आहेत काय ? अपघात टाळण्यासाठी कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना महामंडळातर्फे केली जात आहे ? आज कित्येक गाड्या रस्त्यात बंद पडत आहेत. त्यामुळे अपघात टाळण्यासाठी महामंडळातर्फे कोणती उपाययोजना करण्यात येत आहे ?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, मी येथे वर्षामध्ये बसगाड्यांचे आयुर्मान सांगितले आहे. मात्र सन्माननीय सदस्यांनी कि.मी.मध्ये बसगाड्यांचे आयुर्मान सांगितले आहे. आता आपण कमी कि.मी.च्या गाड्या रस्त्यावर ठेवलेल्या आहेत. आता फक्त 5 लाख कि.मी.पर्यंत धावलेल्या बसगाड्याच रस्त्यावर राहतील. त्यापेक्षा जास्त कि.मी.धावलेल्या बसगाड्या रस्त्यावर उतरविण्यात येणार नाहीत. बसगाड्या चांगल्या स्थितीत राहिल्या पाहिजेत, चालल्या पाहिजेत यासाठी अनेक उपाययोजना आपण आपल्या विभागामार्फत करीत आहोत. कार्यशाळेमध्ये 2 महिने पूर्ण झाल्यानंतर पहिले डॉकिंग करतो, त्यानंतर 4 महिन्यांनी तपासणीचे दुसरे डॉकिंग करतो. पुन्हा विभागीय कार्यशाळेमध्ये सहा महिने पूर्ण झाल्यानंतर डॉकिंग करतो. पुन्हा आगार कार्यशाळेमध्ये 8 महिने पूर्ण झाल्यानंतर डॉकिंग करतो. पुन्हा 10 महिने झाल्यानंतर आगार कार्यशाळेमध्ये डॉकिंग करतो. अशा प्रकारे वेगवेगळ्या प्रकारच्या तपासण्या व दुरूस्तीची कामे करण्यात येतात. बसगाड्यांच्या देखभालीचा कार्यक्रम वेळेवर अंमलात आणण्यासाठी विशेष कटाक्ष आहे. बसगाड्यांच्या देखभालीत सुधारणा करण्याकडे लक्ष देण्यात येते. अशा प्रकारच्या अनेक व्यवस्था आपण करीत आहोत. आता आपल्याला पुढच्या काळात स्टेपनी, जॅक नसल्याची परिस्थिती दिसणार नाही.

यानंतर श्रीमती रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25490 . . .

श्री.अनिल भोसले : सभापती महोदय, ज्यावेळी ड्रायव्हर प्रवासी घेऊन मुंबईला येतो, तेव्हा तो ड्रायव्हर मुंबईलाच मुक्काम करतो आणि त्यावेळी त्याला 12 रुपये इतका भत्ता दिला जातो. तसेच ज्यावेळी तो ग्रामीण भागामध्ये गाडी घेऊन जातो आणि त्याला तेथे रहाण्याची वेळ येते तेव्हा त्याला 3 रुपये भत्ता दिला जातो. हा भत्ता योग्य आहे काय ? तसेच संबंधित गाडीचा फिटनेस रोजच्या रोज तपासला जातो काय ?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, ड्रायव्हरनां देण्यात येणाऱ्या भत्त्याच्या संबंधात निश्चितपणे माहिती घेऊन त्या दृष्टीकोनातून ज्या उपाययोजना करता येण्यासारख्या आहेत त्या केल्या जातील.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय तुम्ही चांगले सांगत आहात की, काढतो, घेतो आणि टाकतो म्हणजे याला काढतो, यांना घेतो आणि यांना टाकतो. मला माननीय मंत्री महोदयांना तीन प्रश्न विचारावयाचे आहेत. आपण मोठ्या प्रमाणावर कर्मचारी घेतो असे उत्तरामध्ये सांगितले. आदिवासींना साडेबारा टक्के राखीव आरक्षण आहे. अशा वेळी येथील कर्मचाऱ्यांच्या भरतीमध्ये आदिवासींची संख्या किती असेल ? हा एक प्रश्न आहे. जुन्या एस.टी.च्या 1500 गाड्या चालत आहेत, त्या कोणत्या विभागात किती आहेत ? तसेच या जुन्या गाड्या दोन वर्षामध्ये काढण्यात येतील असे सांगितले आहे. माझा प्रश्न असा आहे की, या गाड्या किती आहेत याची माहिती द्यावी. तिसरा मुद्दा म्हणजे माननीय मंत्री महोदयांनी मघाशी कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाबद्दल, त्यांच्या आरोग्याबाबत चार-पाच मिनिटे माहिती दिली आहे. मध्यंतरी पुणे येथे मोरे ड्रायव्हरच्या बाबतीत प्रकरण झाले. त्या प्रकरणामध्ये महाराष्ट्र राज्यातील मंत्री महोदय म्हणून आपण दूरचित्रवाणीच्या एका वाहिनीवर चर्चेसाठी उपस्थित होतात आणि त्या वाहिनीवर तुमचा झालेला अपमान आणि संबंधितांना दिलेला दम याबाबतीत आपण पुढे कोणती कार्यवाही केली ?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, याठिकाणी आदिवासींच्या बाबतीत साडेबारा टक्क्याबाबत विभाग वाईज माहिती मागितलेली आहे आणि विभागाप्रमाणे किती गाड्या आहेत याची माहिती मी सदनाच्या पटलावर ठेवतो. दुसरी गोष्ट म्हणजे ....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आदिवासींचा किती अनुशेष भरावयाचा आहे ते माननीय मंत्री महोदयांनी सांगावे.

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, मी ही माहिती सदनाच्या पटलावर ठेवतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25490 . . .

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, जुन्या गाड्या दोन वर्षामध्ये काढण्यात येतील असे सांगितले आहे. परंतु प्रत्येक भागामध्ये अशा किती गाड्या आहेत ?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, मी ही माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो हे अगोदरच सांगितलेले आहे.

सभापती : ठीक आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांचा दूरचित्रवाणीवर झालेला अपमान आणि संबंधितांना दिलेला दम याबाबतीत काय कारवाई केली आहे हे मी मघाशी आपल्याला विचारलेले आहे.

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, ज्यावेळेला पुणे येथे अपघात झाला. त्यावेळी आय.बी.एन.चॅनेलवर चर्चा सुरु होती. मला घरी रात्री 10.00 ते 10.30 च्या सुमारास संबंधित चॅनेलच्या प्रतिनिधीचा फोन आला आणि त्यांनी मला विचारले की, या संबंधात तुमची प्रतिक्रिया काय आहे ? त्यावेळी मी त्यांना व्यवस्थितपणे उत्तरे देत होतो. आम्ही या अनुषंगाने काय कार्यवाही केली, हा प्रकार कसा घडला ? या प्रश्नांच्या बाबतीत मी अत्यंत नम्रपणे आणि शांतपणे उत्तरे देण्याचा प्रयत्न करीत होतो. परंतु आयबीएन चॅनेलचे श्री.निखील वागळे हे ज्याप्रकारे बोलले ते सर्वांनी, तसेच साहेबांनी देखील पाहिले आणि त्यांनी मला फोन देखील केला. ही बाब खूप लोकांना आवडलेली नाही. श्री.निखील वागळे यांनी "तुम्हाला शरम वाटत नाही काय" अशा प्रकारचे वक्तव्य माझ्या संदर्भात केले आणि ते माझ्या मनाला लागले. मी त्यांना सांगितले की, तुम्ही राज्याच्या माननीय मंत्री महोदयांबरोबर बोलत आहात. एखाद्या जबाबदार मंत्र्यांबरोबर कसे बोलले पाहिजे? आपण नीटपणे बोलावे हे मी त्यांना नीटपणे समजावून सांगण्याचा प्रयत्न केला.

सभापती महोदय, मला याबाबतीत सांगावयाचे आहे की, या गोष्टींवर कुठेतरी निर्बंध आले पाहिजेत. कारण चॅनेलचे प्रतिनिधी असे समजतात की, मंत्री असतील किंवा लोकप्रतिनिधी असतील ते सगळे गुन्हेगार आहेत, दरोडेखोर आहेत आणि हे सगळेजण कायम चुका करीत असतात असे समजून ते वागतात आणि बोलण्याचा प्रयत्न करतात. श्री.निखील वागळे जे बोलले ते माझ्या मनाला लागले. मी त्यांना सांगितले की, आम्ही गुन्हेगार नाही, आम्ही लोकांची कामे करतो, सेवा करतो आणि एवढया मोठ्या प्रचंड व्यापामध्ये काम करीत असतो. याठिकाणी संबंधित गाडीचा ....

. . . .डी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25490 . . .

श्री.गुलाबराव देवकर . . . .

ड्रायव्हर हा .मानसिकदृष्टया ग्रासलेला होता आणि त्याने चूक केली त्याला आमचा संपूर्ण विभाग जबाबदार नाही. तसेच आम्ही याबाबतीत जास्तीतजास्त काळजी घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

यानंतर श्री.अ.शिगम .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25490...

श्री.गुलाबराव देवकर...

माझ्या बाबतीत जो प्रकार घडला तो मी सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. मला काहीजणांनी सांगितले की, आपण त्यांच्या विरुध्द विशेष हक्कभंगाचा प्रस्ताव दाखल करावा. परंतु मी तसे काही केलेले नाही. मी आपल्या निदर्शनास ही बाब आणू देऊ इच्छितो की, या बाबतीत सूचना दिल्या गेल्या पाहिजेत, अशी माझी विनंती आहे.

सभापती : पुणे येथे जो दुर्दैवी प्रकार घडला त्या संदर्भात कोणत्याही पत्रकारांनी किंवा अन्य कोणीही माहिती मागविणे आणि त्या संदर्भातील वस्तुस्थिती समजून घेणे हा वेगळा भाग आहे. परंतु आपण कोणीतरी आहोत या अविर्भावात "तुम्हाला शरम वाटते काय" असे बोलणे हा मंत्री महोदयांचा अपमान तर आहेच पण तो लोकप्रतिनिधींचाही अपमान आहे, शासनाचा अपमान आहे. तेव्हा मला वाटते की, या संदर्भात कुठेतरी गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे.

श्री.जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, एस.टी.महामंडळाच्या गाड्यांच्या होणाऱ्या अपघाता संदर्भात उत्तर देण्यात आलेले आहे की, कर्मचाऱ्यांना झालेल्या अतिश्रमामुळे अपघात झालेले नाहीत. गाड्यांच्या नादुरुस्तीमुळे अपघात झालेले नाहीत. तेव्हा माझा प्रश्न आहे की, मग या अपघातांची कारणे काय आहेत, अपघात आपोआप होतात काय ? मी आपल्यामार्फत माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास एक बाब आणून देऊ इच्छितो की, एस.टी.कर्मचाऱ्यांना किमान वेतन मिळत नसल्यामुळे त्यांची मन:स्थिती बरोबर नाही हे त्या मागील एक कारण आहे. दुसरे म्हणजे एस.टी.महामंडळामध्ये गाड्यांच्या स्पेअर पार्टची खरेदी निकृष्ट दर्जाची असते. मागील अधिवेशात सुध्दा स्पेअर पार्टस संबंधी प्रश्न उपस्थित झाला होता. आर.सी. रद्द करुन खालचे अधिकारी लोकल पार्टस घेतात आणि ते निकृष्ट दर्जाचे असतात. माझा प्रश्न आहे की, एस.टी.कर्मचाऱ्यांचे कमी झालेले भत्ते पूर्ववत केव्हा करणार ? लोकल पर्चेस किती डिव्हीजनमध्ये झाले आणि कोणत्या डिव्हीजनमध्ये किती अपघात झाले याची माहिती मंत्री महोदय देतील काय ?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी कर्मचाऱ्यांच्या वेतना संदर्भात आणि भत्त्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला. त्या बाबत सांगू इच्छितो की, कनिष्ठ वेतना बाबतचा प्रश्न मागील अनेक वर्षापासून सुरु आहे, त्या बाबत शासन स्तरावर ताबडतोब निर्णय

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25490...

श्री.गुलाबराव देवकर...

घेत आहोत. कोणत्याही कर्मचाऱ्याला कमी वेतन मिळेल अशी परिस्थिती राहणार नाही अशा पध्दतीचे धोरण लवकरात लवकर तयार करीत आहोत. सन्माननीय सदस्यांनी लोकल पर्चेस संदर्भात प्रश्न विचारला त्या बाबत सांगू इच्छितो की, आपण जे काही पर्चेस करतो ते अतिशय पारदर्शकपणे करतो. आपण टेंडर काढून खरेदी करतो. तीन-चार टेंडर आल्यानंतर त्यातील कमी किमतीचे आणि उत्कृष्ट दर्जाचा माल पुरविणारे टेंडर सिलेक्ट करतो. कोणत्याही सप्लायरला किंवा ठेकेदाराला फेव्हर करण्याचे काम कोणत्याही टेंडरमध्ये किंवा ऑर्डरमध्ये केले जात नाही हे मी येथे नम्रपणे सांगू इच्छितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

एस.टी.महामंडळाने पार्सल सेवा बंद केल्यामुळे महामंडळाचे

होत असलेले लाखो रुपयांचे नुकसान

(3) * 25540 श्री.जयप्रकाश छाजेड , श्री.मोहन जोशी , श्री.उल्हास पवार , श्री. एस. क्यू. ज़मा : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्य एस.टी.महामंडळाने माल वाहतूक सेवा माहे डिसेंबर,2011 पासून बंद केली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, माल वाहतूक सेवा बंद केल्यामुळे एस.टी.महामंडळाला वाहतूक सेवेतून मिळणारे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, सदर सेवा बंद करण्याची सर्वसाधारण कारणे कोणती व ही सेवा पुर्ववत किती कालावधीत चालू करण्यात येणार आहे,

(4) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री.गुलाबराव देवकर, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता : (1) व (2) हे खरे नाही.

(3) सदर सेवा बंद करण्यात आली नसल्यामुळे सेवा पूर्ववत करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, एस.टी.महामंडळा संबंधी अगोदरच्या दोन प्रश्नावर भरपूर चर्चा झाली. एस.टी.महामंडळातील भ्रष्टाचारा संबंधी ज्या ज्या वेळी प्रश्न विचारला जातो त्यावेळी अधिकाऱ्यांकडून आलेले उत्तर हे चुकीचे असते. सन्माननीय सदस्य दर वेळेला चुकीच्या आधारावर प्रश्न विचारतात म्हणून असे उत्तर येत असावे असा प्रश्न आमच्या सर्वाच्या मनात निर्माण झालेला आहे. एस.टी.महामंडळामध्ये पार्सल सेवा विभाग सुरु झाला. पहिली तीन वर्षे झाल्यानंतर नवीन टेंडर काढण्याची वेळ आली त्यावेळी धुळे येथील एका कंपनीला मदत करण्यासाठी टेंडरमध्ये चुकीच्या पध्दतीने अटी घालण्यात आल्या. माननीय उच्च न्यायालयाने ती अट नंतर रद्द केली. एखाद्या संस्थेला मदत करण्यासाठी टेंडर प्रक्रिया वेळोवेळी लांबविण्यात आली. या मध्ये पाच महिन्यांचा विलंब झाला आहे. यामध्ये दर महिन्याला दोन कोटी रुपये आणि तीन महिन्यांचे एकूण सहा कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे.

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25540....

श्री. जयप्रकाश छाजेड...

नुकसान काहीच झालेले नाही असे सांगण्यात येत आहे.

सभापती महोदय, माझा पहिला प्रश्न असा आहे की, परिवहन विभागामार्फत या सगळ्या प्रश्नाची गांभीर्याने चौकशी करण्यात येणार आहे का? मला या ठिकाणी निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, या संस्थेचे चेअरमन श्री. सुधाकर परिचारक यांनी स्वत: या प्रकारणाची चौकशी करावी असे आदेश दिलेले आहेत. स्वत: चेअरमननी या संबंधीच्या चौकशीचे आदेश देऊन सुध्दा चौकशी होणार नसेल तर संबंधित मग त्या विभागातील कायद्याचे अधिकारी असतील किंवा फायनान्सचे अधिकारी असतील ज्यांनी चुकीचे सल्ले दिलेले आहेत त्या सगळ्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करण्यात येणार आहे का असा माझा दुसरा प्रश्न आहे.

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे त्या संदर्भात टेंडर देण्याची प्रक्रिया सुरु असून अतिशय पारदर्शकतेने ते टेंडर देण्यात येत आहे. सुरुवातीला सन 2005 ते 2008 या कालावधीमध्ये बाबा ट्रेडिंग कंपनीला 10 कोटी रुपयांचे टेंडर दिले होते. त्यांची मुदत संपल्यानंतर सन 2008 ते 2011 या कालावधीसाठी सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे जोशी फ्रेट कॅरिअर धुळे यांना 22 कोटी 87 लाख रुपयांचे टेंडर देण्यात आलेले आहे. या टेंडरची मुदत संपल्यानंतर पुन्हा तिसऱ्यांदा टेंडर काढण्यात आले. एस.के.ट्रान्सलाईन प्रा. लि. जळगाव यांना 37 कोटी 11 लक्ष रुपयाचे टेंडर देण्यात आलेले आहे. हे टेंडर 22 कोटी रुपयावरुन 37 कोटी रुपयापर्यंत आलेले आहे. निविदाधारकांनी मोठया प्रमाणात जास्तीचा दर दिलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला होता की, टेंडर रद्द झाले. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, पहिल्या वेळेला एकच टेंडर आलेले होते, ते पात्र टेंडर नव्हते म्हणून त्यावेळी ते तहकूब केले, रद्द केले. दुसऱ्या वेळी दोन टेंडर आली होती ती दोन्ही टेंडर पात्र नव्हती. पात्र नसल्यामुळे साहजिकच ती रद्द केली. पुन्हा तिसऱ्यांदा आपण टेंडर मागविले. त्यावेळी 6 टेंडर्स आली. 6 टेंडर्सपैकी दोन टेंडर्स अपात्र होती आणि 4 टेंडर्स पात्र होती या 4 पात्र टेंडर्समध्ये एस.के.ट्रान्सलाईन प्रा.लि.जळगाव यांनी जास्तीचा दर दिलेला होता. त्यामुळे त्यांच्या 37 कोटी 11 लाख रुपयांच्या टेंडरला मंजुरी देण्यात आली. ही टेंडर्स प्रक्रिया होईपर्यंत आणि काम सुरु होईपर्यंतचा मधला काळ वाया जाऊ नये, एस.टी. विभागाचे नुकसान होऊ नये

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25540...

श्री. गुलाबराव देवकर....

यासाठी गेल्या दोन-तीन महिन्यापासून कुरीयरचे काम डिपार्टमेंटमार्फत करण्यात येत होते. त्यामुळे निश्चितपणे टेंडरच्या तुलनेमध्ये थोडयाफार प्रमाणात वसुली कमी झालेली आहे. याचे कारण असे की,या कामासाठी एस.टी. महामंडळाची स्वतंत्र यंत्रणा लावली नव्हती. या ठिकाणी जो स्टाफ होता जे काही कर्मचारी होते त्यांच्या माध्यमातून काम करण्याचा प्रयत्न केला आणि पार्सल सेवा कायम स्वरुपी चालू ठेवली त्यामध्ये कोणतीही अनियमितता झालेली नाही.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आपले संरक्षण एवढयाचसाठी पाहिजे की, ज्यावेळी एखादे सन्माननीय सदस्य प्रश्न विचारतात आणि विशेषत: प्रश्न विचारणारे सन्माननीय सदस्य हे त्या महामंडळाच्या संघटनेचे पदाधिकारी आहेत. प्रश्नाचे उत्तर कसे टोलवायचे याचे मूर्तिमंत उदाहरण हे आहे. मंत्री महोदयांनी सविस्तर उत्तर दिले असले तरी आमचे आणखी चार प्रश्न असू शकतात. सभापती महोदय, कुठे तरी न्याय मिळावा यासाठी प्रश्न दिले जातात. मंत्री महोदय, सुध्दा अशा प्रकारची अधिकाऱ्यांनी दिलेली उत्तरे मान्य करुन सभागृहात येतात. म्हणून ही जी टोलवाटोलवी चालते या विषयी सभापती महोदय, आपण ताकीद दिली पाहिजे असे मला प्रामाणिकपणे वाटते.

एस.टी.महामंडळाने ही पार्सल सेवा सुरु करण्यास सांगितली आहे. त्यातील काही विभागामध्ये विशेषत: पुणे, धुळे आणि जळगाव अशा ठिकाणच्या या पार्सल सेवा अद्यापर्यंत नीट सुरु झालेल्या नाहीत. तेथील व्यापाऱ्यांनी या संदर्भात आमच्याकडे निवेदने दिलेली आहेत की, येथील सेवा बंद असल्यामुळे आम्ही इतर ठिकाणावरुन ती चालू करीत आहोत हे खरे आहे का? या ठिकाणच्या सेवा आतापर्यंत नीटपणे सुरु झाल्या नसतील तर आतापर्यंतचे त्यांचे उत्पन्न काय आणि गेल्या तीन महिन्या या सेवा नीट सुरु न झाल्यामुळे महामंडळाचे किती नुकसान झालेले आहे?

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 25540.....

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, गेल्या दोन महिन्यापासून म्हणजे जानेवारी, 2012 पासून आपण डिपार्टमेंटल काम सुरु केले आहे आणि त्यामध्ये दोन्ही महिन्याचे सरासरी उत्पन्न 35 ते 40 लाख रुपये मिळालेले आहे. काही जिल्ह्यामध्ये हे काम सुरु व्हावयाचे राहिले असेल, पुणे,धुळे,जळगाव जिल्ह्यामध्ये राहिले असेल तर त्या ठिकाणी आपली यंत्रणा किंवा स्टाफची कमतरता असल्यामुळे हे काम सुरु करु शकलो नसेल. परंतु आता जे टेंडर फायनल केलेले आहे त्याप्रमाणे 1 एप्रिल पासून या कामाला सुरुवात होणार आहे. जेव्हा 1 एप्रिलपासून सदर कंत्राटदाराकडून कामाला सुरुवात होईल त्यावेळी सर्वच जिल्ह्यामध्ये हे काम सुरु होणार आहे. त्यामुळे 1 एप्रिल पासून पुढच्या कालावधीमध्ये यामध्ये कोणतीही अडचण राहणार नाही.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, या प्रश्नातून आपल्याला अतिशय मूलभूत विषयाकडे जाता येऊ शकेल. खरे म्हणजे एस.टी.महामंडळ हे राज्यातील सगळ्यात जुने आणि सगळ्यात नावाजलेले महामंडळ आहे. परिवहन महामंडळाचे दोन महत्वाचे भाग होतात. त्यातील एक भाग म्हणजे प्रवासी वाहतूक आणि दुसरा भाग म्हणजे माल वाहतूक. माल वाहतूक करुन त्यामधून अधिकचा नफा मिळण्याची शक्यता अधिक असते. कारण प्रवासी वाहतुकीवर होणाऱ्या खर्चाच्या मानाने माल वाहतुकीवर होणारा खर्च हा या उद्दिष्टापैकी एक भाग असणे फार आवश्यक आहे. अशी परिस्थिती असताना जितक्या गोष्टी आऊटसोर्स करता येतील त्याकडेच आपल्या महामंडळाचा कल का असावा ? आपल्याकडे मनुष्यबळ असताना त्यांना योग्य प्रशिक्षण देऊन, माल वाहतुकीसाठी सुसज्ज करणे, त्यांची तयारी करणे आणि त्यासाठी प्रत्येक जिल्ह्याप्रमाणे वेगवेगळ्या पायाभूत सुविधा निर्माण करणे आवश्यक आहे. एस.टी. महामंडळाच्या जागा बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा अशाच पध्दतीनेच जर सर्व कारभार चालवावयाचे असतील तर कागदोपत्री ते चांगले दिसतील पण सेवेच्या दृष्टीने ते चांगले होणार नाही. म्हणून माल वाहतूक ही प्रवासी वाहतुकीइतकीच महत्वाची समजून त्या बाबतीत नवीन धोरण एस.टी. महामंडळ स्वीकारणार का ?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, यामध्ये फायद्याची बाब कोणती असणार आहे हे तपासून पुढच्या काळामध्ये धोरण ठरवावे लागणार आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 25540.....

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, मूळ प्रश्न वेगळा आहे. यामध्ये भ्रष्टाचाराचा प्रश्न आहे. माझा साधा प्रश्न आहे. मला माननीय मंत्री महोदयांकडून सविस्तर उत्तर नको. राज्य परिवहन महामंडळाचे अध्यक्ष श्री. सुधाकरराव परिचारक यांनी या भ्रष्टाचाराची चौकशी करण्याचे आदेश दिले होते का ? कारण त्यांचा तो अधिकार आहे. जर त्यांनी आदेश दिले असतील तर त्याचे काय झाले ?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, जर असे आदेश दिले असतील तर त्या संदर्भात माहिती घेऊन निश्चितपणे त्या पध्दतीने चौकशी करण्यात येईल.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

सभापती : ज्यावेळी हा प्रश्न उत्तरासाठी आला त्यावेळी सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, आपण अतिशय चांगले सविस्तर उत्तर दिले. परंतु मी सन्माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, या प्रश्नाचे जे अधिकृत उत्तर आलेले आहे ते फार तुटपुंजे आहे अशी एकंदरीत सदनाची भावना होऊ नये. राज्य परिवहन महामंडळाच्या सन्माननीय अध्यक्षांनी या बाबतीत जो व्यवहार झालेला आहे किंवा जी अनियमितता झालेली आहे त्या अनुषंगाने चौकशीचे आदेश दिले होते का, असा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी विचारलेला आहे.

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, चौकशीसाठी पत्र दिलेले आहे आणि त्या पत्राचा निश्चितपणे विचार करुन त्याबद्दल कार्यवाही करण्यात येईल.

सभापती : मी सन्माननीय राज्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, आपण सविस्तर चांगले उत्तर देण्याचा प्रयत्न करता पण राज्य परिवहन महामंडळाकडून ज्यावेळी शासनाकडे उत्तर येते त्यावेळी ते उत्तर सविस्तरपणे येत असताना महामंडळाच्या सन्माननीय अध्यक्षांनी या बाबतीत काही अनियमितता आहे असे म्हटले असेल तर त्याची वस्तुस्थिती सुध्दा सभागृहासमोर आली पाहिजे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बीड जिल्ह्यातील माजलगांव तालुक्यात धान्यकोटा वाटपात झालेला भ्रष्टाचार

(4) * 25740 श्री.विनायकराव मेटे , श्री.हेमंत टकले , ॲड. उषा दराडे , श्री.रमेश शेंडगे : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) बीड जिल्ह्यातील माजलगांव तालुक्यात 45 हजार शिधापत्रिका वाटप करणे गरजेचे असतांना अर्ध्या शिधापत्रिकांचे वाटप करण्यात आले आहे, मात्र धान्य कोटा संपूर्ण शिधापत्रिका धारकांना वितरित करण्यात आल्याचे माहे डिसेंबर, 2011 च्या तिसऱ्या सप्ताहात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर धान्य साठयाचा विनियोग कसा केला गेला व त्याचा तपशिल काय आहे,

(3) तसेच ज्यांचेकडे शिधापत्रिका नाहीत त्यांना धान्य वितरित करणेबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप, कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अनिल देशमुख : (1) नाही.

(2) प्रश्न उद्‌भवत नाही.

(3) व (4) ज्या कुटुंबांची नावे स्वस्त धान्य दुकानदारांकडील कार्डधारकांच्या यादी आहेत परंतु ज्यांच्या शिधापत्रिका जीर्ण झाल्या आहेत किंवा हरवल्या आहेत अशा शिधापत्रिका धारकांनाच दुय्यम प्रत देण्यात येवून त्या आधारे स्वस्त धान्य दुकानामार्फत धान्य वितरित करण्यात येते. ज्या कुटुंबाची नावे स्वस्त धान्य दुकानदारांकडील कार्डधारकांच्या यादीत नाहीत व ज्यांनी नवीन शिधापत्रिका मिळणेसाठी अर्ज केला आहे त्यांना नियमाप्रमाणे तपासणी करुन नवीन शिधापत्रिका देण्यात येते व त्यानंतरच धान्य वितरित करण्यात येते.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यामध्ये किती शिधापत्रिकांचे वाटप केले आहे आणि ज्यांना शिधापत्रिकांचे वाटप केलेले आहे त्यांना किती धान्याचे वाटप केले आहे ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यामध्ये 69,339 शिधापत्रिकांचे वाटप करण्यात आले होते. त्यापैकी 34,558 शिधापत्रिका जीर्ण झाल्यामुळे त्याऐवजी नवीन शिधापत्रिका देण्यात आल्या आहेत. 4192 क्विंटल बीपीएलच्या गव्हाचे वाटप केलेले आहे. त्या तालुक्यात वाटप केलेल्या धान्याची माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, या प्रश्नाच्या उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, ज्या कुटुंबाची नावे स्वस्त धान्य दुकानदाराकडील कार्डधारकांच्या यादीत नाहीत व ज्यांनी नवीन शिधापत्रिका मिळण्यासाठी अर्ज केला आहे त्यांना नियमाप्रमाणे तपासणी करुन नवीन शिधापत्रिका देण्यात येते व त्यानंतरच धान्य वितरित करण्यात येते." मंत्री महोदयांनी नवीन शिधापत्रिका

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

देण्याच्या प्रक्रियेची माहिती नमूद केलेली आहे. माजलगाव तालुक्यातील किती अर्ज प्रलंबित आहेत आणि त्यांना किती दिवसात शिधापत्रिका देण्यात येतील ?

श्री.अनिल देशमुख : माजलगाव तालुक्यातील अर्ज प्रलंबित आहेत हे खरे आहे. डिसेंबर, 2011 पर्यंत 53 हजार शिधापत्रिका होत्या. 5 मार्च, 2012 पर्यंत 69,369 शिधापत्रिका देण्यात आलेल्या आहेत. म्हणजे 15-16 हजार शिधापत्रिका दिलेल्या आहेत. ज्या अर्जदारांनी कागदपत्रे व्यवस्थित सादर केलेली असतात त्याबाबत कार्यवाही करुन नवीन शिधापत्रिका दिली जाते.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, शिधापत्रिका कार्यालयाशी संबंधित माझा प्रश्न आहे. ठाण्याच्या शिधापत्रिका कार्यालयातील सर्व कर्मचा-यांना मुंबई येथे केंद्र सरकारच्या राजीव गांधी जीवनदायी योजनेच्या कामासाठी दिनांक 15 मार्च ते 17 एप्रिल, 2012 पर्यंत डेप्युट केलेले आहे. त्यामुळे ठाण्याच्या नागरिकांच्या दृष्टीने ही गंभीर बाब आहे. ही वस्तुस्थिती आहे काय आणि त्या कर्मचाऱ्यांना पुन्हा त्यांच्या कार्यालयात पाठविले जाईल काय ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, मूळ प्रश्नाशी या प्रश्नाचा काही संबंध नाही. सन्माननीय सदस्यांनी मला 5 मिनिटांपूर्वी या संदर्भातील एक पत्र दिले असून त्याबाबत माहिती घेऊन प्रत्यक्षात काय झाले आहे त्याची माहिती त्यांना देण्यात येईल.

श्री. एस.क्यू. ज़मा : सभापति महोदय, बी.पी.एल. के नए कार्ड इसलिए नहीं बनाए जाते क्योंकि अधिक कोटा शासन के पास उपलब्ध नहीं है. इससे बी.पी.एल. के लोगों को असुविधा हो रही है. लेकिन जब जाँच करने के बाद गलत बने हुए बी.पी.एल. के कार्ड रद्द कर दिए जाते हैं तो क्या आप उस निश्चित कोटे के अन्दर ही नए बी.पी.एल. के कार्ड बनाने की प्रक्रिया शुरु करेंगे ? मेरी जानकारी के अनुसार नए बी.पी.एल. के कार्ड नागपुर में बिल्कुल नहीं बन रहे हैं.

श्री.अनिल देशमुख : बीपीएल कार्डधारकासंबंधी केंद्र सरकारने लक्षांक दिलेला असतो. त्यापेक्षा अधिक बीपीएलची कार्डे राज्य शासनाला देता येत नाहीत. केंद्र सरकारने दिलेले लक्षांक शासनाने पूर्ण केलेले आहे. नवीन बीपीएलची यादी तयार करण्यासाठी शासनाने सर्वेक्षण सुरु केले असून त्याची संपूर्ण राज्यात कार्यवाही चालू आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील आर.टी.ओ. कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

(5) * 25724 **श्री.प्रकाश बिनसाळे , श्री.हेमंत टकले , श्री.रमेश शेंडगे , ॲड.उषा दराडे , श्री.विक्रम काळे , श्री.किरण पावसकर , श्री.अरुण गुजराथी , श्री.जयवंतराव जाधव , श्री.अनिल भोसले , श्री.दीपकराव साळुंखे , श्रीमती विद्या चव्हाण , श्री. एस. क्यू. ज़मा , श्री.माणिकराव ठाकरे , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री.एम.एम.शेख , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.राजन तेली , श्री.मोहन जोशी** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील आर.टी.ओ.कार्यालयात प्रथम, द्वितीय, तृत्तीय आणि चतुर्थ श्रेणीतील सुमारे 3580 पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर पदे रिक्त ठेवण्याची कारणे काय आहेत,

(3) तसेच, सदर पदे भरणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप, कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.गुलाबराव देवकर, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता : (1) मोटार वाहन विभागाचे आस्थापनेवर एकूण 3650 पदे मंजूर आहेत. त्यापैकी माहे डिसेंबर, 2011 अखेर 963 पदे रिक्त आहेत.

(2) व (3) सदर पदे भरण्यासाठी आयोगाकडे मागणी पत्र सादर करण्यात आले आहे. तसेच जाहिरात देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे निवड समितीच्या बैठका घेऊन पदोन्नती देणेबाबत निवडसूची तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, आरटीओ कार्यालयामध्ये 3650 पदे मंजूर असून व त्यापैकी 963 पदे डिसेंबर, 2011 अखेर रिक्त असल्याचे उत्तरात नमूद केलेले आहे. या आरटीओ कार्यालयामध्ये आपण गेलो तर तेथे दलालांचा सुळसुळाट दिसून येतो. आपण एखादे काम घेऊन गेलो तर ते लवकर होत नाही, परंतु दलालांमार्फत गेलो तर तेच काम लवकर होते असा सर्वांचा अनुभव आहे. कामाच्या विलंबाबाबत विचारणा केली असता या कार्यालयात बरीच पदे रिक्त असल्याचे एक कारण सांगितले जाते. त्यामुळे ही 963 पदे केव्हापासून रिक्त आहेत आणि ती पदे किती दिवसात भरण्यात येतील आणि आरटीओ कार्यालयाच्या बाहेर दलालांचा जो सुळसुळाट दिसून येतो तो केव्हा बंद करण्यात येईल ?

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर : परिवहन खात्याच्या मोटार वाहन विभागामध्ये 963 पदे रिक्त आहेत. त्या पैकी 324 पदे लोकसेवा आयोगा मार्फत भरावयाची आहेत. या रिक्त पदांच्या भरती बाबत लोकसेवा आयोगाकडे मागणी पत्र सादर केलेले आहे. लोकसेवा आयोगाने उमेदवार उपलब्ध करुन दिल्यानंतर त्यासंदर्भातील कार्यवाही निश्चितपणे केली जाईल. 324 पदे लोकसेवा आयोगाकडून भरली जाणार आहेत. लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील 127 लिपिक, टंकलेखक इत्यादी पदांपैकी 10 पदांवर नियुक्त्या देण्यात आलेल्या आहेत. प्रतीक्षा सूचीवरील 32 उमेदवारांना नियुक्त्या देण्यासंदर्भात प्रादेशिक स्तरावर व्यवस्था करण्यात आलेली आहे. बाकीच्या पदाबाबत दोन-तीन महिन्यामध्ये निर्णय घेत आहोत. कार्यालयीन अधीक्षकाची 40, उपलेखापालाची 55 आणि वरिष्ठ लेखापालाची 92 पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही चालू आहे. दोन-तीन महिन्यामध्ये ही कार्यवाही पूर्ण होईल.

सन्माननीय सदस्यांनी दलालासंबंधीचा विषय या ठिकाणी उपस्थित केला. या संदर्भात मी परवा ॲडिशनल कमिशनर यांच्याशी चर्चा केली. हा प्रश्न संपूर्ण राज्यामध्ये अडचणीचा झालेला आहे. या विभागातील कार्यालयामध्ये दलाल गेल्या शिवाय काम होत नाही अशी लोकांची धारणा झालेली आहे. कमर्चा-यांची भरती झाल्यानंतर अतिशय काटेकोरपणे कडक निर्देश देऊन कोणताही दलाल आरटीओ कार्यालयात फिरणार नाही अशा प्रकारची व्यवस्था करावी लागेल आणि त्यासंदर्भात निश्चितपणे पावले उचलली जातील.

डॉ. दीपक सावंत : प्रत्येक विभागातील रिक्त पदे सरळ सेवेने भरण्यासाठी खूप मोठ्या प्रमाणावर विलंब होत आहे. लोकसेवा आयोगामार्फत ही पदे भरली पाहिजेत हे जरी खरे असले तरी पदे भरण्याच्या बाबतीत लोकसेवा आयोग तेवढे कार्यक्षम नाही हे वारंवार सदनासमोर सिद्ध झालेले आहे. तेव्हा रिक्त पदे भरण्यासाठी माननीय मुख्यमंत्री काही वेगळा पर्याय शोधून काढणार आहेत काय ?

श्री. गुलाबराव देवकर : या संदर्भात निश्चितपणे विचार करावा लागेल. आपण लोकसेवा आयोगाकडे पत्र पाठवितो. पण प्रोसिजरला वेळ लागतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण : लोकसेवा आयोग ही घटनात्मक तरतूद आहे. मध्यंतरीच्या काळामध्ये लोकसेवा आयोगाच्या बाबतीत काही प्रश्न निर्माण झाले होते. आता काम गतीने चालले आहे. ही रिक्त पदे लवकरात लवकर भरण्याकरिता त्यांना विनंती करीत आहोत. या बाबतीत वेळोवेळी लोकसेवा आयोगा बरोबर चर्चा झालेली आहे. लोकसेवा आयोगा मार्फत निश्चितपणे लवकरात लवकर पदे भरली जातील. तसेच आणखी दुसरी काही प्रक्रिया करता येईल का याचा देखील निश्चितपणे विचार केला जाईल. ही गोष्ट खरी आहे की पदे भरणे, त्यांचे योग्य प्रशिक्षण होणे, चांगल्या सुविधा देणे, संगणकीकरण करणे या सर्व गोष्टी करण्याचे प्रयत्न चालू आहेत. या कार्यालयाच्या कामामध्ये निश्चितपणे सुधारणा होईल असे आश्वासन मी देतो.

श्री. प्रभाकर घार्गे : लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षांचे पद भरलेले आहे काय ?

(उत्तर नाही)

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महापालिकेच्या ई-गव्हर्नन्स प्रणालीत असलेल्या त्रुटी

(६) * २५८८६ ***श्री.हेमंत टकले , ॲड. उषा दराडे , श्री.रमेश शेंडगे , श्री.विक्रम काळे , श्री.किरण पावसकर , श्री.जयवंतराव जाधव , श्री.अनिल भोसले , श्री.दीपकराव साळुंखे , श्रीमती विद्या चव्हाण*** **:** सन्माननीय ***मुख्य मंत्री*** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महापालिकेच्या ई-गव्हर्नन्स प्रणालीत अनेक त्रुटी असून सुमारे १०० कोटींचा अपहार झाल्याचे माहे जानेवारी, २०१२ च्या दुसऱ्या सप्ताहात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. भास्कर जाधव, श्री.पृथ्वीराज चव्हाण : (१) महानगरपालिकेच्या ई-गव्हर्नन्स प्रणालीचे माहिती व तंत्रज्ञान लेखा परीक्षण भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी माहे मार्च, २००८ मध्ये केले आहे. सदर लेखा परीक्षणादरम्यान महानगरपालिकेने विकसित केलेल्या काही आज्ञावल्यांमध्ये काही तांत्रिक त्रुटी आढळून आल्या आहेत. तथापि, सदर त्रुटी दूर करण्यात आल्या आहेत. तसेच सदर लेखा परीक्षणाच्या दरम्यान रु. १०० कोटीचा अपहार झाल्याची कोणतीही बाब उघडकीस आलेली नाही किंवा तसा आक्षेप लेखा परीक्षण अहवालात घेण्यात आला नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. हेमंत टकले : कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या ई-गव्हर्नन्स प्रणालीबाबतचा हा प्रश्न आहे. उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, काही तांत्रिक त्रुटी आढळून आल्या आहेत, पण भ्रष्टाचार मात्र झालेला नाही. ही पद्धत अंमलात आल्यानंतर ज्या काही सुधारणा झाल्या असतील किंवा ज्या काही तांत्रिक त्रुटी निर्माण झाल्या असतील त्यामुळे कामावर परिणाम झाला असेल, परिणामी काम थांबले तर विकास थांबेल. तेव्हा यासंदर्भात शासन काही सूचना देणार आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : आतापर्यन्त या ठिकाणी फायनान्शियल ऑडिट होत होते. परंतु यावेळी तांत्रिक लेखापरीक्षण म्हणजे आयटी ऑडिट झाले. हे ऑडिट होत असताना काही तांत्रिक चुका लक्षात आल्या. आपणास माहीत असेल की कल्याण-डोंबिवली महापालिकेने पहिल्यांदा असे एक सॉफ्टवेअर डेव्हलप केले की त्याला इंटरनॅशनल आणि नॅशनल लेव्हलवर एकूण ७ ॲवॉर्डस् मिळालेली आहेत. ११ मोडयूल्स ऑपरेट केली होती. त्यामध्ये तांत्रिक चुका होत्या. त्या दुरुस्त करण्यात आलेल्या आहेत. महानगरपालिकेचा कोणताही प्रशासकीय लॉस झालेला नाही.

...नंतर श्री. गिते...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पनवेल (जि.रायगड) येथील सरकारी धान्य काळा बाजारात विकल्याबाबत

(७) * २५०८६ *श्री.जयंत प्र. पाटील , श्री.कपिल पाटील* : सन्माननीय ***अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री***पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) येथील स्वस्त धान्य दुकानात विक्रीसाठी आलेला सुमारे सव्वा लाख किंमतीचा गहू व तांदूळ साठा जानेवारी २०१२ मध्ये पोलिसांनी जप्त केला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर विक्रीसाठी आलेला गहू व तांदूळ कोणत्या अधिकाऱ्यांने काळया बाजारात विकल्याचे निदर्शनास आले,

(३) असल्यास, संबंधित अधिकाऱ्यावर कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

श्री.अनिल देशमुख : (१) दिनांक ९ जानेवारी, २०१२ रोजी श्री अशोक कुमार ठक्कर यांचे मालकीच्या गाळ्यात गहू ७५ क्विंटल व तांदूळ १२ क्विंटल असे एकूण रु.७७,२१०/- किमतीचे धान्य जप्त करण्यात आले आहे.

(२) असे निदर्शनास आलेले नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, उपरोक्त प्रश्नास शासनाकडून "होय "असे उत्तर आलेले आहे. दिनांक ९ जानेवारी, २०१२ रोजी श्री. अशोक कुमार ठक्कर यांचे मालकीच्या गाळयात गहू ७५ क्विंटल व तांदूळ १२ क्विंटल असे एकूण रुपये ७७,२१०/- किंमतीचे धान्य पोलिसांनी जप्त केलेले आहे. धान्य जप्त केल्यानंतर या प्रकरणी कोणाला जबाबदार धरण्यात आले ? याप्रकरणी कोणत्या अधिकाऱ्यांना जबाबदार धरले आहे व त्यांचे विरुध्द कोणती कारवाई केली गेली आहे ? सदर गहू व तांदूळ काळया बाजारात विकण्यात आले नाही असे निदर्शनास आले आहे अशा प्रकारचे उत्तर दिलेले आहे. याबाबतची वस्तुस्थिती सभागृहासमोर समोर आली पाहिजे. ही बाब शासनाच्या निदर्शनास आली नाही तर हे संपूर्ण प्रकरण चौकशीसाठी सी.आय.डी.कडे पाठवा. अशा प्रकारचे धान्य काळया बाजारात विकले गेल्याची बाब आपल्या खात्याच्या निदर्शनास येत नसेल तर हे प्रकरणी शासन सी.आय.डी.कडे चौकशीसाठी देणार काय ?

२...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, एका खाजगी मालकाच्या गाळयामध्ये ७७,२१० रुपये किंमतीचा गहू आणि तांदूळ पकडण्यात आला आहे. याप्रकरणी ज्या मालकाचे गोडाऊन होते त्याचा मालक, ज्याने धान्य विकत घेतले ती व्यक्ती, वाहन चालक आणि गोडाऊन किपर या सर्वांना अटक करण्यात आलेली आहे. यांनी ज्या स्वस्त धान्य दुकानातून माल विकत घेतला होता, त्या दुकानदाराचे लायसन्स सस्पेंड करण्यात आलेले आहे.

श्री. दिवाकर रावते : हे संपूर्ण प्रकरण चौकशीसाठी सी.आय.डी.कडे देणार काय ?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, याप्रकरणी चार लोकांना अटक करण्यात आलेली आहे. स्वस्त धान्य दुकानदाराचे दुकानाचे लायसन्स स्पस्पेंड करण्यात आले आहे. त्या दुकानदारास सुध्दा अटक करण्यात येईल.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी मान्य केले आहे की, हा धान्यसाठा पकडण्यात आला आहे, तो सर्वसामान्य जनतेच्या शिधापत्रिकेवर वितरण करण्यासाठीचा हा साठा होता. श्री. ठक्कर यांच्या खाजगी गोडाऊनमधून पोलिसांनी सदर धान्यसाठी जप्त केलेला आहे. हा सर्वसामान्य जनतेच्या शिधापत्रिकेवर वितरण करण्यासाठीचा धान्यसाठा होता. तो जप्त केलेला धान्यसाठा शिधापत्रिका धारकांना वाटपासाठी परत देण्यात आला होता काय ? ज्या शिधापत्रिका धारकांना हा धान्यसाठा मिळाला नसेल तर त्यांच्यासाठी शासनाने काय उपाययोजना केलेली आहे ?

श्री.अनिल देशमुख : जो धान्यसाठा जप्त केला गेला होता, तो साठा शासन दरबारी जमा करण्यात आला आहे. सन्माननीय सदस्यांनी अतिशय महत्वाचा प्रश्न विचारला आहे. याप्रकरणी विभागाच्या अधिकाऱ्याने कारवाई करण्यास विलंब लावला आहे, त्या अधिकाऱ्यांविरुध्द आम्ही निश्चितपणे कारवाई करु. स्वस्त धान्य दुकानदाराचे लायसन्स रद्द करण्यात आलेले आहे. विभागाच्या अधिकाऱ्यांनी दुकानाचे लायसन्स रद्द करण्यासाठी विलंब लावला आहे. त्यांनी पुढची कारवाई म्हणजे या दुकानदारास अटक करावयास पाहिजे, ती देखील त्यांनी केली नाही. त्या दुकानदाराला निश्चितपणे अटक करण्यात येईल. हा धान्यसाठा ज्या विभागातील होता, तेथील शिधापत्रिका धारकांना धान्य मिळू शकले नाही, त्यांना त्यांच्या धान्याची भरपाई निश्चितपणे दिली जाईल.

यानंतर श्री. भोगले...

अशुद्धित प्रत / शिघ्रलेखासाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, ही फार गंभीर बाब आहे. असे प्रकार रायगड आणि पनवेल येथे उघडकीस आले. परंतु राज्यात सर्व ठिकाणी असे प्रकार सुरु आहेत. गरीब लोकांसाठी जे धान्य उपलब्ध करुन दिले जाते ते त्यांच्यापर्यंत पोहोचत नाही. हा प्रश्न वारंवार सभागृहात चर्चेला येत असतो. त्यामुळे ही वितरण व्यवस्था बदलणे आवश्यक आहे. केवळ एका ठिकाणी धाड टाकून अधिकारी आणि दुकानदार यांच्यावर कारवाई करुन हा प्रश्न मिटणार नाही. जर गरीब लोकांना धान्य मिळत नसेल तर ही योजना उपयोगाची नाही. या योजनेतील त्रुटींची गंभीर चौकशी करुन नवीन पर्यायी योजना शोधून काढली पाहिजे. या संदर्भात शासन विचार करणार आहे काय?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, अनेक गावांमध्ये, तालुक्यांमध्ये आणि जिल्हयाच्या ठिकाणी अशा प्रकारच्या घटना घडतात. त्यामुळे शासनाने आता धान्य हमी योजना या नावाने नवीन योजना सुरु केली आहे. या योजनेच्या माध्यमातून त्या गावामध्ये तीन महिन्यांचे धान्य बीपीएल लाभार्थ्यांना सर्व लोकांसमोर वाटप करण्यास मंजुरी दिली आहे आणि त्याची अंमलबजावणी लवकरात लवकर महाराष्ट्रात करीत आहोत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबईतील गिरणी कामगारांच्या घरांसाठी माहिती देणारे "चातकांचे वारस" या पुस्तकाबाबत

(८) * २६५४६ ***श्री.दिवाकर रावते , डॉ.दीपक सावंत*** **:** सन्माननीय ***मुख्य मंत्री*** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील १ लाख गिरणी कामगारांच्या घरासाठी २०० एकर जमीन आणि त्यासाठी १० हजार कोटी रुपये कसे उभारता येतील याची माहिती देणारे "चातकांचे वारस" ही मार्गदर्शक पुस्तिका शिवसेना नेत्यांनी दिनांक १८ ऑक्टोबर,२०११ रोजी मा.मुख्यमंत्री यांना दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुस्तिकेत कोणकोणत्या सूचना केलेल्या आहेत व त्यानुषंगाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) या संदर्भात पुस्तिकेतील बाबीवर अद्यापही निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

श्री.सचिन अहिर, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता : (१) "चातकांचे वारसदार" असे शीर्षक असलेली पुस्तिका देण्यात आलेली आहे.

(२) व (३) सदर पुस्तिकेत खालील स्वरूपाच्या सूचना आहेत.

अ) बृहन्मुंबई विभागात नाजकधा कायद्यांतर्गत अधिग्रहीत करण्यात आलेल्या ८७४.५३ हेक्टर जमिनीपैकी झोपडपट्टयांनी व्यापलेल्या जमिनींपैकी सुमारे १५० हेक्टर जमीन आहे. त्यातील किमान ५० हेक्टर जमीन गिरणी कामगारांच्या घरबांधणीकरिता उपलब्ध होऊ शकते आणि त्यामुळे किमान २५००० गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न मार्गी लागू शकतो. तसेच नाजकधा कायद्यांतर्गत कारखान्याकडून २०० हेक्टर जमीन उपलब्ध केल्यास गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न सुटू शकतो. तसेच आणखी ३०० हेक्टर जमीन अधिग्रहीत केल्यास मुंबईतील सर्व झोपडपट्टयांचाही प्रश्न सुटू शकतो.

ब) नगर विकास विभागाच्या दिनांक २४ ऑगस्ट, २०१० च्या आदेशानुसार म्हाडाला व महानगरपालिकेला देण्यात यावयाची जमीन तातडीने अधिग्रहीत करण्याची कार्यवाही करावी.

क) काही गिरण्यांना दिलेल्या जमिनीचा भाडेपट्टा संपल्यामुळे अथवा लवकरच संपणार असल्यामुळे १९८.७२ हेक्टर जमीन उपलब्ध होऊ शकते व तेथे ४ चटईक्षेत्र निर्देशांकांच्या उपलब्धतेनुसार २२५ चौ.फुटाची १ लाख १० हजार घरे उपलब्ध होऊ शकतात.

ड) एवढया मोठयाप्रमाणावर घर बांधणीसाठी निधी उपलब्ध करावा लागेल, त्यासाठी नगर विकास विभागाच्या आदेशानुसार महापालिकेच्या वाटयास येणाऱ्या जमिनीवरील चटई क्षेत्राचा गिरणी मालकांकडून संपूर्ण व्यापारीकरणासाठी वापर होत असल्यामुळे त्यांच्या हस्तांतरणावर रु.१५ ते २० हजार प्र.चौ.फूट अधिभार लावल्यास शासनास किमान अडीच ते तीन हजार कोटी रूपये गिरणी कामगारांच्या घरबांधणीसाठी उपलब्ध होऊ शकतील इत्यादी.

उपरोक्त मुद्दयांबाबत खालीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहे.

अ) नाजकधा अधिनियमांतर्गत बृहन्मुंबई नागरी समुहात कलम १०(३) व १०(५) ची कार्यवाही करून प्रत्यक्ष ताब्यात घेण्यात आलेल्या १२६.२० हेक्टर क्षेत्रापैकी झोपडपट्टी व्याप्त क्षेत्र ८५.८७ हेक्टर ना विकास क्षेत्राखाली १९.७० हेक्टर, कोर्ट रिसिव्हरच्या ताब्यात असलेले क्षेत्र ३.०० हे. वाटप केलेले क्षेत्र १७.४३ हेक्टर व मोकळे क्षेत्र ०.२० हेक्टर इतके आहे. तर नाजकधा अधिनियमाच्या कलम २० खाली औद्योगिक प्रयोजनार्थ सूट दिलेले क्षेत्र सुमारे १०५४.४४ हेक्टर इतके आहे. सदरहू सूट दिलेले क्षेत्र शासनाच्या ताब्यात घेता येणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ब) शासनाच्या दिनांक २४.८.२०१० च्या आदेशानंतर म्हाडास सुमारे २.२७ हेक्टर जागा हस्तांतरित झालेली आहे. तसेच मुंबईतील ज्या बंद कापड गिरण्यांच्या जागेचे प्रस्ताव बृहन्मुंबई महानगरपालिकेने मंजूर केले आहेत, अशा प्रस्तावामधून म्हाडा व बृहन्मुंबई महानगरपालिका यांना प्राप्त होणाऱ्या जमिनी प्राप्त झाल्या नसल्यास त्या प्राप्त होण्याच्या दृष्टीने तातडीने कार्यवाही करण्यास व ज्या बंद गिरण्याच्या जागांचे अभिन्यास प्रस्ताव मंजूरीसाठी प्रलंबित असतील अशा प्रस्तावांना ३ महिन्याच्या आत मंजुरी देण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेस नगर विकास विभागाने सूचना दिलेल्या आहेत.
क) गिरण्यांच्या जमिनी म्हाडास मिळण्याबाबत नगर विकास विभागाकडून कार्यवाही सुरु आहे.
(ड) चटई क्षेत्र हस्तांतरणाबाबत अधिभार लावण्याबाबतच्या उपरोक्त सूचनेप्रमाणे अद्याप असा कोणताही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, गिरणी कामगारांच्या घराचा प्रश्न वारंवार या सदनामध्ये मांडण्यात येतो. सरकारने त्या प्रश्नाबाबत आपली बाजू मांडली आहे. शिवसेना पक्षाच्या वतीने जी पुस्तिका आम्ही माननीय मुख्यमंत्र्यांना सादर केली त्या पुस्तिकेमध्ये घरांची उपलब्धता कशी करता येईल हे विस्तृतपणे सांगितले आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी त्या पुस्तिकेतील सर्व मुद्दे उत्तराच्या माध्यमातून पटलावर आणले आहेत त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.

सभापती महोदय, शासनाने जमीन कशी उपलब्ध होऊ शकत नाही हे उत्तराच्या माध्यमातून सांगून एकप्रकारे जखमेवर मीठ चोळले आहे. आम्ही शासनाला सुचविले होते की, नागरी जमीन कमाल धारणा कायद्यांतर्गत जी कारखान्यांची जमीन उपलब्ध व्हावयास पाहिजे ती तातडीने ताब्यात घेतली तर केवळ गिरणी कामगारांसाठी नव्हे तर इतर भागातील प्रकल्प बाधितांसाठी आणि झोपडपट्टयांसाठी घरे तयार होऊ शकतात अशी स्थिती आहे. प्रत्येक वेळेला मालकधार्जिणे धोरण का निर्माण होते हे आम्हाला कळून येत नाही. औद्योगिक प्रयोजनाकरिता सूट दिलेले क्षेत्र सुमारे १०५४.४४ हेक्टर इतके आहे. सदर सूट दिलेले क्षेत्र शासनाच्या ताब्यात घेता येणार नाही याची कारणे काय आहेत?

सभापती महोदय, सूट दिलेल्या क्षेत्रात बांधकाम करण्याकरिता कोणत्या सवलती दिल्या आहेत, किती चटईक्षेत्र मंजूर केले आहे? झोपडपट्टीव्याप्त क्षेत्र ८५.८७ हेक्टर असून ना विकास क्षेत्र १९.७० हेक्टर आहे. काहीतरी वाद निर्माण झाल्यामुळे कोर्ट रिसिव्हरच्या ताब्यात ३ हेक्टर क्षेत्र गेलेले आहे. या जमिनीची मालकी सरकारकडे येण्याची आवश्यकता आहे. वाटप केलेले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ KTG/

११:५०

श्री.दिवाकर रावते..... ता.प्र.क्र.२६५४६....

क्षेत्र १७.४३ हेक्टर असून ०.२० हेक्टर क्षेत्र मोकळे आहे हे शासनाने मान्य केले आहे. ही सगळी जमीन एकत्र केली तर ९० हेक्टर इतकी होते. झोपडपट्टीच्या संदर्भातील एसआरए योजना खाजगीरित्या राबविल्या जातात, त्या योजना म्हाडाने राबविल्या तर झोपडपट्टीधारकांसाठी घरे उपलब्ध होऊन विक्रीयोग्य घरांसाठी जे भूखंड उरतील त्यावर काही प्रमाणात घरे बांधता येतील. १०५४.४४ हेक्टर क्षेत्रावर कोणत्या सवलती दिल्या आहेत, चटईक्षेत्र किती मंजूर केले आहे? मुंबईतील एन.टी.सी.च्या ताब्यातील गिरण्यांच्या जमिनीमधून २०० हेक्टर जमीन उपलब्ध होऊ शकते.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 26546..... श्री. दिवाकर रावते .....

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी ही जमीन देणार आहे. त्यांनी शासनाकडे असा प्रस्ताव दिलेला आहे की आम्ही 200 एकर जमीन देतो पण त्या बदल्यात ज्या ठिकाणी हे स्मारक उभारण्यात येईल तेथे आम्हाला एफएसआय द्यावा, पण हा प्रस्ताव शासनाने अद्यापही का स्वीकारला नाही ? म्हाडा व बृहन्मुंबई महापालिका यांना प्राप्त होणाऱ्या जमिनी प्राप्त झालेल्या नसल्यामुळे त्या प्राप्त करण्याच्या दृष्टीने तातडीने कारवाई करण्यासाठी तसेच अभिन्यास प्रस्ताव मंजुरीसाठी प्रलंबित असतील अशा प्रस्तावांना मान्यता देण्याबाबत संबंधितांना सूचना दिल्या व त्यांनी तीन महिन्यांच्या आत हे करावे असे म्हटले आहे. या कालावधीत एकूण किती जमीन मिळणार आहे ? शेवटी शासनाने जे उत्तर दिले ते पुन्हा मालकधार्जिणेच दिसते, तसे शासनाने करु नये अशी माझी मागणी आहे. तसेच मंत्री महोदयांना यासंबंधीची चांगली माहिती आहे की मिल कामगारांची चौकशी झाली, जो पैसा मिळाला पण चटई क्षेत्र असण्याबाबत व त्यावर अधिभार लावण्याबाबत उपरोक्त सूचनेनुसार अद्याप कोणताही प्रस्ताव शासनाकडे नाही, त्याबाबत शासन कोणता निर्णय घेणार आहे ? या भागातील घरांचा प्रति चौरस फुटाचा दर 1 लाख रुपये आहे आणि आपण 2 हजार रुपयाप्रमाणे या जमिनी घेतल्या आहेत. यात जर शासनाने प्रिमीयमच्या माध्यमातून प्रयत्न केला तरी त्यातून 4-5000 कोटी एवढी रक्कम गिरणी कामगारांची घरे बांधण्यासाठी उभी राहू शकते, त्यामुळे ही अडचण सुध्दा राहणार नाही. या मुंबईत शहरातील तसेच प्राईम लोकेशनच्या जमिनी आहेत म्हणून गिरणी कामगारांच्या दृष्टीने सकारात्मक प्रस्ताव शासनाने लवकरात लवकर घेऊन आवश्यक ती घरे उपलब्ध करण्याचा प्रयत्न करणार काय ?

श्री. सचिन अहिर : महोदय, सन्माननीय सदस्यांनी सुरुवातीला "नाजकधा" या शब्दाबद्दल विचारले त्याबाबत मी सांगू इच्छितो की, "नागरी जमीन कमाल धारणा" या कायद्याचे संक्षिप्त रुप म्हणून असा शब्दप्रयोग केलेला आहे.

त्यानंतर सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना या विषयाच्या अनुषंगाने व्यक्त केल्या त्यांचे मी स्वागत करतो. तसेच त्यांनी ज्या सूचना दिल्या आहेत त्यासंदर्भात उत्तर देत असताना त्यांच्या म्हणण्याप्रमाणे किंवा प्रश्नात उल्लेख केल्यानुसार उत्तर देखील सविस्तर आणि स्पष्टपणे दिलेले आहे, ही वस्तुस्थिती आहे. कलम 58 (अ)(1) अशी दुरुस्ती आपण नुकतीच केली असून त्यामागील

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुलभूत संकल्पनेत मी जाऊ इच्छित नाही. परंतु ही दुरुस्ती केल्यानंतर आणि न्यायालयाची मान्यता मिळाल्यानंतर शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे जेवढी जमीन घेतलेली आहे ती घेण्याचा प्रयत्न केला आहे.

हे निश्चित आहे की, 15.78 हेक्टर जमीन उपलब्ध होणे आवश्यक होते पण प्रत्यक्षात 9.12 हेक्टर एवढीच जमीन उपलब्ध झाली. त्यावर आपण आतापर्यंत गिरणी कामगार आणि उपकर प्राप्त इमारतीत राहण्याऱ्या लोकांसाठी घरे बांधण्याचा प्रयत्न केला. काही लोक जमीन देत नाहीत असे निदर्शनास आल्यानंतर सन 2010 मध्ये शासनाने एक जी.आर. काढला व त्याच्या आधारे भविष्यात पुनर्बांधणी करावयाची म्हटले तर कलम 58 (1) आणि (2) प्रमाणे 1/3 जमीन म्हाडाला आणि शासनाला द्यावीच लागणार आहे, असाही प्रयत्न शासनाने केला आहे. असे केल्यामुळे हे लोक उच्च न्यायालयात गेले व शासनाच्या या निर्णयाला स्थगिती आणण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणाचा अंतिम टप्प्यातील निर्णय शासनाच्याच बाजूने होईल. त्यानंतर ही 15.78 हेक्टर जमीन शासनाला मिळेल. त्यानंतर सन्माननीय सदस्यांनी गिरणी कामगारांच्या बाबतीत मालक धार्जिणे निर्णय शासनाने घेऊ नयेत असा उल्लेख केला. मी त्यांना सांगू इच्छितो की, गिरणी कामगारांच्या विषयाला बगल न देता त्यांना पूर्णपणे विश्वासात घेऊन घरे कशी मिळवून देता येतील त्यासाठी कामगार संघटनांचे प्रतिनिधी, विभिन्न पक्षाचे प्रतिनिधी यांच्यासोबत माननीय मुख्यमंत्र्यांनी बैठक घेतली. या चर्चेत एक समिती नेमण्याचा प्रयत्न करण्यात आला असून त्यात जी घरे बांधण्यात येतील त्यांचे दर काय असणार आणि दुसरे जे प्रश्न निर्माण होणार असतील त्यासाठी एक समिती आणि युएलसीची जमीन किंवा एमएमआरडीएच्या परिसरातील जिल्हा स्तरावरील जमिनी असतील अशा बाबींसाठी मंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्याचाही निर्णय घेण्यात आला. या समितीमध्ये संघटनेच्या तीन पदाधिकाऱ्यांचा समावेश करण्यात येईल. हे झाल्यानंतर या प्रश्नाला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न होईल.

शेवटचा मुद्दा म्हणजे आपण कंपनी कायद्याप्रमाणे जमिनी देण्याचे काम केले होते त्यासाठी कलम 58 (1) मध्ये तरतूद करीत असताना हे अधिकार देण्याचा त्यावेळेस प्रयत्न केला नव्हता. तसेच सन्माननीय सदस्यांनी चार्जेस लावण्याचा प्रश्न निर्माण केला तो प्रस्ताव सध्या विचाराधीन नाही.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर ...

परंतु या प्रश्नाच्या अनुषंगाने काही करता आले तर निश्चितपणे यासंदर्भात विचार केला जाईल.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, गिरणी कामगारांच्या घरांच्या संदर्भातील प्रश्न हा नाजूक व भावनात्मक आहे. नियम 58(1) मध्ये जर आपण बदल करु शकतो तर त्या नियमामध्ये अजून बदल करावयाचे झाले तर ते आपण करु शकतो. परंतु एनटीसीची 200 हेक्टर जागा मिळते काय यासंदर्भात जर आपण पडताळणी करुन पाहिली तर यातून मार्ग निघू शकेल. गिरणी कामगारांना घरे मिळाली पाहिजेत ही आपल्या सर्वांची भावना आहे. गिरणी कामगारांना घरे मिळावीत यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी खूप चांगले प्रयत्न केलेले आहेत. एनटीसी सरकारच्या अखत्यारीत असून त्यांच्यांकडून आपल्याला 200 हेक्टर जागा मिळू शकते काय ? तसेच नियम 58(1) मध्ये आपल्याला काही बदल करावे लागले तर ते आपण करणार आहात काय ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, आज जरी नियम 58(1) मध्ये फेर विचार करण्याची भूमिका घेतली तरी जमिनी उपलब्ध आहेत काय हा महत्वाचा प्रश्न असून अनेक जमिनी रिडेव्हलपमेंटला गेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी सुध्दा प्रश्न विचारला आहे की, एनटीसी कडून 200 हेक्टर जागा मिळू शकेल. परंतु यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, एनटीसीने काही जमिनींची विक्री केली असून एवढे वर्ष त्यांनी जे पैसे खर्च केलेले आहे व जे आधुनिकीकरण केलेले आहे त्याचे पैसे त्यांनी वळते केलेले आहेत. काही गिरण्यांमध्ये एनटीसीने आधुनिकीकरणाचे काम केलेले आहे तर काही गिरण्या विक्री करण्याचे बाकी आहे. यासंदर्भात जर एनटीसी कडून प्रस्ताव आला तर त्याचा आपण निश्चितपणे विचार करु शकू. परंतु तूर्त 200 हेक्टर जमीन एनटीसीकडे उपलब्ध आहे याबाबत आपल्याकडे कोणताही आकडा नाही. एनटीसीने काही गिरण्या जॉईंट व्हेंचरमध्ये सुरु ठेवल्या असून त्यांना शासन म्हणून हे सांगू शकत नाही की, जॉईंट व्हेंचर न करता तिकडच्या गिरण्या बंद करुन त्या ठिकाणच्या जमिनीची विक्री करा किंवा ती जमीन आम्हाला द्या असे आपल्याला आज त्यांना सांगता येणार नाही. ज्यावेळेस भविष्यकाळात जमीन उपलब्ध होण्याची परिस्थिती निर्माण होईल त्यावेळी यासंदर्भातील विचार करता येईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते :सभापती महोदय, आपण काहीनूर मिलच्या 6 गिरण्यांच्या बाबतीत यासंदर्भातील निर्णय घेतलेला आहे. काहीनूर मिलने बाकीच्या जागा विकून शासनाला एकाच ठिकाणी जागा दिली होती. कोहीनूर मिलची 1/3 जमीन घेता व बाकीची जमीन डेव्हलप करण्याची त्यांना तुम्ही मोकळीक दिली होती. त्यामुळे एनटीसीच्या बाबतीत प्रस्ताव का देत नाही ? एनटीसी तुम्हाला प्रस्ताव देणार नाही तर तुम्ही एनटीसीकडे गिरणी कामगारांच्या घरांकरिता प्रस्ताव घेऊन गेले पाहिजे. या ठिकाणी मंत्री महोदयांनी जे उत्तर दिलेले आहे ते गिरणी कामगारांना मारक आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात सांगितले आहे की, मी जेव्हा जेव्हा दिल्लीत जातो तेव्हा महाराष्ट्राच्या हिताकरिता जातो आणि काम करुन घेऊन येतो. इतर मुख्यमंत्र्यासारखा मी दिल्लीला भटकत नाही. माननीय मुख्यमंत्र्यांकडे जे सामर्थ्य आहे त्याचा वापर त्यांनी करावा अशी आमची या प्रश्नामागची भूमिका आहे त्यामुळे मंत्रीमहोदयांनी सकारात्मक बोलावे अशी विनंती करतो.

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, अशा प्रकारचा प्रस्ताव आमच्याकडून करता येईल का हे पाहण्यात येईल.

श्री. रामदास कदम : सन्माननीय सभापती महोदय, गिरणी कामगारांच्या घराचा प्रश्न हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. गिरणी कामगारांना जागा देण्यासाठी शासनाने तसेच तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी चुकीचे निर्णय घेतले होते. 100-100,140 एकर शासनाची जागा शासनाने काही बिल्डरांना 3 के.प्रमाणे दिलेली आहे. परंतु या जागेचा म्हाडाकडून विकास केला तर गिरणी कामगारांच्या जागेचा प्रश्न मोठया प्रमाणात सुटू शकेन. ठाणे येथे हिरानंदानीला 115 एकर जागा कब्जा हक्काने दिलेली आहे. कांदिवली येथे 100 एकर, सांताक्रुझला 140 एकर, आकृती बिल्डरला 150 एकर जागा शासनाने दिलेल्या आहेत. बिल्डरांना जागा देण्यामध्ये शासनाचे सुध्दा काही अधिकारी गुंतलेले आहेत. या ज्या जागा दिलेल्या आहेत त्याच्या पार्टनरशिपमध्ये शासन सुध्दा आहे. गिरणी कामगारांचा प्रश्न सोडविण्यासाठी आपल्याला जर जागा हवी असेल तर बिल्डरांच्या घशात टाकलेल्या जागा परत घेऊन त्या जागा म्हाडाला विकास करण्यासाठी दिल्या तर गिरणी कामगारांच्या जागेचा प्रश्न सुटू शकेल ?

यानंतर श्री. भारवि...

अशुधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वस्त्रोद्योग महामंडळ गिरणी कामगारांसाठी आहे. परंतु, वस्त्रोद्योग महामंडळाच्या माध्यमातून गिरण्यांच्या जागा विकून दिल्लीत पाच हजार कोटी रूपये घेऊन गेले. तेव्हा माननीय मुख्यमंत्र्यांनी दिल्लीत आपले वजन वापरून पाच हजार कोटी परत आणले तर गिरणी कामगारांना घरे देता येऊ शकतील. तेव्हा तसा प्रयत्न माननीय मुख्यमंत्री करणार आहेत काय ?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, या प्रश्नाला विस्तृतपणे उत्तर देण्यात आले आहे.

सभापती : हा गिरणी कामगारांचा प्रश्न आहे म्हणून अपवादात्मक बाब म्हणून मी पाच मिनिटे वेळ वाढवून दिलेला आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोदजी तावडे यांना देखील प्रश्न विचारावयाचा आहे. त्यामुळे त्यांना देखील मी प्रश्न विचारण्याची संधी देत आहे. त्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी एकत्रित उत्तर द्यावे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी विचारलेल्या प्रश्नाला माझा पूरक प्रश्न आहे. माननीय राज्यमंत्री महोदयांनी सांगितले की, मुंबईतील काही गिरण्या जॉईंट व्हेंचरमध्ये सुरू आहेत. त्या गिरण्या जॉईंट व्हेंचरमध्ये सुरू आहेत की, त्यांचे टाय-अप झाले आहे ? गिरणी चालू आहे हे दाखविण्यासाठी 100 मशिन्स नावाला टाकून ठेवलेल्या आहेत. तेव्हा गिरणी चालू आहे असे दाखविण्याचे जे प्रयत्न करीत आहेत त्यांचे सर्वेक्षण करण्यात यावे. त्यामुळे आपल्याला खऱ्या अर्थाने जॉईंट व्हेंचर आहे की नाही ते कळेल. 10-15 वर्षाने जमीन विकण्यासाठी ज्यांनी नाममात्र जॉईंट व्हेंचर करून ठेवले आहे त्यांच्या विरूद्ध सरकार कोणती कारवाई करणार आहे ?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, या प्रश्नाला विस्तृतपणे उत्तर देण्यात आले आहे. आता काही नवीन प्रश्न उपस्थित झालेले आहेत. मी येथे पुन्हा सांगू इच्छितो की, नियम 58 नुसार जागा वाटपाचा निर्णय झाला. तो निर्णय योग्य होता की, अयोग्य होता यासंबंधी मी टिप्पणी करणार नाही. हे प्रकरण सुप्रीम कोर्टामध्ये गेल्यानंतर निर्णय झालेला आहे. त्यावेळच्या राज्य शासनाने आपला इंटरेस्ट प्रोटेक्ट करण्याचा प्रयत्न केला. गिरणी कामगारांसाठी जास्तीत जास्त मिळविण्याचा प्रयत्न झाला. परंतु, तो निर्णय आपल्या बाजूने काही लागला नाही. मोकळ्या जागेची 1/3 वाटणी झाल्यामुळे आपल्या वाट्याला खूप कमी जमीन आली. जी जमीन आली त्यामध्ये घरे

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण.....

बांधली गेली आहेत. पहिल्या टप्प्यामध्ये जवळ जवळ 7 हजार घरे बांधली आहेत. ती घरे कशी वितरित करायची याचा निर्णय झालेला आहे.

मी काही दिवसांपूर्वीच गिरणी कामगारांच्या शिष्टमंडळाला भेटलो आहे. जुना जो निर्णय झाला आहे त्यानुसार काही जमीन येणे बाकी आहे. त्यातील 3 हेक्टर जमीन मिळालेली आहे. अधिक अतिरिक्त जमीन मिळविण्याचा प्रयत्न सुरू आहे. ती मिळाल्यानंतर पुढे काय करायचे, त्या घरांची किंमत किती असेल, ती घरे म्हाडानेच बांधायची काय, गृहनिर्माण संस्थाना प्लॉट द्यायचे काय यासंबंधी विचार सुरू आहे. बांधलेली घरे वितरित करण्याचा निर्णय झालेला आहे. शासनाने 8 लाख 34 हजार एवढी किंमत उंच इमारतीतील सदनिकांसाठी, तर 4 लाख 81 हजार इतकी किंमत 4 मजली इमारतीतील सदनिकांसाठी ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. काही संघटनांनी व विरोधी पक्षाने घरांची किंमत कमी करता येईल काय या बद्दल विचारणा केली आहे. त्यामुळे शासनाने मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली आहे. एका आठवड्यामध्ये त्यात काही करता येईल काय याचा विचार करण्यासाठी सदर समिती नेमली आहे. दुसरी समिती महसूल मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली नेमली आहे. या समितीला आणखी कुठे जागा उपलब्ध करून देता येईल याचा विचार करण्यास सांगितले आहे. या समितीला बृहन्मुंबईच्या एमएमआरडीच्या रिजनमध्ये जागा मिळेल काय, हे बघण्यास सांगितले आहे.

काही गिरणी कामगार गावी गेले आहेत. त्यांनी अशी मागणी केली आहे की, आम्ही गावच्या घरी गेलो आहोत. आता आम्हाला पुन्हा मुंबईला यायला लावू नका. आम्हाला आमच्या जिल्हा मुख्यालयात जागा दिली तर आमची मुले बाळे सुखाने तेथे राहतील. तेथे गृहनिर्माण सोयायटयांना जागा उपलब्ध करून देता येईल काय याबद्दल देखील माननीय महसूल मंत्र्यांना सांगण्यात आले आहे. येथे नवीन प्रश्न उपस्थित केले आहेत. गिरणी मालकांकडून त्यांच्या वाट्याला आलेल्या जमिनी परत घेता येईल काय, अशा प्रकारचा नवीन प्रश्न सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम व माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी उपस्थित केला आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण . . . .

सुप्रीम कोर्टाने याबाबतीत अंतिम आदेश दिलेले असल्यामुळे पुन्हा तो प्रश्न उपस्थित करता येईल की नाही याबाबत अभ्यास करावा लागेल. त्याचबरोबर जॉईंट व्हेंचर करुन नाममात्र मशिनरी तेथे ठेऊन आमचा कारखाना चालू केला अशा पध्दतीने काही ठिकाणी जमीन वाचविण्याचा प्रयत्न होत आहे ही गोष्ट माझ्या निदर्शनास आली आहे. त्यामुळे मला असे वाटते की, सर्व गिरणी मालकां बरोबर चर्चा करु आणि असे जर काही घडणार असेल आणि त्यातून जर शासनाची फसवणूक होणार असेल तर त्याबाबत गंभीर कारवाई करण्यात येईल यादृष्टीने मी निश्चितपणे चर्चा करीन. मात्र आपल्याला हा प्रश्न सोडवावयाचा असून शासन या बाबतीत गंभीर आहे. कारण ज्या माणसांनी मुंबईच्या निर्मितीसाठी, समृध्दीसाठी त्याग केला आहे, त्यांच्याकरता आजच्या पिढीने काहीतरी केले पाहिजे यादृष्टीने शासन निश्चितपणे विचार करील.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

. . . .ओ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 289 अन्वये देण्यात आलेल्या प्रस्तावाच्या सूचनेबाबत

सभापती : आज सर्वश्री डॉ.दीपक सावंत, श्री.दिवाकर रावते, श्री,रामदास कदम, डॉ. नीलम गोऱ्हे व श्री.परशुराम उपरकर यांनी नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याबाबत सूचना दिलेली आहे. सदरहू विषय नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाचा विषय कसा होतो यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात सांगावे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आज मी आणि इतर सन्माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे. कारण राज्यामध्ये आणि मुंबईमध्ये दोन्ही ठिकाणी स्वाईन फ्ल्यूची साथ पसरत आहे. तसेच मुंबई शहरामध्ये आपल्याला जवळजवळ 5 पॉझिटीव्ह रुग्ण सापडलेले आहेत. मुंबई शहर हे दाटीवाटीचे आणि गर्दीचे असल्यामुळे या श्वसन रोगाचा प्रसार येथे झपाट्याने होऊ शकतो अशी आमच्या सर्वांच्या मनामध्ये भीती आहे. अशा रुग्णांसाठी कस्तुरबा हॉस्पिटल, जे.जे.रुग्णालय येथे विशेष कक्ष उघडले जाणार आहेत ते सशक्त आहेत काय ? तेथे व्हेन्टीलेटर्स् आहेत काय? तेथे औषधांचा पुरेसा साठा आहे काय? त्याचबरोबर फ्लू हॉल्ट गोळ्यांची एक्सपायरी डेट संपली आहे काय या विषयावर सदनामध्ये चर्चा होणे आवश्यक आहे. कारण हा लोकांच्या जीवन-मरणाशी संबंधित प्रश्न आहे. त्यामुळे माझी विनंती आहे की, या रोगाच्या बाबतीत चर्चा करण्यासाठी सभागृहासमोरील कामकाज थोडे बाजूला ठेवावे किंवा या विषयावरील चर्चेसाठी वेगळा वेळ देणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणून आपल्याला माझी विनंती आहे की, स्वाईन फ्लू च्या नियंत्रणाबाबत आणि त्याच्या प्रसाराबाबत वेगवेगळया बातम्या येत आहेत. त्यामुळे लोकांमध्ये देखील घबराट निर्माण होत आहे. त्यामुळे या विषयाच्या बाबतीत विचार व्यक्त करण्यासाठी आपण मला वेळ द्यावा अशी मी विनंती करतो.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी या सदनामध्ये औचित्याच्या मुद्याव्दारे पहिल्याच आठवड्यात हा मुद्दा उपस्थित केला होता. कारण पुण्यामध्ये स्वाईन फ्लू मुळे मृत्यू झालेल्यांची संख्या सातत्याने वाढत आहे. सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार आणि सन्माननीय आरोग्य मंत्री डॉ.सुरेश शेट्टी यांनी गेल्या आठवड्यात पुण्यातील सर्व आमदारांची बैठक घेतली. त्यावेळी व्हॅक्सीनची उपलब्धता, त्याबाबतीत कोणते प्रश्न निर्माण होत आहेत तसेच टॅनी फ्लु गोळयांच्या बाबतीत काय परिस्थिती आहे आणि प्रत्येक मोठ्या शहरातील हॉस्पिटलमध्ये सेपरेट वॉर्ड करण्यासाठी सरकारने कोणत्या उपाययोजना केलेल्या आहेत हे जाणून घेणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, एप्रिल-मे मध्ये टेम्परेचर वाढले की स्वाईन-फ्ल्यू चा जोर कमी होतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पण पुन्हा जून-जुलै मध्ये हेच संकट उभे रहाते. त्यामुळे अर्थसंकल्पीय अधिवेशन संपण्यापूर्वी स्वाईन-फ्लू बाबत राज्य स्तरावर सरकारने कोणत्या उपाययोजना केलेल्या आहेत याबद्दल चर्चा करण्यासाठी आपण वेळ राखून ठेवावा आणि या विषयावर चर्चा घडवून आम्हाला शासनाकडून समर्पक उत्तर मिळावे अशी आमची विनंती आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत, श्री.दिवाकर रावते, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी स्वाईन फ्लू बाबत मुद्दा उपस्थित केला आहे. मला असे वाटत की, अधिवेशन सुरु असताना या विषयाच्या बाबतीत शासन युध्दपातळीवर कोणती तयारी करीत आहे यासंबंधीची माहिती जनतेपर्यंत जाणे खूपच आवश्यक आहे. कारण ज्यावेळी अशा प्रकारचे मेजर क्रायसेस येतात त्यावेळी घाईघाईमध्ये काही लॅप्सेस सुध्दा होत असतात. मी माननीय मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले की, स्वाईन फ्लू च्या संबंधातील फ्लू-हॉल्ट म्हणून ज्या गोळ्या आहेत, त्या दिल्लीमधील आरोग्य विभागाकडून येतात आणि त्या येथे दिल्या जातात. परंतु या गोळयांची एक्सपायरी डेट संपल्यानंतर या गोळया आल्या असून त्या वाटण्यात आल्या आहेत. ही गोष्ट लक्षात आल्यानंतर मी संबंधित अधिकाऱ्यांशी बोललो. त्याबाबत ते असे म्हणाले की, यामध्ये आमचा दोष नाही. आमच्याकडे दिल्लीतील आरोग्य विभागाकडून ज्या गोळ्या पाठविण्यात आल्या, त्या आम्ही वाटल्या आहेत. पण या गोळया पाठविण्यात आल्यानंतर त्या आपण पहातो की नाही. अशा प्रकारे अनेक लॅप्सेस होत असतात म्हणून अशा प्रकारच्या गोष्टी लोक प्रतिनिधींच्या माध्यमातून चर्चेला आल्यानंतर त्यादृष्टीने काळजी घेण्यात आली तर अनेकांचे प्राण वाचविता येतील. म्हणून सभापती महोदय, आपण लवकरात लवकर या विषयावरील चर्चा करण्यासाठी परवानगी दिली तर अधिक उपयुक्त होईल या अर्थाने आपण हा विषय घ्यावा.

यानंतर श्री.अ.शिगम . . ..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

सभापती : मी आज सकाळी "स्वाईन फ्ल्यू" आजारा संबंधी या सदनाचे नेते व माननीय उप मुख्यमंत्री, माननीय विरोधी पक्ष नेते, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्या सोबत चर्चा केलेली आहे. आजच्या कामकाजपत्रिकेवर हा विषय नसला तरी राज्यातील जनतेच्या आरोग्याच्या दृष्टीने हा महत्वाचा प्रश्न आहे. तेव्हा या विषयावर मी चर्चा करण्यास मान्यता दिलेली आहे. या विषयावरील चर्चा केव्हा घ्यायची व चर्चेस किती वेळ द्यावयाचा या बाबत माननीय विरोधी पक्ष नेते व सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्याशी चर्चा करुन ठरविण्यात येईल. या प्रश्नावर चर्चा घडवून आणण्याचे मी निर्णय घेतलेला आहे.

दुसरी एक नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना माझ्याकडे आलेली आहे. माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे, सर्वश्री पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र.पाटील, संजय केळकर, डॉ.दीपक सावंत, ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर, श्री.चंद्रकात पाटील, डॉ.नीलम गोऱ्हे, श्रीमती शोभा फडणवीस, सर्वश्री परशुराम उपरकर, केशवराव मानकर, रामनाथ मोते, सय्यद पाशा पटेल, डॉ.रणजित पाटील यांनी "गडचिरोली जिल्ह्यात काल नक्षलवाद्यांनी जो भीषण स्फोट घडवून आणला त्यामध्ये सीआरपीएफचे 12 जवान मारले गेले." या विषयावर नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. या संदर्भात विरोधी पक्ष नेते यांनी थोडक्यात आपले विचार मांडावेत.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, अधिवेशन सुरु असताना नक्षलवाद्यांनी स्फोट घडवून आणला त्यामध्ये सीआरपीएफचे 15 जवान आणि 8 जण गंभीररित्या जखमी झालेले आहेत. हे अधिवेशन सुरु होण्यापूर्वी महामहिम राज्यपाल यांनी आपल्या अभिभाषणात शासन नक्षलवाद्यांचा कसा बिमोड करणार आहे याचा उल्लेख केला होता. आता अधिवेशन सुरु असताना ही घटना घडली आहे. नक्षलवाद फक्त गडचिरोली जिल्ह्यापुरता मर्यादित राहिला नसून तो नाशिक पासून डोंबिवलीपर्यंत त्याचे पुरावे सापडले आहेत असे गृह विभागाने पत्रकारपरिषदेत सांगितले आहे. फेब्रुवारी 2009 नंतर ही मोठी घटना घडली आहे. अशी घटना घडल्या नंतर यामध्ये स्थानिक माणसे आहेत की बाहेरची माणसे आहेत या बाबत वेगवेगळ्या प्रकारची माहिती येत असते. आंध्र प्रदेशमध्ये पोलीस कारवाई सक्त झाल्यामुळे नक्षलवादी इकडे सरकरले आहेत काय अशा ब-याच गोष्टी त्यामध्ये आहेत. केंद्र सरकार आणि राज्य सरकार नक्षलवादाचा बिमोड करण्यासाठी प्रयत्न

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे..

करीत आहे. राज्यात इतकी मोठी घटना घडल्यानंतर त्यावर सभागृहात चर्चा होणे आवश्यक आहे असे मला वाटते. कारण ही गंभीर बाब आहे. माननीय गृहमंत्री हे स्वत: गडचिरोली येथे माहिती घेण्यासाठी गेले आहेत. ते परत आल्यानंतर या विषयावर चर्चा करु शकतो. तेव्हा आपण ही चर्चा आवर्जून घ्यावी अशी माझी विनंती आहे.

सभापती : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने जे निवेदन केले ते विचारात घेता आणि आज सकाळी या संदर्भात सभागृहाचे नेते व उप मुख्यमंत्री, सन्माननीय विरोधी पक्ष नेते, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्या सोबत माझी चर्चा झाली आहे. घडलेला प्रकार अत्यंत भयावह आहे. माननीय गृह मंत्री गडचिरोली येथे परिस्थिती पाहण्यासाठी गेले आहेत. मी या विषयावर एक तास चर्चा करण्यास मान्यता दिलेली आहे. माननीय गृहमंत्री आज उपस्थित झाले तर आज चर्चा होईल. अन्यथा उद्या या विषयावर चर्चा होईल.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी "बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथील विकास आराखड्याची पूर्तता न करणाऱ्या तसेच विकास कामात निकृष्ट दर्जाच्या साहित्याचा सर्रास वापर करुन कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार करणाऱ्या संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी विकास कामे मुदतीत पूर्ण न केल्यामुळे उच्च स्तरीय चौकशी करण्याची व या आराखड्यानुसार विकास कामे तातडीने पूर्ण करण्या बाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. हा नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नागो पुंडलिक गाणार,विनोद तावडे, डॉ. रणजित पाटील, रामनाथ मोते यांनी "गोंदिया येथील सावजी शिक्षण संस्थेचे सचिव तसेच हरिहरभाई पटेल हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. सुरेश चौरागडे यांनी शाळेच्या कार्यालयीन वेळेत विनयभंग केल्याची तक्रार या संस्थेत परिचर या पदावर कार्यरत असणाऱ्या श्रीमती उषाबाई राणे यांनी दिनांक 22 मार्च,2012 रोजी गोंदिया येथील रावणवाडी पोलीस स्थानकात करणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील, जयंत प्र. पाटील यांनी "सर्वोच्च न्यायालयाचे आदेश तसेच विद्यार्थी आणि व्यवस्थापनाची गरज लक्षत घेऊन इंजिनिअरिंगच्या दुसऱ्या वर्षालाही 20 टक्के जागा संस्था स्तरावर भरण्यास परवानगी मिळावी यासाठी राज्यातील विविध संस्था आणि संघटनांनी वारंवार मागणी केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "मुंबई उपनगरातील गोरेगावंमध्ये दिनांक 28.3.2012 रोजी वा त्या सुमारास एका इमारतीतील लिफ्ट कोसळल्याने झालेल्या दुर्घटनेत दहा जण जखमी हाणे, राज्यात 86 हजार लिफ्ट असून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे केवळ 36 निरिक्षक असल्याने लिफ्टची नियमित तपासणी करणे कठीण असल्याने अपघाताच्या प्रमाणात वाढ झ ाल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी "राज्य शासनाने राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमाची अंमलबजवणी करुन केलेल्या पाहणीत कुष्ठरोगाचे प्रमाण झपाटयाने वाढत असल्याने कुष्ठरोग निर्मूलन योजना अधिक प्रभावीपणे राबविण्याची आवश्यकता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर, डॉ. दीपक सावंत यांनी "सिंधुदुर्ग जिल्हयातील सावंतवाडी तालुक्यातील साठेली गावातील लोह खनिज उत्खनन नियमबाह्य होत असल्याचे उघडकीस आल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकात पाटील, डॉ.रणजित पाटील, श्री. संजय केळकर यांनी "मुंबईत स्वाईन फ्ल्यूची लागण झालेले 5 पेशंट सापडल्याची दिनांक 26 मार्च,2012 रोजी उघडकीस आलेली घटना, स्वाईन फ्ल्यू रोगाला प्रतिबंध करणाऱ्या रॅनबॅक्सी कंपनीच्या फ्ल्यू हॉल्ट गोळयांची मुदत संपुष्टात आल्यानंतर रुग्णांना वाटण्यात आल्यामुळे रुग्णांवर त्यांचा विपरीत परिणाम झाल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.

या संदर्भात नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना देण्यात आली होता त्याबाबतचा निर्णय मी दिलेला असल्यामुळे मी या सूचनेला अनुमती नाकारित आहे.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: बोगस शिधापत्रिका तयर करुन केलेला भ्रष्टाचार याबाबत सर्वश्री विनोद तावडे,चंद्रकांत पाटील, संजय केळकर, रामनाथ मोते वि.प.स.यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री. अनिल देशमुख (अन्न व नागरी पुरवठा मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 1 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...4....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, 2 कोटी 12 लाख शिधापत्रिकांपैकी 54 लाख म्हणजे जवळ जवळ 25 टक्के शिधापत्रिका या राज्यात बोगस आहेत. बोगस शिधापत्रिका शोधल्या बद्दल किंवा बोगस करुन घेतल्या बद्दल मंत्री महोदय, श्री. अनिल देशमुख यांचे अभिनंदन केले पाहिजे.

प्रा. लक्ष्मण ढोबळे : अशा प्रकारे मिष्कील बोलून कसे चालेल?

श्री. विनोद तावडे : मी मिष्कील बोलत आहे की नाही माहीत नाही पण मी खरे बोलत आहे. यासंबंधीची आकडेवारी असे सांगते की, 25 टक्के शिधापत्रिका बोगस आहेत. या 25 टक्के शिधापत्रिका खोटया नोंदविल्या गेल्या आहेत हे देखील कर्तृत्व आहे.

सभापती : असा सन्माननीय सदस्यांचा आक्षेप आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, या शिधापत्रिका कोण देतात? या अन्न व नागरी पुरवठा विभागामार्फत देण्यात येतात. त्यामुळे 25 टक्के शिधापत्रिका खोटया नोंदविल्या याचे कर्तृत्व कोणाचे आणि शोधून काढल्या याचे कर्तृत्व कोणाचे? माझा मुद्दा असा आहे की, ज्या शिधापत्रिका नोंदविल्या जातात त्या प्रिंटिंग प्रेसमध्ये छापल्या जातात असे नाहीत. स्वस्तधान्य दुकानदार, जिल्हा पुरवठा अधिकारी आणि ठेकेदार यांच्या संगनमताने हे होत असते. 25 टक्के शिधापत्रिका खोटया नोंदविल्या गेल्या असतील तर यातील दोषींवर कारवाई करणार का? सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींनी दिनांक 25 मार्च अखेर नाराजी दाखविली आहे. पुणे, वर्धा आणि अमरावती या जिल्हयातील शिधापत्रिका कार्यालयातील संगणकीकरणाच्या बाबतीत दिरंगाई झालेली आहे ही दिरंगाई जाणीवपूर्वक झालेली आहे काय, असल्यास त्यावर कारवाई करण्यात येईल काय?

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

शाळेमध्ये जशी पटपडताळणी झाली त्या पध्दतीने शिधापत्रिकांच्या बाबतीत पटपडताळणी शासन करणार आहे का ?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो पहिला प्रश्न विचारला त्याबाबत सांगू इच्छितो की, या खोट्या शिधापत्रिका नसून अपात्र शिधापत्रिका आहेत. खोट्या आणि अपात्रमध्ये फरक आहे. ज्या शिधापत्रिका होत्या त्याची शोध मोहीम आम्ही संपूर्ण राज्यामध्ये तीन महिने राबविली. त्या शोध मोहिमेमध्ये ज्यांनी ज्यांनी फॉर्म भरुन दिले नाहीत, गैरहजर असल्यामुळे फॉर्म भरुन दिले नसतील, कोणाची बदली झाली म्हणून फॉर्म भरुन दिले नसतील किंवा जे ऊसतोड कामगार असतात ते गाव सोडून बाहेर जातात अशा ज्या लोकांनी फॉर्म भरुन दिले नाहीत त्या 54 लाख लोकांची यादी ही अपात्र लोकांची यादी आहे. त्याला खोट्या शिधापत्रिका म्हणता येणार नाही. यामध्ये आणखी एका महिन्याची मुदत दिलेली आहे. कारण त्यानंतर अनेक अर्ज आले की, या कालावधीमध्ये आम्ही गावामध्ये नव्हतो, तालुक्यामध्ये नव्हतो, जिल्ह्यामध्ये नव्हतो म्हणून आम्हाला ते फॉर्म भरता आले नाहीत. त्यामुळे आम्ही त्यांना परत एक महिन्याची मुदत दिलेली आहे. एक महिन्यामध्ये जे अपात्र शिधापत्रिकाधारक आहेत त्यांनी फॉर्म भरुन दिले, आपली संपूर्ण माहिती दिली तर त्यांना आम्ही नवीन शिधापत्रिका देऊ. त्यामुळे या ठिकाणी जो आकडा दिलेला आहे तो खोट्या शिधापत्रिकांचा नसून अपात्र शिधापत्रिकांचा आहे.

श्री. विनोद तावडे : त्यामध्ये खोट्या शिधापत्रिका काहीच नाहीत का ?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, त्यामध्ये काही खोट्या शिधापत्रिका असतील. सन्माननीय सदस्यांनी संगणकीकरणाच्या बाबतीत प्रश्न विचारला. संगणकीकरणाच्या बाबतीत राज्य शासनाने निर्णय घेतलेला आहे. आम्ही छत्तीसगडमध्ये एनआयसीचे सॉफ्टवेअर वापरुन जसे बारकोड पध्दतीने काम केलेले आहे त्या पध्दतीने राज्यामध्ये संगणकीकरण करीत आहोत. संपूर्ण महाराष्ट्राच्या संगणकीकरणासाठी आम्ही केंद्र शासनाकडे 103 कोटी रुपयांची मागणी केलेली आहे. केंद्र शासनाने सुध्दा त्या बाबतीत अनुकूलता दाखविलेली आहे. लवकरात लवकर हे पैसे मिळाल्यावर युध्द पातळीवर हे काम चालू करु. राज्य शासनाच्या माध्यमातून पाच जिल्ह्यांची निवड करण्यात आली असून त्या ठिकाणी पायलट प्रोजेक्टचे काम राज्यामध्ये चालू झालेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, काही बोगस रेशन कार्ड सापडले. आपण विविध खात्याचे काम करीत असलो तरी शेवटी राज्याचा प्रश्न असतो. एकट्या पुणे शहरामध्ये पावणेतीन लाख बोगस रेशन कार्ड सापडलेली आहेत. ही पावणेतीन लाख बोगस रेशन कार्ड कोणी दिली ? मधल्या काळामध्ये त्यांनी या रेशन कार्डचा फायदा घेऊन कर्ज घेणे, जागा घेणे, आधार कार्ड मिळविणे असे सगळे फायदे उपटलेले आहेत. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, या पावणेतीन लाख रेशनकार्ड धारकांनी जे काही दुरुपयोग केले असतील त्या बाबत शासन सीआयडीमार्फत कारवाई करणार का ? नाही तर ही रेशनकार्ड रद्द होतील आणि पुन्हा नवीन रेशन कार्ड येतील. आम्हाला माननीय मंत्री महोदय नेहमी अशी उत्तरे देतात की, जिल्हा स्तरावर दक्षता कमिटी केलेली आहे. पण आमच्या जिल्ह्यामध्ये तशी वस्तुस्थिती नाही. विभागीय स्तरावर दक्षता कमिटी करावी आणि विधानसभा व विधान परिषदेच्या सर्व सदस्यांना त्या कमिटीवर घ्यावे. जिल्हा स्तरावर कमिटी होत नाही याची कारणे माननीय मंत्री महोदयांना माहीत आहेत. विभागीय स्तरावर शासन दक्षता समिती नेमणार का ?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, मी मघाशी सांगितले की, अपात्र आणि बोगसमध्ये फरक आहे. त्यामध्ये अनेक अपात्र आहेत आणि काही बोगस सुध्दा असू शकतील. त्यामुळे आम्ही त्यांना एक महिन्याची मुदत दिलेली आहे. या एक महिन्यामध्ये या 54 लाखांपैकी ज्यांचे फॉर्म सर्व कागदपत्रांसह आमच्याकडे येतील त्यांना परत शिधापत्रिका देण्यात येतील.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी अपात्र आणि बोगस यात जो फरक केलेला आहे त्यामध्ये नक्की तथ्य आहे. हे करीत असताना बोगस केल्याचे सापडल्यानंतर त्यांना पाठीशी घातले जाते एवढेच मला सांगावयाचे आहे. या अपात्र किंवा बोगस शिधापत्रिकांवर त्या काळात जे धान्य वाटले गेले ते कोणत्या बाजारात विकले गेले ? असा हा एक मोठा घोटाळा आपल्या खात्याचा आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

त्यामुळे गंभीरपणे ही बाब घेऊन ज्या शिधापत्रिका अपात्र नसून बोगस होत्या त्यांच्यावर कारवाई करण्याचा मनोदय व्यक्त झाला पाहिजे. अन्यथा, मंत्री महोदय आपल्या पाठीशी घालण्यासाठी बसले आहेत असा त्यांचा समज होईल. आपण त्यांना पाठीशी घालत नाही हा भाग वेगळा आहे. म्हणून अपात्र व बोगस कार्डधारकांची माहिती एक महिन्यात द्यावी आणि बोगस कार्डधारकांविरुध्द कोणती कारवाई केली जाणार आहे त्याची माहिती आम्हाला द्यावी.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, एक महिन्याची मोहीम पुन्हा राबविण्यात येत आहे. ती संपल्यानंतर किती अपात्र व किती बोगसची आकडेवारी समोर येईल. बोगस कार्डधारकांची माहिती मिळाल्यावर संबंधितांवर कारवाई करण्यात येईल. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांची माहिती खरी आहे. यामध्ये बोगस कार्डधारक नाहीत असे मी म्हणत नाही. कारण बाहेरचे लोक सुध्दा कार्ड छापत असतात. त्यामुळे मध्यंतरीच्या काळात विभागाने धाडी टाकल्या होत्या. या 54 लाख कार्डामध्ये सगळयाच शिधापत्रिका अपात्र आहेत असे मी म्हणणार नाही. यामध्ये बोगस सुध्दा आहेत. एक महिन्यात तपासणी झाल्यावर बोगस कार्डाबाबत दोषी असलेल्यांवर कारवाई करण्यात येईल.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

पृ.शी. / मु.शी. :राज्यात अनेक जिल्ह्यात दक्षता समित्या गठित न होणे याबाबत सर्वश्री केशवराव मानकर, विनोद तावडे, पांडुरंग फुंडकर, श्रीमती शोभा फडणवीस वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.अनिल देशमुख (अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 2 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, सार्वजनिक वितरण प्रणालीबाबत मी नियम 93 अन्वये सूचना दिली होती. आमच्या जिल्ह्याच्या पालक मंत्र्यांकडे अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण खाते आहे हे आमचे अहोभाग्य समजतो. मी काही वस्तुस्थिती सभागृहाच्या माहितीसाठी सांगू इच्छितो. रेशनिंगच्या दुकानात धान्य 2-3 रुपये किलो या दराने विकले जाते. बाजारातील सर्वसाधारण ग्राहक आहे तो दुकानदाराला विकत असतो. 2-3 रुपये किलोच्या भावाचे धान्य लोकांना 10 रुपये दराने विकत घ्यावे लागते. याबाबत पोलीस विभाग, अन्न व नागरी पुरवठा विभाग कोणतीच दखल घेत नाही.

सभापती महोदय, आमच्या जिल्ह्यात जिल्हा स्तरीय व तालुका स्तरीय दक्षता समित्या अस्तित्वात नाहीत. ते धान्य रेशनिंगचे आहे की नाही असे लिहिलेले नसते. साखरेसंबंधी अशीच एक घटना घडलेली आहे. एस.पी.च्या पथकाने धाड टाकून 21 साखरेची पकडली होती. दक्षता समित्या हा एका जिल्ह्याचा विषय नाही तर संपूर्ण महाराष्ट्राचा प्रश्न आहे. आमगाव तालुक्यातील रेशनिंगची साखर पकडून एकाही दुकानदारावर गुन्हा नोंदलेला नाही. जे होलसेल व्यापारी आहेत त्यांनी सुध्दा अशी अफरातफर केलेली नाही. असे असताना पत्रकारांच्या अहवालावरुन तालुक्यातील रेशन दुकानदारांना व व्यापा-यांना त्रास देण्याचे प्रकार सुरु आहेत. श्री.द्वारकाप्रसाद अग्रवाल या व्यापाऱ्यावर कारवाई केल्यामुळे ते 18 दिवसापासून न्यायालयीन कोठडीमध्ये आहेत. जिल्ह्याचे पालक मंत्रीच दक्षता समित्यांचे अध्यक्ष असतात. मी माननीय मंत्री महोदयांना असा प्रश्न विचारतो की, त्यांनी आतापर्यंत दक्षता समितीच्या बैठका घेतल्या आहेत काय ? तालुक्यामध्ये सुरक्षा समितीची एकही बैठक होत नाही. सार्वजनिक वितरण प्रणालीच्या व्यवस्थेत दुरुस्ती करण्यासाठी मी नियम 93 ची सूचना दिली आहे. आमच्या जिल्ह्यात पालक मंत्री बैठका घेत नाहीत, ज्यांच्यावर या प्रणालीबाबत अधिकार दिलेला आहे ते जिल्हाधिकारी कोणतीही कार्यवाही करीत नाहीत. शासनाने किती दक्षता समित्यांच्या सदस्यांवर कारवाई केली आहे ? 2500 नागरिकांना एसएमएस केला जातो. परंतु मला जिल्ह्यातून किंवा तालुक्यातून एकही एसएमएस प्राप्त झालेला नाही. त्यामुळे शासनाच्या दोन्ही योजना व्यर्थ ठरलेल्या आहेत. शासनाच्या नागरी सेवा परिपत्रकाचे उल्लंघन झाल्यामुळे महाराष्ट्रातील किती जिल्हाधिकाऱ्यांनी यासंबंधी कार्यवाही केली आहे ?

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दक्षता समित्यांबाबत प्रश्न विचारलेला आहे. जिल्हा स्तरावर व तालुका स्तरावर दक्षता समित्या असतात. त्यानुसार राज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर दक्षता समित्यांचे गठन झालेले आहे. या दक्षता समित्यांसाठी 35,368 सदस्य नेमणे आवश्यक होते. राज्यातील बहुतेक जिल्ह्यात दक्षता समित्यांचे गठन झालेले आहे. ज्या जिल्ह्यात व तालुक्यात दक्षता समित्या स्थापन झालेल्या नाहीत त्याबाबत पालक मंत्र्यांना सूचना दिलेल्या आहेत. जिल्हा स्तरीय व तालुका स्तरीय दक्षता समित्यांच्या नियमित बैठका घेण्याबाबतही पालक मंत्र्यांना सूचना दिलेल्या आहेत.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख...

अनेक जिल्ह्यामध्ये दक्षता समित्यांच्या बैठका व्यवस्थित होतात. काही जिल्ह्यामध्ये त्या होत नसतील तर त्याबाबतीत मी पालकमंत्र्यांना विनंती करीन की त्यांनी आपापल्या जिल्ह्यामध्ये दक्षता समित्यांच्या बैठका घ्याव्यात. मी ज्या जिल्हयाचा पालकमंत्री आहे त्या ठिकाणी 7-8 बैठका घेतलेल्या आहेत.

श्री. परशुराम उपरकर : ग्रामस्तरावर माल आल्यानंतर तलाठ्यांनी ज्या पंचायती घालायच्या असतात त्या घातल्या जात नाहीत.या संदर्भात तलाठ्यावर कारवाई केली जाईल काय ? गॅस वितरण व्यवस्थेवर तहसीलदार यांचे नियंत्रण आहे काय असा प्रश्न मी तालुकास्तरावरील दक्षता समितीमध्ये विचारला होता. त्यावेळी त्यांनी गॅस वितरणावर नियंत्रण करता येत नाही, तो आमचा अधिकार नाही असे सांगितले. हे खरे नसेल तर याबाबतीत तहसीलदारावर कारवाई करण्यात येणार आहे काय ?

श्री. अनिल देशमुख : गावातील दक्षता समित्या देखील अतिशय महत्वाच्या असतात. गावातील दक्षता समित्यांच्या सचिवांनी बैठका बोलावल्या पाहिजेत. ज्या गावामध्ये सचिवांनी बैठका बोलावलेल्या नाहीत त्यांच्यावर कारवाई करण्याचे निदेश मी दिलेले आहेत. त्यांनी दक्षता समितीच्या नियमित बैठका घेतल्या पाहिजेत असा आग्रह आणि सूचना आहेत. जे सूचनांचे पालन करणार नाहीत त्यांच्या बाबतीत पुढील कारवाई करण्यात येईल. गॅसच्या बाबतीत ऑईल कंपनी जबाबदार असते. त्याबाबतीत काही तक्रारी आल्या तर तहसीलदारांनी त्या घेतल्या पाहिजेत आणि त्या ऑईल कंपनीकडे, बीडीओकडे आणि जिल्हाधिका-यांकडे पुढील कारवाईसाठी पाठविल्या पाहिजेत. अशा प्रकारचे अधिकार तहसीलदारांना आहेत.

श्री एस. क्यू. जमा : सभापति महोदय, मेरे दो प्रश्न हैं. एक प्रश्न तो यह कि यह सरकार बने दो साल पूरे हो जाने के बाद भी ग्रामीण क्षेत्रों और शहरी क्षेत्रों में भी अभी तक दक्षता समिति नहीं बनी हैं. माननीय मंत्री महोदय यहां पर कह जरुर रहे हैं, लेकिन वे दक्षता समिति अभी तक बन नहीं पा रही हैं. इसलिए मैं मंत्री महोदय से पूछना चाहता हूं कि क्या मंत्री महोदय आप एक टाइम बाउंड पीरियड हमें बता सकते हैं कि कितने दिनों के अंदर ये दक्षता समतियां बन जाएंगी ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जमा....

मेरा दूसरा प्रश्न यह है कि माननीय आमदारों को इस दक्षता समिति का चेयरमेन बनाया जाता है. इसलिए मैं पूछना चाहता हूं कि यदि एक विधान सभा क्षेत्र में दो या तीन तालुका हैं तो वहां पर सभी तालुका क्षेत्रों में ये समितियां बनायी जाएंगी या नहीं ? मेरा एक प्रश्न यह भी है कि उन समितियों में विधान परिषद के माननीय सदस्यों को लिया जाएगा या नहीं ?

श्री. अनिल देशमुख : मागच्या वेळी मी सांगितलेले आहे की, दक्षता समित्यावर सन्माननीय विधानपरिषद सदस्यांना घेतलेले आहे. असे कुठे घेण्याचे राहिले असेल तर त्याबाबतीत मी माहिती घेतो. परंतु एका तालुक्यामध्ये जर दोन आमदार असतील तर त्यापैकी ज्येष्ठ असलेल्या आमदारांना दक्षता समित्यावर घेतले जाते.

--

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : राज्यातील महापालिका शाळांना शारीरिक शिक्षण आणि क्रीडा

विकासासाठी निधी देण्याबाबत

मु. शी. : राज्यातील महापालिका शाळांना शारीरिक शिक्षण आणि क्रीडा विकासासाठी निधी देण्याबाबत प्रा. सुरेश नवले, सर्वश्री सुभाष चव्हाण, एस.क्यू. जमा, चरणसिंग सप्रा व भाई जगताप, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

प्रा. सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" सन 2004 ते 2009 या पाच वर्षाच्या काळात राज्यातील अनेक महापालिका शाळांमध्ये शारीरिक शिक्षण आणि क्रीडा विकासासाठी एकही पैसा पुरवण्यात आलेला नसल्याने कॅगने आपल्या अहवालात याबाबत कडक ताशेरे ओढणे, मनुष्यबळ विकासांतर्गत पालिकेच्या प्रत्येक शाळेत क्रीडा मंडळ स्थापन करणे अनिवार्य असताना कुठल्याही शाळेत क्रीडा मंडळ नसल्याचे या अहवालात समोर येणे, प्रत्येक शाळेत शारीरिक शिक्षणावर 2 हजार 500 रुपये खर्च होणे आवश्यक असतानाही 2006-07 ते 2007-09 या कालावधीत एकूण 1 हजार 653 शाळा, 1 कोटी 24 लाख रुपयांच्या निधीपासून वंचित राहणे, एकूण शैक्षणिक खर्चाच्या तुलनेत शारीरिक शिक्षणावर केवळ 0.56 टक्केच खर्च झाला असणे, बहुतेक शाळांना मैदानेच उपलब्ध नसल्याचेही अहवालात नमूद असणे, राज्य शासनाने याबाबत गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया"

श्री. भास्कर जाधव (नगरविकास, क्रीडा व युवक कल्याण राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..4..

प्रा. सुरेश नवले : महाराष्ट्राच्या दृष्टीने हा अतिशय महत्वाचा विषय आहे. 8 ते 14 वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी शारीरिक शिक्षण अतिशय महत्वाचे आहे. त्यांचे कौशल्य पणास

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लावण्याची ही वेळ असते. पूर्वी शासनाने आपल्या धोरणामध्ये 250 विद्यार्थ्यांमागे एक शारीरिक क्रीडा शिक्षक नेमण्याचे ठरविलेले होते. हे धोरण शासनाने अद्याप राबविलेले नाही. तेव्हा 250 विद्यार्थ्यांमागे एक क्रीडा शिक्षक ताबडतोबीने शासन नियुक्त करणार आहे काय ? 14 ते 17 वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी खो-खो, कबड्डी सारख्या स्पर्धा आयोजित केल्या जातात. या स्पर्धांसाठी फक्त 2500 रुपये दिले जातात. असोसिएशन मार्फत खेळण्यासाठी गेलेल्या विद्यार्थ्यांकरिता बनियनसाठी आणि चड्डीसाठी दानशूर शोधावे लागतात. हा प्रकार म्हणजे क्रीडा क्षेत्रातील कारुण्य आहे. उत्तम खेळाडू बनविण्याचे सर्वंकष धोरण शासनाच्या विचाराधीन आहे, त्यामध्ये या गोष्टींचा अंतर्भाव करण्यात येणार आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सदस्यांनी मुख्य तीन प्रश्न विचारले आहेत. हे प्रश्न सर्वसाधारणपणे क्रीडा विभागाशी संबंधित आहेत आणि ही लक्षवेधी नगरविकास विभागाशी संबंधित आहे. सन्माननीय सदस्यांनी अतिशय चांगल्या प्रकारचे प्रश्न विचारलेले आहेत.

...नंतर श्री. गिते...

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव.....

त्यांनी 250 विद्यार्थ्यांमागे एक क्रीडा प्रशिक्षक देणार काय असा पहिला प्रश्न विचारला आहे. याबातीत मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, 250 विद्यार्थ्यामागे आताच्या घडीला एक प्रशिक्षक देणे अवघड आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, या विषयाच्या बाबतीत मला प्रश्न विचारावयाचा आहे..

श्री . भास्कर जाधव :सभापती महोदय, माझे उत्तर पूर्ण होऊ द्यावे.

सभापती : सन्माननीय राज्यमंत्र्यांचे उत्तर पूर्ण झाल्यानंतर मी आपल्याला उप प्रश्न विचारण्याची निश्चितपणे संधी उपलब्ध करुन देईल.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मी या विभागाचा राज्यमंत्री असल्यामुळे या खेळांच्या बाबतीत मला आपण सातत्याने अतिशय गांभीर्याने मार्गदर्शन करीत असता, अतिशय चांगल्या सूचना देत असता. आज शासनाने संपूर्ण जिल्हयांसाठी क्रीडा प्रशिक्षक नेमले आहेत. शासनाने विभागीय क्रीडा संकुलांना मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. त्याचप्रमाणे तालुका क्रीडा संकुलांना देखील मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. त्याचबरोबर 13 व्या वित्त आयोगाच्या माध्यमातून उपलब्ध होणारी तरतूद क्रीडा विकासासाठी कशा पध्दतीने खर्च करावयाची आहे, यासंबंधी मार्गदर्शक सूचनासंबंधीचे परिपत्रक संबंधितांना पाठविण्यात आले आहे. या महाराष्ट्रात "महाराष्ट्र सुवर्ण नवरत्न अभियानास" सुरुवात झाली. त्याच्या अंतर्गत क्रीडा विकासाकरिता मोठया प्रमाणात तरतूद केलेली आहे. त्याचाही फायदा क्रीडा विकासासाठी निश्चितपणे होईल. शासनाचे क्रीडा व युवा धोरण जाहीर होणार आहे, त्यात सगळया गोष्टींचा अंतर्भाव करणार काय अशा प्रकारचा देखील सन्माननीय सदस्य श्री. नवले यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. त्याबाबतीत मी नम्रपणे सांगू इच्छितो की, याबाबतीत वेगवेगळया स्तरावर वेगवेगळया समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत. क्रीडा विभागातील वेगवेगळया तज्ञांकडून मार्गदर्शन घेऊन शासनाच्या क्रीडा धोरणामध्ये या सर्व गोष्टींचा पूर्णपणे अंतर्भाव करण्याचा शासनाने प्रयत्न केलेला आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव...

एका विद्यार्थ्यामागे 2 हजार 500 रुपये एवढाच खर्च केला जातो हे योग्य आहे काय असाही सन्माननीय सदस्य श्री. नवले यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. त्या प्रश्नाच्या बाबतीत सांगू इच्छितो की, ही तरतूद कालबाहय झालेली आहे म्हणून तालुका स्तरावर, जिल्हा स्तरावर, जिल्हा स्तरावर जी क्रीडा प्रशिक्षण शिबिरे घेतली जातात. क्रीडा प्रशिक्षण शिबिरांसाठी निधी वाढवून देण्याचा निर्णय शासनाने मागील चार, पाच महिन्यापूर्वी घेतलेला आहे.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, महाराष्ट्रातील खेळाडू हे निरनिराळया खेळाच्या प्रकारामध्ये अग्रेसर आहेत, अतिशय प्रगतीवर आहेत. नुकताच महाराष्ट्रातील कबड्डी खेळाडूंनी विश्वचषक जिंकून आणला आहे. शासनाचे क्रीडा धोरण जाहीर होणार आहे ही घोषणा गेल्या दोन वर्षापासून ऐकतो आहे. शासनाचे क्रीडा धोरण कधी जाहीर होणार आहे? माननीय मंत्र्यांनी लेखी उत्तर दिले आहे, महानगरपालिका, नगरपालिका या संस्थांनी खर्च केला पाहिजे. त्यांनी फक्त 0.56 टक्के खर्च केला आहे असेही उत्तरात नमूद केले आहे. या गोष्टीला ठाणे महानगरपालिके सारख्या काही महानगरपालिका अपवाद आहेत. ठाणे महानगरपालिकेकडून महापौर चषक स्पर्धा, निरनिराळ्या चषक स्पर्धा भरवितो, त्यासाठी खेळाडूंना प्रोत्साहन देतो. बॅडमिंटनसाठी वेगळे कोर्ट आहे, त्यामुळे देशात ठाणे शहरातील मुले बॅडमिटनच्या खेळामध्ये पुढे आहेत. परंतु आता स्थिती अशी आहे की, महानगरपालिका आणि नगरपालिका यांच्याकडे क्रीडा स्पर्धा भरविण्यासाठी पैसे नाहीत. त्या संस्थांना निरनिराळया कामांसाठी निधी पुरेसा पडत नाही.

महोदय, हा राज्यातील खेळाडूंचा प्रश्न आहे. त्यामुळे क्रीडा संकुल, खेळाडू यांच्यासाठी निधीची उपलब्धता मोठया प्रमाणात करुन देण्यात येईल काय ? तालुका क्रीडा संकुल 382 प्रस्तावित आहे. त्यातील फक्त 35 संकुले कार्यरत आहेत, इतकी संकुलांच्या बाबतीत वाईट स्थिती आहे. क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी काही विशेष कार्यक्रम शासनातर्फे राबविला जाईल काय ? क्रीडा संचालक पद शासनाने अपग्रेड केलेले आहे. तर त्या ठिकाणचे क्रीडा संचालकांचे रिक्त पद कधीपर्यंत भरण्यात येईल ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, 0.56 टक्केच या क्षेत्रावर खर्च केला जातो या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांनी पहिला प्रश्न विचारला आहे. त्याबाबतीत सांगू इच्छितो की,

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव....

मुळामध्ये कॅगच्या अहवालातील हा ऑडीट परिच्छेद आहे. त्या ऑडीट परिच्छेदाच्या अनुषंगाने ही लक्षवेधी सूचना सभागृहात उपस्थित झालेली आहे. सन्माननीय सदस्यांनी असाही उल्लेख केला की, क्रीडा क्षेत्रासाठी नगरपालिका आणि महानगरपालिका यांच्याकडे निधी नाही. ही वस्तुस्थिती काहीअंशी सत्य नाही. त्याचे कारण असे की, शासनाचे स्पष्टपणे धोरण आहे व तसा नियम आहे. या संस्थांचे एकंदरीत वार्षिक उत्पन्न असते, त्या उत्पन्नातील 2 टक्के रक्कम नगरपालिकेने आणि 5 टक्के रक्कम महानगरपालिकेने क्रीडा व शिक्षण विकासाकरिता कंपल्सरी राखून ठेवणे आवश्यक आहे.

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

यानंतर श्री. भोगले...

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मागासवर्गीयांच्या विकासासाठी रक्कम ठेवतो त्याच धर्तीवर ही रक्कम ठेवायची असते. परंतु महानगरपालिकेबाबत मी सांगू शकत नसलो तरी नगरपालिकांबाबत अनुभव असा आहे की, जी 2 टक्के रक्कम प्रत्यक्षपणे खेळांच्या विकासाकरिता दिली पाहिजे त्या ऐवजी वेगवेगळ्या रजिस्टर्ड संस्था, मंडळे आहेत त्यांना रक्कम वितरित केली जाते असे लक्षात आले आहे. म्हणून भविष्यात ही रक्कम खेळांच्या विकासाकरिता प्रत्यक्षपणे वापरली जावी अशा प्रकारचे आदेश दिले जातील, त्यादृष्टीने सुधारणा करु.

सभापती महोदय, नगरपालिकांना आणि महानगरपालिकांना पैसा दिला पाहिजे असे माननीय सदस्यांनी सांगितले. तसेच सुवर्ण नवरत्न अभियानाचा उल्लेख केला. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना जे अनुदान मंजूर केले जाते त्यामध्ये ब व क नगरपालिकांना 80 टक्के आणि सर्व महानगरपालिका व अ वर्ग नगरपालिकांना 50 टक्के अनुदान दिले जाते. ही रक्कम सुवर्ण नवरत्न अभियानावर खर्च करण्याच्या प्रत्यक्षपणे सूचना दिलेल्या आहेत.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, महानगरपालिकांच्या शाळांबाबतचा हा प्रश्न आहे. 250 विद्यार्थ्यांमागे एक प्रशिक्षक देता येणार नाही असे मंत्री महोदयांनी सांगितले. 250 विद्यार्थ्यांमागे एक क्रीडा प्रशिक्षक देण्याचे धोरण आहे आणि नियम आहे. त्यामुळे प्रशिक्षक द्यावाच लागेल, त्याचे पालन केले पाहिजे. विशेषत: मुंबई महानगरपालिकेची खेळाची मैदाने खाजगी संस्थांना दिली जातात. ती मैदाने खेळासाठीच वापरली गेली पाहिजेत या संदर्भात सक्तीने सूचना दिल्या जातील काय? अनेक खेळाडू मोठे होतात. परंतु नंतर मात्र त्यांना जागा उपलब्ध होत नाही. क्रिकेटमधील खेळाडू जाहिरात आणि अन्य मार्गाने उत्पन्न मिळवितात. इतर खेळातील नैपुण्य मिळविलेल्या खेळाडूंचा उपयोग करुन घेता येऊ शकतो. त्यांना क्रीडा प्रशिक्षक म्हणून नेमले तर एक रुपया देखील खर्च द्यावा लागणार नाही. शासनाला हे सहज करता येईल. 250 विद्यार्थ्यांमागे एक क्रीडा प्रशिक्षक नेमण्याची तरतूद आहे. त्या तरतुदीचा उपयोग करुन ज्यांनी मैदान गाजवले आहे अशा खेळाडूंना थेट क्रीडा प्रशिक्षक नेमले तर एक पैसा द्यावा लागणार नाही. जी पदे रिक्त आहेत त्या पदावर त्यांना नेमल्यामुळे त्यांना नियमित वेतन मिळेल. ही सूचना अंमलात आणली तर तीनही गोष्टी साध्य होतील. यासाठी निधी लागणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दोन प्रश्न उपस्थित केले आहेत. विशेषकरुन मुंबई महानगरपालिकेची खेळाची मैदाने खाजगी संस्थांना देऊ नयेत असे त्यांनी सूचित केले आहे. आता डी.पी.केल्यानंतर सुध्दा ज्या जागेवर 37(1) नुसार प्ले ग्राऊंड म्हणून आरक्षण असेल ते आरक्षण यापुढे कोणत्याही परिस्थितीत उठविले जाणार नाही. ते उठवायचे झाले तर खास बाब म्हणून तशा प्रकारचा प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर आल्यानंतरच तेथील आरक्षण उठवावे लागेल. अशा प्रकारचा एक निर्णय झाला आहे. मुंबईतील काही मैदाने खाजगी संस्थांना दिलेली आहेत ही वस्तुस्थिती खरी आहे. त्यांना ज्या मुदतीकरिता मैदान दिले आहे ती मुदत संपली आहे ही गोष्ट लक्षात आली आहे. विशेषकरुन क्रीडा राज्यमंत्री म्हणून अशा प्रकारची मैदाने ज्या कारणास्तव दिली त्या कारणासाठीच वापरली गेली पाहिजेत, त्यांची लिज संपली आहे, नाममात्र भाड्याने मैदाने दिली आहेत. अशी मैदाने पुन्हा शासनाने ताब्यात घ्यावीत अशा प्रकारचे धोरण माझ्या स्तरावर वर्ष दीड वर्षापूर्वीच आखले आहे.

सभापती महोदय, क्रीडा प्रशिक्षक नेमण्याबाबतचा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. आता जिल्हा क्रीडा प्रशिक्षक नेमण्याचे काम केले आहे आणि निकष ठरवून खेळाडूमधूनच क्रीडा प्रशिक्षक नेमत आहोत.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ..... लक्षवेधी सूचना क्र. 1.....

टप्प्याटप्प्याने या लोकांना क्रीडा प्रशिक्षक म्हणून नेमण्याची कार्यवाही करण्यात येईल. तसेच सन्माननीय सदस्यांनी सूचना केल्यानुसार गाजलेल्या क्रीडा पटूंना वाऱ्यावर न सोडता जिल्हा, राज्य, राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळलेल्या क्रीडा पटूंना त्यांच्या कॅटेगरीनुसार व इच्छेनुरुप सर्व्हिस देण्याची तरतूद देखील शासनाने केली आहे.

श्री एस. क्यू. जमा : सभापति महोदय, लक्षवेधी सूचना का यह प्रश्न यहां पर सीएजी के ऑब्जेक्शन के आधार पर आया है. सीएजी ने स्ट्रीक्चर पास किए हैं कि सन् 2004 से 2009 के बीच 5 साल के अंदर सिर्फ 0.56 प्रतिशत ही खर्च नगरपालिका और महानगरपालिकाओं के स्कूलों में किया गया है. जबकि हमारे युवा क्रीडा राज्यमंत्री ही हमारे नगरविकास विभाग के मंत्री भी हैं.

सभापति महोदय, आपके माध्यम से हमारे दो प्रश्न मंत्री महोदय से हैं. मैं बताना चाहता हूं कि हमारी युवा पॉलिसी और क्रीडा पॉलिसी अभी आनी बाकी है. मेरा कहना है कि आप चाहे इसे फिजिकल एज्यूकेशन पर खर्च बोलिए या खेलों पर खर्च बोलिए, लेकिन यह खर्च बहुत कम है. मुझे पूछना है कि क्या इस बारे में सरकार कोई कानून बनाएगी .सरकार का सन् 1998 का एक आदेश है कि कुल खर्च का दो प्रतिशत से लेकर 5 प्रतिशत तक खेलों पर खर्च किया जाएगा. लेकिन उस आदेश का अमल कहीं पर भी नहीं किया जाता है. इसलिए मेरा कहना है कि क्या आप इस तरह का कानून बनाएंगे कि नगरपालिकाओं द्वारा उनके बजट का एक निश्चित खर्च खेलों पर या युवाओं के शारीरिक शिक्षण पर किया जाएगा.

दूसरी बात मुझे यह कहनी है कि यह विषय कई विभागों से संबंधित है. इसलिए माननीय सभापति महोदय से मेरा अनुरोध है कि क्या सभापति महोदय आप अपने कक्ष में इसी अधिवेशन के दौरान सभी संबंधित मंत्रियों की एक बैठक बुलाकर इस बारे में एक कम्पोजिट निर्णय लेने संबंधी कोई पहल करेंगें ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : महोदय, यामध्ये दोन भाग आहेत. त्यात नगरपालिका किंवा महा नगरपालिकांच्या उत्पन्नाप्रमाणे काही टक्के निधीचा वापर हा खेळासाठी करावयाचा असतो हा विषय नगरविकास विभागाच्या अखत्यारित येतो. तसेच दुसरा विषय क्रीडा विभागाशी संबंधित आहे. यासाठी जो निधी राखून ठेवला जातो त्याला त्याच कामासाठी खर्च करण्यासाठी कायद्यात बदल करणार काय अशी सूचना सन्माननीय सदस्यांनी केली. यासंदर्भात तपासणी करुन निश्चितच कायद्यात रुपांतर करणे आवश्यक आहे असे शासनाला वाटते. त्याचबरोबर सन्माननीय सदस्यांनी यासंदर्भात संबंधित विभागाची बैठक लावण्याचीही सूचना केली. या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांनी काही विषय दिले तर माननीय सभापतींच्या दालनात अशी बैठक घेणे अधिक सोईचे होईल असे मला वाटते.

श्रीमती दिप्ती चवधरी : महोदय, ग्राऊंडचे प्रमाण कमी होत आहे असे दिसते. खास करुन पुण्यात 500 पेक्षा जास्त ॲमिनिटीज स्पेस महापालिकेने ताब्यात घेतलेले आहेत. त्यातील काही जागा खेळाच्या मैदानांसाठी राखून ठेवण्यात याव्यात असे निदेश शासनाच्या वतीने देण्यात येतील काय ?

श्री. भास्कर जाधव : नवीन डी.पी. मध्ये पुण्यात काही गोष्टी लक्षात आल्या असून त्यामध्ये डंपिंग ग्राऊंड, वेगवेगळ्या समाजाच्या अंत्यविधीसाठी जागा राखून ठेवलेल्या आहेत. तशा पध्दतीने प्रत्येक डी.पी. मध्ये अशा प्रकारे राखीव भूखंड ठेवण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतलेला आहे.

श्री. रामनाथ मोते : नगरपालिका आणि महा नगरपालिका क्षेत्रात खेळासाठी मैदान उपलब्ध करुन देता येतील असे मंत्री महोदयांनी सांगितले. तथापि जोसेफ समितीच्या अहवालानुसार प्रत्येक शाळेत क्रीडा शिक्षण असणे अत्यंत आवश्यक आहे. नगरपालिका आणि महापालिकांच्या शाळांमध्ये क्रीडा शिक्षक नेमण्याचे शासनाने मान्य केले असले तरी क्रीडा क्षेत्राला विकसित करण्यासाठी क्रीडा शिक्षक असणे आवश्यक आहे म्हणून या शाळांमध्ये जी शिक्षकांची पदे मंजूर असतील त्यात किमान एक तरी क्रीडा विषयी प्रशिक्षीत असावा असे धोरण महापालिका आणि नगर पालिकांच्या बाबतीत स्वीकारणार काय, तसे निदेश शासन देणार काय ?

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, ही बाब आपल्याला तपासून पहावी लागेल असे मी मघाशीच सांगितले होते व यासंदर्भात आवश्यकता भासत आहे असे मला वाटते.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, एका वर्तमान पत्रात बडया नेत्यांचे क्लब ताब्यात घेऊ असा पालिका आयुक्तांनी इशारा दिलेला आहे अशी बातमी छापून आलेली आहे. त्यामुळे मुंबईतील भूखंड, उद्याने व जिमखान्यांची यादी माननीय मंत्रीमहोदयांकडे आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी वर्तमानपत्राचा रेफरन्स घेऊन बडया नेत्यांचे क्लब आणि भूखंड ताब्यात घेणार आहात काय असा प्रश्न केलेला आहे परंतु वर्तमानपत्रातील माहिती मी वाचलेली नसून यासंदर्भातील माहिती माझ्याकडे नाही एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, मुंबई महापालिकेच्या अनेक शाळा असून त्या शाळांकडे खेळाचे मैदाने सुध्दा आहेत. आर.जी. आणि पी.जी. मध्ये ग्राऊंड उपलब्ध आहे असे असतांना त्या ठिकाणी क्लब सुरु झालेले आहेत तसेच अनेक ठिकाणी झोपडपट्टयांचे पुनर्वसन करण्यासाठी ट्रान्झीट कॅम्प सुध्दा दिलेले आहेत. अनेक ठिकाणी तर हे ग्राऊंड आहे काय असा प्रश्न पडतो इतक्या त्या ग्राऊंडवर वस्त्या झालेल्या आहेत. त्या वस्त्या जर 1995 पूर्वीच्या असतील तर त्यांचे त्वरित पुनर्वसन करुन ते ग्राऊंड पुन्हा ताब्यात घेऊन ज्या खाजगी शाळांना ग्राऊंड उपलब्ध नाहीत अशा खाजगी शाळांना ग्राऊंड उपलब्ध करुन दिले जाणार आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, अशा ग्राऊंडवर जर अशा प्रकारचे एन्क्रोचमेंट झाले असेल तर त्यासंदर्भात निश्चितपणे तत्परतेने कारवाई केली जाईल.

श्री. सतीश चव्हाण : सभापती महोदय, क्रीडा शिक्षक हा बीपीएड असावा असा नियम आहे. परंतु तो खेळाडू असावा असा नियम केला जाणार आहे काय ? राष्ट्रीय शालेय स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ औरंगाबादवरुन रेल्वेने चंदीगढला रवाना झाला होता. या संघाला जनरल बोगीतून जनावरांसारखे कोंबून नेण्यात आले होते त्यामुळे संबंधित अधिका-यांवर कारवाई केली जाणार आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, आपल्याकडे खेळाडूंचे स्टेटस दुर्दैवाने मेन्टेन केले जात नव्हते. परंतु आता यासंदर्भात सर्व स्तरावर सुधारणा केली जात आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, मी पॉईंट ऑफ ऑर्डरच्या मुद्यावर बोलण्यासाठी उभा आहे. या सभागृहाचे सन्माननीय सदस्य माननीय श्री. सुभाष चव्हाण हे काँग्रेस पक्षाचे प्रतोद आहेत. सन्माननीय विधी मंडळाच्या सदस्यांना क्लबची मेंबरशीप देण्याच्या बाबतीत आपण काही दिवसापूर्वी जो आदेश दिला होता त्याची माहिती सन्माननीय मंत्रीमहोदयांकडून सभागृहाला मिळावी अशी माझी विनंती आहे.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात मी काही दिवसापूर्वी औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून हा मुद्दा उपस्थित केला होता. नगरविकास मंत्री यासंदर्भात बैठक घेणार होते व त्यांना यासंदर्भात आदेशही देण्यात आले होते. माननीय मंत्रीमहोदयांकडून हे शक्य झाले नाही तर यासंदर्भात आपल्या दालनात संबधितांची बैठक घेतली जाणार आहे काय ?

(उत्तर देण्यात आले नाही.)

श्री. एम.एम.शेख : सभापती महोदय, शारीरिक शिक्षणाचा विषय शाळेमध्ये केवळ ग्रेड पुरताच शिल्लक राहिलेला आहे. त्यामुळे शारीरिक शिक्षणाचा विषय शाळेमध्ये कम्पलसरी केला जाणार आहे काय ? महाराष्ट्रामध्ये 79 शारीरिक महाविद्यालये असून ही महाविद्यालये गेल्या 30 वर्षापासून कार्यरत असून त्या ठिकाणी 3000 कर्मचारी कार्यरत आहेत. त्यामुळे महाराष्ट्र शासन जी 79 शारीरिक महाविद्यालये आहेत त्यांना क्रीडा धोरणाअंतर्गत अनुदान देणार आहे काय ? महाराष्ट्रात एकच शारीरिक शिक्षण महाविद्यालयाला अनुदान दिलेले आहे हे खरे आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सदस्यांचा प्रश्न लक्षवेधी सूचनेशी संबंधित नसल्यामुळे त्यांनी वेगळा प्रश्न विचारावा.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: शिवाजी पार्क शांतता क्षेत्र जाहीर
केल्यामुळे तेथे राजकीय व धार्मिक सभांना असलेली बंदी

मु.शी.: शिवाजी पार्क शांतता क्षेत्र जाहीर
केल्यामुळे तेथे राजकीय व धार्मिक सभांना असलेली बंदी
यासंबंधी सर्वश्री विनोद तावडे,चंद्रकांत पाटील,संजय
केळकर, रामनाथ मोते, डॉ.रणजित पाटील,वि.प.स.
यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.विनोद तावडे (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावी अशी विनंती करतो.

"मुंबईतील शिवाजी पार्क मैदान येथे स्वातंत्र्यपूर्व काळात विशेषकरुन 1942 च्या चले जाव चळवळीच्या दरम्यान महात्मा गांधी यांची सभा, मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र स्थापनेचा सुवर्ण सोहळा, संयुक्त महाराष्ट्र लढ्याच्या काळात आचार्य अत्रे, कॉ.डांगे यांच्यासह दिग्गज नेत्यांनी घेतलेल्या सभा, 1965 च्या युध्दात हिन्दुस्थानने पाकिस्तानचा पराभव केल्यानंतर झालेली विजयी सभा, शिवसेना-भाजप युती सरकारचा शपथविधी सोहळा, अशा ऐतिहासिक घटनांची साक्ष सांगणारे व राजकीय तसेच सामाजिक दृष्ट्या महत्वाचे असणारे शिवाजी पार्क मैदान केंद्रीय ध्वनी प्रदूषण (नियंत्रण व नियमन) नियम 2000 अन्वये राज्य शासनाने शासन निर्णय क्र. ध्वनिप्र-2009/प्र.क्र.95/तांक-1, दिनांकित 21 एप्रिल, 2009 तसेच दिनांकित 7 ऑगस्ट, 2009 अन्वये शांतता क्षेत्र म्हणून जाहीर होणे, परिणामी शिवाजी पार्क मैदानावर राजकीय तसेच धार्मिक सभा घेण्यास बंदी येणे, शैक्षणिक संस्था, सर्व न्यायालये, रुग्णालये आणि धार्मिक स्थळांच्या सभोवताली 100 मीटर क्षेत्र शांतता क्षेत्र म्हणून जाहीर करण्याबाबत सदर शासन निर्णयात नमूद असणे, परिणामी मुंबई शहरातील एकूण शैक्षणिक संस्था आणि धार्मिक स्थळे विचारात घेता सदर शासन निर्णयानुसार संपूर्ण मुंबई शहर शांतता क्षेत्र होण्याची निर्माण झालेली भीती, उच्च न्यायालयाने

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

एका जनहित याचिकेत निर्णय देत असताना उपरोक्त शासन निर्णयात असलेल्या उणीवा व तांत्रिक चूका निदर्शनास आणून सुधारित शासन निर्णय काढण्यास शासनास मुभा देणे, परंतु शासनाने अद्यापही शिवाजी पार्कला संरक्षण देणारा सुधारित शासन निर्णय निर्गमित न केल्याने राज्यातील जनता तसेच राजकीय पक्षांचे कार्यकर्ते यांच्यात शासनाविषयी निर्माण झालेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मला आश्चर्य वाटते श्री.भास्करराव जाधव यांच्या सारख्या माननीय मंत्र्यांनी सरकारी उत्तर देण्याची पद्धत कशी काय सुरू केली ? शिवाजी पार्कवर सभा झाली पाहिजे असे प्रत्येकाला वाटते. पर्यावरण कायदे सन 1984-85 नंतर कडक होत गेले. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचा नंतर त्यामध्ये समावेश झालेला आहे. तेथे राहणाऱ्या आदिवासींना आता बाहेर हाकलले जात आहे. तसेच शिवाजी पार्कच्या सभा बंद करण्याचे चालले आहे. कायदा हा नंतर आलेला आहे. या कायद्यासंबंधी हायकोर्टात पिटीशन्स दाखल करण्यात आल्या. त्यातील सगळी जजमेंटस मी अतिशय बारकाईने वाचली आहेत. शिवाजी पार्कला एक वेगळे महत्त्व आहे. संयुक्त महाराष्ट्र स्थापनेचा सुवर्ण सोहळा शिवाजी पार्कवर झाला. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील आचार्य अत्रे, कॉ.डांगे यांच्या सभा देखील तेथे होत होत्या. स्व.यशवंतराव चव्हाण केंद्रीय संरक्षण मंत्री झाले. 1965 च्या विजयानंतर श्री.लालबहादूर शास्त्री आणि श्री.यशवंतराव चव्हाण यांची सभा शिवतीर्थावर झाली. शिवसेनाप्रमुख मा.श्री.बाळासाहेब ठाकरे यांचा विजयादशमीचा मेळावा शिवतीर्थावरच होतो. श्री.भास्कर जाधव आपल्या राष्ट्रवादी पक्षाच्या स्थापनेचा मेळावा देखील शिवाजी पार्कवर झाला. अशा प्रकारे एक ऐतिहासिक महत्त्व शिवाजी पार्कला आहे. भाजप-शिवसेना युती शासनाचा शपथविधी शिवतीर्थावर झाला. त्यामुळे शिवतीर्थाला एक वेगळे महत्त्व आहे.

केंद्रीय ध्वनिप्रदूषण नियंत्रण कायदा नियम 2 (क) आणि 5 ला नंतर सुधारणा करण्यात आली. त्यात धार्मिक स्थळांचा समावेश करण्यात आला. शाळा, मंदिर असा परिसर घेतला तर संपूर्ण महाराष्ट्र शांतता क्षेत्र होऊ शकते. गरज असेल तर ते केलेच पाहिजे. शिवाजी पार्कच्या बाजूला 10 बेडचे हॉस्पिटल आहे. बंगला होता. तो दहा बेडच्या नर्सिंग होममध्ये कन्व्हर्ट झाला. रूग्णालय झाले. ते 100 मीटरच्या आतमध्ये आले. स्वाभाविकपणे मंदिर हे असणारच. प्रार्थनास्थळ देखील असेल. पण तेथे किती भाविक येतात हे देखील पाहिले पाहिजे. हायकोर्टाने आपल्या पिटीशनमध्ये असे म्हटले आहे की, " However, we make it clear that it is for the State Government, if at all it decides to amend the notification, to apply its mind." आपल्या पक्षाची स्थापना शिवतीर्थावर झाली. त्या शिवतीर्थावर माननीय श्री.शरद पवार साहेबांची सभा व्हावी, माननीय शिवसेना प्रमुखांची सभा व्हावी असे सर्वांनाच वाटते. त्यामुळेच माझे दोन स्पेसिफिक प्रश्न आहेत. ...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

शिवाजी पार्क सारख्या ठिकाणी उठसूठ कोणाच्याही सभा होऊ नये म्हणून केंद्रीय निवडणूक आयोगाने ज्यांना राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता दिली आहे त्या पक्षाच्या नेत्यांच्या सभेला परवानगी मिळण्यासाठी धर्मस्थळाच्या विषयामध्ये अमुक अमुक दुरूस्ती करून द्यावी अशी मागणी केंद्रीय पर्यावरण विभागाला राज्य सरकार करणार आहे काय ? केंद्रीय पर्यावरण खाते या विषयी परवानगी देणार नसेल तर नगर विकास खात्याच्या हातामध्ये एक गोष्ट आहे.

यानतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रामुख्याने तेथील जे गणेश उद्यान मंदिर आहे ते शिवाजी पार्कच्या कठड्यापासून 85 मीटरवर आहे. त्यानंतर अजून 20 मीटरवर आपण जर एक जॉगिंग ट्रॅक केला आणि त्याची बॉर्डर म्हणजे शिवाजी पार्क असे जर नगरविकास विभागाने मार्क केले तर आपोआप ते मैदान 100 मीटरच्या बाहेर येते. जर हे राज्याच्या नगरविकास खात्याच्या अंतर्गत असेल आणि ते करीत असतानाही माझे असे म्हणणे आहे की, आपण त्याठिकाणी केवळ राष्ट्रीय नेत्यांच्याच सभांना परवानगी द्यावी आणि खेळांच्यासाठी जे नियम आहेत त्यातच ते व्हावे.

श्री.कपिल पाटील (खाली बसून) : शिवसेना प्रमुख . . ..

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना सांगू इच्छितो की, शिवसेना प्रमुख हे राष्ट्रीय नेते आहेत, तुम्ही माना अगर मानू नका. त्यांना जगाने मान्यता दिलेली आहे, त्यामुळे ते राष्ट्रीय नेतेच आहेत आणि याची केंद्रीय निवडणूक आयोगाकडे नोंद झालेली आहे हे अभ्यासू सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना माहिती नाही. कारण त्यांनी राजकीय चष्मा घातलेला आहे.

सभापती महोदय, मला एवढेच म्हणावयाचे आहे की, एकतर आपण सगळयांनी मिळून केंद्रीय पर्यावरण विभागाकडे मागणी करु या की, दादर येथील शिवतीर्थाचे एक वेगळे महत्व आहे म्हणून याबाबतीत आम्हाला दुरुस्ती करुन देण्यात यावी आणि तसे होईपर्यंत नगरविकास विभागाचे डायनॉमिक मंत्री श्री.भास्करराव जाधव याबाबतीत निर्णय घेणार आहेत काय? मघाशी सांगितल्या प्रमाणे जर तेथे 20 मीटरचा जॉगिंग ट्रॅक केला आणि शिवतीर्थाची बॉर्डर तेथपर्यंत आणून शिवाजी पार्क खेळांच्या नियमांसह 30 दिवसांसाठी जसे आहे तसेच वापरात आणून फक्त राजकीय नेत्यांना सभेसाठी परवानगी देणार आहात काय ?

उप सभापती : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे यांनी प्रश्न विचारण्यासाठी सहा मिनिटे घेतली. आपण उत्तर देण्यासाठी . . . .

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो प्रश्न विचारला आहे, त्यासंबंधातील त्यांच्या भावनांशी सर्व सभागृह, सन्माननीय सदस्य आणि संपूर्ण महाराष्ट्र सहमत आहे. दादर येथील शिवाजी पार्क मैदानाला एक अनन्य साधारण आणि खूप मोठे ऐतिहासिक महत्व आहे हे आपणा सर्वांनाच ज्ञात आहे. जर आपण एका बाजूला जगामध्ये पाहिले तर फ्रिडम स्पीच असावे आणि तशा दृष्टीने व्यवस्था करुन प्रत्येक राजकीय पक्षाने किंवा वक्त्यांनी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव . . . .

किंवा नेत्यांनी आपापले विचार लोकांसमोर ठेवावेत आणि लोकांनी त्या विचारातून स्वत:ची मते बनवावीत अशा प्रकारची प्रगल्भ लोकशाही होण्याच्या दृष्टीने मार्ग तयार होत आहे. दुसऱ्या बाजूला आपले विचार व्यक्त करण्यासाठी मैदान उपलब्ध करुन न देणे हे जरा विसंगत वाटते आणि ही जरी वस्तुस्थिती असली तरी देखील हा केंद्रीय कायदा असल्यामुळे थोडीशी राज्य शासनाची अडचण झालेली आहे. राज्य शासनाने यासंबंधात काही प्रयत्न केला नाही अशातला भाग नाही. परंतु राज्य सरकारने सुध्दा यामध्ये पुढाकार घेऊन याबाबत केंद्र शासनाने जो कायदा केलेला आहे. मग त्यामध्ये हॉस्पिटलपासून, न्यायालयापासून किंवा शाळांपासून 100 मी.ची मर्यादा घातली आहे त्याऐवजी शासनाने आपले मत कळविले आहे की, हॉस्पिटल बाबत उल्लेख करीत असताना केवळ हॉस्पिटल अशा प्रकारची व्याख्या असता कामा नये. जर एखादे हॉस्पिटल 25 बेडचे असेल त्यामध्ये सुधारणा करावी, नर्सिंग होम नव्हे. म्हणून सरकारने त्याबाबतीत डेफीनेशन करण्याबाबत विनंती केलेली आहे. दुसरा प्रश्न म्हणजे न्यायालयाबाबत सांगावयाचे तर न्यायालयाच्या इमारती पासून 100 मी.अशा प्रकारचा शब्दश: अर्थ न घेता न्यायालय सुरु असेल म्हणजे जो कामाचा वेळ असेल तो कालावधी वगळून त्याठिकाणी सभा घेण्यासाठी परवानगी द्यावी.

सभापती महोदय, शासनाने शाळांच्या बाबतीत दुसरा निर्णय कळविलेला आहे. शाळा म्हणजे केवळ 10 मुलांची, 15 मुलांची, 20 मुलांची असेल असे गृहीत न धरता किमान त्या शाळेमध्ये 500 विद्यार्थी असावेत. या शाळांना शनिवारी, रविवारी सुटी असते, तसेच दिवाळी, ख्रिसमस सणांची सुटी असते, ईदच्या दिवशी सुटी असते, मे महिन्यामध्येही मोठी सुटी असते. अशा वेळेला आपण संबंधितांना सभेसाठी परवानगी का देऊ नये? तशी परवानगी दिली पाहिजे. शासनाने अशा प्रकारचे मत ॲडव्होकेट जनरलनां कळविलेले आहे आणि शासन आपल्या या भूमिकेशी पूर्णपणे सहमत आहे असे म्हणण्यापेक्षा उलटपक्षी शासनाने दोन पावले पुढे टाकलेली आहेत. सन्माननीय सदस्यांनी तेथील गणपतीच्या मंदिराबाबत उल्लेख केला. त्याबाबतीत देखील धार्मिक स्थळे अशा प्रकारचा उल्लेख असला तरी नोंदणीकृत जी धार्मिक स्थळे आहेत.

यानंतर श्री.अ.शिगम . . ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव...

त्याच्या पासून 100 मीटरवर. गणपती मंदिरापासून फूटपाथ 85 मीटरवर आहे तेव्हा त्याच्या बाजूला 20 मीटरचा जॉगिंग ट्रॅक करावा असे सन्माननीय सदस्यांनी सुचविले आहे. या संदर्भात सर्व पक्षाच्या सन्माननीय सदस्यांची बैठक बोलावून त्या बैठकीमध्ये महानगरपलिकेचे अधिकारी, विधी व न्याय विभागाचे अधिकारी, नगर विकास विभागाचे सचिव यांच्या समवेत चर्चा करुन या मधून काही मार्ग काढता येत असेल तर तो काढण्यात येईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : पुणे महानगरपालिकेचे उप आयुक्त यांना अधिकार नसताना त्यांनी महानगरपालिकेच्या विविध मंड्याचे केलेले वाटप

मु. शी. : पुणे महानगरपालिकेचे उप आयुक्त यांना अधिकार नसताना त्यांनी महानगरपालिकेच्या विविध मंड्याचे केलेले वाटप या संबंधी सर्वश्री अनिल भोसले, हेमंत टकले, रमेश शेंडगे, जयवंतराव जाधव,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.अनिल भोसले (पुणे स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पुणे महानगरपालिकेच्या विविध मंडया बी.ओ.टी. तत्वावर विकसित करणे बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीकडे मंजुरीकरिता असणे, तत्कालीन उप आयुक्त (गवनि) यांनी अधिकृत असणाऱ्या गाळेधारका व्यतिरिक्त इतर लोकांनाही गाळे देणे बाबत परस्पर आश्वासन देऊन, ज्या लोकांनी दोन लाख रुपये रक्कम देऊ केली त्या लोकांना पुणे महानगरपालिकेच्या मंडई विभागाकडील कोणतीही नोंद न करता कोरे ताबे यादी मंडई निरीक्षक, मंडई अधिकारी, तत्कालीन उप-आयुक्त (गवनि) यांच्या स्वाक्षरीसह दिलेली असणे, तत्कालीन उप-आयुक्त (गवनि) यांनी सदर मंडई विभागाचा पदभार नसताना ही अशी प्रकरणे मंजूर केलेली असणे, या बाबत मंडई व्यापाऱ्यामध्ये निर्माण झालेला असंतोष व संताप, सदर प्रकरणी शासनाने त्वरित करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.भास्कर जाधव (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल भोसले : सभापती महोदय, पुणे महानगरपालिका क्षेत्रात बी.ओ.टी.तत्त्वावर मंड्या बांधण्यात आल्या. या मंड्या भाडे तत्त्वावर देण्याचा निर्णय असेल किंवा त्याचा लिलाव असेल याबाबत श्री.दामसे यांनी त्यांना अधिकार नसताना लोकांना कोणत्या नियमाखाली गाळे दिले ? श्री.दामसे यांनी लोकांकडून दीड लाख रुपये घेऊन त्यांना बनावट पावत्या दिल्या. त्यामुळे ट्रेझरी ॲक्टचा भंग झालेला आहे. तेव्हा महानगरपालिकेने श्री.दामसे यांच्यावर कोणती कारवाई केली ? त्यांच्याकडे कोऱ्या पावत्या सापडल्या आहेत. श्री.दामसे यांनी ज्या ज्या विभागामध्ये काम केले त्या प्रत्येक ठिकाणी त्यांची चौकशी सुरु आहे. तेव्हा श्री.दामसे यांना निलंबित करुन त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करणार काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की तेथील 28 मंडई - त्या ठिकाणी मंड्या म्हणतात-टप्प्या टप्प्याने विकसित करण्याचा निर्णय घेतलेला आहे. महानगरपालिकेने 2006 मध्ये असा निर्णय घेतला की, तेथील जे गाळेधारक आहेत त्यांच्या कडील थकीत रक्कम वसूल करण्या बाबत गाळेधारकास एकच नोटीस द्यायची. त्या नोटीसमध्ये थकीत रक्कम आणि पुढील सहा महिन्याची अनामत रक्कम तत्काळ भरुन तो गाळा त्यांनी पुन्हा घ्यावा असा उल्लेख केला. त्याच नोटीसमध्ये असाही निर्णय घेण्यात आला होता की, मूळ मालकाने पैसे लवकर भरले नाहीत तर जो कोणी प्रथम येऊन पैसे भरेल त्याला गाळा देण्यात येईल. मुळात हा चुकीचा निर्णय आहे. कारण ज्याची पहिली मालकी आहे ती प्रथम संपुष्टात आणली पाहिजे. खरे म्हणजे दुसऱ्यांदा जाहिरात काढून स्पर्धा निविदा मागवून गाळ्यांचे वितरण करावयास पाहिजे होते. परंतु अशी पध्दत न अवलंबिता गाळे देण्यात आले. त्या भागाचा अधिकार नसताना श्री.दामसे यांनी काही लोकांना थकीत रक्कम भरण्याची, ॲडव्हान्स रक्कम भरण्याची परस्पर चलने दिली, तशी नोटीस दिली.

सभापती महोदय, एका व्यक्तीला गाळा मिळाला नाही म्हणून त्याने दिनांक 14.11 रोजी तक्रार केली आणि दिनांक 15.11. रोजी ताबडतोब आयुक्तांनी तेथे पाहणी केली. त्यावेळी त्यांच्या लक्षात आले की, येथे काही गडबड झाली आहे.कोऱ्या पावत्यांवर मार्केट अधिकाऱ्यांच्या सह्या, संबंधित अधिकाऱ्यांच्या सह्या आणि दामसे यांच्या सह्या होत्या. त्यांनी कोऱ्या पावत्या तयार करुन ठेवल्या होत्या. जी कोणी व्यक्ती येईल त्यावर त्याचे नाव टाकायचे आणि ती पावती द्यायची.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव...

श्री.शंकर थोरात नावाच्या एजंटाकडे या पावत्या दिल्या होत्या. पावती देऊन लोकांकडून दीड ते दोन लाख रुपये घ्यायचे आणि बाकीचे रक्कम भरुन घ्यायची असा उद्योग सुरु होता. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला की, श्री.दामसे यांना निलंबित करणार काय, त्याबाबत सांगू इच्छितो की, या प्रकरणी थोडी अधिकची माहिती घेतल्यानंतर आम्ही असा निर्णय घेतला आहे की, या एकूण प्रकरणात पाच अधिकारी दोषी आहेत आणि त्या सर्वांना निलंबित करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

यानंतर कु.थोरात...

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात)

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, सदर प्रकरणातील पेपर मी आपल्याकडे पाठवून देत आहे कृपया आपण ते पहावेत अशी विनंती आहे.

श्री. अनिल भोसले : सभापती महोदय, या माणसाने गोरगरिबांकडून पैसे घेतले पण त्यांना जागा दिलेली नाही अशा पध्दतीने त्यांची फसवणूक केलेली आहे. या संदर्भात फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा.

उप सभापती : माझ्याकडे जो पेपर देण्यात आला आहे त्यावर सर्व अधिकाऱ्यांच्या कोऱ्या फॉर्मवर सहया आहेत म्हणून संबंधितावर फौजदारी गुन्हा दाखल व्हावयास पाहिजे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, या प्रकरणातील सर्व अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात येत आहे. त्यांची विभागीय चौकशी सुरु आहे. एका आठवडयाच्या आत विभागीय चौकशी पूर्ण केली जाईल आणि आवश्यकता वाटली तर त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करुन त्यांना जेलमध्ये टाकले जाईल.

(काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात)

उप सभापती : मंत्री महोदयांनी विभागीय चौकशीच्या बाबतीत सांगितले आहे पण विभागीय चौकशी त्याच ठिकाणचे अधिकारी करणार त्यामुळे मूळ प्रश्नाला न्याय मिळेल की नाही अशी शंका सन्माननीय सदस्यांच्या मनात आहे. त्यामुळे मला असे वाटते की, संबंधिता विरुध्द रितसर फौजदारी गुन्हा दाखल केला तर ती चौकशी व्यवस्थित होईल.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, आपल्या निदेशाप्रमाणे संबंधितावर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मुंबई विभागातील झोपडपट्टी भागातील शाळांची झालेली दूरवस्था

मु. शी. : मुंबई विभागातील झोपडपट्टी भागातील शाळांची झालेली दुरवस्था यासंबंधी श्री. कपिल पाटील, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई विभागातील 60 टक्क्यांहून अधिक मान्यताप्राप्त अनुदानित व कायम विनाअनुदानित शाळा झोपडपट्टी भागात असून त्यांच्या जमिनी त्यांच्या नावावर नसणे,शिक्षणहक्क कायद्यानुसार आवश्यक असलेल्या सुविधा निर्माण करण्यात अडचण येणे, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत विस्थापन होणे, जुन्या इमारतींची दुरवस्था होणे, या जमिनींची मूळ मालकी शासकीय, निमशासकीय, शासकीय उपक्रम किंवा मंडळ, महापालिका, म्हाडा तसेच खाजगी व्यक्तिची असल्याने शाळा विकासास परवानगी न मिळणे, या शाळांच्या जमिनी शाळा व शिक्षण संस्थांच्या नावावर मालकीहक्काने नियमित किंवा अधिकृत करण्याची मागणी मुंबई उपनगर शिक्षण संस्थेने शासनाकडे करणे, या सर्व शाळांच्या ताब्यात आणि वापरात असलेले भूखंड या शाळांच्या नावावर तातडीने करुन देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने दखल घेऊन तातडीने करावयाची उपाययोजना, केलेली कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. सचिन अहिर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, झोपडपट्टीतील शाळांसाठी एसआरए योजनेमध्ये अधिकचा एफएसआय दिलेला आहे या बद्दल मी सर्वप्रथम सन्माननीय राज्यमंत्री श्री. सचिन अहिर, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय मुख्यमंत्री यांचे अभिनंदन करतो आणि आभार मानतो.

आजची लक्षवेधी सूचना ही थोडीशी वेगळी आहे. शाळांना मालकी हक्काने जमीन देण्याच्या संदर्भात माझा प्रश्न आहे. उत्तरामध्ये राज्य मंत्री महोदयांनी असे सूचविलेले आहे की, "अधिनियम 1971 मधील 15(4) नुसार सदर जमिनीचा भाडेपट्टा करार संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थेस सुरुवातीला 30 वर्षासाठी व नंतर पुढील 30 वर्षे वाढविता येतो." याच कलमाचा आधार घेऊन संबंधित शिक्षण संस्थांना याच कलमान्वये सुरुवातीला 30 वर्षे आणि नंतर पुन्हा 30 वर्षे वाढवून देणार काय? निवेदनातील शेवटच्या परिच्छेदामध्ये आक्षेप आणि सूचना मागविण्याच्या संदर्भात 90 दिवसांची मुदत देण्यात आलेली आहे ती मुदत संपण्यासाठी फक्त एक महिना शिल्लक आहे त्यामुळे या संदर्भातील कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याची आवश्यकता आहे. खालच्या स्तरावर अद्याप ही कार्यवाही पूर्ण् झालेली नाही ती पूर्ण करणार का? ज्याच्यासाठी मी ही लक्षवेधी सूचना विचारलेली आहे तो सगळयात महत्वाचा प्रश्न असा आहे की, मुंबईतील 60 ते 70 टक्के शाळा त्यांच्या स्वत:च्या मालकीच्या जमिनीवर नाहीत. त्या शासकीय, निमशासकीय किंवा खाजगी मालकीच्या जमिनीवर आहेत त्या जमिनी या शाळांच्या नावावर झाल्याशिवाय त्यांचा पुनर्विकास अशक्य आहे. या शाळांचा पुनर्विकास करावयाचा असेल तर या सर्व शाळांची पाहणी, मोजमाप आणि सर्व्हे तातडीने करणार का? जेणे करुन या शाळांच्या मालकी हक्काच्या संदर्भातील निर्णय करता येऊ शकेल.

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी पहिल्यांदा शासनाचे अभिनंदन केलेले आहे. या विषयाला एक वेगळे महत्व देऊन अतिरिक्त चटई क्षत्र वाढवून देण्याचा निर्णय घेतलेला आहे. झोपडपट्टीमध्ये असणाऱ्या शाळांना आहे त्याच एक्झिस्टिंग एरियाचा निर्णय असताना देखील त्यामध्ये सुधारणा करुन या पुढच्या काळात 400 चौ.फुटाचे गाळे शाळेमध्ये घेता येतील. सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या पहिल्या प्रश्नांच्या बाबतीत निवेदनामध्येच स्पष्ट केलेले आहे की, अधिनियम 1971 मधील कलम 15 (4) अन्वये 30 वर्षाची मुदत संस्थेला किंवा पात्र यादीमध्ये ज्यांचे नाव असेल त्या व्यक्तिच्या नावावर देता येते. अनेक वेळा असेही होते की, पात्र यादीमध्ये

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर.....

वेगळया व्यक्तीचे नाव असते आणि संस्था भाडेकरु म्हणून असतात किंवा ऑक्युपंट म्हणून असतात. तेव्हा शासनाचा असाच प्रयत्न आहे की, ऑक्युपंट म्हणून असतील तर त्यांना देखील शैक्षणिक दर्जा देण्याचा निर्णय शासनाला घेता येईल जेणेकरुन ॲक्युपंट म्हणून ई- कॅटॅगरीमध्ये टाकता येईल. तसेच मी उत्तरामध्येच स्पष्ट केलेले आहे की, भाडेपट्टा करार एकदा 30 वर्षासाठी दिल्यानंतर परत पुढील 30 वर्षे देणे हे शासनाच्या वतीने बंधनकारक आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर .....

पुढे तशी योजना देखील चालू करण्याचा आपण प्रयत्न करु. 90 दिवसाच्या सजेशन/ ऑब्जेक्शनसाठी एसआरएला नगरविकास खात्याच्या माध्यमातून सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्या दृष्टीकोनातून 8 मार्च रोजी एसआरएकडून नियम 37(1) अंतर्गत सजेशन/ऑब्जेक्शनसाठी नोटिफिकेशन काढण्याचे काम झालेले आहे. एप्रिल महिन्याच्या आत त्या नोटिफिकेशनप्रमाणे सजेशन/ऑब्जेक्शन मिळाल्यानंतर त्याची सुनावणी द्यावी लागते. ते संपूर्ण कामकाज झाल्यानंतर नवीन अध्यादेश काढण्यात येईल. तिसऱ्या प्रश्नात सन्माननीय सदस्यांनी विचारल्याप्रमाणे सहायक जिल्हाधिकारी त्याचप्रमाणे अतिरिक्त जिल्हाधिकारी (अतिक्रमण) यांच्यामार्फत केस स्टडी म्हणून संयुक्त पाहणी करण्याचे काम करता येईल. संपूर्ण मुंबई शहरामध्ये आपण ते करु शकणार नाही.

श्री. कपिल पाटील : पूर्ण शाळांच्या बाबतीत ते केले तर आपल्याला अंदाज येईल.

श्री. सचिन अहिर : पूर्ण शाळांच्या बाबतीत करतो म्हटले तर तसा डाटा आपल्याकडे उपलब्ध असला पाहिजे. सहायक जिल्हाधिकाऱ्यांकडे तो डाटा असावा. त्या विभागाला तशा सूचना देण्यात येतील.

श्री. विजय सावंत : सभापती महोदय, आपण एसआरएमध्ये शाळा विकसित करताना त्यामध्ये 25 टक्के रिझर्व्हेशन महानगरपालिकेला करुन द्यावे लागते. सिटीस्पेसमुळे गार्डन किंवा प्ले ग्राऊंड या बाबतीत जो स्टे घेतलेला आहे त्यामध्ये कायद्याप्रमाणे 25 टक्के जागा हस्तांतरित करण्याचे बंधन आहे. शाळा बांधली पण त्या ठिकाणी गार्डन झाले नाही किंवा प्ले ग्राऊंड झाले नाही तर त्या शाळेला काही अर्थ नाही. त्यामुळे सिटीस्पेसचा जो स्टे आहे तो उठविण्याचा प्रयत्न महाराष्ट्र शासनाने केला नाही. तो स्टे उठविण्याचा प्रयत्न शासन करणार का ? कारण कायद्यामध्ये तरतूद आहे. कायद्याच्या बाबतीत कसा काय स्टे आहे ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, ही वस्तुस्थिती आहे की, सिटीस्पेसच्या निर्णयामुळे आज जे आरक्षण आहे ते आपल्याला डायव्हर्ट करता येत नाही आणि जे आहे त्याच्या बाबतीत पुनर्विकासाच्या संदर्भात फिजिबिलिटी नसल्यामुळे ते आपल्याला करता येत नाही. परंतु सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे सिनियर कौन्सिल नेमून माननीय उच्च न्यायालयाकडे विनंती अर्ज करता येईल का ही बाब देखील तपासून निश्चितपणे करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, या शाळांचे जे सर्वेक्षण करणार किंवा जिल्हाधिकाऱ्यांकडून रिपोर्ट मागविणार त्या शाळांच्या बाबतीत किती जुनी शाळा असली पाहिजे असा काही निकष लावणार आहात की 1995 किंवा 2000 चा जो निकष आहे तोच कायम ठेवणार ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, आज आपण असा कोणताही निर्णय घेतलेला नाही. शासनाच्या वतीने ज्या शाळांना मान्यता दिलेली आहे त्यांचा सर्व्हे करता येईल. त्या शाळा 1995 च्या अगोदरच्या आहेत की नाही किंवा 2000 च्या आहेत की नाही यामध्ये न जाता स्ट्रक्चर प्रोटेक्टेड असले पाहिजे. स्ट्रक्चर प्रोटेक्टेड असेल आणि ते पात्र ठरले तर त्याला काही हरकत नाही. 1995 च्या नंतरच्या असतील किंवा नंतर कोणी विकत घेतल्या असतील किंवा कोणत्या संस्थेने चालवावयास घेतल्या असतील तर हरकत नाही. यामध्ये भेदभाव करणे योग्य होणार नाही असे मला वाटते. शासनाच्या वतीने ज्या शाळांना मान्यता मिळालेल्या आहेत त्यांचा सर्व्हे करुन अहवाल तयार करता येईल.

श्री. जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, महानगरपालिकेकडून शाळेच्या नावावर परवानगी घेऊन ज्या खोल्या बांधल्या जातात त्या खोल्या नंतर पाडून कमर्शियल कॉम्प्लेक्स बांधले जातात किंवा त्या खोल्या विकून बांधकाम केले जाते. ज्यांना शाळा म्हणून बांधकाम करण्यास परवानगी दिलेली आहे ते पाडून जर कमर्शियल कॉम्प्लेक्स उभे राहणार असतील तर अशा शाळांना ते पाडण्याच्या बाबतीत बंदी घालून कमर्शियल कॉम्प्लेक्स बांधण्यासाठी शासन परवानगी नाकारणार आहे का ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, होय.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : राज्यातील शाहीर व इतर लोककलावंतांच्या मागण्यांकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष

मु. शी. : राज्यातील शाहीर व इतर लोककलावंतांच्या मागण्यांकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष यासंबंधी सर्वश्री जयप्रकाश छाजेड, राजन तेली, सुभाष चव्हाण, श्रीमती अलका देसाई, सर्वश्री उल्हास पवार, मोहन जोशी, एस.क्यू.जमा, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. जयप्रकाश छाजेड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सांस्कृतिक कार्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यभरात समाजात जनजागृती करणारे शाहीर आणि इतर कलावंत असे एकूण 5 हजारांच्या आसपास असून त्यापैकी मुंबईत 1800 कलावंत आहेत, या अनेक वर्षापासून त्यांनी आपल्या विविध मागण्यांसाठी राज्य सरकारकडे वेळोवेळी पत्रव्यवहार करुनही शासनाकडून याकडे दुर्लक्ष होत असल्याची बाब नुकतीच उघडकीस येणे, संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात शाहीर आणि लोककलावंत अग्रेसर होता, पण आजघडीला शाहीर व लोककलावंत दुर्लक्षित झाल्यामुळे त्यांच्यात पसरलेला असंतोष, शासनाबद्दल निर्माण झालेली नाराजीची भावना, शासनाने तात्काळ लक्ष घालून त्यांना न्याय मिळवून देण्याची गरज, यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही."

श्री. संजय देवतळे (सांस्कृतिक कार्य मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, राज्यातील लोककलावंतांच्या संदर्भात ही लक्षवेधी सूचना आहे. छत्रपती शिवरायांच्या काळापासून शाहिरी आणि लोककलांची परंपरा चालू आहे. स्वातंत्र्याच्या काळामध्ये शाहिरी आणि लोककलावंतांनी बजावलेली भूमिका, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये जनता पेटून उठावी यासाठी...

उप सभापती : या विषयावर आपले भाषण चालू आहे का ?

श्री. जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, मघाशी एका विषयाच्या संदर्भात 40 मिनिटे दिलेली आहेत. आपण लोककलावंतांच्या बाबतीत 4 मिनिटे तरी देणार की नाही ? आपण तर लोककलावंतांचे पुरस्कर्ते आहात.

उप सभापती : आपण माझ्या विषयावर बोलू नका.

श्री. जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, शाहीर असतील, तमाशा कलावंत असतील असे जे वेगवेगळे कलावंत आहेत त्यांच्या संदर्भात ही लक्षवेधी सूचना आहे. या ठिकाणी निवेदनामध्ये अत्यंत उदासीनतेचे उत्तर आलेले आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश छाजेड....

या कलाकारांनी या राज्यात योगदान दिलेले आहे. त्या कलाकारांची राज्यात उपेक्षा केली जाते. लोक कलावंतांना 1000 रुपये, 1200 रुपये व 1400 रुपये इतके मानधान दिले जाते. निवेदनात 2009 पासून या मानधनात वाढ केल्याचे नमूद केलेले आहे. नोकरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी दर 3 वर्षांनी नवीन करारनामा करुन नवीन वेतन दिले जाते. ज्या कलावंतांना कोणतीही संधी नाही, जे वृध्द झालेले आहेत त्यांना इतके कमी मानधन देण्यापेक्षा कमीत कमी 5 हजार, 4 हजार व 3 हजार इतके मानधन दिले जाईल काय, जे कलावंत वृध्द झालेले आहेत त्यांच्यासाठी शासनाची कोणतीही योजना सुरु नाही. म्हणून त्यांच्यासाठी वृध्द कलाकार कल्याण फंड निर्माण करुन त्या फंडातून त्यांना मदत दिली जाणार आहे काय ?

श्री.संजय देवतळे : सभापती महोदय, लोककला किंवा सर्वच कलावंतांसाठी शासनाची वृध्द कलाकार मानधन योजना सुरु आहे. या योजनेद्वारे त्यांना 500 रुपये, 600 रुपये व 700 रुपये मानधन दिले जात होते. परंतु 2009 मध्ये या मानधनात दुप्पट वाढ करुन ते 1000 रुपये, 1200 रुपये व 1400 रुपये करण्यात आलेले आहे. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या कलावंताना मानधन देण्यासाठी काही निकष होते. प्रत्येक जिल्ह्यासाठी 40 कलावंतांचे लक्षांक होते त्यात सुवर्ण महोत्सवी वर्षात वाढ करुन 60 करण्यात आलेले आहे. राज्यात 12500 वृध्द कलावंतांची प्रकरणे प्रलंबित होती. त्या सर्व प्रकरणांना मान्यता देण्यात आलेली आहे. या सर्व वृध्द कलाकारांना मानधन दिले जाणार आहे. यापुढे लक्षांकाची अट राहणार नाही. जे पात्र वृध्द कलाकार असतील त्यांना त्या त्या वर्षाप्रमाणे मानधन दिले जाणार आहे.

त्याचप्रमाणे या कलावंतांना वर्षातून सहा महिन्यांनी दोन वेळा मानधन दिले जात होते. आता शासनाने इलेक्ट्रॉनिक वितरण प्रणालीबाबत धोरण स्वीकारले असून त्याबाबत चर्चा चालू आहे. त्यामुळे तिमाहीप्रमाणे या कलावंतांच्या बँकेच्या खात्यात हे मानधन जमा होणार आहे. त्यासाठी शासन प्रयत्न करीत आहे. वृध्द कलावंतांच्या औषधोपचाराचा खर्च भागविण्यासाठी सांस्कृतिक निधी म्हणजे कॉर्पोस फंडासारखा निधी उभा केला जात आहे. त्यासाठी 1 कोटीची तरतूद केलेली आहे. हा विषय विधी व न्याय विभागासमोर आहे. कॉर्पोस फंडातून या वृध्द कलाकारांसाठी विविध योजना राबविता येतील. त्यामध्ये सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेचा विचार केला जाईल.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, वर्षानुवर्षे उपेक्षित असलेल्या प्रश्नाच्या संदर्भात या लक्षवेधीच्या माध्यमातून अनेक मुद्दे उपस्थित झालेले आहेत. त्यापैकी दोन मुद्यांबाबत मी प्रश्न विचारणार आहे. शाहिरांनी स्वत: अर्ज केला पाहिजे अशी एक अट आहे. जे साहित्यिक असतील, नाट्य कलावंत असतील, त्यांनी स्वत:हून अर्ज करणे कितपत योग्य आहे ? यासाठी समितीने स्वत:हून दखल घेऊन त्यांच्याकडून या योजनेबाबत कसे योगदान घेऊ शकतो ते ठरविले पाहिजे. त्यांनी अर्ज करुन रांगेत उभे राहिल्याने त्यांचा अपमान होतो. म्हणून पध्दतीत बदल केला पाहिजे.

त्याचप्रमाणे तमाशा परिषदेच्या वेळोवेळी बैठका होत असतात. तमाशा महोत्सव होत असतात. विठाभाऊ नारायणगावकर यांच्या माध्यमातून नारायणगावला स्मृती केंद्र उभारुन तमाशा कलावंतांच्या मुलांच्या शिक्षणासाठी शासन जागा उपलब्ध करुन देईल असे सांगितले होते. प्रत्यक्षात सांस्कृतिक कार्य विभागाने विठाभाऊ नारायणगावकर यांच्या नावाने तमाशा महोत्सव आयोजित केला होता. त्यावेळी विठाभाऊ नारायणगावकर यांच्याऐवजी सोनाली कुलकर्णीचे छायाचित्र छापले होते. (अडथळा)

यानंतर श्री.शिगम....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे..

माझा प्रश्न असा आहे की, ज्यांच्या नावाने स्मृती महोत्सव साजरा केला जातो त्यांचे छायाचित्र छापण्या ऐवजी दुस-याच कलाकारांचे छायाचित्र छापणे म्हणजे विठाभाऊ नारायणगावकर यांचा अवमान आणि उपेक्षा केल्या सारखे आहे. विठाभाऊ नारायणगावकर यांचे स्मृतीकेन्द्र उभारण्यासाठी जमीन उपलब्ध करुन देणे, निधी उपलब्ध करुन देणे या दृष्टीने शासन काही पावले उचलणार आहे काय ?

श्री. संजय देवतळे : स्मारकाचा विषय हा सामान्य प्रशासन विभागाच्या अखत्यारित येतो. तरीही या संदर्भात पूर्वी जे काही निर्णय झालेले असतील त्याबाबतीत मी स्वत: लक्ष घालीन, बैठक घेईन आणि त्याला गती देण्याचा प्रयत्न करीन. ज्यांच्या नावाने स्मृती महोत्सव साजरा होतो त्यांच्या छायाचित्रा ऐवजी दुस-या कलाकरांचे छायाचित्र प्रदर्शित केले जाणे ही चूक आहे. या बद्दल मी स्वत: दिलगिरी व्यक्त करतो. वृद्ध कलाकारांना मानधन देण्याच्या संदर्भात जी योजना आहे त्यामध्ये जिल्हा स्तरावर एक कमिटी आहे. वृद्ध कलाकारांनी अर्ज करुन त्यांनी प्रतीक्षेत रहावे हा त्यांचा अवमान आहे. म्हणून लक्ष्यांक न ठेवता जे पात्र असतील त्या सर्वांना अनुदान मंजूर करण्यात येणार आहे. परंतु शेवटी जिल्हास्तरावरील कमिटीकडे अर्ज करुन ते पात्र आहेत की नाही हे ठरविले पाहिजे. नाही तर अन्य कोणी तरी येतील. असे कोणी शाहीर असतील, कलावंत असतील तर त्याबाबतची माहिती त्यांनी शासनाकडे द्यावी जेणेकरुन ते दुर्लक्षित राहाणार नाहीत व त्यांना न्याय मिळेल.

उप सभापती : मी मघाशी आपणास या संदर्भात पत्र पाठविलेले आहे आणि आधी देखील तसे पत्र पाठविलेले आहे. त्यानुषंगाने या सभागृहामध्ये विषय उपस्थित झालेला आहे म्हणून मी सांगू इच्छितो की, शासनातर्फे दरवर्षी लावणी महोत्सव आयोजित केला जातो. त्या महोत्सवात भाग घेणा-या कलाकारांच्या एका संचाला 25 हजार रुपये मानधन देण्यात येते.. या 25 हजार रुपयात त्यांचे जाणे-येणे असते, त्यांच्या बरोबर 15 ते 20 कलाकार असतात. त्यांचाही खर्च भागत नाही. तसेच त्यांचे जाण्या-येण्याचे दिवस धरले तर त्यांचा दोन-तीन दिवसाचा रोजगार सहज बुडतो. मी पत्रामध्ये असे नमूद केलेले आहे की, या कलाकारांच्या संचाला जे 25 हजार रु. मानधन देण्यात येते त्यामध्ये त्यांचा ना मान रहातो ना त्यांना धन मिळते. तेव्हा या मानधनामध्ये मंत्री महोदय वाढ करणार आहेत काय ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय देवतळे : राज्य शासनाच्या वतीने दिनांक 2, 3 आणि 4 एप्रिलला एनसीपीअे येथे लावणी महोत्सव आयोजित केलेला आहे. त्यांना मिळणारे मानधन सन्मान करणारे असले पाहिजे अशा आपल्या भावना आहेत. मी या बाबतीत स्वत: लक्ष घालीन आणि त्यांना योग्य प्रकारे मानधन मिळेल याची काळजी घेईन.

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, नुकताच महाराष्ट्राचा सुवर्ण महोत्सव साजरा झाला. स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्म शताब्दीचे हे वर्ष आहे. मला येथे नमूद केले पाहिजे की 1956 साली आणि त्या आधी 1952 साली त्यावेळच्या मुंबई राज्याचे अन्न व नागरी पुरवठा खात्याचे मंत्री स्व. यशवंतराव चव्हाण हे होते. त्यांच्याकडे हे खाते नव्हते. परंतु मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये पूर्ण अभ्यास करुन, एक आराखडा तयार करुन तमाशाला एक वेगळे प्राधान्य देण्याकरिता प्रथम निर्णय स्व. यशवंतराव चव्हाण यांनी घेतला. याची नोंद त्यांच्या या जन्म शताब्दी वर्षानिमित्ताने एवढ्यासाठी करीत आहे की, त्यांनी त्यावेळी उद्‌गार काढले होते की, विकास म्हणजे काय, तर विकासाचे दोन डोळे असले पाहिजे. एक डोळा म्हणजे भौतिक विकास झाला पाहिजे. रस्ते, धरणे, शेती या गोष्टींचा विकास झाला पाहिजे, पण त्याच बरोबर राज्याचा सांस्कृतिक विकास हा दुसरा डोळा असला पाहिजे आणि तो नसेल तर ते राज्य परिपूर्ण विकसित होत नाही. त्यामुळे लोककला, लोकसंस्कृती, लोकगीते, लोकनाटय या सर्वांकडे पहाण्याचा राज्याचा दृष्टीकोन सकारात्मक असला पाहिजे.

सभापती महोदय, आता आपण या ठिकाणी जी व्यथा व्यक्त केली ती अगदी बरोबर आहे. आपण कलाकारांना लावणी महोत्सवाला बोलावतो. पण त्यांचा संच आणि त्यांचा लवाजमा हा इतका मोठा असतो की 25 हजार रुपयात त्यांचे जाणे-येणे, त्यांचे रहाणे, त्यांची इतर व्यवस्था होण्यामध्ये अडचण निर्माण होते. हा तत्कालीन प्रश्न आहे.परंतु जीवनामध्ये वृद्धापकाळात त्यांना काही संधी नसते, काही साधने नसतात, सर्वांनाच पैसे मिळतात असे होत नाही. या ठिकाणी मानधन वाढीचा प्रश्न उपस्थित झालेला आहे.

...नंतर श्री. गिते....

अशुधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार...

आपण वृध्द कलावंतना 1000, 1200 तसेच 1400 रुपये मानधन देत आहात, त्याबद्दल धन्यवाद. सन्माननीय सांकृतिक मंत्री श्री. संजय देवतळे यांनी या विभागामध्ये खरोखरच मनापासून लक्ष घातलेले आहे. या विषयाच्या बाबतीत त्यांनी सकारात्मक भूमिका आहे, त्याबद्दल त्यांना आपणही मनापासून धन्यवाद दिले पाहिजे.

महोदय,माझे मित्र सन्माननीय सदस्य श्री.जयप्रकाश छाजेड व इतर सन्माननीय सदस्यांनी मानधनाचा जो मुद्दा उपस्थित केलेला आहे, तो खरोखरच महत्वाचा आहे. माझे असे म्हणणे आहे की, जे कलावंत चुकीचे आहेत, त्यांना मानधन देऊ नका. पण ज्यांना अत्यंत आवश्यक आहे, जे अत्यंत गरजू आहेत, त्या कलावंतांना मानधन देण्याची व्यवस्था राज्य शासनाने केली पाहिजे. त्या कलावंताना आरोग्याची सुविधा उपलब्ध करुन दिली पाहिजे. दारिद्रय रेषेखालील कुटुंबीयांसाठी राजीव गांधी जीवनदायी योजना अतिशय उत्तमपणे या राज्यात राबविली जात आहे. परंतु या कलावंतांची कोठेही नोंद नाही. नारायणगाव हे त्यांचे मुख्य केंद्र आहे. ते सतत वेगवेगळयां गावांमध्ये कार्यक्रम करण्यासाठी जातात. त्या कलावंताना दारिद्रय रेषेचे कार्ड अथवा आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्याबाबतीत एखादी नवीन यंत्रणा निर्माण केली तर त्यांना आरोग्य सुविधेचा फायदा अतिशय उत्तमप्रकारे दिला जाऊ शकतो. शासन यासंदर्भात प्रशिक्षण केंद्रे चालवित आहेत. प्रशिक्षणार्थीची निवड करण्यासाठी जाणीवपूर्वक चांगल्या मंडळीची निवड करुन प्रशिक्षणार्थी निवडले पाहिजेत. त्याही ठिकाणचा निधी शासनाने वाढविला पाहिजे. कलावंतांना देण्यात येणाऱ्या पुरस्काराच्या निधीमध्ये वाढ केली पाहिजे.

महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांनी विठाबाईच्या नावे स्मारक व्हावे अशी मागणी केली. विठाबाईंच्या नावाने स्मारक निश्चितपणे होईल अशा प्रकारची घोषणा माजी मुख्यमत्री श्री.विलासरावजी देशमुख यांच्या कार्यकाळात झालेली आहे. जलसंधारण, महसूल आणि सार्वजनिक बांधकाम या तिन्ही विभागांची सांस्कृतिक कार्य विभागाने एकत्रितपणे बैठक आयोजित करावी आणि स्मारकाची जागा निश्चित करावी व तेथे चांगले स्मारक बांधावे. आपण हुतात्म्यांची स्मारके केली ही अतिशय अभिनंदनीय गोष्ट आहे. आपण मोठ मोठया महान व्यक्तींची स्मारके बांधतो ही गोष्ट देखील तेवढीच अभिनंदनीय आहे. या ठिकाणी एका लोक कलांवंताचे स्मारक

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार...

होणे ही अत्यंत काळाची गरज आहे. या ठिकाणी कलावंताचे मानधन वाढविणे व इतर प्रश्न मी उपस्थित केलेले आहेत, याबाबतीत राज्य शासनाची काय भूमिका आहे. त्याबाबतची माहिती माननीय मंत्री महोदयांनी सभागृहात सांगावी.

श्री. संजय देवतळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे व सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी विठाबाईच्या स्मारकाबाबतीत प्रश्न उपस्थित केला होता. मी या प्रश्नाच्या अनुषंगाने माहिती सांगू इच्छितो की, स्मारक होण्यासाठी जवळपास तीन विभागांशी संबंध येतो. त्यामुळे मी माझ्या स्तरावर बैठक घेऊन त्याबाबतीत मार्ग काढण्याचा निश्चितपणे प्रयत्न करणार आहे. सांस्कृतिक विभागाच्या माध्यमातून शाहीर,तमाशा कलांवत इत्यादी सर्व कलावंत आहेत त्यांना सांस्कृतिक विभागाच्या माध्यमातून 51 हजार रुपयांचा पुरस्कार देत होतो, त्यामध्ये वाढ करण्यात येऊन ती पुरस्काराची रक्कम 1 लाख रुपये एवढी करण्यात आली आहे. ही पुरस्काराची रक्कम 2012-13 या वर्षापासून देण्यात येणार आहे. शाहीर,कीर्तनकार, तमाशा कलावंत यांच्यासाठी एकच शिबीर घेत होतो. शिबिर घेण्याच्या संख्येत वाढ करण्याचा आम्ही विचार करीत आहोत. शासनाने सांकृतिक धोरण जाहीर केले आहे, त्याप्रमाणे सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये वाढ करण्याचा, तसेच सांस्कृतिक क्षेत्राची उंची वाढविण्याचा आमचा विभाग प्रयत्न करीत आहे. सांस्कृतिक कार्यक्रमांना गती मिळावी हा आमचा प्रमुख उद्देश आहे. सांस्कृतिक कार्य संचालनालय एकच आहे. पूर्वी सांस्कृतिक कार्य विभाग कार्यरत नव्हता, पूर्वी सांस्कृतिक कार्य विभागाचे कार्यक्रम समाजकल्याण विभागाकडून राबविले जात होते. औरंगाबाद, नागपूर आणि पुणे येथे सह संचालकाचे कार्यालये उघडून सांस्कृतिक कार्याला गती देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. मानधनांचे जे पेंडींग अर्ज आहेत, ते निकाली काढण्याचा प्रयत्न केला जात आहे. कलावंतांच्या मानधनात वाढ करण्याबाबत सांस्कृतिक कार्य विभागाकडून सकारात्मक दृष्टीकोनातून विचार करण्यात येईल, एवढी मी या प्रसंगी ग्वाही देऊ इच्छितो.

श्री. विनोद तावडे : कलावंताना देण्यात येणाऱ्या गौरव पुरस्काराच्या रकमा पुढील आर्थिक वर्षापासून दुपटीपेक्षा जास्त करण्यात आलेल्या आहेत असे अर्थसंकल्पीय भाषणात नमूद केले आहे.

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

गेल्या वर्षी पर्यटन आणि सांस्कृतिक खात्याला 380 कोटी रुपये मिळाले. या विभागांना कमी तरतूद मिळाली. मी बजेट एक्सपेंडीचरचे पुस्तक वाचत होतो. त्याच्यामध्ये कलावंत, शाहीर इत्यादींना पुरस्कार देण्यासंबंधीच्या रकमा दाखविलेल्या आहेत, त्या रकमा गेल्या वर्षाप्रमाणेच आहे. मंत्री महोदयांकडून कलावंतांना देण्यात येणाऱ्या गौरव पुरस्काराच्या रकमा दुप्पट झाल्या असे सांगितले जात आहे. परंतु एक्स्पेंडीचर पुस्तकात या बाबीसाठी असलेल्या रकमेमध्ये कुठेच वाढ दिसून येत नाही. यासाठी आपण शेवटी पुरवणी मागणी आणून घाईघाईत ती मंजूर करुन घेणार असा काही शासनाचा विचार आहे काय ? पुरस्काराच्या रकमेत वाढ केली असेल तर त्यासाठीचा निधी वित्त विभागाकडून आपल्या विभागास प्रत्यक्षात प्राप्त झाला आहे काय ?

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-5.....

श्री.संजय देवतळे : सभापती महोदय, सांस्कृतिक कार्य विभागामार्फत जे काही पुरस्कार दिले जातात, त्या पुरस्काराबाबत माननीय सभापतींनी सांगितल्याप्रमाणे सन्मानपूर्वक पुरस्कार असावेत या दृष्टीने निर्णय घेतला असून वित्त विभागाची मान्यता मिळालेली आहे. निश्चितपणे या पुरस्काराचे वितरण होत असताना 2012-2013 या वर्षाकरिता जी रक्कम वाढवून दिली आहे तीच रक्कम पुरस्काराच्या वेळी दिली जाईल. पूर्वीची रक्कम देणार नाही.

श्री.विनोद तावडे : विभागाकडे निधी उपलब्ध झाला आहे काय?

उप सभापती : राज्य शासनाचे मंत्री या नात्याने त्यांनी उत्तर दिले आहे.

श्री.संजय देवतळे : पुरस्काराची रक्कम वाढविली आहे. त्यासाठी पुरवणी मागणी सादर करण्याची गरज भासणार नाही. ठरविल्याप्रमाणे शासन पुरस्काराची रक्कम देणार आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, पुरस्काराची रक्कम 1 लाख रुपये केली आहे असे म्हटले आहे. परंतु विभागाला बजेटमध्ये निधी वाढवून दिलेला नाही.

उप सभापती : मंत्री महोदय सभागृहात ज्यावेळी उत्तर देत असतात त्यावेळी ती बाब सत्य मानून पुढे जायचे असते. आता पुढील लक्षवेधी सूचना विचारात घेण्यात येत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : पुण्यातील न्यायालयांमध्ये निर्माण झालेला स्टॅम्प पेपरचा तुटवडा

मु. शी. : पुण्यातील न्यायालयांमध्ये निर्माण झालेला स्टॅम्प पेपरचा तुटवडा यासंबंधी डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महसूलमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"पुण्यातील न्यायालयामध्ये स्टॅम्प पेपरचा माहे जानेवारी, २०१२ च्या सुमारास निर्माण झालेला प्रचंड तुटवडा यामुळे खटला दाखल करण्याकरिता पक्षकारांना आणि वकिलांना येत असलेल्या अडचणी, त्याचबरोबर पाच रुपयांचा कोर्ट फी लेबल स्टॅम्पही वेळेवर न मिळणे, स्टॅम्प पेपर घेण्यासाठी रांगा लावाव्या लागणे, तर मोठया रक्कमेच्या स्टॅम्प पेपरसाठी वेटिंग लिस्ट असणे, परिणामी दावे दाखल करण्याबरोबरच दररोजची किरकोळ कामेही ठप्प होणे, खटल्यांच्या तारखा पडूनही विलंब होणे, यामुळे पक्षकारांना व वकिलांना किरकोळ कामे वेळेत करणेही मुश्कील होणे, परिणामी सामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेला असंतोष व संतापाची भावना, शासनाने याबाबत तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.बाळासाहेब थोरात (महसूल मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, न्यायालयात उपलब्ध असलेले स्टॅम्प आणि ट्रेझरीमध्ये उपलब्ध असलेले स्टॅम्प याबाबतची यंत्रणा कागदोपत्री सुव्यवस्थित असल्याचे दिसते. परंतु प्रामुख्याने दोन अडचणी सगळ्या ठिकाणी जाणवतात. खासकरुन मुंबई शहराबरोबर महाराष्ट्राच्या अन्य भागामध्ये फेब्रुवारी आणि सप्टेंबर महिन्यात स्टॅम्प उपलब्ध नाहीत म्हणून पक्षकारांना स्टॅम्प विकत घेण्यासाठी तासन्तास रांगेत उभे रहावे लागते. स्टॅम्पच्या संदर्भात कृत्रिम टंचाई निर्माण केली जाते का? मुंबई, पुणे, संभाजीनगर, नागपूर आणि अन्य जिल्ह्यामध्ये शहरे मोठी होत चालली आहेत. जिल्हा व तालुका न्यायालयामध्ये स्टॅम्प विकत घेण्यासाठी पक्षकारांना खूप त्रास सहन करावा लागत आहे. विशेषत: स्टॅम्प घोटाळा उघडकीस आल्यानंतर कोर्टात जाऊन रांगेत उभे राहूनच स्टॅम्प विकत घ्यावे लागतात. त्याऐवजी शहरामध्ये तहसील कार्यालय, बँक किंवा पोस्ट ऑफिसमध्ये स्टॅम्प उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीकोनातून पावले उचलली जातील काय?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, नागरिकांना स्टॅम्प मिळण्यामध्ये खूप त्रास होतो. त्यामुळे माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी सुचविल्याप्रमाणे पोस्ट ऑफिस किंवा बँकेमध्ये स्टॅम्पची विक्री करता आली तर खूप मदत होऊ शकते. म्हणून तसा प्रयत्न निश्चितपणे केला जाईल. कागदोपत्री स्पष्ट दिसते की, स्टॅम्पचा तुटवडा निर्माण झालेला नाही. तरी देखील माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे एकंदरीत विचार करुन मुंबईमध्ये जी व्यवस्था आहे त्यानुसार साठा कसा आहे, पुरवठा कसा होतो, विक्रीबाबत काय काय घडते यासाठी निरीक्षकाची यंत्रणा आहे आणि ती यंत्रणा सतत कार्यरत असते. ती यंत्रणा प्राधान्याने महाराष्ट्रामध्ये सुरु करण्याचा विचार करु. आज पुणे शहराबाबतची लक्षवेधी सूचना उपस्थित झाली असली तरी पुण्याला साठा, पुरवठा किंवा विक्रीबाबत लक्ष ठेवून मदत करणारी निरीक्षकाची यंत्रणा नाही. ती यंत्रणा निर्माण करण्यात येईल. या शिवाय स्टॅम्प मिळण्यासाठी अडचण होत असेल, काळाबाजार होत असेल, कृत्रिम टंचाई होत असेल तर तक्रार नोंदविण्याची जागा उपलब्ध असेल त्या ठिकाणी हेल्प लाईनची व्यवस्था करता येईल. फोनवरुन तक्रार सांगता येईल. जेव्हा अशी अडचण निर्माण होते, स्टॅम्प मिळत नाहीत किंवा विशिष्ट रक्कमेचे स्टॅम्प मिळत नाहीत किंवा काळाबाजार होत असेल तर हेल्प लाईनला सांगू शकता. त्याबाबत उपाययोजना होऊ शकते. या शिवाय मुंबई उच्च न्यायालयामध्ये ऑनलाईन सुविधा उपलब्ध केली आहे. ऑनलाईन पध्दतीने स्टॅम्प मिळू

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात.....

शकतात. प्रायोगिक तत्वावर वर्धा येथे योजना सुरु केली आहे. तो प्रयोग यशस्वी झाल्यानंतर संपूर्ण ग्रामीण भागात ऑनलाईन पध्दतीने स्टॅम्प प्राप्त होऊ शकतील अशी व्यवस्था केली जाईल.

नंतर श्री.खर्चे...

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र. 6.....

श्री. मनिष जैन : महोदय, स्टॅम्प पेपर्सचा काळा बाजार भरपूर होतो. विशेषत: तेलगी घोटाळा यात मोठ्या प्रमाणात झाला होता. तसेच मंत्री महोदयांनी बँक व पोस्ट ऑफिसच्या माध्यमातून स्टॅम्प पेपर्स उपलब्ध करण्याबाबत सांगितले. तसेच मोठ्या संख्येने स्टॅम्पची गरज असेल तर बँकांकडून फ्रँकिंगची सुविधा देखील उपलब्ध करुन दिली आहे. पण यामध्ये पेपरची क्वॉलिटी चांगली असावी म्हणून ऑथेंटिक हॉल मार्कची सुविधा करण्याचा शासनाचा विचार आहे काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : महोदय, स्टॅपची छपाई सिक्युरिटी प्रेसमध्ये केली जाते त्यामुळे त्यावर हॉल मार्क्स लावण्याची गरज वाटत नाही. तसेच तेलगी घोटाळा झाल्यानंतर याबाबतीत शासनाने खूप नियंत्रण आणले आहे त्यामुळे देखील काही नागरिकांना अडचण निर्माण झाली असावी. बँकांच्या माध्यमातून फ्रँकिंग आणि मोठ्या शहरातून ई-स्टॅम्पिंगची सुविधा आपण कार्यान्वित केलेली आहे. या बदलामुळे सुध्दा सामान्यांना अडचणी येत असाव्यात. ई-स्टॅम्पिंगची सुरुवात ज्यावेळेस न्यायालयात होईल तेव्हा या सर्व प्रश्नांचे उत्तर मिळणार आहे. तसेच स्टॅम्पच्या बाबतीत सामान्य नागरिकांना अडचणी येऊ नयेत त्यासाठी बाकीच्या उपाययोजनांचा अवलंब आपल्याला करता येईल.

श्री. उल्हास पवार : महोदय, या प्रश्नाशी मुद्रांकांची उपलब्धता, मुद्राकांची टंचाई आणि वितरण करणारे वेंडर्स अशा तीन गोष्टी निगडीत आहेत. मग या वेंडर्सचे काही प्रश्न असतील ते सोडविण्याच्या दृष्टीने त्यांनी मंत्री महोदयांकडे निवेदने दिलेली आहेत. त्या अडचणी सोडविण्याच्या दृष्टीने शासनाने त्यांच्याशी चर्चा केली आहे काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : महोदय, मुद्रांक विक्रेते संपूर्ण राज्यातच असून त्यांचे काही प्रश्न आहेत. बदलत्या काळाप्रमाणे त्यांचे प्रश्न सुध्दा वेगवेगळे आहेत. मोठ्या शहरातून ऑन लाईनने ई-स्टॅम्पिंगची सुविधा सुरु झाल्यानंतर आमच्या बाबतीत शासन कोणता निर्णय घेणार आहे असा त्यांचा प्रश्न आहे त्यामुळेच त्यांनी निवेदन दिलेले आहे. त्यांच्या मागणीनुसार त्यांना सध्या जे स्टॅम्प विक्रीसाठी वेळेचे बंधन आहे ते शिथील करण्यात येईल. याशिवाय 15 हजारच्या मर्यादेपर्यंत त्यांना विक्री करता येत होती ती मर्यादा 30 हजारपर्यंत वाढविण्याचा निर्णय घेण्यात येईल. तसेच

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र. 6..... श्री. बाळासाहेब थोरात.....

नुतनीकरण करण्यासाठी पोलिसांचा रिपोर्ट सादर करणे आवश्यक होते. याउलट आपण पोलिसांनाच असे आदेश देत आहोत की, ज्यांना नूतनीकरण करुन पाहिजे त्यांचे रिपोर्ट शासनाला सादर करावेत, जेणेकरुन या मुद्रांक विक्रेत्याला हेलपाटे घालण्याची वेळ येणार नाही. तसेच मुद्रांक विक्रीचा परवाना ज्यांच्या नावाने आहे त्यानेच ते विकले पाहिजे त्याऐवजी त्यांच्या घरातील माणसाला सहकारी म्हणून विक्री करण्यासाठी परवानगी देण्याची व्यवस्था केली जाईल आणि असे निर्णय प्रॅक्टिकली घेण्याचा शासनाचा विचार आहे.

श्री. विक्रम काळे : स्टॅम्पची सुविधा ऑन लाईन करण्याचा निर्णय शासनाने घेतला त्याबद्दल मी मंत्री महोदयांना धन्यवाद देतो. ही पध्दत सुरु झाल्यानंतर बाकीचे प्रश्न निकाली निघतील असे वाटते. पण अशा प्रकारे ऑनलाईनचा निर्णय घेतला त्याची अमलबजावणी किती दिवसात सुरु होणार आहे, तसेच आपण संपूर्ण राज्याचा आढाव घेतला आहे असे सांगितले. त्यानुसार जेवढे स्टॅम्प लागतील तितका पुरवठा करण्याचा प्रयत्न शासन करणार काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : महोदय, मागणीप्रमाणे ही उपलब्धता होत असते. कारण शॉर्टेज निर्माण झाले तर त्यात काळा बाजार होण्याची शक्यता असते. यासंदर्भात संपूर्ण राज्यातील मागणीचा आढावा घेऊन अशी चूक पुन्हा होणार नाही याची दक्षता नक्कीच घेण्यात येईल. तसेच ऑन लाईन मुंबई उच्च न्यायालयात सुरु झालेली असून संपूर्ण राज्यात तसेच ग्रामीण भागात ही सुविधा करण्याचा शासनाचा विचार आहे. त्या दृष्टीने वर्धा येथे प्रायोगिक तत्वावर ही सुविधा सुरु केली असून ती यशस्वी झाल्यानंतर दोन तीन महिन्यात त्याचा निकाल आल्यानंतर त्यात काही बदल आवश्यक असतील ते करुन पुढील काळात संपूर्ण राज्यात ही सुविधा उपलब्ध केली जाईल.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, स्टँप वेंडरांची पूर्वी 15 हजाराची मर्यादा होती ती आता 30 हजार रुपये करण्यात येणार आहे. पूर्वी आम्ही त्या किमतीचा स्टँप स्टँप वेंडर कडून विकत घेत होतो. समजा 50 हजार रुपयांचा स्टँप हवा असेल तर स्टँप वेंडर स्वत: गुंतवणूक करुन किंवा आम्ही गुंतवणूक करुन स्टँप विकत घेत होतो. परंतु आता स्टँप वेंडरांवर मर्यादा आल्यामुळे ट्रेझरीमध्ये चलन भरण्यासाठी वकिलांना तसेच पक्षकारांना सुध्दा रांगा लावाव्या लागत आहेत. त्यामुळे स्टँप विक्रेत्यांवर जी 30 हजार रुपयाची मर्यादा घालण्यात आलेली आहे ती असू नये. न्यायालयात लागणारा ज्या काही किमतीचा स्टँप लागेल तो स्टँप पेपर विकण्याची मुभा स्टँप वेंडरांना दिली जाईल या दृष्टीने शासन काही पाऊल उचलणार आहे काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, स्टँप वेंडरांना 30 हजार रुपयांचा स्टँप पेपर विकण्याची परवानगी देण्याचा निर्णय घेतला आहे तरी सुध्दा सन्माननीय सदस्यांनी जो उल्लेख केलेला आहे ती बाब निश्चितपणे तपासून घेण्यात येईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेख

पृ.शी./मु.शी. : मुंबई अंधेरी(पूर्व) येथील ईएसआय रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना सेवेतून कमी करण्याची दिलेली धमकी याबाबत श्री.जयप्रकाश छाजेड,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. जयप्रकाश छाजेड (विधानसभेने निवडलेले) सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

मुंबईतील अंधेरी(पूर्व) येथे असलेल्या ईएसआय रुग्णालयात गेली 30 ते 35 वर्षापासून कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना राज्य शासनाच्या अखत्यारीत असतांना सर्व सोयी-सुविधा देण्यात येणे, पण काही कारणास्तव राज्य शासनाने या रुग्णालयाचा कारभार सन 2008 मध्ये कामगार विमा योजना महामंडळाकडे सोपवून कार्यरत असलेल्या सर्व कर्मचा-यांना कायमस्वरुपी सेवेत सामावून घेण्याचे आदेश राज्य शासनाने देणे, परंतु रुग्णलायाचे अधीक्षक यांनी राज्य शासनाचे आदेश धुडकावून कर्मचा-यांना कायमस्वरुपी सेवेत न घेता कर्मचा-यांना सेवेतून कमी करण्याची देण्यात आलेली धमकी, या धमकीमुळे भीतीपोटी 300 कर्मचा-यांनी अर्ज भरुन देणे व उर्वरित 200 कर्मचा-यांनी दि. 20 मार्च 2012 पासून सुरु केलेले साखळी उपोषण, कर्मचा-यांना सेवेतून कमी केल्यास त्यांच्यावर अन्याय होऊन कर्मचा-यांच्या कुटुंबियांवर ओढवणारी उपासमारीची वेळ, परिणामी कर्मचा-यांमध्ये शासनाबद्दल निर्माण झालेली तीव्र चीड, संतापाची भावना, कर्मचा-यांना राज्य शासनाच्या सेवेप्रमाणेच सर्व सोयी-सुविधा देऊन कायमस्वरुपी सेवेत सामावून घेऊन त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी मी विशेष उल्लेखाच्या द्वारे सभागृहाचे लक्ष वेधून इच्छितो.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : 50 किलो पेक्षा जास्त ओझे देणा-यांवर कारवाई करणे याबाबत

ॲड. उषा दराडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

राज्यात आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या ठरावानुसार माणसाच्या पाठीवर 50 किलोपेक्षा जास्त ओझे देण्यास मनाई करणारा ठराव घेण्यात येणे, त्यास केंद्र शासनाने 1990 मध्ये मान्यता देऊन सर्व राज्यांना तसेच आदेश देऊनही त्याची अंमलबजावणी प्रभावीपणे न होणे, याबाबत 50 किलोपेक्षा जास्त वजनाच्या पोत्यास बंदी घालण्यात यावी तसेच 50 किलोपक्षा जास्त ओझे देणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी म्हणून महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळ संघटनेमार्फत होत असलेली मागणी, उक्त मागणीच्या अनुषंगाने मापाडी कामगारांना 50 किलो पेक्षा जास्त ओझे देण्यात येऊ नये. निर्जीव वाहनात क्षमतेपेक्षा जास्त लोड दिला तर दंड तर मग हा नियम माणसांतही लागू असावा. यासाठी शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना याविषयी हा विशेष उल्लेख देत आहे. कृपया योग्य ते निर्देश द्यावेत ही विनंती.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : मुलुंड (प) उपनगरात 40 वर्षापासून राहत असलेल्या झोपडपट्टी वासियांचे पुनर्वसन सर्व्हे नं. 377-68 वर करणे याबाबत श्रीमती अलका देसाई, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

मुलुंड(मुंबई) पश्चिम मधील शेवटच्या ठिकाणापासून संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाची हद्द सुरु होत असून या विभागात हनुमानपाडा नं.1 व 2, पंचशीलनगर, गणेश पाडा, राहुलनगर व शंकर टेकडी या परिसरात मागील 40 वर्षापासून राहत असलेले झोपडपट्टीवासीयांची वनजमीन आता मोकळी करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र राज्याचे मुख्य वन संरक्षक व संचालक यांनी या झोपडपट्टीधारकांचे पवई जवळील चांदिवली येथे पुनर्वसन करण्याचा निर्णय घेतला आहे. झोपडपट्टी वासियांनी मात्र त्याच परिसरातील सर्व्हे क्रमांक 377-68 येथेच पुनर्वसन करण्याची मागणी केली आहे. मागील 40 वर्षापासून सदर ठिकाणी राहत असलेल्या या झोपडपट्टीवासीयांचे पुनर्वसन चांदिवली येथे न करता सर्व्हे नंबर 377-68 याच जागेवर करण्याची आवश्यकता आहे. अशा या अतिशय महत्वाच्या विषयावर मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : गट सचिवांना शासकीय सेवेत सामावून घेणे याबाबत

डॉ.नीलम गो-हे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

डॉ. नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

सभापती महोदय, संपूर्ण राज्यात सहकाराचे जाळे सहकारी सोसायटयांमधून उभे राहिले आहे. ग्रामीण भागातील शेतक-यांना आधार म्हणून या सेवा संस्था महत्वाची कामगिरी बजावत आहेत.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

गट सचिव प्रत्येक गावपातळीवर जबाबदारी पार पाडत असतात. गट सचिवांना शासकीय सेवेत सामावून घेण्यासंबंधीचा प्रश्न थोडा थोडका नव्हे तर गेल्या 45 वर्षापासून प्रलंबित आहे. गट सचिवांचे प्रश्न सोडविण्यासाठी 1969 साली व्यंकय्या समिती नेमली. त्यानंतर 1971 साली कोरे समिती नेमली. 1978 साली दांडेकर समिती नेमली. 1989 साली श्री.शामराव कदम समिती नेमली. 1991-92 मध्ये प्रा.पी.बी.पाटील यांची समिती नेमण्यात आली. प्रत्यक्षपणे कोणती उपाययोजना करायची याबाबत शासन कोणतीही अंमलबजावणी करताना दिसत नाही. सहकार मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांनी गेल्या वर्षी सुद्धा आश्वासन दिले होते. त्याची अद्याप पूर्तता झालेली नाही. त्यामुळे ग्रामीण भागातील सहकारी सोसायट्या अजूनही खिळखिळ्या होण्याचा मोठा धोका तयार झालेला आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी गट सचिव संघटना संयुक्त कृती समितीचा प्रश्न तातडीने सोडविण्याची आवश्यकता असल्याने शासनाने याबाबत निवेदन करावे अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई,गेवराई,शिरूर,आष्टी, पाटोदा,बीड,वडवणी,माजलगावसह अन्य तालुक्यात दहावीच्या परीक्षा केंद्रांवर विद्यार्थ्यांसाठी नीटनेटकी व्यवस्था नसणे याबाबत श्री.धनंजय मुंडे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.धनजंय मुंडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

नुकत्याच झालेल्या दहावीच्या परीक्षेत बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई, गेवराई, शिरूर, आष्टी, पाटोदा, बीड, वडवणी, माजलगावसह अन्य तालुक्यातही परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांना नीटनेटकी बैठक व्यवस्था नसणे, पाणी, वीज, शौचालये, पंखे आदी भौतिक सुविधा न मिळणे, ज्या शाळांमध्ये आसन व्यवस्था, पाणी, वीज, शौचालये आदी भौतिक सुविधा व पूरक व्यवस्था नाही अशा शाळांनाच परीक्षा केंद्राची परवानगी देण्याचा न्यायालयाचा आदेश असतानाही या आदेशाला शिक्षण विभागाने हरताळ फासणे, बैठक व्यवस्था, पाणी, वीज नसल्याने परीक्षार्थी विद्यार्थ्यांची प्रचंड गैरसोय होणे, त्यामुळे मनस्ताप होऊन त्याचा परिणाम पेपर सोडविण्यावर होऊन त्यांचे शैक्षणिक नुकसान/भीती निर्माण होणे, परीक्षा केंद्रावर भौतिक सुविधा नसतानाही परीक्षा केंद्र मंजूर करून न्यायालयाचा अवमान करणाऱ्या शिक्षण विभागातील जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची गरज व होत असलेली मागणी, भौतिक सुविधा नसणाऱ्या परीक्षा केंद्रांना मान्यता न देण्याबाबतच्या निर्णयाची कठोर अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, याकडे शिक्षण विभागाचे दुर्लक्ष,त्यामुळे विद्यार्थी-पालकांमध्ये निर्माण झालेला संताप यावर शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: पुणे शहरातील वीर माता, वीर पत्नी यांच्या नावे असलेल्या मिळकतीस सर्वसाधारण करातून माफी देणे

श्री.मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

पुणे शहरातील माजी सैनिकांच्या वीर माता, वीर पत्नी यांच्या नावे असलेल्या एका मिळकतीस सर्वसाधारण करातून माफी देण्यात यावी असा ठराव पुणे महानगरपालिकेने सन 2009 साली मंजूर केला आहे. मुंबई प्रांतिक म.न.पा.अधिनियमांतर्गत या ठरावाला राज्य शासनाची अंतिम मंजुरी आवश्यक आहे. या संदर्भात स्थानिक वर्तमानपत्रात जाहीर प्रगटनाद्वारे हरकती व सूचना देखील मागविण्यात आल्या होत्या. सदरहू ठरावास पुणे म.न.पा.च्या स्थायी समितीने देखील मान्यता दिली आहे. या ठरावाला नगरविकास विभागाने अद्याप मान्यता दिलेली नाही. ती मान्यता तातडीने देऊन पुणे शहरातील वीर माता, वीर पत्नी यांच्या प्रती शासनाने कृतज्ञता व्यक्त करावी अशी मागणी मी या निमित्ताने करतो.

उप सभापती : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2.45 वाजता पुन: भरेल.

(दुपारी 1.58 ते 2.45 वाजेपर्यंत मध्यंतर)

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत.

सभापती : मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 2.45 वाजता 10 मिनिटांकरिता स्थगित झाली.)

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

सभापतीस्थानी माननीय सभापती

सभापती : माननीय मंत्री महोदय,श्री. बाळासाहेब थोरात हे एक वक्तशीर मंत्री आहेत या दृष्टिकोनातून मी त्यांच्याकडे बघतो असे असतानासुध्दा सभागृहाचे कामकाज सुरु झाल्यानंतर या सभागृहात येण्यास त्यांना दोन मिनिटे विलंब झाला अशी परिस्थिती आहे. सभागृहाने याची नोंद घेतलेली आहे. या अनुषंगाने यापुढच्या काळात अशा प्रकारचा विलंब होणार नाही याची आपण नोंद घ्यावी.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय,या दोन आठवडयात तीन वेळा अशा प्रकारची परिस्थिती निर्माण झालेली आहे.

सभापती : माननीय मंत्री महोदय, बाळासाहेब थोरात यांनी ही बाब लक्षात घ्यावी तसेच आपल्या अन्य सहकाऱ्यांना सूचना देण्याच्या अनुषंगाने संसदीय कामकाज विभागाला कल्पना द्यावी.

पृ.शी./मु.शी.: पॉईंट ऑफ प्रोसिजर

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ प्रोसिजर आहे. खरे तर महाराष्ट्रातील साडे अकरा कोटी जनतेची विधिमंडळाकडून अशी अपेक्षा असते की येथे भ्रष्टाचाराला संमती मिळू नये आणि म्हणूनच आपण सर्वजण या ठिकाणी काम करीत असतो. मी काल महाराष्ट्र विधानसभा नियम 35 अन्वये नोटिस दिली होती एम.एन. कौल व एस.एल. शकधर यांच्या संसदेची कार्यपध्दती व कार्यप्रणाली या पुस्तकातील पान क्रमांक 441 परिच्छेद क्रमांक 4 प्रमाणे ज्या काही प्रकरणामध्ये काही आरोप दुसऱ्या सदनामध्ये एखाद्या लोकसभेच्या सभासदाच्या विरोधामध्ये केले गेले असतील तर अध्यक्ष अशा सभासदास आपले स्पष्टीकरण देण्यास परवानगी देऊ शकतात तसेच अध्यक्षांनी अशा सभासदास देखील स्पष्टीकरणाची परवानगी दिली आहे की, ज्या सभासदाचे नाव इतर सदनात एखाद्या सरकारी तपासात सामील असेल." सभापती महोदय, या प्रमाणे मी विधानसभेचे सन्माननीय सदस्य श्री. कृपाशंकर सिंह यांना नोटिस दिली होती आणि त्या संबंधीचे पत्र आपल्याला दिले होते. मी नियम 35 अन्वये दिलेली नोटिस आपण नाकारलेली आहे असे मला आपल्याकडून पत्र आलेले आहे. माझा पॉईंट ऑफ प्रोसिजर एवढाच आहे की,

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ...

मी ज्या नियमान्वये श्री. कृपाशंकर सिंह यांच्या विरोधात अपराधारोपात्मक अभिकथन करणार आहे, त्यांच्यावर काही आरोप करणार आहे अशी जी नोटिस दिली होती. त्या संदर्भात सभापती महोदय आपण मला जे पत्र दिलेले आहे त्यामध्ये असे म्हटले आहे की,"निदेशानुसार आपणास कळविण्यात येते की,.... संदर्भाधीन पत्रान्वये आपण मविप/35 अन्वये, सभापती महोदय, फक्त नियम 35 अन्वये नाही तर मी कौल आणि शकधर यांच्या संसदेची कार्यपध्दती व कार्यप्रणाली या पुस्तकातील पृष्ठ 441 परिच्छेद क्रमांक 4 चा उल्लेख केला होता त्याचा उल्लेख या पत्रात आलेला नाही. श्री. कृपाशंकर सिंह विधानसभा सदस्य यांच्या संदर्भात अपराधारोपात्मक अभिकथन करण्याबद्दल दिलेली सूचना सभागृहात उपस्थित करण्यास माननीय सभापती यांनी अनुमती नाकारली आहे असे सन्माननीय डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव यांचे पत्र मला मिळालेले आहे.

सभापती महोदय, मला या संदर्भात माहिती पाहिजे. माझा तो अधिकार आहे. एखादा स्पेसिफिक नियम देऊन मी आपल्याकडे ज्यावेळी परवानगी मागितली की, श्री. कृपाशंकर सिंह यांच्यावर अशा प्रकारचे अपराधारोपात्मक आरोप करण्याची कृपया आपण मला परवानगी द्यावी.त्या संदर्भातील सर्व कागदपत्रे मी आपल्याला पाठविलेली आहेत सन्माननीय श्री. कृपाशंकर सिंह यांना देखील पाठविलेली आहेत. जेवढया प्रकरणाच्या संदर्भात मी त्यांच्यावर आरोप करणार आहे त्याबद्दलची सर्व कागदपत्रे मी पाठविलेली आहेत. एवढेच नाही तर सन्माननीय सुप्रीम कोर्टाने जो निर्णय दिला आहे त्याची प्रत मी आपल्याकडे पाठविली आहे. सुप्रीम कोर्टाने याला स्थगिती दिलेली नाही फक्त ज्या एका प्रकरणात स्थगिती दिलेली आहे त्या प्रकरणाच्या बाबतीत मी त्यांच्याकडून ॲफिडेव्हिट मागितलेले आहे.

सभापती : या अनुषंगाने निर्णयाप्रत येण्याच्या दृष्टीने मी जी काही तपासणी केली त्या अनुषंगाने याबाबतीतील माझा सविस्तर निर्णय मी घेतला आहे त्या बाबतीतील फाईडिंग्स मी आपल्या समोर ठेवल्या तर सर्व क्लिअर होईल.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, त्याची काही अडचण नाही. फक्त माझ्या अधिकारावर गदा येता कामा नये.

सभापती : सभापतींच्या निर्णयावर शक्यतो चर्चा केली जात नाही.

श्री. रामदास कदम : आपला निर्णय अजून झालेलाच नाही. आपण मला काही सांगितले नाही.

सभापती : माझे जे पत्र आले आहे तो निर्णयाचाच भाग आहे.

श्री. रामदास कदम : कोणत्या नियमाच्या आधारे परवानगी नाकारली हे आपण सांगितलेले नाही. तो माझा अधिकार आहे.

सभापती : नियम 35 अन्वये आपण जी नोटीस दिली होती...

श्री. रामदास कदम : मी फक्त नियम 35चाच उल्लेख केलेला नाही.

सभापती : आपण कौल आणि शकधर यांच्या पुस्तकातील पृष्ठ 441 वरील परिच्छेद 4 चा उल्लेख केलेला आहे.

श्री. रामदास कदम : त्या पुस्तकातील पृष्ठ क्रमांक 441 परिच्छेद 4 चा उल्लेख मी केलेला आहे. मी फक्त नियम 35 चाच उल्लख केलेला नाही.

सभापती : आपण कौल आणि शकधर यांच्या पुस्तकातील पृष्ठ क्रमांक 441 चा उल्लेख केलेला आहे.

श्री. रामदास कदम : होय.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम, विधान परिषद सदस्य यांनी श्री. कृपाशंकर सिंह, विधानसभा सदस्य यांच्यावर अपराधारोपाच्या स्वरुपाचे अभिकथन करण्यास महाराष्ट्र विधान परिषद नियम 35 अन्वये परवानगी मिळणेबाबत विनंती माझ्याकडे दिलेली आहे. या संदर्भात महाराष्ट्र विधान परिषद नियम 35 मधील तरतूद मी प्रथम निदर्शनास आणतो.

"ज्या सदस्यास एखाद्या व्यक्तीवर मानहानिकारक किंवा अपराधारोपाच्या स्वरुपाचे कोणतेही अभिकथन ज्या दिवशी करावयाचे असेल त्या दिवशीच्या आदल्या कामकाजाच्या दिवशी त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/ MMP/ KGS/

सभापती ....

सदस्याने सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत सभापतीस व तसेच चौकशी करुन उत्तर देण्याच्या प्रयोजनासाठी संबंधित मंत्र्यास, आवश्यक त्या कागदपत्रांसह लेखी पूर्वसूचना दिल्याशिवाय त्या सदस्यास कोणत्याही व्यक्तीविरुध्द मानहानिकारक किंवा अपराधारोपात्मक स्वरुपाचे कोणतेही अभिकथन करता येणार नाही ;

परंतु, असे अभिकथन सभागृहाच्या प्रतिष्ठेस कमीपणा आणणारे आहे किंवा असे अभिकथन केल्याने कोणत्याही प्रकारे लोकहित साध्य होणार नाही असे सभापतींचे मत असेल तर, कोणत्याही सदस्यास असे कोणतेही अभिकथन करण्यास कोणत्याही वेळेस सभापती मनाई करु शकतील."

तसेच मे. कौल व शकधर यांच्या "पार्लमेंटरी प्रॅक्टीस अँड प्रोसीजर" (पाचवी आवृत्ती) संदर्भ ग्रंथातील काही उतारे मी निदर्शनास आणतो. पृष्ठ क्रमांक 917 वर पुढील प्रमाणे म्हटले आहे.

"As a rule, No allegation of a defamatory or incriminatory nature can be made by a member against any person unless the member has given previous intimation to the Speaker and taken his permission and has also informed the Minister concerned, so that the Minister could make an investigation into the matter for the purpose of a reply. Nevertheless, the Speaker may at any time prohibit a member from making any allegation if he is of opinion that such allegation is derogatory to the dignity of the House or that it does not serve any public interest."

त्याचप्रमाणे पृष्ठ क्रमांक 921 वर पुढीलप्रमाणे म्हटले आहे.

(i) The member gives adequate advance notice to the Speaker and the Minister concerned.

(ii) The details of the charges sought to be leveled are spelt out in precise terms and are duly supported by the requisite documents which are to be authenticated by the member.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

(iii) The member before making the allegations in the House satisfies himself after making enquiries that there is a basis for the allegations;

(iv) The member is prepared to accept responsibility for the allegations; and

(v) The member is prepared to substantiate the allegation.

एखाद्या व्यक्तीविरुध्द अपराधारोपात्मक अभिकथन करावयाचे असल्यास लोकसभेमध्ये दिनांक 17 डिसेंबर, 1970 रोजी पुढीलप्रमाणे कार्यपध्दती आखून दिलेली आहे.

1. सदस्यानी आरोप करण्यापूर्वी पुरेशी आगाऊ सूचना माननीय सभापती, सदस्य व मंत्री महोदयास दिली पाहिजे.
2. सदस्य जे आरोप करु इच्छितात तद्संबंधी सविस्तर माहिती, पुराव्यादाखल आवश्यक ती कागदपत्रे ऑथेंटिक करुन देणे आवश्यक आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती....

3. तत्संबंधी सन्माननीय सदस्यांनी कागदपत्रे वस्तुस्थितीवर आधारित आहेत याची खात्री करुन घेणे आवश्यक आहे.
4. सदस्यांनी याबाबत संपूर्ण जबाबदारी स्वीकारणे आवश्यक आहे.
5. सदस्य हे आरोप सिध्द करण्यास समर्थ असले पाहिजेत.
6. सदस्यांना सभा बाहेरील व्यक्तीविरुध्द आरोप करण्यास अनुमती दिली जाणार नाही. त्यासाठी सदस्यांना माननीय अध्यक्षांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. माननीय अध्यक्ष किंवा मंत्री महोदयांनी आगाऊ सूचना देणे बंधनकारक राहील व अशा सूचना समवेत आरोपांचे स्वरुप, पुरावे इत्यादीसुध्दा द्यावे लागतील.
7. जर सदस्यांनी सभागृहाच्या बाहेरील व्यक्तीविरुध्द व माननीय अध्यक्षांच्या पूर्वपरवानगीशिवाय आरोप केले तर असे आरोप हे सभागृहाच्या कार्यवाहीचे भाग होणार नाहीत. त्याप्रमाणे श्री.योगेन्द्र नारायण यांच्या "राज्यसभा ॲट वर्क" त्या संदर्भातील ग्रंथात पृष्ठ क्रमांक 778 वर पुढील प्रमाणे म्हटले आहे :-

"As per rule, no allegation of a defamatory or incriminatory nature can be made by a member against any other member or a member of the other House unless the member making the allegation has given previous intimation to the Chairman and also to the Minister concerned so that the Minister may be able to make an investigation into the matter for the purpose of a reply. Nevertheless the Chairman may at any time prohibit any member from making any such allegation, if he is of opinion that such allegation is derogatory to the dignity of the House or that no public interest is served by making such allegation."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

नियमातील तरतुदी, लोकसभेत घेण्यात आलेले निर्णय, त्याचप्रमाणे कौल व शकधर यांच्या ग्रंथातील उतारे तपासून पाहिले असता, जी व्यक्ती विधानपरिषदेची सदस्य नाही व ज्या व्यक्तीस त्यांच्याविरुध्द करण्यात आलेल्या अपराधारोपात्मक अभिकथनाविरुध्द सभागृहात खुलासा करण्याची कोणतीही संधी प्राप्त होणार नाही, अशा प्रसंगी प्रस्तुत सूचना स्वीकारार्ह ठरते काय ? याबाबत तपासून पाहिले असता खालील बाबी आढळून आल्या :-

कौल आणि शकधर यांच्या ग्रंथाच्या पाचव्या आवृत्तीमधील पृष्ठ क्रमांक 413 वर असे नमूद केले आहे की,

"In case where certain allegations were in the other House against a member of Lok Sabha, the Speaker has permitted the affected member to make a personal explanation in the House to clarify his position. The Speaker has also permitted members whose names were mentioned in the other House in connection with a certain inquiry being conducted by the Government, to make personal explanations in the House to clarify their respective positions."

त्याचप्रमाणे लोकसभेच्या माननीय सदस्यांनी राज्यसभेच्या माननीय सदस्यांविरुध्द अथवा राज्यसभेच्या माननीय सदस्यांनी लोकसभेच्या माननीय सदस्यांविरुध्द अपराधारोपात्मक स्वरुपाचे अभिकथन केल्याचे पूर्वोदाहरण आहेत काय ? हे तपासले असता, श्री.सुभाष कश्यप यांच्या पार्लमेंटरी प्रोसिजर या ग्रंथाच्या खंड 2 मधील पृष्ठ क्र.2452 मध्ये पुढील प्रमाणे आढळून आले :-

राज्यसभेचे सदस्य असलेल्या व सार्वजनिक धर्मादाय न्यासाचे अध्यक्ष असलेल्या राज्यसभेच्या सदस्याविरुध्द लोकसभेच्या सदस्याने अभिकथन केल्याचे पूर्वोदाहरण आहे. दिनांक 12 एप्रिल, 1983 रोजी (एडुआर्डो फालेरो) या सदस्यांनी गृह मंत्रालयाच्या विभागाच्या मागण्यांवर बोलताना सिंधिया देवस्थान ट्रस्ट या संस्थेचे अध्यक्ष असलेल्या राज्यसभेच्या सदस्यांविरुध्द अभिकथन केले होते व उपरोक्त सदस्यांनी आपल्या भाषणानंतर अभिकथनाच्या समथनार्थ काही विशिष्ट कागदपत्रे सादर केली होती. सदर कागदपत्रे ठेवण्यासाठी त्यांनी

3...

सभापती.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

परवानगी घेतली नव्हती. त्याचप्रमाणे बाब न्यायप्रविष्ठ असल्यास त्याबाबतीत तरतुदी तपासल्या असता महाराष्ट्र विधानपरिषद नियम 34 (2) (एक) मध्ये पुढील प्रमाणे चर्चेवरील मर्यादा निश्चित करण्यात आली आहे.

यानंतर श्री.शिगम....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

भारताच्या कोणत्याही भागात अधिकारिता असलेल्या न्यायालयाच्या अभिनिर्णयाधीन असेल अशा कोणत्याही बाबींचा उल्लेख करता कामा नये.

तसेच कौल आणि शकधर यांच्या ग्रंथातील (पाचवी आवृत्ती) पृ. क्र. 1069 वर न्यायप्रविष्ट बाब केव्हा होऊ शकते या संदर्भात खालीलप्रमाणे विवेचन करण्यात आलेले आहे.

"A committee of Presiding Officers has considered the scope of the rule of sub judice and recommended the following guidelines.-

8. Rule of sub judice has application only during the period when the matter is under active considertion of a court of law or courts martial. That would mean as under-

(a) In criminal cases- From the time charge sheet is filed till judgment is delivered.

(b) In court martial- From the time charges are preferred till the charges are confirmed.

(c) In civil suits- From the time issues are framed till judgment is delivered.

(d) In writ Petitions- From the time they are admitted till orders are passed.

(e) Injunction petitions- From the time they are admitted till orders are passed.

(f) Appeals- From the time appeal is admitted till judgment is delivered."

तसेच मे. कौल आणि शकधर यांच्या ग्रंथातील (पाचवी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक 917 वरील पुढील परिच्छेद निदर्शनास आणण्यात येत आहे.-

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

"It was against the rules of parliamentary debate and decorum to make defamatory statements or allegations of incriminatory nature against any person and the position was rather worse if such allegations were made against persons who were not in a position to defend themselves on the floor of the House. The House should not be made a forum where the conduct and character of persons should be brought into disrepute, as the person against whom allegations were made had no remedy against a speech made on the floor of the House which was privileged."

उपरोक्त सर्व नियम आणि संदर्भ ग्रंथातील तरतुदी यांचा सर्वंकष अभ्यास करुन या प्रकरणी नमूद करण्यात येते की -

1. माननीय मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरुध्द सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आलेली आहे व सदर याचिका सर्वोच्च न्यायालयाने दाखल करुन या प्रकरणी पुढील कारवाई करण्याचे आदेश सुध्दा दिलेले आहेत.
2. मे. कौल आणि शकधर यांच्या ग्रंथात नमूद केल्याप्रमाणे माननीय सदस्यांनी त्यांनी उल्लेख करावयाच्या बाबीच्या सत्यतेसंबंधी संपूर्ण जबाबदारी घेतली पाहिजे. या प्रकरणी श्री. रामदास कदम, वि.प.स. यानी अशी जबाबदारी घेण्याचे सूचनेत नमूद केलेले नाही.
3. म.वि.प. नियम 34(2)(एक) नुसार भारताच्या कोणत्याही भागात अधिकारिता असलेल्या न्यायालयाच्या अभिनिर्णयाधीन असेल अशा कोणत्याही बाबींचा उल्लेख करता कामा नये. या प्रकरणी श्री. रामदास कदम, वि.प.स.यांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, श्री. कृपाशंकर सिंह यांच्या विरुध्द करावयाच्या अपराधारोपात्मक अभिकथनाद्वारे उपस्थित करावयाच्या सर्व बाबी न्यायप्रविष्ट आहेत.

..3..

28-03-2012 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) OO-3

MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 15:10

सभापती...

4. म.वि.प. नियम 35च्या परंतुका नुसार असे अभिकथन लोकहितार्थ असणे आवश्यक आहे. या प्रकरणी कोणत्याही प्रकारे लोकहित साध्य होईल असे दिसत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपरोक्त सर्व बाबी एकसमयावच्छेदे करुन विचारात घेता प्रस्तुत सूचना संबंधित नियमातील निकष पूर्ण करीत नसल्याचे दिसून येते. अत: सूचनेस मी अनुमती नाकारली आहे.

...नंतर श्री. गिते...

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

मु.शी.: सन 2012-2013 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

(चर्चा पुढे सुरु.....)

सभापती : सन 2012-2013 च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेचा आजचा दुसरा दिवस आहे. चर्चेसाठी एकूण जो वेळ उपलब्ध होईल त्यापैकी वित्त मंत्र्यांच्या उत्तरासाठी असलेला एक तास जमेस धरुन निम्मा वेळ सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांकरिता आणि निम्मा वेळ विरोधी पक्षाचे सदस्य व अपक्ष सदस्य यांना देण्यात येईल. या चर्चेत ज्या सदस्यांना भाग घ्यावयाचा असेल त्यांनी आपली नावे आपल्या प्रतोदामार्फत माझ्याकडे त्वरित पाठवावी. आता सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर चर्चेला सुरुवात करतील.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)

श्री. पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2012-2013 या वर्षाचा अर्थसंकल्प सोमवार, दिनांक 26 मार्च, 2012 रोजी सभागृहाला सादर झाला आहे. या अर्थसंकल्पाला अर्थ नसलेला अर्थसंकल्प म्हटले तरी ते वावगे होणार नाही. भव्य दिव्य काही करण्यासारखे नसेल आणि तशी इच्छा नसेल तर माणूस काही छोटया, मोठया गोष्टी करु लागतो. महाराष्ट्रातील राज्यकर्त्यांची परिस्थिती तशीच झाली आहे. गेली कित्येक वर्षे महाराष्ट्र राज्य हे सर्व गोष्टीत मागे पडू लागले आहे. एकेकाळी देशाच्या सरासरी आर्थिक विकासापेक्षा महाराष्ट्राचा आर्थिक विकासाचा वेग अधिक होता. विकासाच्या बाबतीत केंद्रापेक्षा कमी वेगावर महाराष्ट्र राज्य येऊन थांबलेले आहे. माननीय वित्त मंत्री श्री.अजितदादा पवार आजची परिस्थिती बदलतील असे वाटले होते. परंतु गेल्या वर्षाप्रमाणेच याही वर्षी निराशा केली असे म्हणावे लागेल. गेल्या काही वर्षाच्या अर्थसंकल्पात महाराष्ट्रात अधिकाधिक तूट दाखवू लागलेली आहे. गेल्या वर्षाच्या माननीय वित्तमंत्री श्री.अजित पवार यांच्या अर्थसंकल्पानुसार यंदाच्या 31 मार्च पर्यंत राज्याच्या तिजोरीत किमान 58 कोटी रुपये शिल्लक राहणे अपेक्षित होते. परंतु शिल्लक तर राहू द्या. उलट राज्याच्या तिजोरीत 2058 कोटी रुपयांची तूट निर्माण झाली आहे. असे असताना पुढील वर्षाच्या 31 मार्च अखेर राज्याकडे 152 कोटी रुपयांची शिल्लक असेल असा त्यांचा दावा आहे. 58 कोटी रुपयांची शिल्लक राखता येत नसेल तर बदलत्या आणि बिघडत्या अर्थव्यवस्थेत 152 कोटी रुपये सरकारकडे शिल्लक राहतील असे मानण्यात काही अर्थ नाही.

सभापती महोदय, एखाद्या विद्यार्थ्याने आपण परीक्षेत पहिल्या क्रमांकावर येऊ असे सांगावे. त्याच्या शब्दावर विश्वास ठेवणाऱ्या पालकाचा त्याचा निकालानंतर भ्रमनिरास व्हावा अशी परिस्थिती महाराष्ट्रात वारंवार येऊ लागलेली आहे. आघाडी सरकारच्या आतापर्यंतच्या काळात सपूर्ण अर्थव्यवस्थेलाच उतरती कळा लागलेली आहे. गैरकारभार, भ्रष्टाचार, कर्जबाजारीपणा, माफीयांची लुटमार याचा राज्याच्या आर्थिक घडीवर विपरित परिणाम झाला असून संपूर्ण अर्थव्यवस्था रसातळाला गेली आहे. स्वातंत्र्यानंतरच्या पूर्वीच्या सरकारमध्ये कधी नव्हे एवढे घोटाळे व भ्रष्टाचार या सरकारच्या कार्यकाळात झाला आहे.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, आमच्या कार्यकाळात म्हणजे युतीच्या काळात या राज्यावर 39 हजार कोटी रुपयांचे कर्ज होते. आज हे कर्ज 2 लाख 36 हजार कोटी रुपयांपर्यंत गेलेले आहे. कर्जाच्या बाबतीत असे म्हणावे लागेल की, "श्रीमंत राजा आणि कर्जबाजारी प्रजा". महाराष्ट्रावरील कर्जाबाबतची आकडेवारी माझ्याकडे आहे. ज्यावेळी युती सरकारने सत्ता सोडली, त्यावेळेला 39 हजार कोटी रुपयांचे कर्ज या राज्यावर होते...

यानंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

आता माझ्याजवळ आकडेवारी उपलब्ध आहे त्यानुसार 2003-04 मध्ये 97674 कोटी रुपयांचे कर्ज होते, 2004-05 मध्ये 1,09,167 कोटी रुपयांचे कर्ज होते, 2005-06 मध्ये 1,24,365 कोटी रुपयांचे कर्ज होते, 2006-07 मध्ये 1,33,722 कोटी रुपयांचे कर्ज होते, 2007-08 मध्ये 1.42 लाख कोटी रुपये, 2008-09 मध्ये 1.60 लाख कोटी रुपये, 2009-2010 मध्ये ते कर्ज 1.81 लाख कोटी रुपयांवर गेले आणि 2010-2011 मध्ये हे कर्जाचे प्रमाण 2.03 लाख कोटी रुपयांवर पोहोचले. आता सुरु असलेल्या 2012-13 या वर्षात 2.53 लाख कोटी रुपयांचे कर्ज आणि त्यावरील 18523 कोटी रुपयांचे व्याज गृहित धरुन हे एकूण कर्ज आता 2,71,608 कोटी रुपये इतके झाले आहे. युती सरकारकडून आघाडी सरकारने ज्यावेळी राज्य कारभार हाती घेतला तेव्हापासून सातत्याने महाराष्ट्र राज्य कर्जाच्या खाईत लोटले गेले आहे. आज महाराष्ट्रातील प्रत्येक माणसाच्या डोक्यावर 24164 रुपयांचे कर्ज सरकारने उभे केले आहे.

सभापती महोदय, राज्य स्थूल उत्पन्नाशी कर्जाचे असलेले प्रमाण राज्याच्या आर्थिक स्थितीचे निदर्शक मानले जाते. युती शासनाने आघाडी शासनाच्या हाती सत्ता सोपविली त्यावेळी राज्य स्थूल उत्पन्न 17.2 टक्के होते. 2004-05 मध्ये आघाडी शासन दुसऱ्यांदा सत्तेवर आले. त्यावेळी कर्जाचा बोजा 1,09,167 कोटी रुपयांचा होता. स्थूल उत्पन्नाच्या प्रमाणात हा बोजा 28.3 टक्के एवढा वाढला. त्यावरील व्याज रु.10258 कोटी रुपये इतके होते. म्हणजे एकूण कर्ज 1,99,425 कोटी रुपये इतके झाले होते. राज्य कर्जाच्या खाईत लोटले गेले आहे.

सभापती महोदय, दरडोई उत्पन्नाची आकडेवारी पाहिली तर गडचिरोली, नांदेड आणि बुलढाणा हे जिल्हे दरडोई उत्पन्नामध्ये सगळ्यात मागे आहेत. ठाणे, पुणे आणि मुंबईचे दरडोई उत्पन्न सर्वाधिक आहे. बुलढाणा जिल्हयाचे दरडोई उत्पन्न 45699 रुपये, नांदेड जिल्हयाचे 44978 रुपये आणि गडचिरोली जिल्हयाचे 43458 रुपये इतके आहे. ठाण्यातील दरडोई उत्पन्न 1,25,562 रुपये, पुण्याचे 1,27,176 आणि मुंबईचे 1,41,138 रुपये इतके सर्वाधिक आहे. मुंबई, ठाणे आणि पुणे येथील दरडोई उत्पन्न आणि राज्याच्या ग्रामीण भागातील दरडोई उत्पन्न यात प्रचंड दरी निर्माण झालेली आहे.

सभापती महोदय, मी अंदाजपत्रकीय भाषण वाचत होतो. या ठिकाणी माननीय अर्थ राज्यमंत्री उपस्थित आहेत. अंदाजपत्रकीय भाषणाच्या पहिल्या भागामध्ये दुसऱ्या भागाचे भाषण

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

समाविष्ट केलेले आहे. पहिल्या भागाच्या पुस्तिकेवर "भाग-1" असे लिहिलेले आहे. परंतु पुस्तिकेमध्ये भाग-2 मधील भाषणाचा काही भाग अंतर्भूत केलेला आहे. सुरुवातीचे 14 मुद्दे जोडलेले नाहीत. 15 व्या मुद्यापासून भाषणाची सुरुवात झालेली आहे. जे भाषण दुसऱ्या भागातील होते ते पहिल्या भागामध्ये अंतर्भूत केले असून जे भाषण पहिल्या भागातील होते ते दुसऱ्या भागामध्ये अंतर्भूत केले आहे. आघाडी शासनामध्ये कसा गोंधळ सुरु आहे हेच यावरुन दिसून येते. सुरुवातीचे 14 मुद्दे वगळण्यात आले आहेत. पहिल्या भागाचे भाषण दुसऱ्या भागामध्ये आणि दुसऱ्या भागाचे भाषण पहिल्या भागामध्ये अंतर्भूत केले आहे.

राज्याचा आर्थिक आढावा घेतला तर 2011-2012 मध्ये स्थूल राज्य उत्पन्नामध्ये 8.5 टक्के वाढ अपेक्षित होती. 2010-2011 मध्ये राज्याचे निव्वळ उत्पन्न 9,82, 452 कोटी रुपये अपेक्षित होते.

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

सन 2010-11 मध्ये राज्याचे दरडोई उत्पन्न 87686 कोटी रुपये एवढे होते. सन 2012-13 मध्ये अपेक्षित महसुली उत्पन्न 1,36,711 कोटी एवढे तर सन 2012-13 मधील अपेक्षित महसुली खर्च रु. 1,36,559/- कोटी एवढा आहे. सन 2012-13 मध्ये अपेक्षित महसुली अधिक्य रु. 1,52,049 कोटी एवढे आहे. राज्याच्या आर्थिक योजनेचे आकारमान रु. 45000 कोटी एवढे असून अनुसूचित जाती उपयोजनेसाठी 4590 कोटी, आदिवासी उप योजनेसाठी 4005 कोटी, जिल्हा सर्वसाधारण योजनेसाठी 4250 कोटी एवढी तरतूद केली आहे. मागील वर्षीच्या तुलनेत यामध्ये 630 रुपयांची वाढ झाली आहे. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी हे पुस्तक मी पाहिले आहे. त्याचबरोबर कृषी क्षेत्रात मी जास्त लक्ष घालतो. त्यामध्ये खरीप हंगामात अन्नधान्य उत्पादनात 45 टक्के घट झाली आहे. सन 2010-11 च्या तुलनेत सन 2011-12 या वर्षात अन्नधान्याचे उत्पादन 154.99 लाख मे.टन वरुन 118.09 लाख मे.टन कमी होईल आणि ही घट 23 टक्के इतकी आहे. महाराष्ट्र हा शेतकऱ्यांचा प्रदेश आहे आणि शेतकरी हा या राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. अन्नधान्याच्या उत्पादनात दिवसेंदिवस घट होत आहे. एक काळ असा होता की, आपल्याकडे जेव्हा अन्नधान्याची तुट होती तेव्हा तत्कालीन मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक यांनी राज्यात हरितक्रांतिचे स्वप्न पाहिले व त्या माध्यमातून शेतीचे प्रचंड उत्पादन घेण्याचा प्रयत्न झाला होता. आज आपण मात्र 23 टक्क्याची घटपर्यंत पोहचलो आहोत. राज्यात नुकत्याच झालेल्या खरीप आणि रब्बी हंगामाचा विचार केला तर रब्बी हंगामात तेलबिया उत्पादनात 47 टक्के घट झाली आणि एकूण तेलबिया उत्पादन 8 टक्के व कापसाचे उत्पादन 15 टक्क्याने या वर्षी घट होण्याची शक्यता आहे. अशा प्रकारे दोन्ही हंगामाचा विचार केला असता शेतीचे उत्पन्न घटले आणि या अर्थसंकल्पात सुध्दा शेतीची वाटच लावण्यात आली आहे.

महोदय, मावळत्या आर्थिक वर्षात अन्नधान्याचे उत्पादन असून 33 टक्के घटले होते, तेलबियामध्ये 8 टक्के आणि कापसाच्या पिकात 15 टक्के घट झाली आहे. परिणामी कृषी क्षेत्राचा विकास हा केवळ 9.01 टक्क्यावर येईल अशा प्रकारचा मोठा धक्का या कृषी क्षेत्राला बसल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. सन 2010-11 मध्ये 154.19 लाख मे.टन एवढे अन्नधान्य उत्पादन होते ते सन 2011-12 मध्ये 118.09 लाख मे.टनावर येईल असा अंदाज दिला आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

मराठवाडा आणि विदर्भामध्ये मोसमी पावसाच्या उशिरा आगमनामुळे खरिपाच्या पेरण्या उशिरा करण्यात आल्या. अपुऱ्या पावसामुळे रब्बीच्या उत्पादनात घट झाली असे या अहवालात म्हटले असून तो अहवाल मी पूर्णपणे वाचत नाही. पण महाराष्ट्राला महाराज्य बनविणारे माननीय अर्थमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री यांची जी घोषणा आहे त्या अनुषंगाने काही ठळक बाबींच्या संदर्भात त्यांना जाणीव करुन देऊ इच्छितो की, यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने शासनाने 100 कोटीची तरतूद केली आहे. पण यामध्ये जन्मशताब्दीच्या निमित्ताने राज्यात कोणकोणते कार्यक्रम घेण्याचा शासनाचा मानस आहे याचा खुलासा दिलेला नाही. मी या निमित्ताने एक बाब निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, यापूर्वी देखील सभागृहात जन्मशताब्दी बाबत अनेक वेळा चर्चा झाल्या. नुकतेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या जन्मशताब्दीचे वर्ष साजरे करण्यात आले. त्या निमित्ताने शासनाने काही तरतूद सुध्दा केली होती. पण छातीवर हात ठेवून माननीय अर्थ मंत्र्यांनी सांगावे की खरोखरच राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या जन्म शताब्दी वर्षासाठी शासनाने किती रक्कम दिली, किती पैसे खर्च केले. सभागृहात फक्त घोषणाच केल्या जातात पण खर्च मात्र केला जात नाही, याबद्दल खंत वाटते.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर .....

सभापती महोदय, अर्थसंकल्पात लघु पाटबंधारे प्रकल्पासाठी केवळ 80 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. महाराष्ट्रातील लघु पाटबंधा-यांची अवस्था आज अत्यंत वाईट आहे. लघुपाटबंधा-याचे काही प्रकल्प अर्धवट स्थितीत पडलेले आहेत तर काही प्रकल्प नादुरुस्त असल्यामुळे त्यांच्यामध्ये पाणी साचत नाही. असे असतांना लघु पाटबंधा-यासाठी केवळ 80 कोटी रुपयांची तरतूद शासनाने केलेली आहे.

सभापती महोदय, शासनाने कोरडवाहू शेतीसाठी 200 कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात केलेली आहे. महाराष्ट्रात बागायतीचे प्रमाण अगोदरच कमी आहे. देशाच्या तुलनेत महाराष्ट्राचे एरिगेशनचे प्रमाण अतिशय कमी आहे व महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाडा व विदर्भाचे इरिगेशन अत्यल्प आहे. असे असतांना कोरडवाहू शेतीसाठी अर्थसंकल्पात केवळ 200 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, अर्थसंकल्पात राज्यात 18 हजार विहिरी करण्याचा निर्णय घेतलेला आहे. रोजगार हमी योजनेच्या जवाहर विहिरीसाठी शेतक-यांना दोन वर्षापासून पैसे दिले गेलेले नाहीत. पावसाळा दोन महिन्याने सुरु होणार आहे असे असतांना शेतक-यांना रोजगार हमी योजनेतील विहिरींचे पैसे मिळालेले नसल्यामुळे या विहिरी ढासळल्या तर शेतकरी पुन्हा उध्वस्त होईल.

सभापती महोदय, अर्थसंकल्पात शासनाने केवळ 3 हजार शेततळे बांधण्याचा निर्णय घेतलेला आहे. अर्थसंकल्पाच्या माध्यमातून तुम्हाला महाराष्ट्राच्या शेतक-याला खरोखर काही द्यावयाचे आहे का ? अर्थसंकल्पामध्ये हे सरकार राज्यातील शेतक-याला विसरलेले आहे असे दिसते आहे. राजा उदार झाला आणि शेतक-याच्या हाती भोपळा दिला असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. गुजरात राज्यात एका वर्षात 1 लक्ष शेततळी बांधली गेली असतांना आपल्या राज्यात केवळ 3 हजार शेत तळी बांधण्याचा जो निर्णय घेतला आहे तो अतिशय चुकीचा आहे. एकाच जिल्हयात 3 हजार शेततळी बांधावयास पाहिजे होत्या परंतु हे शासन तसे करणार नाही. 3 हजार शेततळयाचा जो आकडा आहे तो महाराष्ट्राला शोभणारा नसून त्यातून महाराष्ट्राची बेईज्जतच होईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर .....

सभापती महोदय, लघु पाटबंधा-याला, शेत तळयाला महाराष्ट्र शासनाने कमी तरतूद केलेली आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी शासनाचा कान धरलेला आहे. माननीय राज्यपाल महोदयांनी राज्य शासनाला सांगितले आहे की, "75 हजार कोटी रुपयांचे प्रकल्प रखडलेले असल्यामुळे सिंचनाचे नवे प्रकल्प हाती घेऊ नका". राजकीय आणि आर्थिक फायदे डोळयासमोर ठेवून राज्यकर्त्यांनी सिंचन प्रकल्पाचे नारळ वाढण्याचा सपाटा लावला खरा परंतु पैशाचे सोंग करता येत नाही हे तत्व लागू पडलेले आहे. 75 हजार कोटी रुपयांचे रखडलेले प्रकल्प आणि निधीच्या उपलब्धतेचा प्रश्न या पार्श्वभूमीवर सिंचनाचे नवे प्रकल्प हाती घेण्यापेक्षा जुने प्रकल्प पूर्ण करण्यावर भर द्यावा असा आदेश महाराष्ट्राच्या राज्यपालांनी राज्य सरकारला दिलेले आहेत. माननीय राज्यपाल महोदयांनी आपल्याला जे आदेश दिलेले आहेत ते आपण पाळणार आहात काय?

सभापती महोदय, कृषी हा राज्य सूचीतील विषय आहे त्यामुळे कृषीच्या विकासाकरिता राज्यानेच पुढाकार घेणे जरुरीचे आहे. 1970-1971 मध्ये प्रत्यक्ष शेती करणा-यांची संख्या 49,50,600 एवढी होती. सन 2005-2006 मध्ये ही संख्या 1.37 कोटी झालेली आहे. याचा अर्थ 1970 च्या तुलनेत कृषीवरील भार तिपटीने वाढला व त्याच वेळेस शेतीच्या क्षेत्रात मात्र घट झालेली आहे. सन 1970-1971 मध्ये 2.11 कोटी एकर क्षेत्र वहिती खाली होते ते आता 2 कोटी एकराच्याही खाली आलेले आहे. महाराष्ट्रात वहिती क्षेत्र हळू हळू कमी होत चालले आहे. उत्पादनात घट होण्यास हे अजून एक कारण आहे. शहरे हळू हळू फुगत चालली असून शहराच्या भोवतालची उपजाऊ जमीन कमी कमी होत चालली आहे. पुढील काळात नागरी करणाचा प्रश्न गंभीर होणार आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

उपजाऊ शेतीचे क्षेत्र आता घटत चालले आहे. त्यातून शेतीचे उत्पादन घटणार आहे. "क" वर्ग नगरपालिका असली तरी तिच्या आजूबाजूच्या शे-पाचशे जमिनीचे ताबडतोब एन.ए.केले जाते. त्यामुळे त्या जमिनीतील उत्पादन कमी होते. यातून उपजाऊ जमिनीचे क्षेत्र दिवसेंदिवस कमी होत आहे. त्यातून महाराष्ट्राच्या उत्पादनामध्ये घट होत चालली आहे, हे आता पर्यंत सिद्ध झालेले आहे. 1970-71 मध्ये महाराष्ट्रामध्ये प्रत्येक शेतकऱ्यांकडे सरासरी 4.28 हेक्टर क्षेत्र होते ते सन 2005-2006 पर्यंत 1.46 हेक्टपरपर्यंत आले आहे. एकूण अन्नधान्याचे राष्ट्रीय सरासरी प्रती हेक्टर उत्पादन 17.79 क्विंटल असताना महाराष्ट्रामध्ये ते केवळ 10.13 क्विंटल एवढे आहे. कापसाचे राष्ट्रीय सरासरी प्रती हेक्टर उत्पादन 4.17 क्विंटल असताना महाराष्ट्रात ते केवळ 2.71 क्विंटल एवढे आहे. देशात सरासरी सिंचनाची टक्केवारी 45.3 टक्के एवढी असताना महाराष्ट्राची केवळ 17.03 टक्के एवढी आहे. कृषि क्षेत्राला बळकटी दिल्यास त्याचा सरळ परिणाम ग्रामीण भागावर होईल व ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळेल.

मी अर्धवटच अर्थसंकल्पीय पुस्तक वाचले आहे. येणारा पैसा आणि जाणारा पैसा याचा देखील विचार केला पाहिजे. मागच्याच्या मागच्या वर्षी आपण तुटीचा अर्थसंकल्प सादर केला. मागच्या वर्षी शिलकी अर्थसंकल्प सादर केला. पण वर्ष पूर्ण होता होता 2000 कोटी पर्यंत तूट गेली. आज आपण कॉलर टाईट करून 152 कोटी रूपयांचा शिलकी अर्थसंकल्प सादर केला आहे. मी शिलकी अर्थसंकल्पाचे पुस्तक वाचत असताना कर्ज आणि कर्जावरील व्याजाच्या नियतव्ययाचा उल्लेख कुठेही केल्याचे दिसून आले नाही. 2 लाख 36 हजार कोटीचे कर्ज राज्यावर आहे व त्यावरील व्याज या अर्थसंकल्पामध्ये कुठे दाखविणार आहात, हे आपण सांगितले पाहिजे.

शासनाने काही वस्तूंवर कर लावला तर काही वस्तूंना सूट दिली. मी संपूर्ण अर्थसंकल्पावर बोलणार नाही. संपूर्ण अर्थसंकल्पावर बोललो तर मला वेळ देखील पुरणार नाही. घरगुती गॅसवर कर लावण्यात आला आहे. वर्ष 2008 मध्ये राज्याने घरगुती वापरासाठी एलपीजी करमुक्त केला होता. मागील वर्षीही सूट कायम ठेवली होती. "अनेक राज्यांमध्ये घरगुती वापराच्या एलपीजीवर कर आहे. राज्यात घरगुती वापराच्या केरोसिनवर सुद्धा कर आकारण्यात येतो. तरी घरगुती वापराच्या गॅसवर मी 5 टक्के कर प्रस्तावित करीत आहे," असे अर्थसंकल्पात म्हटले आहे.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

सभापती महोदय, खालच्या सभागृहामध्ये माननीय वित्त मंत्री श्री.अजितदादा पवार यांनी अर्थसंकल्प मांडताना जगदगुरू तुकोबारायांचा एक अभंग सांगितला. त्यांच्या अभंगाने अर्थसंकल्पाची सुरूवात केली.

जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले
तोचि साधून ओळखावा, देव तेथेची जाणावा

खरच हा रंजल्या गांजल्यांचा अर्थसंकल्प आहे का ? आपण काय करमुक्त केले तर सुकामेवा. गरीब सुकामेवा खातो काय ? श्री.शेंडगे साहेब आपण ग्रामीण भागामध्ये जाऊन बघा. ग्रामीण भागातील गरीब आज शेंगदाणे खायला मोहताज झाला आहे. असे असताना सुका मेवा आपण कर मुक्त करता. त्या गरिबाच्या डोळ्याला सुका मेवा दिसतो काय ? तरी देखील शासन म्हणते की, हा रंजल्या गांजल्यांचा अर्थसंकल्प आहे. सुक्या मेवाला आपण सूट दिली आहे. मात्र, प्लॅस्टर ऑफ पॅरिसवर कर लावला आहे. गणपतीच्या सिझनमध्ये प्लॅस्टर ऑफ पॅरिसचा फार मोठा उपयोग होतो. त्यावर आपण कर वाढविला आहे. सुक्या मेवावरील कर कमी केला आहे. तसेच विमान इंधनावरील कर देखील कमी आहे. तो कोणासाठी केला आहे ?

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

याठिकाणी बसलेले मराठवाडा, विदर्भातील जे आमदार आहेत, त्यांनी याचा गांभीर्याने विचार करावयास पाहिजे. याठिकाणी शासनाने कापूस आणि तेलबियांवर पाच टक्के कर लावलेला आहे. महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यापासून आजपर्यंत येथील कापूस उत्पादक शेतकऱ्यांवर कधी कर लावण्यात आलेला नव्हता. पण माननीय उप मुख्यमंत्री आणि वित्त मंत्री यांनी शेतकऱ्यांवर तशा प्रकारचा कर लावला आहे आणि पाठ थोपटून घेतली. शासनाने कापूस उत्पादक शेतकऱ्यांना, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना, धान उत्पादक शेतकऱ्यांना दोन हजार कोटी रुपयांचे पॅकेज दिले आहे. नागपूर अधिवेशनाच्या वेळी हेक्टरी पाच हजार रुपये देण्याबाबत घोषणा झाली. मग आम्ही एकरी हिशोब काढला असता दोन हजार रुपये एकराला मिळाले. परंतु सभापती महोदय, अजून पर्यंत शेतकऱ्यांपर्यंत ते पॅकेज गेलेच नाही. आपले अधिवेशन सुरु होण्यापूर्वी परवाच्या दिवशी त्याबाबतीत जी.आर.काढण्यात आला आणि एका बाजूला दोन हजार रुपये वरच्या खिशात टाकण्याचा तुम्ही दृश्य देखावा महाराष्ट्रामध्ये केला. माननीय वित्त मंत्री अजितदादा पवार यांना सांगू इच्छितो की, या अर्थसंकल्पामध्ये कापसावर पाच टक्के कर लावून त्या गरीब शेतकऱ्याचा खिसा कापला गेला आहे. यातून शेतकऱ्यांचा विश्वासघात झाला. एका बाजूला तुम्ही दोन हजार कोटी रुपयांचे पॅकेज शेतकऱ्यांच्या खिशात टाकण्याचा दृश्य देखावा केला आणि दुसऱ्या बाजूला तुम्ही कापसावर पाच टक्के कर लावून त्याचा खिसा कापून टाकला. यामुळे शेतकऱ्यांवर प्रचंड अन्याय झालेला आहे.

सभापती महोदय, आज कापसाची काय स्थिती आहे ? मग मराठवाडा असो, विदर्भ असो किंवा खानदेश असो, मागच्या वर्षी कापूस उत्पादक शेतकऱ्याला 7 हजार रुपयांचा भाव मिळाला होता, पण यावर्षी मात्र शेतकऱ्यांच्या कापसाला तीन हजार, साडेतीन हजाराच्या वर भाव मिळाला नाही. मग 15-20 दिवस व्यापाऱ्यांनी कापसाची खरेदी बंद केली. का बंद केली ? कारण कापूस निर्यात करण्याबाबत बंदी लागू केली होती. त्यामुळे कापसाची निर्यात होऊ शकली नाही. त्यामुळे व्यापाऱ्यांनी कापूस घेणे बंद केले म्हणजेच शासनाने एका बाजूला शेतकऱ्यांना निर्यात बंदीमध्ये अडकविले आणि दुसऱ्या बाजूला मागच्या वर्षी सात हजार रुपये भाव दिला होता, तो यावर्षी मात्र क्विंटलला तीन हजार ते साडेतीन हजाराच्या वर दिला नाही. तसेच कापसावर पाच टक्के कर लावलेला आहे म्हणजे एका क्विंटलला जर 4000 रुपयांचा भाव असेल तर 50 रुपये म्हणजे शासनाने एका क्विंटलसाठी 50 रुपये कर लावला. अशा वेळी जर त्या शेतकऱ्यांच्या शेतामध्ये 5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . ..

क्विंटल कापूस पिकला तर तुम्ही करापोटी एक हजार रुपये घेणार आहात. कारण कापसावर एका क्विंटलला 20 रुपये कर लावलेला आहे. माननीय अर्थमंत्र्यांनी सरकीवर देखील कर लावला आहे. कापूस आणि कापसातून निघणाऱ्या सरकीवरही तेलबियांच्या नावाखाली कर लावला. त्यानंतर त्याची जी पुढील प्रक्रिया आहे ती म्हणजे सरकी पासून निघणारे जे तेल आहे त्यावर देखील कर लावला म्हणजे कापसावर कर, सरकीवर कर, तेलावर कर मग अशा वेळी तुम्ही याला मूल्यवर्धित करातून सूट दिली आहे काय ? तर नाही, त्यांना चार टक्के मूल्यवर्धित कर भरावा लागणार आहे. तुम्ही सूत गिरण्यांना सूट दिली. त्याबाबतीत आमचे काही म्हणणे नाही. आमचा सूत गिरण्यांना विरोध नाही. पण माननीय वित्त मंत्री महोदय, यातून काय होणार आहे ? यातून असे होईल की, जर गुजरात मध्ये किंवा आंध्र प्रदेशमध्ये किंवा कर्नाटकमध्ये कापसावर कर नसेल तर येथील कापूस आता महाराष्ट्रात विकला जाणार नाही. मग महाराष्ट्रातील कापसावर प्रक्रिया करणारी जी कारखानदारी आहे ती बंद होण्याची वेळ येईल. कापूस परप्रांतामध्ये जाईल आणि त्यामुळे राज्याला मिळणाऱ्या टॅक्सचेही नुकसान होईल. या राज्यातील काही सूत गिरण्या सध्या बंदच आहेत. जिनिंग-प्रेसिंगची प्रक्रिया करणारी कारखानदारी आहे, जी मागील पाच-सात वर्षामध्ये महाराष्ट्रात वाढत होती, ती पुन्हा एकदा या राज्यातून स्थलांतरित होण्याची भीती निर्माण झालेली आहे. त्यामुळे कापसाचे, सरकीचे नुकसान, तेलाचे आणि त्या बरोबर टॅक्सचेही नुकसान होणार आहे.

यानंतर श्री.अ.शिगम . . ..

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

सभापती महोदय, मी भाषण करणार नव्हतो, परंतु या अर्थसंकल्पामध्ये कापूस उत्पादक शेतकऱ्यांवर जो पाच टक्के कर लावण्यात आलेला आहे तो मागे घ्यावा अशी विनंती करण्यासाठी मी उभा राहिलो आहे. कापूस हे राज्यातील महत्वाचे पीक आहे. हे पीक मराठवाडा, विदर्भ, खानदेश इत्यादी ठिकाणी घेतले जाते. शासनाने या पिकावर पाच टक्के कर लावून शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळले आहे. आज शेतकरी नागावलेला आहे. तो आत्महत्या करण्याच्या मन:स्थितीमध्ये आहे. त्याच्यावर एका बाजूला निसर्ग कोपला आहे तर दुसऱ्या बाजूला सरकार कोपले आहे, अशा परिस्थितीत त्याने कोणाकडे दाद मागायची ? आज शेतकऱ्यांना वीज मिळत नाही. पाणी मिळत नाही. शेतकऱ्यांची विजेची कनेक्शन्स तोडली जात आहेत. त्यांच्या पिकाला भाव मिळत नाही आणि आता त्यांना भाव मिळाला आहे तर सरकार त्यावर पाच टक्के कर लावत आहे. सरकार अशाप्रकारे कर लावत असेल तर शेतकरी जगणार नाहीत. राज्यातील शेतकरी कापूस पीक पिकविणार नाहीत. तेव्हा माझी माननीय वित्त मंत्री व उप मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे की, जसे आपण एलपीजी गॅसवरील वाढ कमी करीत आहात त्या प्रमाणे कापूस पिकावरील पाच टक्के कर देखील कमी करावा आणि आपल्या उत्तराच्या भाषणात तशी घोषणा करावी अशी आग्रहाची मागणी करुन माझे भाषण पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी सन 2012-2013 च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, 45 हजार कोटी रुपयाचां आराखडा असलेला हा अर्थसंकल्प आहे. देशातील सर्वात मोठा ॲन्युअल प्लान महाराष्ट्राचा आहे. देशातील पहिल्या क्रमांकाचे पुरोगामी आणि प्रगतीशील असे हे राज्य आहे. माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी हा अर्थसंकल्प दिलेला आहे तेव्हा आजची परिस्थिती काय आहे ती पाहू. राज्यात दुष्काळी परिस्थिती आहे, अन्नधान्य उत्पादनात लक्षणीय घट, परतीचा पाऊस नाही, पावसाची लहर, नजर, निसर्गाची दयामाया यावर आधारलेली शेती, 33 टक्के उत्पादन घटण्याची भीती, शेतकऱ्यांना दिलेले दोन हजार कोटी रुपयांचे आर्थिक साह्य, परराज्यातून वीज खरेदी, इतर आर्थिक आव्हाने, आस्थापनेवरील वाढता खर्च, वेतनावरील खर्चासाठी 51 हजार 225 कोटी, पेन्शनसाठी 13 हजार 393 कोटी, वाढीव भत्ता द्यायचा झाला तर आणखी 1500 ते 2000 कोटी रुपये, 4 हजार 600 कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या आणि 18 हजार कोटी रुपये व्याजापोटी द्यावी लागणारी रक्कम. या सबंध परिस्थितीमध्ये राज्याला दिशा देणारा अर्थसंकल्प या ठिकाणी माननीय वित्त मंत्री व उप मुख्यमंत्री महोदयांनी मांडलेला आहे.

सभापती महोदय, 2010-2011 मध्ये राज्याचे स्थूल उत्पन्न प्रचलित किंमती नुसार 9 लाख 82 हजार 452 कोटी रुपये इतके होते. म्हणजे मागील वर्षापेक्षा 24.7 टक्क्यांनी जास्त आहे. आपण धोरणाचे मूल्यमापन केले तर 9 ते 10 टक्के वाढ झाली तर ती वाढ योग्य आहे असे समजले जाते. आपली वाढ 24 टक्के झालेली आहे. म्हणजे राज्य पुढे जात आहे याचे हे प्रसाद चिन्ह आहे. महाराष्ट्र राज्याचे दरडोई उत्पन्न 87 हजार 686 आहे तर देशाचे 53 हजार रुपये आहे. सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी मुद्दा मांडला की, बुलढाणा, नांदेड आणि गडचिरोली जिल्ह्याचा दरडोई उत्पन्न अनुक्रमे 45 हजार, 44 हजार आणि 43 हजार इतका आहे. ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. इतर जे मागासलेले जिल्हे आहेत त्या मागासलेल्या जिल्ह्यात दरडोई उत्पन्न कसे वाढेल यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी....

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्यातील लोकसंख्या वाढीचा दर सन 2001 ते 2011 या कालावधीत 6.74 ने कमी झालेला आहे. हे चांगले लक्षण आहे. सामाजिक, आर्थिक सुधारणेचे ते द्योतक आहे.

सभापती महोदय, 2002 ते 2009-2010 पर्यंत शाळेतील गळतीचे प्रमाण पाहिल्यास प्राथमिक शाळेतील गळती 15 टक्के पासून 2.7 टक्क्यापर्यंत आलेली आहे. उच्च प्राथमिक शाळेतील गळती 24 टक्क्यापासून 7.6 टक्क्यापर्यंत आलेली आहे. तेव्हा महाराष्ट्राच्या संदर्भात एक चांगले चित्र आहे असे म्हणता येईल.

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी .....

बजेट इन ब्रिफ हे अर्थसंकल्पीय प्रकाशन फार चांगले आहे. सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी याचा रेफरन्स दिलला आहे. यातून आपल्याला संपूर्ण अर्थसंकल्प थोडक्यात कळतो. महाराष्ट्रात येणारा एक रुपया कसा येतो? त्यात कर्जाची रक्कम ही फक्त 15.76 इतकी आहे. राज्याच्या स्वत:चा कर 54 टक्के आहे. करेत्तर महसूल 6 टक्के असे संबंध पाहिले तर अर्थसंकल्पात 84 टक्के राज्य शासनाचे आणि 16 टक्के कर्जाच्या माध्यमातून उभे केलेले आहेत. रुपया कसा जातो हे पाहिले तर सामाजिक सेवा 36.45 टक्के आर्थिक सेवा 14.7 टक्के सर्वसाधारण सेवा 17.51 टक्के व्याज. व्याज आणि कर्जाची परतफेड हे संबंध सोडल्यानंतर 83 टक्के अर्थसंकल्प हा आपला आहे त्याचा कुठल्याही पध्दतीने कर्जाशी संबंध येत नाही. आपली वार्षिक योजना 45 हजार कोटी रुपयांची आहे त्यात महसूल लेखा 24573, भांडवली लेखा 19746 अशा प्रकारे 45 हजार कोटी रुपयांचे ॲनॅलिसीस केले तर विदर्भ विकास मंडळ 9531 कोटी रुपये याच्याशी आपला संबंध नाही. माननीय राज्यपाल यांच्या निर्देशानुसार मंडळांना जी रक्कम दिली जाते ती विदर्भ विकास मंडळाला 9531 कोटी, मराठवाडा विकास मंडळाला 5529 कोटी रुपये, उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळाला 1617 कोटी रुपये म्हणजे 31 हजार कोटी रुपये राज्यपालांच्या माध्यमातून विविध मंडळाला दिले जातात. कदाचित एखाद वेळेला कमी खर्च केला असेल तर ती गोष्ट वेगळी आहे. पण या संदर्भात संबंध अधिकार माननीय राज्यपालांना देण्यात आले आहेत.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याचे मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण हे पुस्तक माझ्या हातात आहे. सन 2011-2012 मध्ये तेराव्या वित्त आयोगाची शिफारस होती त्याप्रमाणे "कर्ज उभारणीची मर्यादा 35160 कोटी रुपये आहे पण राज्य शासनाने 21 हजार कोटी रुपये कर्ज घेतले आहे. म्हणजे मर्यादेपेक्षा 14 हजार कोटी रुपये इतके कमी कर्ज घेतलेले आहे. यांच्या व्याजाचा दर 8.56 टक्के आणि 9.9 टक्के आहे. म्हणजे दोन-तीन वर्षापूर्वी 13 ते 14 टक्के व्याज द्यावे लागत होते.सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून माननीय उप मुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, वर्ल्ड बँकेला सोबत घेऊन, केंद्र शासनाच्या माध्यमातून कुठे तरी लिंकिंग करुन हा व्याजाचा दर अजून कमी होऊ शकतो. आज परदेशातून येणारे कर्ज व्यापाऱ्यांना किंवा मोठया उद्योगपतींना तीन ते चार टक्के व्याज दराने मिळते. माननीय उप मुख्यमंत्र्यांनी व्याजाचा दर कमी केला

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी. . . .

त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. व्याजाचा दर 13 ते 14 टक्क्यावरुन 8 ते 9 टक्क्यावर आणलेला आहे. तो 3 ते 4 टक्क्यापर्यंत कसा आणता येईल या संदर्भात शासनाने प्रयत्न करावेत.

सभापती महोदय, 2012-13 या वर्षामध्ये अंदाजे 24499 कोटी रुपये कर्ज उभारावयाचे आहे. प्रस्तावित एकूण कर्ज उभारणी केंद्र शासनाने निश्चित केलेल्या मर्यादापेक्षा बऱ्याच कमी प्रमाणात आहे. कर्ज वाढले आहे ही वस्तुस्थिती कोणी नाकारणार नाही. राज्याचे स्थूल उत्पन्न वाढले आहे. मला वाटते पिवळया पुस्तकातील आकडे फार बोलके आहेत. पण कर्जाचा वापर कसा केला पाहिजे या संदर्भात "BUDGET IN BRIEF 2012-13" या पुस्तकातील पृष्ठ क्र. 18 वर क्रमांक 5 च्या परिच्छेदामध्ये असे नमूद केले आहे की, "The second division which is known as 'Capital Expenditure outside the Revenue Account'...." म्हणजे या अर्थसंकल्पातील जो क्रक्स असेल तर तो 'Capital Expenditure outside Revenue Account' हा आहे. महसुली खर्च कमी करुन जास्तीत जास्त भाडवली खर्च कसा निर्माण करु शकतो या संदर्भात पुढे असे म्हटले आहे की, "... deals with the expenditure met usually from borrowed funds with the main object of creating assets of material character. It also includes receipts of a capital nature intended to be applied as a set-off against capital expenditure." कर्ज जर व्याज देण्यासाठी वापरत असू तर आपली परिस्थिती बिघडलेली आहे असे समजावयास पाहिजे. कर्जाचा वापर भांडवली कामासाठी करण्यात येत असेल, क्रिएशन ऑफ ॲसेटसाठी असेल तर ते कर्ज घेण्याच्या संदर्भात पथ्य आहे. हे पथ्य राज्य शासनाने पाळलेले आहे या दृष्टिकोनातून मी उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी .....

महाराष्ट्र राज्याचे मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण यातील तीन चार बाबींचा उल्लेख मी करणार आहे. राज्य स्थूल उत्पन्नाच्या टक्केवारीनुसार राजकोषीय तूट 3.1 टक्के होती. आज आपली राजकोषीय तूट 1.72 टक्के आहे. तीन चार वर्षाच्या कालावधीमध्ये निश्चितपणे राज्य शासनाने आर्थिक प्रगती केली हे या आकड्यांवरुन आपल्या लक्षात येईल. राज्य स्थूल उत्पन्नाच्या टक्केवारीनुसार कर महसूल 2009-2010 मध्ये 7.76 टक्के होता तो आता 8.12 टक्क्यापर्यंत वाढलेला आहे. 2011-2012 मध्ये कर महसूल 8.34 टक्के होता तो थोडा कमी होऊन 8.12 टक्के झालेला दिसतो पण आपण चार वर्षाची टक्केवारी घेतली तर हा आकडा चांगला आहे.

सभापती महोदय, राज्य स्थूल उत्पन्नाच्या टक्केवारीनुसार संचित ऋण 5 वर्षापूर्वी 20.91 टक्के होते. आता ते ऋण 18.84 टक्के झालेले आहे. 2014-2015 मध्ये ते 18.14 टक्के होणार आहे. मी व्याजाच्या संदर्भात सांगू इच्छितो. महसुली जमेच्या टक्केवारीनुसार व्याज प्रदान 2009-2010 मध्ये 17.7 टक्के होते आता ते 13.55 टक्के झालेले आहे. या संपूर्ण आकडेवारीचा जर आपण अभ्यास केला तर राज्य कोठे तरी तोट्यात चालले आहे, राज्य संपत आलेले आहे, तिजोरी रिकामी झालेली आहे असे जर आपण म्हटले तर त्याचा परिणाम म्हणून कदाचित येणारी जी गुंतवणूक आहे ती थांबण्याच्या संदर्भातील धोका निर्माण होतो. परंतु आज देखील राज्याची आर्थिक परिस्थिती भक्कम आहे आणि अजून ती चांगल्या पध्दतीची कशी करता येईल या संदर्भात चर्चा होणे अत्यंत गरजेचे आहे.

सभापती महोदय, शेतीच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी आपले विचार अतिशय विस्ताराने मांडले. महाराष्ट्र राज्य 3 हजार शेततळी बांधणार आहे. आपण दुसरे राज्य 1 लाख शेततळी बांधत आहे असे सांगितले. मी या संदर्भात असे म्हणेन की, पाऊस आणि पाणी यामुळे कृषी क्षेत्रात राज्य मागे जात आहे. देशाची सिंचनाची टक्केवारी 45 टक्के आहे आणि आपल्या राज्याची सिंचनाची टक्केवारी 19 टक्के आहे. ती टक्केवारी वाढत नाही. मध्यंतरी मी असे वाचले होते की, बीओटी तत्वावर आपण सिंचनाचे काही प्रकल्प बांधू शकतो का ? या बाबतीत माझा पूर्ण अभ्यास नाही पण जेवढे पाणी उपलब्ध आहे त्या संपूर्ण पाण्याचा वापर चांगल्या पध्दतीने करावा लागेल. अगदी पाटबंधाऱ्याचे पाणी देखील आपल्याला पाणी आले आणि दिले अशा पध्दतीने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी .....

पाणी देता येणार नाही. त्या पाण्याचा वापर अत्यंत चांगल्या पध्दतीने आपल्याला करावा लागेल.

सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्र्यांनी रोजगार हमी योजनेसाठी 850 कोटी रुपयांचा नियतव्यय प्रस्तावित केलेला आहे. रोजगार हमीची कामे करीत असताना ज्यावेळी माननीय श्री. शरद्चंद्रजी पवार मुख्यमंत्री होते त्यावेळी फलोत्पादनाच्या संदर्भातील काम रोजगार हमी योजनेशी लिंक केले. आज आपण पाहिले तर 10 वर्षाच्या कालावधीमध्ये रोजगार हमीच्या माध्यमातून ते काम केल्यामुळे महाराष्ट्रात फलोत्पादन वाढले. मी शासनाला विनंती करीन की, जो कोरडवाहू शेतकरी आहे त्याच्या शेतामध्ये रोजगार हमीची कामे केली पाहिजेत. 75 टक्के रक्कम शासनाने द्यावी आणि 25 टक्के रक्कम शेतकऱ्याने द्यावी. कोरडवाहू शेतकरी जर जगवावयाचा असेल तर त्याला एकरी इतके रुपये द्या, तितके रुपये द्या असे करण्यापेक्षा रोजगार हमी योजना त्या ठिकाणी राबवावी अशी विनंती मी शासनाला करतो.

सभापती महोदय, एआयबीपीच्या अंतर्गत भरपूर पैसे या शासनाने मिळविले. कदाचित सर्वात जास्त पैसे महाराष्ट्रात आले असतील. आतापर्यंत 9422 कोटी रुपये एवढे केंद्रीय सहाय्य आपल्याला मिळाले. 2012-2013 मध्ये 2129 कोटी रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित केलेला आहे. अजूनही एआयबीपीमध्ये काही वाढू शकेल का हे पहावे. अजूनही अनेक प्रकल्प अपूर्ण आहेत. एआयबीपीच्याच माध्यमातून पैसे मिळतात. राज्य शासनाच्या माध्यमातून तितके पैसे मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी...

सभापती महोदय, मी शासनाचे आणखी एका गोष्टीसाठी अभिनंदन करतो. राज्यामध्ये आपत्कालीन वैद्यकीय सेवा सुरु केली जाणार आहे. या सेवेकरिता सन 2012-13 साठी रुपये 73 कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित केलेला आहे. हे चांगले काम शासनाने केले आहे.

सभापती महोदय, सर्वशिक्षा अभियानासाठी केंद्र सरकारचा हिस्सा रुपये 1428 कोटी व राज्य सरकारचा हिस्सा 759 कोटी असे एकूण 2188 कोटी रुपये प्रस्तावित केलेले आहेत.

सभापती महोदय, डिसेंबर, 2012 अखेर राज्यातील भारनियमन संपेल असा अंदाज आहे. शासनाने 11 हजार 15 मेगावॉट वीजनिर्मिती करण्याचे योजले असून सन 2012-13 या वर्षाकरिता रुपये 1 हजार 500 कोटी रुपये भाग भांडवलासाठी प्रस्तावित केलेले आहेत. त्याच्यावर शासन कर्ज घेतले जाणार आहे. माननीय अर्थमंत्र्यांबरोबर काल माझी या संदर्भात चर्चा झाली आहे. 6 हजार कोटी रुपये विजेच्या निर्मितीसाठी खर्च केला जात आहे. गेल्या काही वर्षांमध्ये वीजनिर्मितीसाठी इतका निधी दिला गेला नव्हता. हा पैसा देणे अत्यंत गरजेचे आहे. वीजनिर्मितीसाठी शासन इतका निधी देणार आहे ही चांगली गोष्ट आहे. काल सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी भाषण करताना असे म्हटले होते की, मंत्रालयातील कक्ष अधिकाऱ्यांनी तयार केलेला हा अर्थसंकल्प आहे. परंतु मी असे म्हणतो की, लक्ष देऊन माननीय अर्थमंत्र्यांनी तयार केलेला हा अर्थसंकल्प आहे.

सभापती महोदय, शासनाने वीज बिलाची थकबाकी कमी करण्यासाठी थकबाकीवरील 100 टक्के व्याज माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. पाणीपुरवठ्यासाठी 100 टक्के व्याज माफ केले आहे, बंद उद्योगासाठी 50 टक्के व्याज माफ केलेले आहे. जर विजेचे बिल भरले नाही तर विजेचे कनेक्शन ताबडतोब तोडले जाते. माननीय उप मुख्यमंत्री व ऊर्जा मंत्र्यांची एक शिस्त आहे. त्यांना मुख्य अभियंता, अधिक्षक अभियंता घाबरतात. या अधिकाऱ्यांकडे गरीब शेतकऱ्याच्या वीज बिलाबाबत बोललो तर ते आम्हाला असे सांगतात की, अधिकारी निलंबित झाले आहेत. त्यामुळे आम्ही काही करु शकत नाही. परंतु या निमित्ताने माझी माननीय उप मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, विविध कार्यकारी सोसायट्यांनी गॅरेटी देऊन 100 रुपये किंवा 20 रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी....

थकबाकीदाराचे पेमेंट आम्ही 2-3 महिन्यात देऊ असे लिहून घ्यावे. थकित बिलासाठी विजेचे कनेक्शन तोडण्यापेक्षा विविध कार्यकारी सोसायटीच्या माध्यमातून पैसे भरण्याची पध्दत सुरु केली फार चांगले काम होईल.

सभापती महोदय, वस्त्रोद्योग धोरणाचा भाग म्हणून केंद्र सरकारच्या 'टफ' योजनेसाठी व्हॅटची सबसिडी, भांडवली अनुदान दिलेले आहे. परंतु वस्त्रोद्योगासाठी 'टफ' या योजनेच्या व्यतिरिक्त काही करता येत असेल तर जरुर विचार करावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, शासनाचे उद्योगासंबंधी धोरण जाहीर होणार आहे. शासनाने उद्योग क्षेत्रासाठी चांगले धोरण आणावे अशी मी विनंती करीत आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी एक मुद्दा मांडला होता. कापूस, तेल बियांवर शासनाने 5 टक्के खरेदी कर लावण्याचे प्रस्तावित केलेले आहे. व्हॅट किंवा सेल्स टॅक्समध्ये खरेदी कर अपेक्षित नसतो. खरेदी कर बेकायदेशीर आहे असे मी म्हणत नाही. पण तो व्यवहारिक नाही असे माझे मत आहे. कापसावर 5 टक्के लावलेला खरेदी कर 3 प्रकारे घेतला जाणार आहे. महाराष्ट्रामध्ये गाठी विकल्या जातील हा पहिला भाग झाला. महाराष्ट्राच्या बाहेर गाठी विकल्या जातील हा दुसरा भाग झाला आणि गाठींची निर्यात केली जाईल हा तिसरा भाग झाला. महाराष्ट्रामध्ये गाठी विकल्या गेल्या तर त्याचे पैसे राज्याला परत मिळणार आहेत. परंतु व्हॅटचा रिफंड 3-3 वर्षे मिळत नाही, या वस्तुस्थितीकडे माननीय अर्थ मंत्र्यांनी लक्ष दिले पाहिजे. 3 वर्षाचे 12-13 टक्क्याप्रमाणे व्याज गृहित धरले तर 35-40 टक्के व्हॅट होतो. व्हॅटच्या रिफंडची ऑर्डर मंजूर झाल्यानंतर 3 महिन्यात रिफंड दिला पाहिजे. लोकांकडून व्याज घेतले जाते त्यामुळे लोकांना व्याज सुध्दा दिले पाहिजे. राज्यात क्विंटलमागे 20 रुपये कर वाढला तर जवळपासचा कापसाचा माल बाहेरच्या राज्यात जाईल अशी भीती सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी व्यक्त केली आहे. ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. महाराष्ट्राच्या बाहेर माल पाठविला असेल आणि शेतकऱ्यांनी 'सी' फॉर्म भरला असेल तर रिफंड मिळतो, पण 'एफ' फॉर्म भरला असेल तर पूर्ण रिफंड मिळत नाही. त्याच्या रेश्योप्रमाणे रिफंड मिळतो. मी याबाबत चौकशी केली असता शेजारच्या कर्नाटक सरकारने 2 टक्के कर लावलेला आहे.

यानंतर श्री.शिगम...

अशुधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी...

माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी याबाबतची माहिती घ्यावी. यातून काही उत्पन्न मिळणार नाही. शेतक-यांकडून येणा-या कापसाच्या संदर्भातील ही बाब आहे. म्हणून या संदर्भात पुनर्विचार करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, ऑक्ट्रायच्या संदर्भात मी माननीय उप मुख्यमंत्री महोदयांना विनंती करणार आहे. Octrai is worst form of collection of tax. महाराष्ट्र सोडला तर इतर कोणत्याही राज्यामध्ये जकात घेतली जात नाही. शेजारच्या गुजराथ राज्याने 12.5 टक्के व्हॅटमध्ये 1 टक्का वाढवून घेतला आणि जकात कमी करुन घेतली. यासाठी कोणताही पर्याय स्वीकारावा. परंतु जकात गेली पाहिजे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, 50 टक्के, 60 टक्के खर्च 11 महिन्यामध्ये होतो. शेवटच्या फेब्रुवारी,मार्च महिन्यामध्ये आणि शेवटच्या 8-10 दिवसामध्ये 10 टक्के, 5 टक्के खर्च होतो. किमान जानेवारी अखेर पर्यन्त 80 ते 85 टक्के खर्च झाला पाहिजे अशा प्रकारची आर्थिक शिस्त लावण्याची गरज आहे.

गट सचिवांचा संप सुरु आहे. तो संपला की नाही हे मला माहीत नाही. परंतु 31 मार्चपर्यन्त कर्जाचे हप्ते भरले नाहीत तर शेतक-याला त्यावर सबसिडी मिळत नाही. यामध्ये अडचणी निर्माण होत असतील तर मुदत वाढवून द्यावी लागेल जेणेकरुन शेतक-यांना व्याजापोटी मिळणारे अनुदान त्यांना निश्चितपणे मिळू शकेल.

सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी कापूस निर्यात बंदीचा मुद्दा येथे मांडला. प्रत्येक वेळी ही कापूस निर्यात बंदी होते. आता 8 दिवसापूर्वी कापूस निर्यात बंदी करण्यात आली. माननीय श्री. शरद पवार यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे ही निर्यात बंदी उठली. परंतु निर्यात बंदी उठली असे काही दिसत नाही. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी सांगितले की बंदरावर 10 हजार कापसाच्या गाठी पडून आहेत. या बाबतीत राज्य शासनाने केन्द्र शासनाला सांगितले पाहिजे. कांदा, कापूस, साखर यांच्या निर्याती संबंधी किमान दोन किंवा तीन वर्षाचे सुस्पष्ट असे धोरण ठरविले पाहिजे. अचानक निर्यात बंदी लादल्यामुळे शेतक-यांचे नुकसान होते.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी...

सभापती महोदय, ग्रामीण आणि शहरी भागातील गरिबीसंबंधीचा मुद्दा मी माननीय उप मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून देत आहे. आज ग्रामीण भागामध्ये 22 टक्के आणि शहरी भागामध्ये 33 टक्के गरिबी आहे. तेव्हा शहरी गरिबी कमी करण्याच्या संदर्भातील प्रयत्न व्हावेत अशी माझी उप मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे.

वित्त विषयक विवरणाच्या पुस्तिकेमध्ये दिलेल्या आकडेवारी नुसार 22446 कोटी पैकी 8158.77 कोटी इतकी तरतूद पाटबंधा-यासाठी केलेली आहे. परंतु राज्यातील सिंचन क्षमता वाढताना दिसत नाही. ती 16 ते 17 टक्के इतकी आहे. या संदर्भात आपणाकडून प्रयत्न व्हावेत अशी माझी माननीय उप मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे.

सभापती महोदय, शासनाचे कर्मचारी किती आहेत ? तर शासकीय कर्मचा-यांची संख्या 5 लाख 74 हजार 244 इतकी आहे आणि 18 हजार 194 कोटी रु.इतका पगारावरील खर्च आहे. अनुदान प्राप्त संस्थामधील कर्मचा-यांची संख्या 9 लाख 80 हजार 358 इतकी असून त्यांच्या वेतनावरील खर्च 25943 कोटी रु. इतका आहे. सार्वजनिक क्षेत्रातील कर्मचा-यांची संख्या 2 लाख 51 हजार 868 इतकी आहे आणि त्यांच्या वेतनावर 7088 कोटी रु. इतका खर्च होत आहे. एकूण 18 लाख 6 हजार 770 कर्मचा-यांच्या वेतनावर 51,255 कोटी रु. इतका खर्च होत आहे. व्याज, वेतन आणि पेन्शन यावरील खर्च जवळपास 60 टक्क्यापर्यन्त जात आहे. हा खर्च वाढत चालला आहे. वित्त विषयक विवरणपत्रातील पृष्ठ क्रमांक 12वर नमूद केलेले आहे की, "वर्षभरात प्राप्त होणा-या कर्जावरील व्याज 12195 कोटी रु. इतके वाढणार आहे. महागाई भत्त्यातील संभाव्य वाढीच्या ठोक तरतुदीसाठी 1724 कोटी, सर्वसाधारण शिक्षण वेतनावरील खर्चात वाढ झाल्यामुळे 3123 कोटी, वैद्यकीय सेवा वेतनावरील खर्चात वाढ झाल्यामुळे 541 कोटीची वाढ झालेली आहे. हे मी माननीय उप मुख्यमंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देत आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / शीघ्रलेखीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी....

महोदय,आपण महाराष्ट्राचे संपूर्णपणे चित्र पाहिले, महाराष्ट्रावरील कर्जाची रक्कम पाहिली तरी देखील केंद्र सरकारने याबाबतीत आदर्श असे धोरण स्वीकारलेले आहे. त्यापेक्षा चांगल्या पध्दतीने राज्य चालविण्याचे काम या शासनाने केलेले आहे, त्यामुळे केंद्र शासनाकडून मिळणारा हिस्सा वाढतो आहे ही एक समाधानाची बाब आहे. आधी कराचा हिस्सा 30.05 होता, तो आता 32 टक्के झाला आहे. महाराष्ट्राला 4.09 ऐवजी 5.01 टक्का, सेवाकर 5.63 टक्के आता 5.28 टक्के, म्हणजे 18 हजार 442 कोटी रुपयांचे अर्थसहाय्य महाराष्ट्राला मिळणार आहे. अजून जास्त कसे वाढेल, मुंबई शहरासाठी कसे वाढेल, यासंदर्भात शासनाने प्रयत्न करावा. या ठिकाणी माननीय राज्यमंत्री श्री. राजेंद्र मुळक हे सभागृहात उपस्थित नाहीत, परंतु त्यांनी अर्थसंकल्पीय भाषणाच्या सुरुवातीला चांगली कविता म्हटली आहे.

"हा लेखा जोखा नाही समतेचे तोरण आहे
सर्वांना समान न्याय हे आमचे धोरण आहे."

सभापती महोदय, स्व.यशवंतरावजी चव्हाण यांचे हे जन्मशताब्दी वर्ष आहे. त्यांना अभिप्रेत असलेल्या चार ओळी मी उद्धृत करु इच्छितो.

"येथे डोळयात दु:ख सांडलेले
तेथे दोन अश्रू ढाळू नये
जेथे जग झोपले उपाशी
तेथे दोन घास भरवू नये "

त्यांना असेही अभिप्रेत होते की,

"जे हात आणताती खेचूनी वैभवाचे
ते हात दुखितांच्या पुसतील आसवांचे"

अशा पध्दतीने सामाजिक न्याय देण्याचा संदर्भातील एक विचार करणे हे अत्यंत गरजेचे आहे. प्राप्त परिस्थितीत एक चांगल्या पध्दतीचा अर्थसंकल्प माननीय उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांनी सभागृहात मांडला त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. महाराष्ट्रातील इतर अनेक प्रश्न आहेत, ते सोडविण्यासाठी शासनाने कार्यवाही करावी, अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त करुन मी माझे चार शब्द संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

--- 2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : आता सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी काल व्यासपीठावर असलेल्या अधिकाऱ्यांना विचारले होते की, मला बोलण्याची संधी कधी मिळणार आहे. त्यावेळी मला सांगण्यात आले की, सन्माननीय सदस्य श्री.सैयद पाशा पटेल यांच्या भाषणानंतर आपला नंबर आहे. सभापती महोदय, मघाशी आपण सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांचे भाषणासाठी नाव घेतले, म्हणून मी काही हरकत घेतली नाही. त्यांच्या भाषणानंतर तरी मला संधी मिळेल या अपेक्षेने मी सभागृहात बसून आहे. परंतु त्यांचे भाषण संपल्यानंतरही माझे नाव न घेता दुसऱ्याच सन्माननीय सदस्यांचे नाव घेतले.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना सांगू इच्छितो की, अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा जवळपास साडेतीन तास झालेली आहे.

श्री.दिवाकर रावते : मी काल या चर्चेची वेळ एक तासाने वाढवून घेतली होती.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांनी माझे म्हणणे ऐकून घ्यावे. काल झालेल्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत विरोधी पक्षाचे पाच आणि सत्ताधारी पक्षातील चार सन्माननीय सदस्य बोलले. या साडेतीस तासाच्या चर्चेमध्ये 2 तास 1 मिनिटांचा वेळ विरोधी पक्षातील सदस्यांनी घेतला आणि 1 तास 10 मिनिटांचा वेळ सत्ताधारी पक्षातील सदस्यांना मिळालेला आहे. आज या चर्चेला सन्माननीय सदस्य श्री. भाऊसाहेब फुंडकर यांनी सुरुवात केली. त्यांनी जवळपास 31 मिनिटे आपले मनोगत व्यक्त केले. त्यांचे मनोगत पूर्ण झाल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी बोलले. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांचा मनोगत व्यक्त करण्यासाठी नंबर होता. सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी देण्यासंदर्भात क्रम लावण्यात आलेला आहे, त्याप्रमाणे त्यांना बोलण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. काल सत्ताधारी पक्षातील कमी सदस्यांना कमी वेळ बोलण्याची संधी दिली आहे. विरोधी पक्ष सदस्यांना उलट या विषयावर जास्त वेळ बोलण्याची संधी दिलेली आहे. अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेसाठी दोन्ही बाजूच्या सदस्यांना अर्धा-अर्धा वेळ वाटून देण्यात येत असतो. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेच्या भाषणास सुरुवात करावी.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी हे माजी वित्त मंत्री आहेत. सी.ए.आहेत. ते एक अभ्यासू सदस्य आहेत असे म्हणून मी त्यांच्याकडे बघतो. ते सत्ताधारी पक्षाचे आहेत म्हणून त्यांनी अर्थसंकल्पाचे समर्थन केले, त्याबद्दल मी काही बोलू इच्छित नाही. महाराष्ट्र हे शेतीप्रधान राज्य आहे. विधिमंडळातील 80 टक्के सन्माननीय सदस्य हे स्वत:ला शेतकऱ्यांचे प्रतिनिधी म्हणतात. महाराष्ट्राची सिंचन परिस्थिती अतिशय वाईट आहे. देशामध्ये सिंचनावर जास्त खर्च करणारे राज्य म्हणून महाराष्ट्राचे नाव आहे. देशामध्ये जी राज्ये आहेत, ती सिंचनासाठी खर्च करतात, त्याच्यात सर्वाधिक खर्च महाराष्ट्र राज्य करीत आहे. आमची सिंचन क्षमता किती आहे त्याबाबतची माहिती सांगणार आहे. आंध्रप्रदेशामध्ये 48 टक्के सिंचन क्षमता आहे.

यानंतर श्री. भोगले....

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

अरुणाचल प्रदेश 20, आसाम 3.8, बिहार 61, झारखंड 9.7, गोवा 72.1, गुजराथ 45, हरियाणा 85, जम्मू-काश्मीर 41, केरळ 17, पश्चिम बंगाल 56, उत्तरप्रदेश 76, तामीळनाडू 58, राजस्थानसारखे वाळवंट म्हणून गणल्या जाणाऱ्या राज्यात 34 आणि महाराष्ट्रात 17.7 टक्के एवढे प्रमाण आहे. माननीय सदस्य श्री.अरुणभाई गुजराथी याबाबत किती समर्थन करणार आहेत?

सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी स्पष्ट निर्देश दिले आहेत की, नवीन प्रकल्पाची कामे हाती घेऊ नयेत. या राज्याच्या दोन माजी राज्यपालांनी व सध्याच्या राज्यपालांनी राज्य शासनाला नवीन पाटबंधारे प्रकल्प हाती न घेण्याचे स्पष्ट निर्देश दिलेले आहेत. सभापती महोदय, मी आज सकाळी अलिबाग येथे गेलो होतो. मांडवा जेट्टीचे उद्घाटन करण्यासाठी माननीय बंदरे विकासमंत्री तेथे आले होते. तो कार्यक्रम आटोपल्यानंतर मी विधानभवनात आलो आणि जून्या प्रकल्पांबाबतची आकडेवारी शोधण्याचा प्रयत्न केला. माननीय वित्त मंत्री सभागृहात बसलेले आहेत. जूने प्रकल्प पूर्ण करण्यासाठी 75 हजार कोटी रुपयांची आवश्यकता आहे. असे असताना नवीन प्रकल्पाची कामे का घेतली जातात? नवीन प्रकल्प हाती घेण्याचे षडयंत्र राज्यामध्ये सुरु झालेले आहे. नवीन प्रकल्प सुरु करायचे. ते मुद्दाम वन विभागाच्या क्षेत्रात घ्यायचे. त्या प्रकल्पाचे अंदाजपत्रक तयार करायचे. 100 ते 150 कोटी रुपयांचे अंदाजपत्रक तयार करायचे आणि 10 टक्के मोबीलाईज ॲडव्हान्स कॉन्ट्रक्टरला द्यायचा. मी हे पुराव्यानिशी बोलत आहे. त्या कॉन्ट्रॅक्टरने ॲडव्हान्स घेऊन मोडकी तोडकी मशिनरी साईटवर आणून ठेवायची. तेथील शेतकऱ्यांना विस्थापित केल्यानंतर वन विभागाचा प्रश्न निर्माण करुन कोर्टात जायचे. कॉन्ट्रॅक्टरला वर्कऑर्डर दिल्यानंतर त्याने कोर्टात जायचे आणि मला वर्कऑर्डर दिली असल्यामुळे मी साईटवर मशिनरी आणून ठेवली आहे सांगून शासनाकडून नुकसानभरपाई मागायची असे प्रकार सुरु आहेत. अशा प्रकरणांमुळे आतापर्यंत शासनाचा किती निधी खर्च झाला आहे?

सभापती महोदय, वित्त विभागातील निवृत्त सहसचिव श्री.एस.एस.गायकवाड यांना विधिमंडळामध्ये आर्थिक सल्लागार म्हणून नेमण्यात आले आहे. मी त्यांची चार वेळा भेट घेतली. कारण अर्थसंकल्पीय प्रकाशने वाचून आम्हाला प्रकल्पाविषयीची माहिती कळून येत नाही. या राज्यात एकूण अपूर्ण प्रकल्प किती आहेत आणि ते पूर्ण करण्यासाठी किती निधी लागेल याची माहिती द्यावी अशी मी श्री.गायकवाड यांना विनंती केली. फार गंभीर बाब पुढे आलेली आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

हजारो प्रकल्प अपूर्णावस्थेत आहेत. मी मध्यंतरीच्या काळात विदर्भ आणि हिंगोली येथे गेलो होतो. हिंगोली येथे एका धरणाचे काम हाती घेण्यात आले आहे. तेथील शेतकऱ्यांनी मला बोलावून सांगितले की, 150 कोटी रुपयांचा हा प्रकल्प असून कॉन्ट्रॅक्टरला ॲडव्हान्स दिल्यानंतर त्याने मोडकी तोडकी मशिनरी साईटवर आणून ठेवली आहे. या प्रकल्पाचे आतापर्यंत एक रुपयाचे देखील काम झालेले नाही. या संदर्भातील अभ्यास माननीय सदस्य श्री.अरुणभाई गुजराथी यांनी केला पाहिजे. या संदर्भातील टक्केवारी सभागृहाच्या निदर्शनास आणली पाहिजे. हे प्रकार थांबले पाहिजेत. या संदर्भातील खुलासा चर्चेच्या उत्तराच्या भाषणात अर्थमंत्र्यांकडून अपेक्षित आहे.

नंतर श्री.खर्चे...

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील.....

कोणत्याही परिस्थितीत नवीन प्रकल्प न घेता जे अपुरे प्रकल्प आहेत तेच अगोदर पूर्ण करावेत असे निदेश माननीय राज्यपालांनी दिले आहेत. या प्रकल्पांच्या माध्यमातून देखील राज्यात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार चालू आहे.

आपल्या राज्यात सिंचन क्षमता पुरेशी नाही म्हणून शासनाने सिंचनासाठी चालू वर्षी 7700 कोटीची तरतूद केलेली आहे. पण या 7700 कोटीमध्ये सिंचन क्षमता कशी वाढणार हे मला माहिती नाही, मंत्री महोदयांनी ते स्पष्ट करावे. राज्यात जरी सिंचन क्षमता वाढलेली नसली तरी मंत्र्यांची आर्थिक सिंचन क्षमता चांगल्या प्रकारे वाढल्याचे निदर्शनास आले. माझी तर अशी मागणी आहे की, या सर्व प्रकरणांची सीबीआय मार्फत चौकशी केली पाहिजे. कारण सिंचनाचे प्रकल्प तेच तेच ठेकेदार घेत असतात आणि केवळ 10-20 ठेकेदारांचीच मोनोपोली राज्यात निर्माण झाल्याचे चित्र दिसत आहे, ती तोडण्याचे काम मंत्री महोदयांनी करावे. आमच्या कर्जत तालुक्यात कोंढाणे येथे एक 40 कोटी एस्टीमेटचा प्रकल्प होता पण त्याची उंची वाढवून हा प्रकल्प 400 कोटीवर नेण्याचे काम त्या प्रकल्पाच्या ठेकेदाराने केले. शेवटी हा जनतेचा पैसा आहे म्हणून अशा बाबींचे स्पष्टीकरण माननीय उप मुख्यमंत्र्यांनी दिले पाहिजे. कर्जतला जो कंत्राटदार आहे तो जवळजवळ 100 प्रकल्पांची कामे घेण्याचा विक्रम करतो, यातून राज्याची सिंचन क्षमता कशी वाढणार हेही स्पष्ट झाले पाहिजे. एकदा हा ठेकेदार माझ्याकडे आला आणि म्हणाला की, "साहेब मी तुमची सगळी व्यवस्था करतो" मी त्याला म्हणालो की मी फाटका माणूस आहे, वर्षाला चार कपडे घालतो, त्या व्यतिरिक्त मला दुसरे काही लागत नाही. तसेच मी त्याला सांगितले की, "तू दादांकडे जा" अशी परिस्थिती असल्याने मला अत्यंत वाईट वाटले. यात माननीय अर्थमंत्र्यांनी बदल करावा अशी मी विनंती करतो. तसेच 40 कोटीचे टेंडर 400 कोटीवर जात असेल तर अशा विक्रम करणाऱ्या कंत्राटदाराची व संबंधित अधिकाऱ्यांची सुध्दा चौकशी झाली पाहिजे.

त्याचबरोबर रोहा तालुक्यात सुध्दा वन विभागात प्रकल्प घेण्याचा विचार शासन करीत आहे. त्याचा नारळ मंत्री महोदय फोडतात.....अडथळा.....त्याची आम्हाला गरज नाही. माझ या अलिबाग मध्ये मी एकटा सोडून इतर सर्व सदस्य 5-5, 8-8 हजार मतांनी निवडून येतात. आम्ही प्रत्यक्ष जनतेत जाऊन काम करीत असतो. सर्वसामान्यांच्या दारात जाऊन 24 तास

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील.....

लोकांना भेटतो व कामे करतो, कोणाच्या मेहेरबानीवर येथे येत नाही म्हणूनच या अर्थसंकल्पाचे समर्थन करणे माझ्या दृष्टीने योग्य नाही. अशा प्रकारे हे राज्य लुटण्याचा प्रयत्न या शासनाकडून व अधिकाऱ्यांकडून होत आहे. मी काल माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित असताना सांगितले आणि आता माननीय उप मुख्यमंत्री असताना पुन्हा रिपीट करतो की अशा प्रकारे सत्तेतून पैसा आणि पैशातून सत्ता असा प्रकार आम्ही कधीच करणार नाही.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील...

असेच जर चालू राहिले तर तुम्हाला परत सत्तेच्या खुर्चीत बसता येणार नाही. सिंचनाची जी 17.60 ची आकडेवारी दिलेली आहे ती सुध्दा बोगस आहे. रायगडमध्ये सुध्दा कालव्याचे प्रश्न प्रलंबित आहेत. धरणे बांधून तयार आहेत परंतु कालवे केले गेले नाहीत. बोगस बिले तयार करण्याचे काम सुरु आहे. जलसंपदा खाते म्हणजे लूटमारी करणारे खाते आहे असा आता लोकांचा समज होत चालला आहे. जलसंपदा खात्यामध्ये खालपासून वर पर्यंत पैसे खाण्याचे काम सुरु आहे. कर्जत येथील कोंढाणे प्रकल्पाचे काम 40 कोटी रुपयांवरुन 400 कोटी रुपयांपर्यंत कसे काय गेलेले आहे याचीही माहिती माननीय अर्थमंत्र्यांनी आपल्या उत्तराच्या भाषणात द्यावी अशी विनंती आहे. अशा प्रकारे राज्याची लूट चालली असेल तर ती थांबली पाहिजे अशी आमची अपेक्षा आहे.

सभापती महोदय, जलसंपदा विभागाच्या संदर्भातील अनेक गोष्टी मी सांगू शकतो परंतु वेळ कमी असल्यामुळे मी दोन तीन मुद्यांना स्पर्श करुन माझे भाषण पूर्ण करणार आहे.

सभापती महोदय, आर्थिक पाहणीच्या अहवालात पुढील वर्षी मंत्र्यांची सिंचन क्षमता किती वाढली याचा उल्लेख यावयास पाहिजे असे मला वाटते.

सभापती महोदय, एमएमआरडीएने मँग्रोव्हजच्या वाढीसाठी 100 कोटी रुपये दिलेले आहे. एमएमआरडीए ग्रामीण भागासाठी एक रुपया सुध्दा खर्च करीत नाही तर आमच्यावर त्यांची भरपूर बंधने असतात. 0.2 एफएसआय, अमुक परवानगी पाहिजे, हा झोन, तो झोन अशा प्रकारची ग्रामीण भागावर एमएमआरडीएने बंधने घातलेली आहेत.

सभापती महोदय, श्री. देवी गोयंका, बॉम्बे एनव्हायरमेन्ट ग्रुपने महाराष्ट्र शासनाच्या विरुध्द, लोकहितार्थ मुंबई हायकोर्टात 27006 अन्वये पीआयएल दाखल केलेली आहे. मँग्रोजचे खाजगी आणि शासकीय जमिनीवर संरक्षण करण्यासाठी पीआयएल त्यांनी दाखल केलेली आहे. यासंदर्भात सांगण्यात आले आहे की, यांचे म्हणणे बरोबर आहे. यासंदर्भात कोणाही लोकप्रतिनिधींना बोलावण्यात आले नाही. या राज्याच्या मुख्य सचिवांनी त्यांना बोलावले व त्यांच्या आदेशा प्रमाणे मँग्रोजचे संरक्षण होण्यासाठी त्यांची कमिटी नेमली. खारे पाटात बांध फुटल्यामुळे आमच्या शेतात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील...

खारे पाणी येते व त्यामध्ये मँग्रोव्हजची वाढ चांगल्या प्रकारे होत असते. आमच्याकडील हजारो एकर शेतीमध्ये मँग्रोव्हजची वाढ झालेली आहे. त्यामुळे यासंदर्भात माझी मागणी आहे की, गोयंका कंपनी जे काही काम करीत आहे तिचे काम ताबडतोब थांबवले गेले पाहिजे.

आमच्याकडे आता रोजगार हमी योजनेतून बांध बांधण्याच्या कामास सुरुवात केलेली असल्यामुळे राज्य शासनाचे एका दृष्टीने आम्ही पैसे वाचवले आहेत. मँग्रोव्हजची वाढ तर एक दिवसात होत असते. गावागावात तट असल्यामुळे एकमेकांविरुध्द केसेस टाकून कामे थांबवली गेली आहेत. रोजगार हमी योजनेतून 100 कोटी रुपयांची कामे बांध बांधण्याची सुरु केलेली आहेत.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

गोयंका कमिटीमुळे आज काम थांबलेले आहे. मुंबईतील एनजीओंचा आज धंदा झालेला आहे. ते उठून अलिबागला येतात. पेण मध्ये येतात. सिंधुदुर्गमध्ये जातात. मॅनग्रोव्हसंबंधी सांगतात म्हणून त्यांना चांगली ट्रीटमेंट मिळते. त्यांना सगळेजण घाबरतात. ते सांगतात की, आम्ही हायकोर्टात जाऊ. म्हणून याकडे आपण लक्ष घातले पाहिजे, अशी माझी मागणी आहे. तीन वर्षामध्ये आमचे बांध बांधून पूर्ण होणार आहेत. तेव्हा आपण किमान तीन वर्षे तरी या समितीचे कामकाज थांबविले पाहिजे अशी मागणी मी या निमित्ताने करतो. ही गंभीर बाब आहे. शासन सांगते की, रोजगार हमी योजनेचे पैसे संपत नाहीत. सदर निधी उपयोगी पडावा म्हणून आम्ही बैठका घेतल्या. प्रबोधन केले. मात्र ते काम थांबविण्याचे काम मुंबईतील मोठे लोक करीत आहेत. ज्यांनी कधी शेती पाहिली नाही असे हायफाय लोक, गॉगल लावून, बॉबकटवाल्या मुली एनजीओ म्हणून येतात. त्याची माहिती डॉ.नीलम गोऱ्हे यांना आहे.

केंद्राचा निधी आणल्याबद्दल कौतुक करण्यात आले. मी रात्री अर्थसंकल्पाचा अभ्यास करीत होतो. तीन-चार हजार कोटींच्या व्यतिरिक्त केंद्राचा निधी आपल्याला मिळालेला नाही. सर्व शिक्षा अभियानाचा जवळ जवळ 7000 हजार कोटीचा निधी आपल्याला डायरेक्ट मिळतो. तो सोडला तर जवळ जवळ 3 ते 4 हजार कोटी आपल्याला मिळतात.

मी उत्तर भारतातील राज्यांचा थोडा अभ्यास केला. केंद्राचा सर्वाधिक निधी घेऊन ही राज्ये चालवली जातात. त्यांच्याकडे आपल्या सारखे उत्पन्नच नाही. त्यांच्या बजेटचा अभ्यास केल्यानंतर हे आपल्या लक्षात येईल. त्यांची आपण वेब साईट पहा. मी दोन मुलांना घेऊन ती वेब साईट बघण्याचा प्रयत्न केला. त्यांना लोकसंख्येच्या प्रमाणात निधी मिळते, याबाबत माननीय अर्थमंत्रीच जास्त सांगू शकतील. माझी या निमित्ताने मागणी आहे की, राज्य सरकारने दिल्ली मध्ये एक सेल उघडला पाहिजे. तेथे आयएएस दर्जाचा अधिकारी नेमला पाहिजे. केंद्राच्या विविध योजनांचा निधी दर महिन्याला किती आला व किती प्रकरणे मंजूर होतात यासाठी आयएएस दर्जाचा अधिकारी दिल्लीत महाराष्ट्र सदनमध्ये नेमला पाहिजे. त्याने निधी आणण्याचे काम केले पाहिजे. आम्ही त्याला दिल्लीला जाऊन भेटू शकतो. त्यामुळे राज्य सरकारने एक सेल उघडावा अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे. जेणकरून जास्तीत जास्त निधी आपल्याला मिळू शकतो. माननीय अर्थमंत्री कार्यक्षम आहेत. हे काम माननीय अर्थ मंत्री करू शकतील. आपण मोठ्या प्रमाणावर निधी आणू शकतो. ..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

आताच श्री.राणे साहेबांनी मांडव्याला जेट्टीचे उद्‌घाटन केले. त्यावेळी मी देखील होतो. मी त्यांना सासवड्याचे टोक आणि कुलाब्याची दांडी या दोघांचे ब्रेक वॉटर करा अशी सूचना केली. सासवड्याचे टोक ते कुलाब्याची दांडी हे सात कि.मी.चे अंतर आहे. मलेशिया, सिंगापूरमध्ये भर समुद्रात ब्रेक वॉटर करून पोर्ट केले आहे. हे दोन्ही केले तर मुंबईचा संपूर्ण समुद्र शांत होईल. कुठेही तुम्हाला लाटांचा त्रास होणार नाही. यासाठी 700 ते 1000 कोटी इतका खर्च येईल. आपण फक्त दहा टक्के हिस्सा द्यायचा आहे. राज्य शासन सहजपणे 100 कोटीची तरतूद करू शकते. असे केले तर आपल्याला केंद्राकडून 900 कोटी रूपये सहज मिळू शकतात. पावसाळ्यात सुद्धा आपण गेट वे ऑफ इंडियापासून जल वाहतूक करू शकतो.

मांडवा जेट्टीसाठी 250 कोटीची तरतूद केली आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

याबाबतीत घोषणा केली. त्यासाठी पर्यावरण विभागाची परवानगी आहे काय ? माझी अर्थसंकल्पावरील चर्चेच्या निमित्ताने मागणी आहे की, ज्या कामांसाठी पर्यावरण विभागाची परवानगी असेल त्याच कामाच्या बाबतीत राज्य शासनाने घोषणा करावी. पहिल्यांदा पर्यावरण विभागाची परवानगी आणावी आणि मग त्यासाठी शासनाने तरतूद करावी. नाहीतर तुम्ही पुढच्या वर्षी काय सांगणार तर आम्ही तरतूद केली होती परंतु पर्यावरण विभागाने नकार दिल्यामुळे सदरहू तरतूद खर्च करु शकलो नाही.

सभापती महोदय, मला यावर्षी छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा दिसलाच नाही. यासंबंधात सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेब बोलतील. यावर्षी छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभा करण्यासाठी आपल्या बजेटमध्ये तरतूद नाही. मात्र गेल्या वर्षी होती. पण तो विषय तुमचा असल्याने तुम्ही अधिकार वाणीने बोलू शकता असे मला वाटते. जर यावर्षी देखील तरतूद केली असेल पण मी त्याबाबतीत तेवढा अभ्यास केलेला नाही. पण मी याबाबतीत पाहिले पण कुठे तसे काही दिसलेले नाही. परंतु मला माननीय अर्थ मंत्री श्री.अजितदादा पवार यांना सांगावयाचे आहे की, तुम्ही प्रथम पर्यावरणाच्या बाबतीत परवानगी घेऊन मग याबाबतीत घोषणा करावी. कारण पर्यावरण विभाग याला परवानगी देणारच नाही. पण या मुंबईमध्ये देशातील पहिले ब्रेक वॉटर तयार केले तर तुमचे नाव होऊन जाईल. त्यासाठी तुम्ही मला बोलवावे. 200 कोटी रुपयांचे मांडव्याला खर्च करणार, नवी मुंबईला वेगळे करणार. यासाठी माझी माननीय उप मुख्यमंत्री महोदयांना आणखी सूचना करावयाची आहे की, बॉम्बे पोर्ट ट्रस्ट, जे.एन.पी.टी. हे देखील यामध्ये समाविष्ट होऊ शकतात. जे.एन.पी.टी.ची जहाजे येथे राहू शकतात. आज जी जहाजे येतात मी माननीय राज्यपालांचे जे निवासस्थान आहे त्या बंगल्याच्या खाली उभी रहातात. अशा वेळी तुम्ही त्याठिकाणी पावसाळ्यामध्ये ब्रेक वॉटर तयार केले तर एक वेगळया प्रकारचे काम होईल आणि राज्याला मिळणारे उत्पन्न वाढेल कारण तेवढ्या प्रमाणात वाहतूक वाढेल.

सभापती महोदय, जे.एन.पी.टी.ने 900 कोटी रुपयांचे ड्रेजिंग केले.माननीय मंत्री श्री. अजितदादा पवार यांनी मला वेळ दिला तर मी आपल्याकडे येईन,चर्चा करीन. त्यांच्याकडे स्वच्छता आहे आणि तशी माझ्या छोट्या बंधूमध्येही आहे.ते जिल्हा परिषदेचे अध्यक्ष होते आणि आता जिल्हा परिषदेचे सदस्य आहेत.त्यांना सुध्दा माननीय उप मुख्यमंत्र्यांप्रमाणे कुठे कचरा दिसला तर तो काढून टाक, कुठे कागद दिसला तर काढून टाक अशी सवय आहे.मी माननीय मुख्यमंत्र्यांकडून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

अपेक्षा करतो की, आज नागरीकरण वेगाने होत आहे. सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी चांगला मुद्दा मांडलेला आहे की, ज्या गतीने नागरीकरण होत आहे, त्यावेळी कुठे कचरा टाकण्याची सोयच नाही. आज कचरा टाकण्यासाठी कुठेही डंपिंग ग्राऊंड मिळत नाही. आज ग्रामीण भागामध्ये देखील फ्लॅट संस्कृती येत आहे. त्यामुळे तुम्हाला कचरा टाकण्यासाठी खास जागेची तरतूद करावी लागेल आणि तो उचलण्यासाठी सुध्दा आर्थिक तरतूद करावी लागेल. नाहीतर आपण रस्त चांगले करु, कारंजे करु पण तुम्हाला त्याच्या बाजूला कचरा पडलेला दिसून येईल. यादृष्टीकोनातून याबाबतीत कुठे तरतूद झाल्याचे मला दिसत नाही. याबाबतीत स्वच्छता ही महत्वाची आहे. पण याबाबतीत पर्यावरण विभागाचे लोक काही बोलत नाहीत.

सभापती महोदय, माझे दोनच मुद्दे आहेत. एमएमआरडीए ने चार एफ.एस.आय.ची घोषणा केली. 1 एफएसआय शासनाने द्यावयाचा. एमएमआरडीए एरियामध्ये विशेषत: पनवेल, उरण या परिसरामध्ये एमएमआरडीए च्या चार एफएसआय च्या योजना आहेत त्यासंबंधातील फाईल पुढे हलत नाही. यामध्ये मेख आहे. याठिकाणी आठ झोन करण्याच्या संबंधातील धोरण शासनाच्या विचाराधीन आहे आणि आठ झोन झाले तर त्याठिकाणी एक एफएसआय मिळतो आणि त्यामुळे ही योजना बारगळणार आहे. आता त्याठिकाणी ते प्रस्ताव पडून आहेत. मी काही बिल्डर नाही पण माझ्याकडे जी माहिती उपलब्ध आहे, त्याप्रमाणे जवळजवळ 9 हजार फ्लॅटस् राज्य शासनाला फुकट मिळणार आहेत आणि यासाठी एकही रुपया खर्च करावयाचा नाही. जर ही योजना संपूर्णपणे राबविली तर 1 लाख 80 हजार फ्लॅट राज्य शासनाला मोफत मिळणार आहेत.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

ती घरे रेन्टवर देण्याची घोषणा शासनाने जाहीर केली होती. बी.डी.डी.चाळीत राहणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या घरांची अवस्था अतिशय वाईट झालेली आहे. त्यांना आपण ही घरे दिली तर ते आपणास दुवा देतील. तेव्हा ही योजना झाली पाहिजे अशी माझी सरकारला विनंती आहे. परंतु प्रशासनातील अधिकारी ही योजना होऊ देत नाही, या संदर्भातील फाईल चार-चार वर्षे अडवून ठेवली जात आहे. शासनाला करोडो रुपयांची प्रॉपर्टी मिळणार आहे. परंतु या मध्ये बिल्डरांचे हित नाही म्हणून जाणूनबुजून ही योजना राबविली जात नाही. तेव्हा या बाबत चौकशी करावी अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, माझे परममित्र व जलसंपदा मंत्री श्री.सुनील तटकरे साहेब हे अर्थमंत्री असताना त्यांनी अनेक घोषणा केल्या होत्या. माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी आमच्याकडचे खाते हिरावून घेतले, आम्हाला वाटले आम्ही "सुजलाम् सुफलाम्" होऊ. परंतु दादानी ते खाते त्यांच्याकडून काढून घेतले. सभापती महोदय, कोणतीही घोषणा करण्यापूर्वी शासनाने प्रथम जागा निश्चित करुन ती ताब्यात घ्यावी आणि त्या संदर्भातील सर्व परवानगी मिळाल्यानंतर घोषणा करावी. फक्त घोषणा करायच्या नाहीत. माननीय श्री.सुनील तटकरे हे वित्त मंत्री असताना त्यांनी नाना महाराजांचे स्मारक करण्याची घोषणा केली होती, त्याच बरोबर पाचाड येथे शिवसृष्टी, कान्होजी आंग्रे यांचे लाईट ॲन्ड साऊंड स्मारक करु असे सांगितले. त्यासाठी 2 कोटी रुपयांची तरतूद करण्याची घोषणा केली. परंतु दोन रुपये देखील दिलेले नाहीत. शासनाला कोणत्याही महापुरुषाचे स्मारक करावयाचे असेल तर त्या संदर्भात्ील सर्व परवानगी प्रथम घेतल्या पाहिजेत. या स्मारकांमुळे माझा मुलगा निवडणुकीत पडला. दादा, आपण त्या ठिक्राणी शब्द दिला. तिकडे सांगण्यात आले की, नाना महाराजांच्या स्मारकाला जयंत प्र. पाटील यांनी विरोध केला. आम्हाला हे नंतर समजले. श्री.खानविलकर आणि दादांची बैठक झाली. त्यावेळी आपण त्यांना सांगितले की, स्मारक होणार नाही. मी सांगितले की, अन्य कोणी निवडणूक लढण्यास तयार नसेल तर माझा मुलगा निवडणूक लढवेल. "लढनेको तुम अन् खाने को मै " अशी आमची कधीही भूमिका नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

सभापती महोदय, मी मुद्यावर येतो. तेव्हा स्मारके उभारण्याबाबत ज्या घोषणा झाल्या ती स्मारके उभारणार की नाहीत हे या ठिकाणी सांगितले पाहिजे. त्या ठिकाणी सर्वजण येतात. दादा सुध्दा नारळ फोडायला आले होते. माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार साहेब आले होते. शासनाची जागा असेल तर मग त्यासाठी एनओसी कशाला पाहिजे ? शासनाला प्रोजेक्ट करायचा असेल तर त्यासाठी शासनाच्या परवानगीची आवश्यकता नाही असे मला वाटते. तेव्हा स्मारक उभारण्याची घोषणा करुन शासनाने जनतेची दिशाभूल करु नये. स्मारके होत नाहीत म्हणून आम्ही ती अडवितो असे सांगितले जाते. ते स्मारक ट्रस्टमार्फत होणार होते की शासनामार्फत होणार होते, याचा देखील दादा खुलासा झाला पाहिजे. ट्रस्टमार्फत स्मारक होणार असेल तर त्यासाठी तेथील ग्रामपंचायतीची परवानगी पाहिजे... सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते दोन तास बोलू शकतात तर आम्ही एक तास का बोलू शकत नाही ? आम्ही आपला मान राखतो, पण आम्ही सुध्दा एक तास बोलू शकतो. मागील बारा वर्षापासून मी या सभागृहाचा सदस्य आहे. मी कधीही वेडेवाकडे बोललो नाही. मी मोजकेच बोलत आलेलो आहे. मी कधीही जास्त वेळ घेतलेला नाही. मी अर्थसंकल्पावर का बोलत आहे तर दादांकडून माझ्या वेगळ्या अपेक्षा आहेत. महाराष्ट्र त्यांच्याकडे एका वेगळ्या अपेक्षेने पाहत आहे. तेव्हा माझी विनंती आहे की, आपण बोगस स्मारके देऊ नका.

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील.....

सभापती महोदय, या ठिकाणी मी पर्यावरणाच्या बाबतीत बोलू इच्छितो. मी कधी-कधी गुजराथमध्ये जातो. सगळया पॉझिटिव्ह फाईल्स पाठवा, मॅनग्रोव्ह असले तरी नाहीत असे लिहून द्या कोण बघायला येतात, प्रोजेक्ट होऊ द्या असे गुजरातचे माननीय मुख्यमंत्री सर्व अधिकाऱ्यांना बोलावून सांगतात. दादा तुम्ही हे करु शकता. पण प्रोजेक्ट कसे होणार नाहीत हे आपले सचिव बघतात. मी सी.ए.नाही. सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी हे सी.ए. आहेत. त्यामुळे पैसे कसे वाचवावयाचे हे त्यांना माहीत आहे. त्यामुळे उत्पन्न कसे वाढले हे त्यांनी त्यांच्या गोड भाषेत चांगल्या पध्दतीने सांगितले आहे. केंद्र शासनामुळे शासनाचे उत्पन्न वाढले आहे. केंद्र शासनाने पेट्रोलचे दर चार वेळा वाढविले त्याचा वॅट किती मिळाला हे याठिकाणी सांगितले नाही कारण तुम्ही सी.ए.आहात त्यामुळे पैसे कसे वाचवावयाचे हे तुम्हाला चांगले माहीत आहे.

श्री. दिवाकर रावते (बसून) : लपविण्याचे काम सी.ए.चे असते.

श्री. जयंत प्र. पाटील : बरोबर आहे. सर्व लपविण्याचे काम सी.ए.चे असते त्या बद्दल मी जास्त बोलणार नाही कारण सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांच्याकडे मी वेगळया आदराने बघतो. पेट्रोल डिझेलचे दर वाढविल्यामुळे वॅट किती वाढला आणि त्यामुळे उत्पन्न किती वाढले हे या सभागृहाला कळले पाहिजे. सभापती महोदय,उत्पन्न कसे वाढले यावर देखील आम्ही बोलू शकतो. बोलण्यासारखे बरेच मुद्दे आहेत पण भाषण आटोपते घेण्याची आपण विनंती केली त्यामुळे मी माझे भाषण आटोपते घेतो. पण निश्चितपणे जे दु:ख होते, मनाला क्लेश होतो तेच विषय आणि मुद्दे मी या ठिकाणी मांडलेले आहेत. माननीय उप मुख्यमंत्र्यांनी आणि वित्त मंत्र्यांनी त्याचा जरुर विचार करावा, एवढीच विनंती करुन मी माझे भाषण संपवितो. जय हिंद. जय महाराष्ट्र.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आपण मला बोलण्याची मला संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे.

सभापती महोदय, एका पक्षाचा गट नेता म्हटल्यानंतर मला काही विशेष अधिकार असावा असा माझा समज होता पण आपण माझा तो गैरसमज दूर केला त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. खात्याच्या सचिवांनी सुध्दा सदस्यांबरोबर राजकारण खेळावयाचे ठरविले असेल तर ते अत्यंत विद्रुप आहे. मी एखाद्याला मारु शकतो अशी एकदा त्यांना चटक लागली तर ते फार गंभीर आहे त्यामुळे याकडे फार गंभीरतेने लक्ष द्यावे लागेल. थोडया वेळापूर्वीच या ठिकाणी झालेली प्रश्नोत्तरे आपण बघितली आहेत त्यामुळे आपण ते भोगतच आहोत.

सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अर्थसंकल्पावर बोलावयाला उभा आहे.शिवाजी राजे भोसले हा एक सिनेमा होता. त्या सिनेमातील महाराज काल माझ्या स्वप्नात आले आणि त्यांनी मला असे विचारले की, "तू झोपलास का," तेव्हा मी असे म्हटले की, "मी भोसले नाही मी रावते आहे." तेव्हा ते असे म्हणाले की, "म्हणूनच मी तुझ्याकडे आलो आहे. कशासाठी तुम्ही तिकडे दंगा केला त्या शहरांमध्ये? मला उभे करा त्या अरबी समुद्रामध्ये. मी म्हटले "महाराज आम्ही दंगा केला नाही. ते या शासनाला सुचले की आणखी कोणाला सुचले आम्हाला माहीत नाही. परंतु त्यांनी ठरविले म्हणून आम्ही विचारले की ते कां करत नाही." तेव्हा महाराज असे म्हणाले की, "मी काही सांगितले नव्हते की मला तेथे उभे रहावयाचे आहे." तेव्हा मी असे म्हटले की, "तुम्ही तेथे उभे रहावे अशी त्यांची इच्छा आहे." महाराज म्हणाले "मला उभे राहण्याकरिता काय करावयाचे होते ते त्यांनी केले नाही आणि तुम्ही गप्प बसून येथे येऊन झोपले कसे? मला त्या अरबी समुद्रात जागा मिळेल असे वाटत नाही आणि अर्थसकंल्प का काय म्हणतात पण त्यामध्ये माझ्यासाठी काहीच व्यवस्था नाही, तुम्ही मात्र माझ्यासाठी गोंधळ घालीत आहात." त्यानंतर महाराज असे म्हणाले की, "आता मी टाच मारतो." त्यानंतर ते टाच मारुन रायगडावर निघून गेले. सभापती महोदय, या शासनाचे काय कर्तृत्व आहे. ज्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने राज्य चालविण्यात येते त्या छत्रपती शिवाजी महाराजांवर ही परिस्थिती यावी. ज्या अर्थमंत्र्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचा या महाराष्ट्र राज्यात गोंधळ निर्माण केला आहे. विधिमंडळामध्ये अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सर्व काही महाराजांच्याच नावाने... प्रत्येक वेळेला छत्रपती शिवाजी

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

महाराज आपले आहेत, पण छत्रपती शिवाजी महाराज हे सर्वांचे आहेत. छत्रपती शिवाजी महाराज हे कुठल्या पक्षाचे नाहीत ते सर्वांचेच आहेत. महाराष्ट्रात जन्माला आलेल्या प्रत्येक माणसाचे छत्रपती शिवाजी महाराज हे दैवत आहेत.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे ज्येष्ठ सदस्य आहेत आम्ही त्यांचा आदर करतो पण ते या ठिकाणी बोलत असताना असे म्हणाले की, गोंधळ अर्थमंत्र्यांनी केला. तेव्हा हे चुकीचे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या बाबतीत माननीय अर्थ मंत्र्यांनी गोंधळ कसा केला, त्यांनी काय केले. यांनी काहीच गोंधळ केलेला नाही. तेव्हा अशा प्रकारचे चुकीचे काही तरी सभागृहाच्या रेकॉर्डमध्ये नसावे.

श्री. दिवाकर रावते :सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांना मी मनापासून धन्यवाद देतो कारण आपण खुलासा करण्याची संधी मला उपलब्ध करुन दिलेली आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

मला वाटले की, आपण राजकारणामध्ये आहात, आमदार आहात आणि या ठिकाणी जे काही कामकाज चालते त्याचे कोठे तरी ज्ञान घेत असाल, आमच्यापेक्षा जास्त घेत असाल. माळरानावर महाराजांच्या टाचा पडल्या म्हणून महाराष्ट्राला स्वराज्य मिळाले. शेळ्या आणि मेंढ्यांमुळे नाही.

श्री. रमेश शेंडगे : ते मावळे होते.

श्री. दिवाकर रावते : शेळ्या-मेंढ्यांमुळे स्वराज्य मिळाले नाही. मावळे सोडून द्या.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री. दिवाकर रावते : मी घोड्यांच्या बरोबर शेळ्या मेंढ्या असे बोललो. मला काही कळत नाही का ? मी माणसांबद्दल बोललेलो नाही.

श्री. रमेश शेंडगे : माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेब आपण अर्थसंकल्पावर बोलत असताना अर्थसंकल्पाबद्दल भाषणात काय विचार मांडता हे संपूर्ण महाराष्ट्र बघत आहे. आधी आपण सांगितले की, अर्थमंत्र्यांनी हा सगळा घोटाळा केलेला आहे. ते शब्द आपण मागे घ्यावेत. त्यांचा काहीही संबंध नाही. जे काही झाले ते सर्व महाराष्ट्राला माहीत आहे. ते शब्द आपण मागे घ्यावेत. तसेच आपण दुसरे शब्द सुध्दा मागे घ्यावेत. एखाद्या समाजाच्या भावनांना हात घालणारे आपण बोलत आहात. शेळ्या-मेंढ्यामुळे झालेले नाही असे बोलून एखाद्या समाजाच्या भावनांचा अपमान करीत आहात. छत्रपती शिवाजी महाराजांबरोबर लढणारे मावळे हे शेळ्या-मेंढ्या राखणारे होते. त्यांनी शिवाजी महाराजांना दऱ्याखोऱ्यातील रस्ते दाखविले म्हणून शिवाजी महाराजांची आक्रमणे यशस्वी झाली. शिवाजी महाराजांच्या नावाने आम्ही फक्त मतदानच घेतलेले नाही तर त्यांच्यासाठी जीवाची बलिदाने सुध्दा केलेली आहेत हे सुध्दा आदरणीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी लक्षात घ्यावे.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब अर्थसंकल्पावर आपले विचार व्यक्त करीत असताना त्यांनी काय विचार व्यक्त करावेत हा त्यांचा प्रश्न आहे. महाराजांच्या स्मारकाबद्दल त्यांनी त्यांच्या भावना व्यक्त करणे हेही योग्य आहे. त्या भावना कोणत्या शब्दात व्यक्त करावयाच्या तोही त्यांचा प्रश्न आहे. ते करीत असताना व्यक्तीवर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे .....

किंवा मंत्री महोदयांवर, सरकारवर टीका करणे हाही त्यांचा अधिकार आहे. परंतु एखाद्या समाजाच्या नावाने हिणवून एखाद्या समाजाला बोलणे, केवळ सन्माननीय सदस्य श्री. रमेशराव शेंडगे उभे राहिल्यामुळे आणि ते धनगर समाजाचे असल्यामुळे त्यांना उद्देशून शेळ्या-मेंढ्या असा उल्लेख करुन त्यांचा आणि धनगर समाजाचा अपमान करणे बरोबर नाही. ही बाब निषेधार्ह आहे. ज्येष्ठ सन्माननीय सदस्यांनी असे वक्तव्य करावे त्याचा जेवढा निषेध करावा तेवढा कमी आहे. म्हणून त्यांनी माफी मागावी.

श्री. दिवाकर रावते : मी माफी मागतो. सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांचा एवढा आदर करतो की, मी जाहीरपणे महाराष्ट्राला सांगितले की, हा मेंटेंचा प्रकल्प आहे. सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

श्री. विनायक मेटे : आपण अशा पध्दतीने बोलण्याचे काही कारण नाही.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, खरे तर या सभागृहात अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेचा आजचा दुसरा दिवस आहे. विधानसभेमध्ये अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेला आज सुरुवात झाली. मी माननीय विरोधी पक्ष नेते श्री. एकनाथ खडसे साहेबांचे आणि विरोधी पक्षातील काही प्रमुख सदस्यांचे विचार ऐकण्यासाठी स्वत: उपस्थित होतो. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब आज बोलणार होते. त्यामुळे मी माझ्या राज्यमंत्र्यांना सांगितले की, ज्यावेळी या सभागृहामध्ये सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर असतील, श्री. विनोदजी तावडे असतील, श्री. दिवाकर रावते साहेब असतील किंवा श्री. जयंत प्र. पाटील असतील, हे विरोधी पक्षाचे नेते किंवा गट नेते बोलत असताना मी या सभागृहात उपस्थित राहीन आणि आपण विधानसभेमध्ये उपस्थित राहावे. त्याकरिता मी या सभागृहात उपस्थित झालेलो आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांना एवढीच विनंती आहे की, जरी आपण विरोधी पक्षामध्ये आणि आम्ही सत्ताधारी पक्षामध्ये काम करीत असलो तरी आपल्याला या राज्याच्या विकासाच्या दृष्टीकोनातून जे काही महत्वाचे निर्णय असतील ते घ्यावयाचे आहेत. आम्ही सुध्दा या बाबतीत सकारात्मक आहोत. जो अर्थसंकल्प मांडलेला आहे त्या बाबतीत काही विधायक सूचना करावयाच्या असतील तर त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार .....

जरुर कराव्यात. लोकशाहीमध्ये त्यांचा तो अधिकार आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या संदर्भामध्ये जो काही मुद्दा उपस्थित केला गेला त्याबद्दल राज्याचे प्रमुख या नात्याने माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण साहेबांनी राज्य सरकारची भूमिका या सभागृहामध्ये आणि विधानसभेमध्ये स्पष्टपणे मांडलेली आहे. नक्की काय होणार आहे, कसे होणार आहे, कसा पाठपुरावा होणार आहे, हे सगळे सांगितलेले आहे. त्या विषयाच्या संदर्भात विरोधी पक्षाने चर्चा उपस्थित केली आणि सत्ताधारी पक्षाने उत्तर दिलेले आहे. आता त्या संदर्भात सभागृहामध्ये पुन्हा चर्चा करुन वेळ घेण्यापेक्षा अजून महाराष्ट्रातील बरेच विषय आहेत ते आपण अर्थसंकल्पावरील चर्चेच्या निमित्ताने मांडावेत अशी माझी विनंती आहे. शेवटी काय मांडावयाचे हा अधिकार आपला आहे. त्याबद्दल मी वेगळे काही बोलू इच्छित नाही पण नवीन मुद्दे घ्यावेत म्हणजे आम्हाला त्याबद्दल उत्तर देणे किंवा शासनाची त्याबद्दलची काय भूमिका आहे हे या चर्चेच्या निमित्ताने महाराष्ट्रातील जनतेला सांगणे सोपे जाईल एवढीच माझी विनंती आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय अर्थमंत्र्यांनी मार्गदर्शन केल्याबद्दल त्यांना मनापासून धन्यवाद देतो. मी अर्थसंकल्पावर बोलत असताना महाराजांचा अरबी समुद्रातील पुतळा उभारण्याबाबत काय झाले याचे फक्त वर्णन केले.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

अर्थसंकल्पात त्याबाबत तरतूद केलेली नाही. शिवाजी महाराजांचे अरबी समुद्रात स्मारक उभे केले जाणार आहे त्यासाठी या वर्षाच्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली नाही हे सांगत असताना स्मारकासंबंधी यापूर्वी काय घडले होते त्याचे वर्णन केले आहे. ही तरतूद करण्यात यावी असा माझा आग्रह आहे. ज्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी आम्हाला मार्गदर्शन करीत असताना हे स्मारक होणारच असे सांगितले त्यावेळी आम्हा सगळयांना आनंद झाला. सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांनी विधायक मत जाहीर केले होते. ते स्मारक कसे होईल याची चिंता व्यक्त केली होती. त्याला छेद देत माननीय मुख्यमंत्र्यांनी हे स्मारक होणार आहे असे सांगितले होते. त्यावेळी आम्हाला आनंद झाला होता.

मलेशियाच्या सल्लागारांनी सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांना माहिती दिली, दोन्ही सभागृहात माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यावेळी झालेल्या चर्चेला उत्तर दिले होते. पुढील 5 वर्षामध्ये हे स्मारक होणार असेल तर त्यासाठी तरतूद करणे आवश्यक होते. या स्मारकासाठी 300 कोटींची तरतूद करावी असे मी म्हणणार नाही. परंतु 2 कोटी किंवा 5 कोटींची तरतूद करावयास पाहिजे होती. 1 लाख रुपयांची तरतूद करुन या कामासाठी लेखाशीर्ष निर्माण करावयाचे होते. ती तरतूद अर्थसंकल्पात केलेली नाही असे मी सांगत होतो. आपल्याला आई वाढविते तेव्हा आपण आईला असे म्हणतो की आई, तू माझे किती लाड करतेस ? आपण जसजसे मोठे होत जातो तसतशी आईने आपल्यासाठी घेतलेल्या कष्टाची जाण होत असते. त्यावेळी आपण तिला सांगतो की, आई, मी तुला कधीही विसरणार नाही, तू मला खूप मोठे केले आहेस. आपण आपल्या कामात गुंतल्यामुळे आपल्याला कोणी तरी सांगतो की, अरे, जरा आईकडे बघ ना. त्यावेळी आपण तिला सांगतो की, आई, मी तुझ्या वाढदिवसाला एक साडी आणीन, आनंदाने आणीन, तुझा वाढदिवस साजरा करीन. तुझ्यामुळे मी एवढा मोठा झालो. पण मला कामामुळे विसर पडतो. त्यामुळे पुन्हा तो माणूस सांगतो की, काय रे आईला फसवितो काय, त्यावर मी त्याला म्हणतो की, आईला मी कसा काय फसवीन ? गेल्या वर्षी मी तुला कबूल केले होते, पण या वर्षी नक्की भरजरी साडी आणून देईन. तिच्यामुळे मी मोठा झालो आहे. त्यामुळे मी तिचे कौतुक करीत असतो.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

सभापती महोदय, मी या ठिकाणी दिवाकर रावते म्हणून उभा राहिलेलो नाही. मी शिवसेनेचा नेता आहे. शिवसेनाप्रमुखांच्या आशीर्वादामुळे मी येथे आलेलो आहे. तेव्हा त्यांच्या पक्षाला अभिप्रेत असलेल्या धोरणानुसार व त्यांना अभिप्रेत असलेल्या विचारातून माझी मते मांडावीत. मते मांडत असताना व्यक्तिगत थोडी असावीत.

सभापती महोदय, ज्या माय मराठीमुळे हे राज्य निर्माण झाले, त्या माय मराठीकरिता माननीय अर्थ राज्यमंत्र्यांनी मराठीच्या विकासासाठी 15 कोटींची तरतूद केल्याचे जाहीर केले तेव्हा सर्वांनी बाके वाजविली होती. त्याचा मलाही आनंद झाला होता. पण त्यावेळी सर्वांनी माझ्या नावाचा उल्लेख केला होता. जणू काही ती तरतूद माझ्यासाठीच केली आहे इतक्या उत्स्फूर्तपणे माझा उल्लेख केला होता. तो ऐकून मला बरे वाटले होते. या सदनातील सर्व सन्माननीय सदस्य हे माझ्या भावनेशी एकरुप होऊन मला सन्मान दिला, पण हे सांगता सांगता मला सर्व सन्माननीय सदस्यांचा अभिमान वाटतो, आनंद वाटतो की, या महाराष्ट्राच्या मातीमध्ये मराठी म्हटल्यानंतर बोट फक्त शिवसेनेकडे जाते, शिवसेनेच्या विचारांकडे जाते. शिवसेना म्हणजे मराठी हे काल तुम्ही सर्वांनी उत्स्फूर्तपणे दाखवून दिले आहे. त्याबद्दल मी सर्वांचे आभार मानतो.

सभापती महोदय, मी मघाशी सांगत होतो की, आई मी तुला गेल्या वर्षी साडी घेण्यासाठी विसरलो पण या वर्षी तुला साडी घेण्याचे मी भान ठेवीन. गेल्या वर्षी 10 कोटींची तरतूद केली होती, त्यापैकी 1 कोटीची सुध्दा कामे झालेली नाहीत. आमच्या मराठवाड्यातील श्री.चपळगावकर विश्वकोष मंडळामध्ये काम करीत होते. त्यांचा आम्हाला अभिमान वाटत होता. पण त्यांनी त्यांच्या पदाचा राजीनामा दिला. शासनाने आता ती दोन मंडळे एकत्र आणलेली आहेत. विश्वकोषाचे होणारे काम आकुंचित करुन टाकले आहे. आम्ही कोणत्याही पक्षाचे असलो तरी माझे मित्र नाट्य संमेलनाचे अध्यक्ष सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले हे मान्य करतील. गेल्या वर्षीचे 10 कोटी रुपये खर्च झालेले नसताना या वर्षी 15 कोटी रुपयांची तरतूद केल्याचा आनंद मानत असताना कशासाठी बाके वाजविली जात आहेत याबाबत अंतर्मुख करणारा विचार कालच्या अर्थसंकल्पात मराठीबद्दल होता.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

तेराव्या वित्त आयोगामध्ये न्याय प्रक्रियेत सुधारणा करण्यासाठी अनुदान म्हणून 108.53 कोटी इतक्या प्राप्त झालेल्या निधीपैकी शासनाने फक्त 4.62 कोटी रुपये खर्च केले. भाषेसाठी आलेले पैसे परत पाठविले, हा कर्मदरिद्रीपणा आपल्या मातेविषयी, आपल्या मातृभाषेविषयी राज्यकर्ते दाखवित असताना मराठीकरिता बाके वाजवित असताना आपल्याला कोणता आनंद मिळू शकतो असा प्रश्न पडतो. मग पुन्हा त्याच त्वेषाने मला मराठी भाषेकरिता लढावे लागणार आहे. हे मला अर्थसंकल्पात प्रत्यक्षात केलेल्या तरतुदीमुळे अनुभवयास मिळत आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

सभापती महोदय, मी कृषी विषयावर माझे काही मुद्दे मांडणार आहे. पण त्याच बरोबर दोन-चार गोष्टी शासनाला आवर्जून सांगणे मला भाग आहे. माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार हे फार रोमँटिक आहेत. त्यांनी कोणत्या गोष्टी स्वस्त केल्या हे मी पहात होतो. वृत्तपत्रवाले देखील काही गोष्टी फार कौतुकाने लिहितात. या अर्थसंकल्पामध्ये वेणी बांधायची रिबीन स्वस्त केली आणि काजळ स्वस्त केले आहे.. डोळे हे जुलमी गडे... अर्थसंकल्पामध्ये या गोष्टी असल्या तरी त्या चर्चेत असता कामा नयेत.

हा अर्थसंकल्प मांडताना मंत्री महोदयांनी सांगितले की, आपण एकमेक महाराष्ट्राच्या विकासाकरिता बोलूया. आमच्या काही उणिवा असतील तर त्या तुम्ही सांगा. त्यांनी केलेल्या वक्तव्या बद्दल मला आनंद झाला. सरकारची हीच भूमिका असली पाहिजे की, महाराष्ट्राच्या विकासाकरिता आपण एकत्र झगडले पाहिजे, भांडले पाहिजे. पण या सदनामध्ये आम्हाला काय करावे लागते ? आदर्श घोटाळा, तेलगी घोटाळा, मुंबई एज्युकेशन ट्रस्टचा 178 कोटीचा घोटाळा, अनुसूचित जमातीच्या सहकारी औद्योगिक संस्थेमधील 375 कोटीचा घोटाळा, आदिवासी आश्रमशाळेतील अन्न खरेदीचा 60 कोटीचा घोटाळा, शासनाच्या एसआरअे मधील 10 कोटीचा घोटाळा, एचडीआयएलचा 5 हजार कोटीचा भूखंड घोटाळा, बीकेसीचा भूखंड घोटाळा,गायरान जमीन घोटाळा, पुणे भूखंडाचा अडीच हजार कोटीचा घोटाळा, सिडको भूखंड घोटाळा, लवासा भूखंड घोटाळा, वाशी भूखंड घोटाळा, रमाबाई भूखंडाचा 250 कोटीचा घोटाळा, ओशिवरे भूखंडाचा 150 कोटीचा घोटाळा, म्हाडा सोडत भूखंड घोटाळा, कल्पतरु भूखंड घोटाळा, महाबळेश्वर भूखंड घोटाळा, चणाडाळ घोटाळा, पुण्याची मेघासिटी रद्द करण्याचा घोटाळा, वैद्यकीय साहित्याचा घोटाळा, शालेय पोषण आहार घोटाळा, कृष्णा-खोरे रोखे खरेदीचा घोटाळा, शेतकरी आत्महत्येच्या पॅकेज मधील घोटाळा आणि न्यायसागर सोसायटीचा घोटाळा. गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये एवढ्या सर्व घोटाळ्याची चर्चा या सदनामध्ये झाली. महाराष्ट्राचा विकास खुंटला. या सर्व घोटाळयांनी भरलेला अर्थसंकल्प आमच्या पुढे आला. घोटाळयांनी भरलेल्या अर्थसंकल्पाच्या संदर्भात या सदनामध्ये चर्चा करावी लागत असताना आम्ही राज्याच्या कोणत्या विकासाच्या संदर्भात बोलायचे असा प्रश्न आम्हाला पडतो. मंत्री महोदयांची आणि आमची विकासात्मक चर्चा करण्याची

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

कितीही इच्छा असली तरी बाहेर पडलेले हे घोटाळे महाशासन बुडवित आहेत. यातून बाहेर पडण्यासाठी आपण एकत्रितपणे काय करणार आहोत असा प्रश्न यामधून निर्माण होतो.

सभापती महोदय, कर वसुलीच्या संदर्भात या ठिकाणी चांगले मार्गदर्शन करण्यात आले. त्यावर जास्त काही बोलावे अशातला भाग नाही. तरी सुध्दा 4110 कोटी इतका कर गेल्या चार वर्षापासून वसूल करायचा राहिलेला आहे. हा मंत्री महोदयांचा आणि माझा विषय नाही. याबाबतीत मंत्री महोदय नियंत्रण करु शकतात. ही वसुली करण्यामध्ये अधिकारी कुठे अपयशी ठरत आहेते हे आपण पाहिले पाहिजे. हे सगळे व्यापारी बेलआऊट पॅकेजची वाट पहात आहेत. राज्याची तिजोरी भरण्यासाठी वसुली झाली पाहिजे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी कर्जासंबंधीचा मुद्दा येथे मांडला. हे कर्ज घेणे कसे आवश्यक आहे हे सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी सांगितले. कर्ज उगाच घेतलेले आहे असे आम्ही म्हणत नाही. हे जे कर्ज शासनाने घेतलेले आहे ते कशासाठी घेतलेले आहे यासंबंधीची एक श्वेतपत्रिका शासनाने काढावी अशी गेल्या पाच वर्षापासून आम्ही सातत्याने मागणी करीत आहोत. मला आठवते की जेव्हा युती शासनाने कर्ज घेतले होते त्यावेळी विरोधी पक्षात बसलेले सर्व सन्माननीय सदस्य कर्जा संबंधी बोलत होते. त्यानंतरच्या शासनातील वित्त मंत्री श्री. जयंत पाटील यांनी सांगितले की, युती शासनाने घेतलेल्या कर्जाची श्वेतपत्रिका काढण्यात येईल आणि ती श्वेतपत्रिका त्यांनी काढली. त्यांना त्यामध्ये कुठे घोटाळा सापडला नाही. राज्याच्या विकासासाठी घेतलेले ते कर्ज होते.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. विनायक मेटे)

...नंतर श्री. गिते...

असुधारित मत / शोधनासाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

माननीय श्री. अरुणभाई ते विकास कामासाठी घेतलेले कर्ज होते. माननीय श्री. अरुणभाई तुमचा जो मुद्दा आहे, तोच माझा मुद्दा आहे. माझ्याकडे देखील कर्जाची संपूर्णपणे आकडेवारी उपलब्ध आहे, परंतु ती वाचून मी सभागृहाचा वेळ घेणार नाही. 2 लक्ष 26 हजार कोटी रुपये एवढा कर्जाचा आकडा आहे. त्या कर्जाच्या आकडेवारी संदर्भात राज्य शासनाने श्वेतपत्रिका काढावी. महाराष्ट्रातील जनतेला कळले पाहिजे की, महाराष्ट्राने घेतलेल्या कर्जातील किती रक्कम विकासासाठी वापरली गेली. कर्ज फेडीसाठी किती रक्कम दिली गेली. व्याज फेडीसाठी किती रक्कम गेली. ही संपूर्ण माहिती जनतेला कळली पाहिजे. तुम्ही उगाच कर्ज घेतले असे आम्ही तुमच्यावर आक्षेप किंवा आरोप करीत नाही.

महोदय,त्या दिवशी माननीय वित्त मंत्री म्हणाले की, या सरकारने 2005 पासून ओव्हर ड्रॉफ्ट घेतलेला नाही. चांगली परिस्थिती आहे. राज्य सुदृढ म्हणता येणार नाही, परंतु तिजोरीत खडखडाट आहे ही वस्तुस्थिती आहे. सन्माननीय श्री. जयंत पाटील हे वित्त मंत्री होते, त्यांच्या कार्यकाळात पाच-पाच, सहा-सहा वेळा ओव्हर ड्राफ्ट काढला गेला आहे. त्यांनी बऱ्याच वेळा ओव्हर ड्राफ्ट काढले होते ही गोष्ट मला चांगली आठवते आहे. त्यावर आम्ही टीका करावयाचो. परंतु हा अर्थसंकल्प पाहिल्यानंतर तो किती योग्य आहे आणि अयोग्य आहे यावर मी टिप्पणी करु इच्छित नाही. अर्थसंकल्प हा निर्धारित असला पाहिजे होता, तसा अर्थसंकल्प तुम्ही करुन दाखवाल अशी अपेक्षा होती. माननीय श्री. अजितदादा पवार हा तुमचा अर्थसंकल्प आहे असे मला तरी वाटत नाही. या अर्थसंकल्पात फक्त एकाच गोष्टीचा उल्लेख जास्त प्रमाणात केला आहे तो उल्लेख म्हणजे आम्ही तरतूद करणार आहोत. त्या करिता तरतूद करण्यात येईल, या करिता निधी उपलबब्ध करुन देण्यात येईल. परंतु कोणत्याही योजनेसाठी वा कामासाठी ठोस अशी तरतूद अर्थसंकल्पात केलेली आम्हाला दिसून येत नाही.

सभापती महोदय, काल माननीय उद्योग मंत्र्यांवर आमचे सन्माननीय सदस्य श्री. उपरकर यांनी टीका केली. मंत्र्यांनी टीका सहन केली पाहिजे. सभागृहात काही व्यक्तीवर टीका करण्यात येत नाही. सभागृहात केलेल्या टीकेचा देखील माननीय मंत्र्यांना राग येतो हे बरोबर नाही. माननीय मुख्यमंत्री असे मला म्हणाले की, टीका करताना पुरावे द्यावे लागतात. कसले पुरावे मागता

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

आहात? माननीय मुख्यमंत्र्यांचा भाषणात जो उल्लेख होता तो मी वाचून दाखविला होता. त्यात पुरावे कसले मागता आहात. पुरावे मागितल्यानंतर माझ्या सारख्या माणसाला वाटते की, काही पुरावे सादर केले पाहिजेत. एक गोष्ट नक्की आहे की, आपण आपल्या अधिकाऱ्यांना सांगा. सदस्यांना महाराष्ट्राचा आर्थिक अहवाल हा आदल्या दिवशी वितरित केला जातो. आर्थिक अहवाल हे एक दडपण असते. आपल्या राज्याची आर्थिक परिस्थिती काय आहे आणि त्या परिस्थितीला अनुसरुनच अर्थसंकल्प तयार केला गेला पाहिजे, ही त्यामागची भूमिका असते. त्यात ज्या उणिवा असतात, त्यावर सरकार कशी मात करणार आहे याबाबतचा उल्लेख अर्थसंकल्पात असावयास पाहिजे. महाराष्ट्राची आर्थिक परिस्थिती काय आहे आणि त्यात कोणत्या उणिवा आहेत या गोष्टी जाणून घेण्यासाठी सदस्यांना तो आर्थिक अहवाल वितरित केला जातो. परंतु तुमच्या अधिकाऱ्यांनी अर्थसंकल्प तयार करताना काहीही नोंद घेतलेली नाही. माननीय वित्तमंत्र्यांत इच्छाशक्ती निर्माण व्हावी यासाठी काही बाबी ठळकपणे त्यांच्यासमोर अधिकाऱ्यांनी मांडल्या पाहिजेत. आमच्या विभागातील कामांचा समावेश का केला नाही, त्यासाठी तरतूद का केली नाही यासाठी माननीय वित्तमंत्र्यांकडे सगळे मंत्री जाऊन का भांडत नाहीत या गोष्टीचे मला आश्चर्य वाटते.नीटनेटके पणा आणण्यासाठी दर्पण असतो. व्यवस्थित दिसण्यासाठी दर्पणाची या जगात निर्मिती झालेली आहे. दर्पण दाखविल्यानंतर व्यवस्थित का दिसत नाही हा संशोधनाचा विषय आहे.

महोदय, माननीय श्री. राणे साहेब समोर आले. ते उद्योग मंत्री आहेत. ते सांगावयास लागले की, मला पुरावा द्या. आर्थिक अहवालात उद्योग विभागाची परिस्थिती दाखविली गेली आहे ते त्यांचे दर्पण आहे. मजुरांची प्रस्तावित संख्या 17207 आहे. गुजरातचे नाव घेतल्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांना राग आला. जगामध्ये जे जे चांगले असेल ते आपण स्वीकारावे, आपले जे चांगले असेल ते दुसऱ्याला देण्यासाठी मार्गदर्शन करावे ही देशाच्या उन्नतीची भूमिका असू शकते. गुजरातचे नाव घेतल्यानंतर राग कशाला पाहिजे. गुजरातपेक्षा महाराष्ट्रात औद्योगिक संस्था जास्त आहेत, परंतु गुंतवणूक मात्र कमी आहे हा खरा महत्वाचा मुद्दा आहे. गुजरातमध्ये 11308 एवढयाच औद्योगिक संस्था आहेत. आपल्याकडे होणारी गुंतवणूक 8 लाख 74 हजार 53 कोटी एवढीच आहे. गुजरातमध्ये होणा-या गुंतवणूकीपेक्षा 10 लाख 39 हजार 508 कोटीने ती कमी

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

आहे. गुजरातची लोकसंख्या महाराष्ट्रातील लोकसंख्येपेक्षा अर्धी आहे.तसेच औद्योगिक संस्था कमी असताना देखील त्यांची गुंतवणुक 10 लाख 39 हजार 508 कोटीने जास्त आहे. उद्योग मंत्र्यांना कोणता पुरावा पाहिजे होता. तुमच्याच सरकारने दिलेला पुरवा तुम्हाला देतो आहे. गेल्या वर्षाच्या आर्थिक पाहणी अहवालामध्ये मजूर क्षेत्राची संख्या 143 आणि गुंतवणूक 1 लाख 48 हजार 997 कोटी व आधुनिक क्षेत्राची संख्या 63 दाखविण्यात आली होती. याचा अर्थ गेल्या वर्षभरात 52959 कोटी रुपयांचे आधुनिक क्षेत्राचे मंजूर झालेले प्रस्ताव मागे घेतले गेले.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

प्रस्ताव आले, प्रस्ताव आले आणि ते मागे घेतले गेले. 52,958 कोटी रुपयांचे प्रस्ताव मागे घेतले गेले. त्यामुळे 11.22 लाख रोजगाराचे नुकसान झाले. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात असा उल्लेख आहे की, 25 लाख रोजगार निर्माण होतील. उलट आर्थिक पाहणीमध्ये 11.22 लाख रोजगार कमी झाल्याचे नमूद केले आहे. इतकेच नव्हे तर गेल्या वर्षी एकही नवीन क्षेत्र अधिसूचित झालेले नाही. माननीय अर्थमंत्र्यांना मी म्हटले की, तुम्ही निरुद्योगी मंत्री आहात असे माननीय मुख्यमंत्र्यांच्या बोलण्यातून वाटले. यामुळे उद्योगमंत्र्यांना राग आला. आता निरुद्योगी असल्याचेच यावरुन सिध्द होते. गेल्या वर्षभरात एकही नवीन क्षेत्र अधिसूचित झाले नाही.

सभापती महोदय, अर्थसंकल्पात 25 प्रस्ताव अधिसूचित न झाल्याने व मागे घेतल्याने राज्याची 18835 कोटीची गुंतवणूक व 2.70 लाख रोजगाराची हानी झाली आहे. असे उद्योग क्षेत्राचे विदारक चित्र आहे. याबद्दल आम्ही बोललो असता पुरावे द्या असे उद्योगमंत्र्यांनी सांगितले. म्हणून मी आपल्या सर्वांच्या साक्षीने उद्योगमंत्र्यांच्या प्रखर उद्योगाविषयी साक्ष दिली आहे. माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी राग मानू नये. मी स्वत:चे काहीही सांगितलेले नाही. जे काही सांगितले ते शासनानेच प्रकाशित केलेले आहे.

सभापती महोदय, शिक्षण हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. मला काल अतिशय दु:ख झाले. स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने 100 कोटी रुपयांची तरतूद करुन त्यांना अभिप्रेत असलेले प्रकल्प राबविण्याचे ठरविले आहे. मला त्यांच्या पहिल्या भाषणाची आठवण झाली. त्यांनी स्पष्टपणे सांगितले, हे राज्य मराठ्यांचे नसून मराठीचे राज्य आहे. आता स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने आम्हाला सदनामध्ये काय ऐकावे लागत आहे? मंत्री महोदयांनी उभे राहून सांगितले की, 28 मराठी शाळांना त्या बंद करण्याची आम्ही नोटीस दिली आहे. महाराष्ट्र राज्यात इंग्रजी शाळा तुमच्या छाताडावर नाचतात आणि मराठी शाळा काढली त्यांना तुम्ही दरोडेखोर, चोर ठरवित आहात. मराठी शाळा काढल्यामुळे सर्व ठिकाणी लुटालूट चालली आहे अशी अवस्था झाली आहे काय? राज्यामध्ये इंग्रजी शाळांची मिजास वाढत चालली असून मराठी शाळांच्या संचालकांना हातकड्या घालून तुरुंगात पाठविणार असे सभागृहात सांगितले जाते तेव्हा आमची मान शरमेने खाली जाते. न्यायालयाचे कामकाज मराठीतून होणार नसेल, दिलेला निधी परत जाणार असेल, मराठी शाळांच्या संस्थापकांना

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

हातकड्या घालून तुरुंगात पाठविणार, 28 शाळांना नोटीस दिली हे सभागृहात सांगितले जाते. अत्यंत दुर्दैवी अशी ही बाब आहे. म्हणून शिक्षणाच्या बाबतीत मी त्यांना विचारले तेव्हा ते बोलले की, हे करावेच लागेल. त्याला इलाज नाही. शिक्षणाच्या बाबतीत एवढी गंभीर परिस्थिती झालेली आहे.

सभापती महोदय, सर्व शिक्षा अभियान योजनेंतर्गत प्राथमिक शाळांची संख्या 2011-12 मध्ये 49983 इतकी वाढली असली तरी पटसंख्या मात्र 70 हजाराने कमी झाली आहे. शिक्षणमंत्री यांनी मराठी शाळांच्या संचालकांना बेड्या ठोकण्यापेक्षा 70 हजार विद्यार्थी कमी का झाले, त्यासाठी योजना आखावी. त्यासाठी सामर्थ्य दाखवावे. शिक्षकांचे आणि पालकांचे मेळावे घ्यावेत. आम्ही ज्याप्रमाणे कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी गावागावात फिरतो, त्या प्रमाणे मंत्री महोदयांनी मराठी विद्यार्थी संख्या वाढण्यासाठी गावोगावी फिरावे. 70 हजार विद्यार्थी कमी झाले ही बाब या सभागृहात मांडायची नाही? त्यांचा नाकर्तेपणा मांडायचा नाही? आता तरुण पिढीचे नुकसान होत आहे. ती तरुण पिढी अशिक्षित होते तेव्हा महाराष्ट्रामध्ये तुम्ही समाजाला कोणत्या तोंडाने सामोरे जाणार?

सभापती महोदय, राष्ट्रीय शैक्षणिक योजना आणि प्रशासन विश्व विद्यालय अंतर्गत 2011 मध्ये राज्यात 28253 खाजगी शाळा आहेत. आर्थिकदृष्ट्या कमकुवत असणे ही सर्वात चिंतेची बाब आहे. माननीय सदस्य श्री.विक्रम काळे हे शिक्षण संस्था चालवितात. त्यांनी या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांचा सन्मान करावा. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना 2011-2012 मध्ये मोफत शिक्षण दिले गेले. या योजनेतील लाभार्थ्यांची संख्या मागील तीन वर्षाच्या तुलनेत मोठया प्रमाणात घटली आहे.

नंतर श्री.खर्चे...

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

ही चिंतेची बाब आहे.

महोदय, सन 2007 ते 2010 या तीन वर्षात अनुक्रमे 3.83 लाख, 3.80 लाख आणि 3.11 लाख विद्यार्थी या योजनेचा लाभ घेत होते. ही संख्या सन 2010-11 मध्ये फक्त 2 लाखावर आली. आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील सहभागाला उत्तेजन देण्यासाठी सन 2009-10 मध्ये 2.11 लाख मुलांच्या तुलनेत फक्त 35 हजार रुपये खर्च करण्यात आला ही बाब शिक्षणाच्या बाबतीत चिंतनीय आहे. याचाच अर्थ असा होतो की, दुर्दैवाने फक्त श्रीमंत आणि मध्यमवर्गातील मुलेच शिकत आहेत आणि दुर्बलांमध्ये अशिक्षितांचे प्रमाण वाढत आहे. म्हणून शासनाला समाजातील शिक्षणाची व सामाजिक विषमता जी निर्माण होत आहे तो प्रश्न भविष्याच्या दृष्टीने जास्त विदारक आहे. आपण शिक्षणाच्या बाबतीत कितीही वल्गना केल्या तरी शिक्षणाचे हे असमान प्रमाण पाहिले तर विकास बाजूलाच राहतो, समाज मोठा कसा होईल याचीच चिंता निर्माण होते हे विसरुन चालणार नाही. राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या माध्यमातून दरवर्षी 1,56,523 विद्यार्थी प्रशिक्षित होऊन बाहेर पडतात त्यांच्यासाठी शासन नोकऱ्या उपलब्ध करुन देऊ शकत नाही व त्याचा परिणाम म्हणून राज्यात प्रशिक्षित आणि सुशिक्षित बेरोजगारांची संख्या लक्षणीय वाढत आहे. डिसेंबर, 2011 पर्यंत 2 लाख प्रशिक्षित विद्यार्थी अशा औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून बाहेर पडले त्यांना नोकऱ्या कोठून देणार हा खरा प्रश्न आहे. तिकडे मात्र राज्याचे उद्योग मंत्री बाहेर बेरोजगारांचे मेळावे घेतात, गिनीज बुकात नोंद होईल असा प्रयत्न होतो परंतु दुसरीकडे अशा मोठ्या संख्येने प्रशिक्षित विद्यार्थी बेकार म्हणून फिरतात ही विसंगती कशी दूर करणार याचे स्पष्टीकरण झाले पाहिजे. शासनाने सांगितले की, 27 शाळांच्या संचालकांना बेड्या ठोकण्यात येतील. पण हे करण्यापेक्षा जे शिक्षीत होऊन बाहेर पडले त्यांच्यासाठी नोकरीची व्यवस्था केली तर अधिक बरे होईल.

महोदय, मी आता शेतीसारख्या छोट्या विषयाकडे वळणार आहे. शेतीला छोटा व्यवसाय म्हणण्याचे कारण म्हणजे शासनाने या शेतीच्या धंद्याला छोटेच बनविलेले आहे. राज्यात सिंचनासाठी शासनाने लघु पाटबंधारे करिता फक्त 80 कोटीची तरतूद केली आहे तर कोरडवाहू शेतीसाठी 200 कोटीचीच तरतूद केली. राज्यात यावर्षी 18 हजार विहिरी आणि 3 हजार शेततळी घेण्याचे उद्दिष्ट ठरविले आहे. काल भाषण करताना सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

यांनी सांगितले की राज्यात सरकार एक लाख शेततळी घेण्याची फक्त घोषणा करते. ही गोष्ट खरी आहे, कारण हे प्रमाण फक्त तीन हजारावर आले आहे. थकबाकीदार शेतकऱ्यांना कर्ज माफी हा विषय या शासनाचाच असून अशा पाच-सात बाबी या शासनाने घेतलेल्या आहेत. हा विषय कृषी विभागाचा असून आपल्या विभागाकडून त्यासाठी किती रक्कम काढून घ्यावयाची यासाठी त्या त्या विभागाची क्षमता असली पाहिजे आणि ती त्यांच्यामध्ये आहे की नाही हे मला माहीत नाही. वित्त पुरवठ्याच्या बाबतीत राज्यातील एकूण 68.9 टक्के कुटुंबांना फक्त बँकेची सेवा मिळते तर उर्वरित शेतकऱ्यांना सावकाराकडेच जावे लागते, त्याशिवाय दुसरा पर्याय नाही अशी परिस्थिती सध्या राज्यात निर्माण झाली आहे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी हा विषय सभागृहात काढला होता म्हणून मी त्यावर जास्त बोलणार नाही. पण 5 टक्क्याच्या बाबतीत मात्र जरुर सांगणार आहे.

महोदय, कापूस आणि सोयाबीनच्या माध्यमातून 5 टक्के रक्कम काढून घ्यावयाची हा प्रकार म्हणजे एका हाताने द्यायचे आणि दुसऱ्या हाताने काढून घ्यावयाचे असा आहे. यासंबंधी वसूल करावयाचा परतावा वगैरे हा नंतरचा प्रश्न आहे. या राज्यात कापसाच्या 60 लाख गाठी तयार होतात त्याच्या 5 टक्के प्रमाणे किती कर बसणार आहे, तसेच 32 लाख मे.टन सोयाबीनचे उत्पादन मागील वर्षी झाले होते, हे प्रमाण अवेळी पावसाने घटले होते आणि त्याची नुकसान भरपाई सुध्दा शासनाने दिलेली आहे. सोयाबीनचा भाव 2000 रुपये प्रति क्विंटलप्रमाणे धरला तर त्याच्या 5 टक्के कर वसूल करणार म्हणूनच एका बाजूने देणार आणि दुसऱ्या बाजूने शासन काढून घेणार असे मी म्हणालो. यासंदर्भात काँग्रेस पक्षाचे काय करावयाचे ते राष्ट्रवादी आणि काँग्रेसवाले पाहून घेतील. त्यावर माननीय मुख्यमंत्र्यांनी घेतलेली भूमिका मला अत्यंत आवडली. सर्वधर्म समभाव आपण म्हणतो तसे सरकारमध्ये सुध्दा सारखेपणा असला पाहिजे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

सभापती महोदय, वॅट वाढल्यामुळे सरकारच्या तिजोरीमध्ये पैशाचा ओघ वाढणारच आहे त्यामुळे गॅसची आताची तुम्ही जी दरवाढ केलेली आहे तिची वाढ त्या वाढीपुढे किरकोळ असणार आहे. गॅसच्या दरवाढीचे मी समर्थन करीत नाही. त्यामुळे यासंदर्भात तुम्ही जो काही निर्णय घ्याल तो आम्ही स्वीकारू नाही तर आंदोलन करण्यास आम्ही तयारच आहोत. कापूस आणि सोयाबीनवर जो कर लावलेला आहे त्याबाबत माननीय अर्थमंत्र्यांनी अवश्य विचार करण्याची आवश्यकता आहे. एका बाजूला शेतक-यांना 2 हजार कोटी रुपयांचे पॅकेज देऊन अशा पध्दतीने शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईचा आदर व्यक्त करणार असाल तर सोयाबीन व कापसावर कर लावून आनंद व्यक्त होता कामा नये अशी माझी आपल्याला नम्र विनंती आहे.

सभापती महोदय, आदरणीय श्री. शरद पवार साहेब शेतक-यांच्या संदर्भात प्रयत्न करीत असतात. कापसाच्या संदर्भात माननीय पवार साहेबांनी तातडीने प्रतिक्रिया दिली होती. कधी नव्हे ते माननीय पंतप्रधानांना तातडीने जाऊन भेटले व एक्सपोर्ट तातडीने सुरु करण्यात येईल अशी आठ दिवसात घोषणा झाली परंतु आठ दिवसात कापसाचे भाव कोसळल्यामुळे शेतकरी अडचणीत आला तरी आपण ते सहन करुन माननीय पवार साहेबांच्या घोषणेचे स्वागत केले. परंतु कापसाच्या एक्सपोर्टमध्ये एवढया अटी टाकल्या की, कापूस एक्सपोर्ट होऊच शकला नाही. कापूस एक्सपोर्ट होऊ नये व महाराष्ट्रात माननीय पवार साहेबांवर टीका व्हावी यासाठी कापसाच्या एक्सपोर्टवर अटी टाकण्यात आल्यामुळे कापसाची निर्यात खुली होऊन सुध्दा एकही गाठ निर्यात होणार नाही यासाठी पाचर मारुन ठेवली असे मला वाटते. आदरणीय शरद पवार साहेबांनी केलेल्या प्रयत्नावर केंद्राने पाणी टाकलेले आहे. त्यामुळे महाराष्ट्रात माननीय शरद पवार साहेबांचा अपमान केलेला चालत नाही असे आपण काही तरी करुन दाखवले पाहिजे.

सभापती महोदय, मी आता कृषीवर माझे विचार व्यक्त करणार आहे. कृषी कर्जाच्या संदर्भात पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेने मराठवाडा आणि विदर्भाला दुजाभावाची वागणूक देण्यात आलेली आहे. परंतु प्रत्येक वेळेस दुजाभाव का केला जातो हे मला तरी समजत नाही. पश्चिम महाराष्ट्राला जास्त कर्ज का देता असे मला म्हणावयाचे नाही, तर जेथे गरज आहे तेथे ती पुरवली गेली पाहिजे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

असे माझे स्वत:चे मत आहे. अनुशेष, अनुशेष म्हणून आम्ही सतत सांगत रहायचे असे होता कामा नये. सन 2011-2012 या वर्षात पश्चिम महाराष्ट्राला पीक कर्ज म्हणून 7854 कोटी रुपये दिले गेले तर विदर्भाला केवळ 1823 कोटी रुपये व मराठवाडयाला 4700 कोटी रुपये दिले गेले. पीक कर्जाची विषमता कशामुळे होते याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. पश्चिम महाराष्ट्रात द्राक्ष बागा , फळ बागा असल्यामुळे तेथे जास्त कर्ज घेतले जात असेल हे मी नाकारू शकत नाही. परंतु मराठवाडा आणि विदर्भातील शेतक-यांना पीक कर्ज मिळत नाही म्हणून त्याला खाजगी सावकाराकडून पैसे घ्यावे लागत असेल व तिकडच्या फळबागा फुलवतांना त्याचा बोजा आमच्यावर पडत असेल तर ते योग्य होणार नाही.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

मी येथे एक महत्त्वाचा विषय मांडणार आहे. सामान्य शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. तो प्रश्न म्हणते भूविकास बँकेचा. विदर्भ, मराठवाडा, खानदेश, कोकण येथील भूविकास बँका बंद आहेत. आता फक्त वसुली सुरू आहे. आजही लोकांच्या घरावर टाच आणली जात आहे. एक लाखाचे कर्ज आता वाढत वाढत 8 लाखाचे झालेले आहे. त्यामुळे भलतेच निर्माण झालेले आहे. आपल्याकडे भूविकास बँकांसंबंधीचा अहवाल आलेला आहे. त्यात काही शिफारशी देखील आहेत. भूविकास बँकेच्या कर्जफेडीसाठी शासनाने 896.52 कोटी शॉर्ट लोन देण्यात यावे अशा प्रकारचा अहवाल आलेला आहे. 589 कोटी रूपयाची वेगवेगळी रक्कम आहे. आपण त्याला जर 245 कोटीचे पॅकेज दिले तर ग्रामीण भागातील संपूर्ण गरीब शेतकऱ्याला त्याच फायदा होईल. 50 कोटी आज आपण राज्य सहाकरी बँकेला दिले. त्या बँकेची व्हॅलिडिटी रहावी म्हणून दिलेले आहेत. ती बँक जगली पाहिजे. कारण त्या बँकेने अनेक बँकांना सांभाळलेले आहे. आमचे कारखाने सांभाळलेले आहेत. त्यामुळे फार मोठा प्रश्न नाही. ते दिले आहे की नाही हा वेगळा भाग आहे. ती बँक आपण जनतेच्या पैशातून सांभाळत असाल तर माझे काहीही म्हणणे नाही. भूविकास बँक ही अत्यंत सामान्यातल्या सामान्य गरीब माणसाची आहे. या बँकेला वाचविण्यासाठी आपण अर्थसंकल्पातून 245 कोटीची मदत केली तर बरे होईल. असे केले तर भूविकास बँका पुन्हा सुरू होतील. आपण 6 टक्केची अट घातली आहे. ते सांभाळून सगळे चालले आहे. तेव्हा गरिबातील गरीब शेतकऱ्यांकरिता करावे अशा प्रकारची विनंती मी करतो.

सभापती महोदय, सिंचनावर बोलण्यासाठी खूप आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी सिंचनाचा विषय मांडला आहे. सिंचनावर 70 हजार कोटी रूपये खर्च करून 0.1 टक्के सिंचन निर्माण केले असेल तर हा चिंतनाचा भाग आहे. मी तर अर्थ खात्याच्या अधिकाऱ्यांना सांगणार आहे की, सिंचनाचे आपण ऑडिट करावे. मी भ्रष्टाचार धरून चालतो. तरी पण एवढ्या निधीतून सिंचन का वाढले नाही ? 5,10,15,50हजार हेक्टर सिंचनाखाली आणले असेल तर एकूण क्षेत्रा पैकी किमान क्षेत्र तरी सिंचना खाली यायला पाहिजे होते. पाच-सात वर्षामध्ये 70 हजार कोटी रूपये खर्च करून सिंचन क्षमता बिंदू मध्ये वाढत असेल तर ती बाब चुकीची आहे. मंत्र्याना अंधारात ठेवून अधिकारी हा निधी असा संपवत असतील तर ते गैर आहे. ही गंभीर गोष्ट आहे. तू

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

किती खाल्ले मी किती खाल्ले असा दोषारोप करण्याचा विषय नाही. महाराष्ट्रातील गरिबातील गरीब शेतकऱ्याचा विषय आहे. शेतकरी शेती सोडून शहरामध्ये का येत आहेत. त्याचे उत्तर शोधायचे असेल, त्याला तेथे शेती का करावीशी वाटत नाही, तर ही परिस्थिती आहे. हजारो कोटी रूपये खर्च करून माझ्या शेतीत पाणी मिळत नसेल, माझी गुरेढोरे सांभाळू शकत नसेल, माझे घरदार उभे करू शकत नसेल तर मी तेथे का थांबावे, असा विचार त्याच्या मनात येणे स्वाभाविक आहे.

सभापती महोदय, तेलबियांमध्ये आपला पहिला नंबर आहे असे सांगितले आहे. पण आपले तेल बियांमधील उत्पादन घटले आहे. आज आपले 15 टक्क्याने तेल बियांचे उत्पन्न घटले आहे. सगळ्यात वाईट परिस्थिती तेलबियांच्या बाबतीत आहे. मी सगळे वाचून दाखवत नाही. विक्रमी उत्पादनाची घोषणा केली पण परिस्थिती अत्यंत दुर्दैवी आहे. माझ्याकडे असलेल्या आर्थिक पहाणीमध्ये नकारात्मक परिस्थिती आहे. दोन्ही बाजूकडे ग्रामीण भागातील आमदार आहेत. आर्थिक पाहणीत परिस्थिती बघितल्यानंतर मनाला क्लेश होतो. हे कोणा मुळे झाले आहे. कृषी विभागामार्फत चांगले धोरण राबविले जात नाही त्यामुळे अशी परिस्थिती आहे. पगार भरपूर आहेत. अधिकारी भरपूर आहेत. कसलाही तुटवडा नाही. खताच्या बाबतीत शेतकऱ्याला लुबाडले जाते तेव्हा अधिकारी सक्षम असतात. हा सगळा आलेख बघितल्यानंतर दु:ख होते. बाजरी 29 टक्क्याने कमी झाली आहे, ज्वारी 3 टक्क्याने कमी झाली आहे, मका 9 टक्क्याने कमी झाला आहे, एकंदरीत तृणधान्य 6 टक्क्याने कमी झाले आहे, तूर, मूग, उडिद, ही कडधान्ये कमी झाली आहेत. सोयाबीन, शेंगदाणा कमी झाले आहे. तीळ कमी झाले. शेंगदाणा, तिळाचा घाणा मराठवाड्यातील ग्रामीण भागामध्ये चालतो. मराठवाडातील तो रोजगार आहे. कुटीरोद्योग आहे. अशाने गरिबाच्या घरातील रोजगार देखील बंद होत आहे. आपण मोठ्या प्रमाणावर कारखान्याला उचलून धरले तर त्याच्या घरातील चूल पेटणार नाही, दिवा पेटणार नाही हे तुम्हा-आम्हाला माहीत आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . ..

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे तुम्हालाही माहिती आहे की, आपल्याकडे धाणे चालतात आणि त्यांची परिस्थिती अतिशय गंभीर झालेली आहे. करडई, सूर्यफूल तेलबिया इ.सगळया गोष्टी कमी झालेल्या आहेत. कापसाचे प्रमाण 15 टक्क्यांनी कमी झालेले आहे. ऊस मात्र प्रचंड प्रमाणात वाढलेला आहे आणि त्यामुळे महाराष्ट्राला उत्पन्नही मिळते याबद्दल वाद नाही. कारखान्यातील ऊसाच्या गाळपामुळे शासनाला चार हजार कोटी रुपये मिळतात. पण त्याचबरोबर या राज्यातील 80 टक्के पाणी हे ऊसाच्या शेतीसाठी वापरले जात आहे हा देखील प्रश्न आहे आणि ही गोष्ट देखील नाकारता येणार नाही.अशा प्रकारे सगळी नकारात्मक भूमिका आहे.मी मघाशी चार-पाच तरतुदी वाचल्या पण मला याबाबतीत धोरणात्मक भूमिका निर्माण करणारी तरतूद या वर्षीच्या अर्थसंकल्पात कुठेही दिसली नाही. काल सन्माननीय सदस्य श्री.सय्यद पाशा यांनी जे सांगितले,ते फार महत्वाचे आहे की, ज्वारीचे पीक गेले, बाजरीचे पीक गेले त्यामुळे जनावरांचा चारा गेला, कडबाही गेला. मग दुभती जनावरे कशी तयार होणार? माननीय अर्थमंत्री श्री.अजितदादा पवार हा विषय तुमचाच असल्याने तुम्हाला त्याबाबत माहिती आहे. शासकीय दूध योजनेमध्ये अत्यंत निम्न स्तर गाठलेला आहे.अशा वेळी त्या विभागासाठी मंत्री तरी कशाला ठेवले आहेत? हे साधे खाते करा आणि ते दुसऱ्या विभागाला जोडून द्या.या विभागासाठी एक मंत्री नेमलेले आहेत आणि दुधाच्या योजनेची सर्व विल्हेवाट लागली आहे. याबाबत सांगावयाचे तर सहकार क्षेत्रामध्ये हे प्रमाण 41 लि.आहे आणि खाजगीमध्ये 67 लि.आहे. त्यामुळे या वितरण व्यवस्थे मध्ये . . . .

तालिका सभापती (श्री.विनायक मेटे) : मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, अर्थसंकल्पाच्या संदर्भात अजून 25 सन्माननीय सदस्यांना भाषण करावयाचे आहे आणि उद्या माननीय उप मुख्यमंत्री उत्तर देणार आहेत. तसेच आपण साधारणपणे 45 मिनिटे बोलत आहात.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी दहा मिनिटांमध्ये माझे भाषण संपवितो.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण लवकर संपवावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी दहा मिनिटांमध्ये भाषण संपवितो.

तालिका सभापती : दहा मिनिटे म्हणजे . . ..

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय,त्यापूर्वी माझे भाषण संपवितो.मी कृषीच्या संबंधातील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उद्योगांबाबत बोलत आहे. मग तो दुधाचा उद्योगधंदा असेल, तसेच जनावरांच्या संबंधातील तरतूद अत्यंत कमी आहे. तसेच आपल्याला माहिती आहे की, घराघरामध्ये जनावरे आहेत आणि त्यावेळी ही जनावरे घराघरामध्ये असणे म्हणजे वैभव मानले जात असे. पण आता आपल्याकडे जनावरेच नाहीत तर मशीन्स् आहेत. मात्र पश्चिम महाराष्ट्रामध्ये अजून जनावरे आहेत, जनावरांचा सर्वात मोठा ठेवा मराठवाड्यामध्ये आहे. त्याचबरोबर आज जनावरांची कत्तल देखील होत आहे.

सभापती महोदय, मी अत्यंत गंभीर बाबींसंबंधात बोलतो. बाकी आत दुधदुभत्याच्या बाबतीत जास्त काही बोलत नाही. परंतु शहाजी फूड कंपनीचा तळोजा, शेगाव येथे एक मोठा कारखाना असून तो केंद्रशासित आहे आणि त्याला केंद्र शासनाचे 100 टक्के अनुदान आहे. पूर्वी श्री. नतिकोद्दीन खतीब हे या सदनाचे सदस्य होते. त्यांच्या मुलाने तो कारखाना घेतलेला असून त्याला 100 टक्के अनुदान आहे आणि रोज 400 जनावरे कापली जाणार आहेत. त्यामुळे मराठवाडा व विदर्भामध्ये अशी परिस्थिती निर्माण होणार आहे की, पूर्वी इतर गोष्टींच्या चोऱ्या होत असत पण आता जनावरांच्या चोऱ्या होतील. कारण त्या कारखान्यासाठी पैसे देऊन एवढी जनावरे कुठून आणणार आहात ? हा प्रश्न आहे. आज राज्यातील पशुधन कमी होत आहे त्यामुळे शेतीचेही नुकसान झाले आहे, ही अत्यंत गंभीर घटना आहे. रोज 40 टन मास काढावयाचे आहे.

सभापती महोदय, तेथे आंतरराष्ट्रीय कीर्तीचा कारखाना उभा राहिलेला आहे. त्यामुळे भविष्यामध्ये जनावरांचा प्रश्न येणार नाही. कारण ॲन्टी करप्शनच्या लोकांनी त्यांच्या एका एजन्टला रात्री 2.00 वाजता पकडल्यानंतर त्याच्याकडे दहा लाख रुपये मिळाले आणि याबाबत चौकशी केल्यानंतर कळले की, जनावरांची खरेदी करण्याकरता एक माणूस रोख पैसे घेऊन रात्री फिरत असतो.अशा वेळी आपल्या गोठ्या तील जनावरे चोरण्याचा नवीन उद्योग सुरु होईल आणि कृषी धन देखील उद्ध्वस्त होईल. तसेच सहकाराच्या बाबतीत आपण सांगत आहात. म्हणून सांगतो की,कारखाना विकत घेतल्याबद्दल तक्रार असली तरी तेथे त्या पध्दतीने चालले आहे. पण एक कारखाना असा आहे की ज्याला आपण तो काढल्यापासून 35 कोटी रुपये दिले. त्यानंतर कारखाना उभा राहिला मग आपण आणखी निधी देत गेलो. माझ्याकडे भरपूर उदाहरणे आहेत. पण एक उदाहरण देतो की, 110 कोटी रुपये देऊन कारखाने घेतले पण तेथे एकदाही गाळप झाले नाही. त्यानंतर तो कारखाना विकला गेला. आपल्या माननीय मंत्री महोदयांनी तो भाड्याने घेतला होता . तो त्यांनी चांगल्या प्रकारे चालविला. पण त्याठिकाणी ऊसाचे गाळप न करता त्यांनी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

110 कोटी रुपये कशासाठी वापरले याची आपण चौकशी करणार नाही काय? शासनाचे 110 कोटी रुपये बुडीत टाकणारा सहकारातील प्रमुख कारखाना अवसानात जातो, विकला जातो हे सगळे मला मान्य आहे. पण अनेक कारखाने आहेत की ज्यामध्ये शासनाचे जे पैसे अडकलेले आहे, त्याबाबतचा प्रश्न आहे. या मधील भागभांडवल बुडत आहे अशा वेळी तो कारखाना अवसयनात गेला तरी तो विकला गेले पाहिजे आणि याबाबत धोरण निश्चित झाले पाहिजे. हीच परिस्थिती कापसाच्या बाबतीत आहेत.

सभापती महोदय, सूत गिरण्या बंद पडल्या आहेत. मात्र त्यासाठी पैसे घेतलेले आहेत आणि हे माननीय मंत्री महोदयांनाही माहीत आहे. मग हे कसे काय चालले आहे? आम्हाला आपल्याकडून प्रशासकाची अपेक्षा आहे. संबंधितांना कोणी जाब विचारणार आहे की नाही ? पैसे बुडवले तर बुडवले, गेले तर गेले असे काही आहे काय ? याबाबतीत आयुधे आहेत आणि मला खात्री आहे की, आपण जर मनावर घेतले तर यातील पाच, पन्नास लोक शंभर टक्के तुरुंगामध्ये जातील अशी 100 टक्के परिस्थिती आहे आणि असे अनेक कारखाने आहेत. परंतु ते विकले गेले पाहिजेत. तेथे गाळप झाले नाही. जर संबंधितांना पकडले तर फरक पडेल. पणनच्या बाबतीत बोलावयास गेलो तरी त्याची परिस्थिती सुध्दा गंभीर आहे.

सभापती महोदय, म्हणून मी जाता-जाता माननीय अर्थमंत्र्यांना एकच विनंती करतो की, कोल्हापूर मध्ये कृषी विभागाचा अधिकारी आहे. परवा मी त्यांना फोन केला होता. मॅनग्रोव्हजमधून त्यांनी जे निर्माण केले आहे, तशा प्रकारचे ताकदीचे अधिकारी जर आपल्या महाराष्ट्रात असतील तर त्यांचे टॅलेंट वापरावयास नको काय ?

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

ऊसाचे चिपाड न जाळता त्यापासून सेंद्रीय खत करण्यात येते, त्यामुळे पाणी वाचते, वीज वाचते, कोट्यवधी लीटर पाणी वाचते. पाणी वाचविणे हा संकल्प आहे. त्यांनी मला ऑन लाईनवर ते पुस्तक पाठविले. मी त्यांना फोन करुन त्यांचे कौतुक केले. शासनामध्ये असे अधिक्कारी असतील जे शेतीमध्ये क्रांती करुन शासनाचे पैसे वाचवत असतील, पाणी वाचवत असतील, महाराष्ट्रात सोन्यापेक्षा जास्त किंमत पाण्याला आहे अशा अधिक्कार्‍यांचे कौतुक झाले पाहिजे.

सभापती महोदय, कृषी महाविद्यालयात शिकणारे विद्यार्थी हे भविष्यात कृषी क्षेत्रात क्रांती घडविणारे आहेत. शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती सवलत खाजगी विनाअनुदानित पदविका, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी व्यवस्थापन कोट्यातील प्रवेश वगळून इतर जागांवर प्रवेश घेण्याऱ्या विद्यार्थ्यांना लागू होते. परंतु सर्व अनुदानित कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती सवलत मिळत नाही. कृषी महाविद्यालयात सामान्य शेतकऱ्यांची, गरिबांची मुले शिकली पाहिजेत. जेणेकरुन कृषी क्षेत्रात चांगले नाव कमाविलेले विद्यार्थी महाराष्ट्राच्या सेवेला मिळतील अशी विनंती करतो आणि आपण वेळ दिल्याबद्दल आपल्याला धन्यवाद देऊन माझे भाषण पूर्ण करतो. जय हिंद ! जय महाराष्ट्र !

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन 2012-2013 च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत माझे विचार मांडण्यासाठी मला संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे.

सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांनी स्व.श्री.यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षात एक सर्वसमावेशक आणि संतुलित असा आणि फारशी करवाढ नसलेला अर्थसंकल्प सादर केला त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, स्व.श्री.यशवंतराव चव्हाण यांनी आधुनिक महाराष्ट्राचा पाया भरण्याचे काम केले. कृषी औद्योगिक क्रांती असेल, आर्थिकदृष्टया मागासलेल्या घटकांच्या शिक्षणासाठी मदतीचे धोरण असेल, किंवा पंचायत राज निर्मितीचे धोरण असेल, आज आपण आधुनिक महाराष्ट्र घडलेला पाहतो त्यामध्ये या गोष्टी अत्यंत महत्वाच्या ठरलेल्या आहेत. आपण स्व.श्री.यशवंतराव चव्हाण यांच्या विचारासाठी 100 कोटी रुपयांची योजना घेण्याचे ठरविले त्याबद्दल मी पुन्हा एकदा माननीय उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, सर्वसाधारणपणे पाहिले तर या अर्थसंकल्पामध्ये कृषी विभागाला अतिशय चांगले महत्व दिलेले आहे आणि ते योग्यही आहे. कारण आपला देश कृषी प्रधान आहे. हे राज्य कृषी प्रधान आहे. या अर्थसंकल्पामध्ये अनेक योजनांचा सहभाग आहे. परंतु वेळेअभावी त्याचा उल्लेख करीत नाही. जेव्हा जेव्हा राज्यातील शेतकरी अडचणीत आला तेव्हा तेव्हा या सरकारने त्यांना जाणीवपूर्वक मदत केलेली आहे. कापूस, सोयाबीन व धान उत्पादक शेतकऱ्यांसाठी दोन हजार कोटी रुपयांचे अर्थसाह्य करण्याची घोषणा मागील हिवाळी अधिवेशनात करण्यात आली होती, त्या निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. त्याबद्दल मी माननीय उपमुख्यमंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. हे पैसे थेट शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये जमा करण्याचे ठरविले ही अतिशय चांगली बाब आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या पीक कर्जामध्ये व्याज दरात सवलत दिलेली आहे. त्यासाठी 138 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. कृषी पंपासाठी अडीच हजार कोटी रुपयांची सवलत दिलेली आहे. लघुपाटबंधारेसाठी 80 कोटी रुपये, एकात्मिक पाणलोट विकास

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे.....

कार्यक्रमासाठी भरघोस तरतूद केलेली आहे. शेततळ्यांच्या कार्यक्रमा विषयी येथे अनेक सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भावना व्यक्त केल्या. दुष्काळी भागासाठी शेततळे हे वरदान ठरलेले आहे. 3 हजार शेततळ्यांचे उद्दिष्ट ठेवण्यात आलेले आहे. परंतु माझी मागणी आहे की, आपण हे उद्दिष्ट वाढविले पाहिजे. त्याच प्रमाणे विहिरीचें नियोजन करण्यात आलेले आहे, त्यामध्ये वाढ करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये जे लिलाव होतात ते संगणकीय पध्दतीने करण्यासाठी 415 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे, ही विशेष महत्वाची गोष्ट आहे. यामुळे कृषी उत्पन्न बाजार समितीतील व्यवहार पारदर्शक होणार आहेत.

सभापती महोदय, या शिवाय पीक विमा योजना असेल, वैयक्तिक अपघात विमा असेल, कोरडवाहू शेतीसाठी तरतूद असेल, कृषी विकासाच्या विविध उपक्रमांसाठी तरतूद असेल,जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय कृषी प्रकल्पांच्या माध्यमातून जे प्रकल्प राबविले जाणार आहेत त्यासाठी नियोजन असेल,

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुधीर तांबे....

दुभत्या जनावरांचे वाटप असेल किंवा मच्छीमारी नौकांच्या यांत्रिकीकरणासाठी जी तरतूद करण्यात आलेली आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. सिंचनाच्या क्षेत्रासाठीही भरघोस तरतूद करण्यात आलेली आहे. केंद्र शासनाच्या वेगवर्धित सिंचन लाभ योनेसाठी या वर्षी 2129 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.

मला या ठिकाणी विशेष अभिनंदन करावयाचे आहे. या वर्षी शासनाने राजीव गांधी जीवनादायी योजना आठ जिल्हयामध्ये प्रायोगिक तत्वावर सुरु केलेली आहे त्यामुळे गरीब माणसाला जे दुर्धर आजार होतात त्यासाठी चांगली मदत होणार आहे. एक लाख रुपये उत्पन्न असणाऱ्या व्यक्तिला दीड लाख रुपयापर्यंतची मदत विम्याच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. या निमित्ताने मला एकच मुद्दा उपस्थित करावयाचा आहे की, यापूर्वीची राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना सुरु आहे ती बंद होणार आहे का? ती बंद होऊ नये अशी माझी शासनाला विनंती आहे. या योजनेच्या माध्यमातून गरीब माणसाला खूप मोठया प्रमाणावर सामान्य आजारांसाठी खाजगी दवाखान्यामध्ये जाऊन उपचार घेण्याची सुविधा आहे. तेव्हा राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना चालू असली पाहिजे. जीवनदायी योजना सुरु असताना तिच्यावर परिणाम होऊ नये अशा प्रकारची विनंती मी या निमित्ताने करतो. प्रथमच या वर्षी वेगवेगळया रुग्णालयांच्या किंवा ग्रामीण रुग्णालयांच्या बांधाकामासाठी मोठया प्रमाणात तरतूद करण्यात आलेली आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. शिक्षणा विषयी अनेक चांगले निर्णय घेण्यात आलेले आहेत. शिक्षण सेवकांचे मानधन दुप्पट करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. शिक्षकांच्या पेन्शन योजनेबाबत चांगले निर्णय घेतलेले आहेत तरी देखील शिक्षण क्षेत्राकडे अधिक लक्ष देण्याची गरज आहे.

सभापती महोदय,आज शिक्षण हक्क कायदा लागू केलेला आहे व त्याची अंमलबजावणी करण्याचे शासनाने ठरविलेले आहे परंतु त्याबाबतीत वेळ जात आहे तो अत्यंत चिंतेचा विषय आहे. या राज्यामध्ये आजही हजारो शिक्षक कमी वेतनावर काम करीत आहेत. शासनाने कायम हा शब्द काढलेला आहे परंतु त्याची अंमलबजावणी करण्याच्या बाबतीत विलंब होत आहे. मूल्यांकनाच्या ज्या अटी घालण्यात येत आहेत त्यामुळे त्यांचे भवितव्य अंधकारमय झालले आहे. ग्रामीण भागातील

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुधीर तांबे. . . .

शाळांमधून जे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत त्यांच्या शिक्षणावर याचा खूप मोठा परिणाम होणार आहे. कारण शिक्षण हक्क कायद्यामध्ये केवळ मोफत शिक्षण देणार नाही तर दर्जेदार शिक्षण देणार आहोत. एकीकडे वेतनेत्तर अनुदान देत नाही. शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची भरती करत नाही मग दर्जेदार शिक्षण कशा पध्दतीने देण्यात येणार हा प्रश्न आहे. म्हणून यासाठी अधिक पैसे उपलब्ध करावयाचे असतील तर ते करावेत परंतु केवळ माध्यमिक नव्हे तर उच्च माध्यमिक पर्यंतच्या सर्व शाळा तातडीने अनुदानित करणे गरजेचे आहे. मुलींना इयत्ता बारावीपर्यंतचे शिक्षण मोफत आहे असे आपण एकीकडे म्हणतो. तसा केंद्र शासनाचा कायदा आहे आणि राज्य शासनाचेही तसेच म्हणणे आहे. आदिवासी, मागासवर्गीय मुलांकडून कुठल्याही प्रकारची फी घ्यावयाची नाही अशा प्रकारच्या शासनाच्या सूचना आहेत असे असेल तर ग्रामीण भागातील उच्च माध्यमिक विद्यालये कशी चालविता येतील. एकीकडे विद्यार्थ्यांकडून फी घ्यावयाची नाही. दुसरीकडे या शाळांना अनुदान देणार नाही ही विसंगती तातडीने दूर होण्याची गरज आहे. ग्रामीण भागात आज मोठया प्रमाणावर उच्च माध्यमिक महाविद्यालये सुरु आहेत ते तातडीने अनुदानित करणे गरजेचे आहे अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था ज्यांना आपण आय.टी.आय. असे म्हणतो येथे विशेषत: गरीब मुले शिक्षण घेत असतात. त्यांच्या बळकटीकरणासाठी शासनाने 28 कोटी रुपयांची तरतूद केली आहे याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करीत असतानाच आपण एककीकडे वैद्यकीय महाविद्यालयामध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलांना दोन ते तीन लाख रुपये फी चे रीइम्बर्समेंट करण्यात येते पण आय.टी.आय.मधील विद्यार्थ्यांना कुठल्याही प्रकारची शिष्यवृत्ती देण्यात येत नाही. तेव्हा आय.टी.आय. किंवा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना देखील शिष्यवृत्ती मिळाली पाहिजे अशी मी या ठिकाणी मागणी करतो.

सभापती महोदय, ज्यांनी खऱ्या अर्थाने ग्रामीण भागामध्ये शिक्षणाची गंगा नेली त्या कर्मवीर भऊराव पाटील यांच्या नावाचे अध्यासन होत आहे आणि शासन त्यासाठी पाच कोटी रुपयाची तरतूद करीत आहे या बद्दल मला शासनाचे विशेष अभिनंदन करावयाचे आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्रात श्री. विठ्ठल रामजी शिंदे यांचे देखील अध्यासन होणे खूप गरजेचे आहे त्या बद्दल शासनाने पुढाकार घ्यावा अशी मी शासनाला विनंती करीत आहे. सभापती महोदय, आज

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुधीर तांबे. . . .

शहरीकरण अतिशय वेगाने वाढत चाललेले आहे. नागरीकरण झपाटयाने वाढत असताना या नागरिकरणाची जी आव्हाने निर्माण झालेली आहेत ती पेलण्यासाठी 'क', 'ड', या महानगरपालिका देखील असमर्थ ठरत आहेत.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुधीर तांबे ....

सभापती महोदय, जेएनएनयुआरएम योजना असेल किंवा राज्याची नगरोत्थान योजना असेल त्यामध्ये जेएनएनयुआरएम ही केंद्र शासनाची योजना आहे आणि त्यासाठी 2200 कोटी रुपये आणि महाराष्ट्राच्या नगरोत्थान योजनेसाठी 250 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. या ठिकाणी या योजना राबवित असताना मला शासनाला विनंती करावयाची आहे की, महाराष्ट्र राज्यात जी कामे नगरपालिकांमध्ये किंवा महानगरपालिकांमध्ये घेतली जातात त्यामध्ये आता कचरा व्यवस्थापनाचा विषय आलेला आहे किंवा सांडपाण्याचा विषय आलेला आहे आणि आपण आज कोणत्याही शहरामध्ये किंवा छोट्या गावामध्ये गेलो तरी सांडपाण्याची व्यवस्था अत्यंत वाईट आहे. या अर्थसंकल्पात आपण नदीच्या संवर्धनाचा विषय घेतलेला आहे. हे सर्व सांडपाणी कोणत्याही प्रकारची प्रक्रिया न करता नदीमध्ये सोडले जाते. त्यामुळे जेव्हा आपण नगरोत्थान योजना आणतो किंवा जेएनएनयुआरएम योजना आणतो त्यावेळी त्यामध्ये सांडपाण्याच्या व्यवस्थापनाला आणि कचरा व्यवस्थापनाला प्राधान्य दिले पाहिजे. त्याच योजना नगरपालिकांनी घेतल्या पाहिजेत अशा प्रकारच्या अटी घालणे गरजेचे आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, रस्ते विकासासाठी शासनाने मोठ्या प्रमाणावर तरतूद केलेली आहे. परंतु आजही राज्यातील अनेक महत्वाच्या रस्त्यांचे चौपदरीकरण झालेले नाही. आपण बघतो की, अपघाताचे प्रमाण दिवसेंदिवस खूप वाढत चालले आहे. त्यामध्ये खूप लोक आणि विशेषत: तरुण लोक बळी पडत आहेत. एकीकडे आपण रस्ते विकासासाठी तरतूद करीत असताना राज्याची जी जिल्ह्याची ठिकाणे आहेत ती तातडीने चौपदरीकरणाने जोडली गेली पाहिजेत. पुणे-नाशिक रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम होणार आहे असे अनेक वर्षापासून ऐकत आहोत परंतु ते काम कोठेही मार्गी लागत नाही. धुळे ते जळगाव हा अतिशय महत्वाचा रस्ता आहे. त्या रस्त्याचेही चौपदरीकरण होणे गरजेचे आहे. ही कामे सुध्दा तातडीने पुढे गेली पाहिजेत. या ठिकाणी जे रस्ते पंतप्रधान ग्राम सडक योजनेमध्ये येणार नाहीत त्यासाठी राज्य शासनाने यशवंतराव चव्हाण यांच्या नावाने एक स्वतंत्र नवीन योजना केलेली आहे. त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, वीज निर्मितीसाठी देखील शासनाचे खूप प्रयत्न चालू आहेत. आपल्यालाही माहीत आहे की, दररोज विजेची गरज वाढत चाललेली आहे. एकीकडे आपण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुधीर तांबे ....

औद्योगिकीकरणाची अपेक्षा ठेवतो, एकीकडे शहरे वाढत चाललेली आहेत आणि दुसरीकडे मात्र ज्या वीज प्रकल्पांना सर्वांनी खऱ्या अर्थाने समर्थन द्यावयास पाहिजे ते दुर्दैवाने दिले जात नाही. जैतापूरचा प्रकल्प असेल किंवा वेगवेगळे अनेक प्रकल्प आहेत की जे वेगाने पूर्ण होणे महाराष्ट्राच्या भविष्य काळाच्या दृष्टीकोनातून अत्यंत महत्वाचे आहेत. हे प्रकल्प खऱ्या अर्थाने पूर्ण होण्यासाठी पक्षीय राजकारण बाजूला ठेऊन सर्वांनी एकत्र येऊन प्रयत्न करणे गरजेचे आहे. एकीकडे आपण विजेच्या टंचाईबद्दल टीका करणार आणि दुसरीकडे विजेच्या निर्मितीमध्ये अडथळे निर्माण करणार ही विसंगती सुध्दा दूर होणे गरजेचे आहे, असे मला वाटते.

सभापती महोदय, उद्योगाच्या बाबतीत सुध्दा चांगल्या पध्दतीने 1483 कोटी रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान दिलेले आहे. या ठिकाणी शासन औद्योगिक धोरण आणत आहे. रेशीम उद्योगाचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये सुध्दा झालेला आहे. या रेशीम उद्योगाला चालना देण्याची आवश्यकता आहे. आज जगातील काही देशांनी रेशीम उद्योगावर लक्ष केंद्रित केलेले आहे. केवळ कापडच नाही तर रेशीम कोशापासून अनेक प्रकारची रसायने तयार केली जातात आणि त्याचा उपयोग सौंदर्य प्रसाधनात आणि वेगवेगळ्या उद्योगामध्ये केला जातो. आपण विदर्भाच्या बाबतीत पाहतो की, त्या ठिकाणी सतत आत्महत्या होत असतात. त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर पैसे गुंतवितो, अनेक प्रकारचे पॅकेजेस देतो तरी हा प्रश्न सुटत नाही. मला असे वाटते की, रेशीम उद्योगाच्या माध्यमातून विदर्भातील शेतकऱ्यांचे किंवा राज्यातील अन्य शेतकऱ्यांचे प्रश्न आपण सोडवू शकतो.

सभापती महोदय, पर्यटनासाठी सुध्दा कोकणामध्ये 228 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. त्याचप्रमाणे मुंबई नागरी परिवहन प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर तरतूद केलेली आहे. मुंबई शहराच्या दृष्टीने पाहिले तर जी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आहे ती तातडीने सुधारणे खूप गरजेचे आहे. कारण शहर मोठ्या प्रमाणावर वाढत चालले आहे. त्या दृष्टीकोनातून हा प्रकल्प वेगाने पुढे जाणे गरजेचे आहे. हे सर्व आपण पाहिल्यानंतर आपल्याला असे दिसते की, आपण एक अतिशय चांगला संतुलित अशा प्रकारचा अर्थसंकल्प सादर केलेला आहे. करवाढीच्या बाबतीत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

डॉ. सुधीर तांबे ....

जीवनावश्यक वस्तूंच्या संदर्भात गरिबांना ज्या काही सवलती दिलेल्या होत्या त्या आपण पुढच्या वर्षापर्यंत कायम ठेवलेल्या आहेत त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो परंतु एलपीजी गॅसच्या संदर्भातील करवाढ जर आपण मागे घेतली तर मध्यमवर्गीयांना मोठा दिलासा मिळणार आहे. त्यामुळे आपण एलपीजी गॅसवरील करवाढ मागे घ्यावी अशी विनंती मी माननीय अर्थमंत्र्यांना करतो. पुन्हा एकदा राज्याचे माननीय अर्थमंत्री यांनी राज्याला चांगला अर्थसंकल्प सादर केलेला आहे आणि या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून विकासाची गती वाढविण्याचा प्रयत्न होत आहे त्याबद्दल राज्याच्या माननीय अर्थमंत्र्यांचे मी मनापासून अभिनंदन करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याच्या सन 2012-2012 या वर्षाच्या अर्थसंकल्पावरील चर्चेत बोलण्यासाठी मला आपण संधी दिल्याबद्दल मी आपले सुरुवातीलाच आभार मानतो.

खरे म्हणजे काल या सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.अरुणभाई गुजराथी यांच्याबरोबर मी चर्चा करीत होतो. मी त्यांना असे विचारले होते की, अर्थसंकल्पावरील चर्चेत सहभागी होत असताना आपण काही गोष्टींचा उल्लेख करीत असतो. प्रत्येक सन्माननीय सदस्य आकडेवारीसह आपले विचार व्यक्त करीत असतात. परंतु काही धोरणात्मक बाबींवर बोलावयाचे असेल तर अर्थसंकल्पामधील कोणत्या बाबी शोधल्या पाहिजेत ? त्यांनी मला केलेल्या मार्गदर्शनामुळे मला बऱ्यापैकी फायदा झाला आहे. मग मी विचार करु लागलो की, इंग्रजीमध्ये अशी एक संकल्पना आहे. क्रिएशन ऑफ वेल्थ, राज्यकर्त्यांनी संपत्ती निर्माण करण्यासाठी राज्यव्यवस्था निर्माण करावी अशा प्रकारचा हा एक संकेत आहे. मग आपण अर्थसंकल्प बारकाईने बघतो. त्यावेळी वेगवेगळ्या पध्दतीने त्याकडे बघितल्यानंतर सबंध पुढच्या वर्षामध्ये राज्याच्या आर्थिक संपत्तीमध्ये अधिकचे काय होणार आहे, त्यामुळे राज्यावर कर्ज किती आहे, त्या कर्जाचा बोजा कसा वाढत गेला आहे, त्यासाठी श्वेतपत्रिका काढावयाची काय, यापेक्षा त्यामधून या राज्याच्या स्थावर मालमत्तेमध्ये वाढ होणार असेल तर कर्ज काढण्यासाठी थांबण्याची गरज नाही. फक्त कर्ज घेताना त्याच्या काही पटींनी आपल्या राज्याची धन संपत्ती वाढली पाहिजे हा एक संकेत मला महत्वाचा वाटतो.

एकविसाव्या शतकातील दुसऱ्या दशकातील सुरुवातीचा हा कालखंड आहे. 2020 पर्यंत भारत देश हा जगामध्ये आर्थिक महासत्ता म्हणून लौकिक प्राप्त करील असा आत्मविश्वास जनतेलाही आहे. या दिशेने प्रवास करीत असताना राज्याने आपला सक्रिय सहभाग व योगदान देणे महत्वाचे आहे. त्यादृष्टीने महाराष्ट्र अग्रेसर कसा राहील यासाठी प्रयत्न करणे महत्वाचे ठरणार आहेत. राज्यकर्त्यांना भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी परिपक्व नेतृत्व देणेही अपेक्षित आहे. राज्याचा अर्थसंकल्प तयार करताना अनेक बाबींचे स्थान, प्राधान्यक्रम व प्रासंगिक व आपत्कालीन कारणांच्या पलीकडे जाऊन काही तरी राज्याच्या संपत्तीमध्ये गुणात्मक व मूल्यात्मक

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले....

वाढ कशी होईल व जीवनस्तर उंचावण्यासाठी हे सरकार आपल्या पाठीशी उभे आहे असा विश्वास राज्यातील 11 कोटी जनतेमध्ये निर्माण करावयास पाहिजे. या प्रगतीच्या वाटचालीसाठी अर्थसंकल्पाच्या पायाची बांधणी मजबूत व योग्य प्रकारेच करावयास पाहिजे. असा सर्वांगीण विचार करुन सादर झालेला राज्याचा सन 2012-13 चा अर्थसंकल्प काळाच्या कसोटीवर नक्कीच उतरेल म्हणून मी माननीय अर्थमंत्र्यांचे सुरुवातीलाच मन:पूर्वक अभिनंदन करतो.

सभापती महोदय, खरे म्हणजे माननीय श्री.अजित दादा पवार हे राज्याचे अर्थमंत्री झाल्यापासून जनभावना अशी झाली आहे की, हे अर्थ खाते बँकेच्या एटीएम सारखे झाले आहे. त्यांच्याकडे आपला प्रश्न घेऊन जायचे, त्यासाठी किती निधीची आवश्यकता आहे हे त्यांना सांगितल्यावर ताबडतोब त्या समस्येचे निराकरण होते अशा प्रकारचे वातावरण या निमित्ताने तयार झालेले आहे. ते मला वाटते की, ते प्रोत्साहनात्मक आहे. योग्य त्या कामासाठी योग्य तेवढा निधी मिळेल असा विश्वास निर्माण करण्याची जी गरज होती ती यामुळे पूर्ण होत आहे. आपल्या राज्यात किंवा देशात शेतीला अनन्यसाधारण महत्व आहे. आपल्या राज्यात काही वर्षात शेती हा व्यवसाय लहरी निसर्गाच्या विचित्र चक्रामध्ये भांबावून गेला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे जगणे अवघड झाले आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे आकडे सर्वांसमोर आल्यावर सर्वांना अस्वस्थ वाटते. त्यामुळे अर्थसंकल्पात शेतीविषयक प्रस्ताव पाहिल्यानंतर ते निश्चितच स्वागतार्ह आहेत. हे सर्व प्रस्ताव आपण बघितले असताना मूलभूत शेतीवर अवलंबून असणारा शेतकरी त्याच्या ज्ञानात भर पडण्यासाठी, त्याच्या पीक पध्दतीत बदल होण्यासाठी किंवा त्याला शेतीचे अर्थकारण समजण्यासाठी काही तरी रचनात्मक योजना जर शासनाने हाती घेतली तर त्याचाही फार मोठा उपयोग होऊ शकेल असे मला या ठिकाणी सुचवावेसे वाटते.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. हेमंत टकले....

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण योजना आणि राज्याची रोजगार हमी योजना यामधून निधी उपलब्ध करुन शेतमजुरांचा प्रश्न निश्चितच मार्गी लागेल असाही दिलासा या अर्थसंकल्पामध्ये आपल्याला निश्चितपणे सापडतो. या सगळया योजना राबवताना एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे ती म्हणजे या योजनांसाठी निधी उपलब्ध करुन दिला जातो आणि मग मार्च अखेरीला राज्याच्या विविध खात्याची धावपळ आणि गडबड होत असताना आपण पहातो. खर्च करण्यासाठी भराभर धनादेश काढले जातात. या बाबतीत आर्थिक शिस्त लागणे अपेक्षित असेल तर आपल्याला या सर्व योजनांचे वारंवार मूल्यांकन करुन योजनांची परिणामकारकपणे अंमलबजावणी होत नसेल तर त्यामध्ये वेळीच सुधारणा करण्याची आवश्यकता असून राज्य शासनाने त्याकडे लक्ष द्यावे असे मला सुचवावेसे वाटते. राज्यातील जनतेच्या कल्याणसाठी आरोग्य आणि शिक्षण इत्यादी बाबतच्या सुविधांकडे शासनाने विशेष लक्ष पुरविलेले आहे. रुग्णालयांच्या इमारती, राजीव गांधी जीवनदायी योजना, आरोग्य ओळखपत्र यासाठी चांगल्या प्रकारे तरतूद करण्यात आलेली आहे. राज्यात 4 नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये उभी रहाणार आहेत. मला वाटते ही अतिशय मूलभूत अशी गरज होती आणि ज्या जिल्ह्याची निवड झाली आहे त्या जिल्ह्यांसाठी वैद्यकीय शिक्षणाचे एक प्रवेशद्वार निर्माण होत आहे. प्रशिक्षित मनुष्यबळ यासाठी निश्चितपणे उभे रहाणार आहे.

मुंबईतील जे.जे. रुग्णालय हे सुपरस्पेशॅलिटी रुग्णालय करण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. हे रुग्णालय नक्कीच आंतरराष्ट्रीय दर्जाचे होईल. पण मला वाटते की, आपण जर आजची देशातील परिस्थिती पाहिली तर पर्यटन हे केवळ मौजमजेसाठी नाही तर मेडिकल टुरिझम हे एक नवे दालन या माध्यमातून उघडले जात आहे. त्याचाही या निमित्ताने विचार केला पाहिजे असे मला वाटते. महाराष्ट्र आपण ज्यांच्या हाती देणार आहोत त्या पुढच्या पिढीसाठी शिक्षण क्षेत्र हे महत्वाचे केंद्र आहे. सर्वशिक्षा अभियानापासून आणि शालेयस्तरापासून याची सुरुवात होते. त्यामुळे शालेय शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यन्तच्या सर्व टप्प्यावर निधी उपलब्ध करुन दिल्याने विकास घडून येईल. सार्वजनिक ग्रंथालयांना अनुदान वाढवून दिलेले आहे. ही छोटी बाब आहे. पण त्याचा नियोजन ग्रंथालयांना बदलत्या काळाप्रमाणे बदल घडविण्यासाठी करायला लावणे याकडे शासनाने लक्ष द्यायला पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले...

शिवाजी विद्यापीठ, पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील आणि रयत शिक्षण संस्था यांची अर्थसंकल्पात घेतलेली दखल सामाजिक स्पंदनाची जाणीव करुन देणारी तर आहेच पण त्याही पेक्षा राष्ट्र उभारणीमध्ये कर्मवीरांचा सिंहाचा वाटा अधोरेखित करणारी आहे. जनसामान्यांना या गोष्टीचे अप्रूप आहे आणि शासनकर्ते संवेदनशील आहेत याचीही साक्ष या निमित्ताने आपल्याला येते. राज्यात झपाटयाने नागरिकरण होत आहे, गावे ओसाड होऊ लागली आहेत आणि शहरे बेसुमार वेगाने फुगताहेत. दोन्हीकडे मोठया प्रमाणावर असंतुलन होत आहे. याकडे शासनाने त्रयस्थपणे पहाणे परवडणारे नाही. मूलत: ग्रामविकासावर भर दिला तर स्थलांतराला आळा घातला जाऊ शकातो.त्यादृष्टीने ग्रामीण विकास हाच मूलमंत्र आहे. ग्रामीण भागात शिक्षणापासून आरोग्य, पर्यावरण यासर्वच बाबतीत शासनाने पुढाकार घेऊन हाती घेतलेल्या उपक्रमांची तत्परतेने अंमलबजावणी केल्यास एक संकलित महाराष्ट्र तयार होईल. नदी संवर्धनाच्या महत्वाच्या योजनेमुळे राज्यातील जलसाठे सुरक्षित होण्यास मदत होणार आहे. पायाभूत सुविधा व उद्योग या दोन्हीसाठी अर्थसंकल्पात योग्य तरतूद करण्यात आलेली आहे. स्व. यशवंतराव चव्हाण ग्रामसडक योजनेमुळे तालुका मुख्यालये व बाजारपेठा जोडल्या जाणार आहेत. भारनियमन मुक्त महाराष्ट्राचा उल्लेख अनेक सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणात केलेला आहे. हे स्वप्न प्रत्यक्षात उतरविण्यासाठीचा प्रवास हा अडचणी, अडथळे आणि आव्हानांनी समोर आलेला आहे. प्रबळ इच्छाशक्ती आणि सर्व राजकीय पक्षाची परिपक्वता या निमित्ताने ऐरणीवर आली आहे.

भारनियमन संपुष्टात आले पाहिजे. परंतु प्रकल्पच होऊ द्यायचे नाहीत अशी परस्पर विरोधी भूमिका आता सगळयांनाच बाजूला ठेवली पाहिजे. राज्याचा सर्वांगीण विकास हे एकमेव ध्येय असेल तर हे स्वप्न कुणा एकटयाचे नसून ते आपणा सर्वांचे आहे ही जाणीव सर्वांनी जपली पाहिजे. इतर काही राज्यांच्या तुलनेत आपण पर्यावरणाच्या बाबतीत अधिकचे काही तरी करणे क्रमप्राप्त आहे. भव्य सागरी किनारा, लोणार सारखे सरोवर, अंजिठा-वेरुळ लेणी, गढ-किल्ले ही मोठी वारसा असलेली क्षेत्रे व उद्याच्या काळात पर्यटनासाठी उपलब्ध होणारी नवी क्षेत्रे संवर्धित करायला हवीत.

...नंतर श्री. गिते...

अशुधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती :सभागृहाची वेळ एक तासाने वाढविण्यांत येत आहे, याची कृपया सन्माननीय सदस्यांनी नोंद घ्यावी.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, धन्यवाद. जगातील काही देश तर पर्यटनांवर संपत्ती निर्माण करतात. अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदीच्या अनुषंगाने व्यापक विचार करुन नव्या योजना शासनाने तयार कराव्यात, अशी मी शासनाला या निमित्ताने विनंती करतो. मुंबई या राज्याच्या राजधानीच्या शहरास आंतरराष्ट्रीय पातळीवर अनन्य साधारण महत्व आहे. मुंबई महानगरासाठी मूलभूत सुविधापासून ते शहराच्या पर्यावरणापर्यंतच्या कामासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे. त्यात जर कमतरता आली तर त्याकडेही सरकारने लक्ष द्यावे. आदिवासी, मागासवर्गीय, अल्पसंख्यांक हे आपल्या समाजाचे सर्वात महत्वाचे घटक आहेत. समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी प्रोत्साहन देणे, पुरेशी तरतूद करणे हा आजचा अर्थसंकल्पाचा मूळ गाभा आहे असे मला म्हणावेसे वाटते. प्रशासकीय कार्यालये, कोषागरे, कर्मचाऱ्यांची निवासस्थाने ही सर्व कामे गुणवत्तेच्या कसोटीवर उतरतील अशीच झाली पाहिजेत,याकडेही विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे. पोलीस दलाचे महत्व, वाढत्या सुरक्षा विषयक गरजा, आधुनिक शस्त्रास्त्रे, वाहने, दळणवळणाची साधने तसेच नक्षलग्रस्त भागातील सुरक्षा व्यवस्था या सर्व गोष्टींवर भविष्यात येणारी संकटे लक्षात घेऊन आवश्यक तरतुदी करण्यावर अर्थसंकल्पात भर दिलेला आहे. ई-गव्हर्नन्सही संकल्पना हेही या अर्थसंकल्पाचे खास वैशिष्टे आहे. पारदर्शक व भ्रष्टाचार विरहित शासन व्यवस्था निर्माण करण्याच्या दृष्टीने राज्यकारभाराची गतिमानता वृध्दींगत होण्यासाठी हे शासन कटिबध्द आहे ही अतिशय समाधानाची बाब आहे.

सभापती महोदय, यशदा ही शिखर प्रशिक्षण संस्था विस्तारित करणे व राज्यातील सर्व प्रशिक्षण संस्था त्यांच्याशी संलग्न करणे हे महत्वाचे पाऊल या शासनाने टाकले आहे. थोर स्वातंत्र्य सेनानी भाई कोतवाल यांच्या स्मारकासाठी गौरवग्रंथ व जीवन चित्रपटासाठी निधी उपलब्ध करुन या स्वातंत्र्य सेनानीला सरकारने मानाचा मुजराच केलेला आहे. भारतरत्न पंडित भीमसेन

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले...

जोशी यांच्या नावाने संगीत पुरस्कार, शिष्यवृत्ती, शास्त्रीय संगीत महोत्सव, संगीत गुरुकुल उभारुन एका महान कलाकाराप्रती शासनाने एक स्तुत्य कार्यक्रम हाती घेतलेला आहे. आपल्या सांस्कृतिक ठेव्याची जपणूक होण्यासाठी केलेले हे काम खरोखरच अभिनंदनीय आहे.

सभापती महोदय, मराठी भाषा विभागाच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे अतिशय आग्रही असतात, त्याप्रमाणे आम्ही सर्व सदस्य देखील या विषयाच्या बाबतीत आग्रही असतो. यासाठी 15 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. ती तरतूद काही प्रमाणात अपुरी वाटते असे मला येथे नमूद करावेसे वाटते. मराठी भाषा भवनाच्या या कामास लवकरात लवकर सुरुवात करावी अशीही माझी शासनाला विनंती आहे. प्रश्न हा मायबोलीपुरता कधीच नसतो. भाषेशी संस्कृती जोडलेली असते. दुर्मिळ ग्रंथांचे युनिकोडमध्ये रुपांतरीत ई-बुक तयार करुन ऑनलाईन उपलब्ध करुन देणे, विश्वकोश निर्मिती मंडळाकडून प्रकाशित करण्यात आलेले खंड इंटरनेटवर उपलब्ध करुन देणे, या बाबी अत्यावश्यक आहे. परंतु त्याही पलीकडे हा विषय शीघ्र गतीने न्यावयास हवा. मात्रृभाषा ही व्यवहाराची भाषा, न्यायाची भाषा, शिक्षणाची भाषा अशा अनेक अंगांनी विकसित झाली तरच काही साध्य होईल. यासाठी मराठी भाषा विभागाबद्दल नवा विचार देण्याची आवश्यकता आहे आणि शासन त्याकडे लक्ष पुरवील असाही मला विश्वास वाटतो.

महोदय, या ठिकाणी मला मुद्दाम नमूद करावयाचे आहे की, शिक्षणाच्या बाबतीमध्ये आपण मराठीचा सारखा उल्लेख करतो, शिक्षणाच्या माध्यमाची चर्चा करताना त्यावेळी फक्त मातृभाषेची तरफदारी करतो आणि प्रत्यक्षात आपल्या राज्यातही तसे होताना दिसत नाही. हा काही केवळ सांस्कृतिक प्रश्न नाही. शिक्षणाने ज्या पुढल्या संधी मिळतात, त्या इंग्रजीसाठी अधिक आणि प्रादेशिक माध्यमांमध्ये शिकलेल्यांना कमी अशी धारणा बळावत चालली आहे. पण माध्यमावर आधारित हा नवा वर्गभेदच आपण मुलांच्या माथी मारतो आहोत, ही गोष्ट थांबवावयाला हवी. केवळ भाषेच्या प्रश्नावर नाही, तर आपण ज्या तऱ्हेने मराठी आणि मातृभाषा हा विषय बोलतो, हा त्यातील महत्वाचा भाग आहे. त्यामुळे या विभागाकडे शासनाने अधिक लक्ष द्यावे, अशी माझी शासनाला विनंती आहे.

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले.....

सभापती महोदय, महसुली सीमा भागातील नागरिकांचा विषय हा माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाप्रमाणे अर्थसंकल्पीय भाषणात देखील सर्वात शेवटी अंतर्भूत केला जातो. सीमा भागातील नागरिकांचे जीवन उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे. सांस्कृतिक जीवन, राहणीमान आणि भाषेविषयीचा आग्रह, संस्कृतीविषयीचा आग्रह याचे खच्चीकरण होत आहे. हे थांबविण्यासाठी अथक प्रयत्न शासनाकडून झाले पाहिजेत अशी या निमित्ताने मला विनंती करावीशी वाटते.

सभापती महोदय, महाराष्ट्राच्या विकासाला नवी दिशा देणारे स्व.यशवंतराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष साजरे होत आहे. म्हणून "महाराष्ट्र काल, आज आणि उद्या" या कालखंडातील हा अतिशय महत्वाचा टप्पा आहे. हे वर्ष साजरे करण्यासाठी मोठी तरतूद केली आहे. परंतु यामधून काही मूलभूत आणि चिरंतन स्वरुपाची उभारणी यावर्षी होण्याची नितांत आवश्यकता आहे. त्या दृष्टीने थोर कवी कै.ग.दि.माडगूळकर यांनी स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या कार्य कर्तृत्वाबद्दल बोलताना त्यांच्या संपूर्ण चारित्र्याला "यशवंतायन" या नावाने संबोधले होते. त्याच नावाने टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसच्या धर्तीवर एक समाजशास्त्र आणि राज्यशास्त्राचे शिक्षण देणारी राज्यव्यापी संस्था उभारली गेली तर त्याचा या महाराष्ट्राला अतिशय चांगला उपयोग होईल.

सभापती महोदय, सांस्कृतिक क्षेत्राच्या ज्यावेळेला आपण गोष्टी करतो त्या वेळेला मला एका गोष्टीचा आवर्जून उल्लेख करावयाचा आहे. जी स्मारके शिक्षणासाठी किंवा समाजकार्यासाठी किंवा देश कार्यासाठी आपण उभारली आहेत, त्याचप्रमाणे सांस्कृतिक आणि कलेच्या क्षेत्राकडेही शासनाने पुरेसे लक्ष दिले पाहिजे.

सभापती महोदय, राष्ट्रपती पुरस्कार विजेत्या तमाशा सम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर यांच्या निधनानंतर पुणे जिल्हयात नारायणगाव येथे त्यांचे भव्य स्मारक उभारण्याचे तसेच त्यांच्या नावाने एक महोत्सव भरविण्याचे शासनाने 2002 साली घोषित केले होते. परंतु गेल्या 10 वर्षात स्मारक उभारण्यासाठी शासकीय यंत्रणेकडून काहीच हालचाल झालेली नाही. तमाशा या लोककलेचा वारसा पुढे चालविण्यासाठी हे स्मारक लवकरात लवकर उभारणे आवश्यक आहे. राज्य शासनाने या बाबीकडे लक्ष द्यावे अशी माझी विनंती आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले.....

सभापती महोदय, या अर्थसंकल्पावरील चर्चेच्या निमित्ताने अनेक माननीय सदस्यांनी भाषण करीत असताना इतर राज्याशी तुलना करुन महाराष्ट्र कुठे आहे याचा मागोवा घेतला आहे. शेवटी असे म्हणावेसे वाटते की,

बहु असोत सुंदर संपन्न की महान

प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा.

हा महाराष्ट्र देशाइतका मोठा आहे. या अर्थसंकल्पातून तो अधिक गतिमान होईल, अधिक प्रगतीशील होईल आणि अधिक सामाजिक न्याय व्यवस्थेचा होईल असा विश्वास वाटतो. म्हणून पुन्हा एकदा शासनाचे आणि माननीय अर्थमंत्र्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो आणि माझे भाषण संपवितो.

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.दिलीपराव सोनवणे (नाशिक विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन 2012-2013 च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी आणि माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार आणि माननीय अर्थराज्यमंत्री श्री.राजेंद्र मुळक यांनी 2012-2013 चा अर्थसंकल्प सादर केल्याबद्दल मी त्यांचे मनापासून स्वागत करतो आणि समर्थन करतो. महाराष्ट्राचे शिल्पकार आणि भारताचे माजी उप पंतप्रधान स्व.यशवंतराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष साजरे करण्याकरिता 100 कोटी रुपयांची तरतूद केली आहे, त्याबद्दल मी मनापासून शासनाला धन्यवाद देतो. हा अर्थसंकल्प सर्वसामान्य माणसाला दिलासा देणारा आहे. शेतकऱ्यांसाठी भरीव तरतूद करणारा, शेतकऱ्यांना न्याय देणारा अर्थसंकल्प आहे. शेतकरी आणि सर्वसामान्य माणसांना डोळयासमोर ठेवून शेवटच्या माणसापर्यंत निधी पोहोचविण्याचा प्रयत्न केला आहे. ऐपत असणाऱ्यांकडून कर घेणारा आणि ती रक्कम गरीब माणसांना देणारा हा अर्थसंकल्प आहे.

सभापती महोदय, एकंदरीत अधिक करवाढ न करता विकास कामांना शक्य तेवढा निधी देण्याचा प्रयत्न माननीय अर्थमंत्र्यांनी केला त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो व त्यांचे आभार मानतो. या अर्थसंकल्पामध्ये गॅस सिलिंडरवर 5 टक्के कर आकारण्यात आला आहे. ही करवाढ रद्द करावी अशी मी त्यांना विनंती करतो.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. दिलीपराव सोनवणे .....

महोदय, जीवनावश्यक वस्तू, तांदूळ, गहू, डाळी, हळद, मिरची, चिंच, गूळ, नारळ, धने, मेथी, पापड तसेच सोलापुरी चादर, टॉवेल इ. वस्तुंवरील करांची सूट 31 मार्च, 2013 पर्यंत कायम केली आहे. तसेच चहावरील 5 टक्के सवलतीच्या दरालाही मुदतवाढ दिली आहे. तसेच लिखाणाचे साहित्य, फळे, ड्राईंग बोर्ड, खोड रबर, स्टॅपलर, पेन, स्केचपेन इ. साहित्यावरील कराचा दर साडेबारा टक्क्यावरुन 5 टक्क्यावर आणला. कुक्कुटपालन तसेच उद्योगासाठीच्या यंत्रावरील कर, सॅनेटरी नॅपकीन, रेनकोट, हेल्मेट, रिबीन, बो, काजळ, बांबूपासून तयार होणाऱ्या वस्तू, खनिज मीठ इ. वस्तुंवरील कर सुध्दा साडेबारा टक्केऐवजी 5 टक्के केला आहे. तेल घाणीतून उत्पादन होणारे तेल व पेंड याची वार्षिक उलाढाल 20 लाखपर्यंत असेल तर त्याला सूट देण्यात आली असून सुतावरील कराचा दर 5 टक्क्यावरुन 2 टक्क्यावर आणला आहे. अशा प्रकारे शेतकरी, कामगार, विद्यार्थी, महिला, लहान व्यापारी, दलित मागासवर्गीय यांच्यासाठी पूरक असलेला हा अर्थसंकल्प मांडल्याबद्दल मी माननीय अर्थ मंत्र्यांचे अभिनंदन करतो व आभार मानतो.

महोदय, या अर्थसंकल्पात कृषी क्षेत्रावर अधिक लक्ष केंद्रीत केले असून शेतीसाठी सर्वाधिक साडेसहा हजार कोटीची तरतूद केली आहे. मागील अधिवेशनात कबूल केल्याप्रमाणे कापूस, धान व सोयाबीन उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी 2000 कोटीची तरतूद व शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर ही मदतीची रक्कम जमा केली जाणार आहे. असे असले तरी नियमितपणे येणाऱ्या आपत्तीपासून सुटका करण्यासाठी अर्थसंकल्पात आपत्कालीन अर्थव्यवस्था करणे आवश्यक वाटते. शेतकऱ्यांना वीज दरात सवलत देण्यासाठी देखील शासनाने 2500 कोटीची तरतूद केली आहे. कोरडवाहू शेती विकासासाठी 200 कोटीचा अतिरिक्त नियतव्यय ठेवण्यात आला आहे. राष्ट्रीय कृषी विकास योजनेसाठी 415 कोटीची तरतूद केली आहे. एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमासाठी 105 कोटीची तरतूद केली आहे. कृषी विकासाच्या विविध उपक्रमांसाठी 284 कोटीची भरीव तरतूद शासनाने केली आहे. विदर्भातील 6 जिल्ह्यांमध्ये कृषी विकास प्रकल्पासाठी 40 कोटी 50 लाख एवढी राज्याचा हिस्सा म्हणून तरतूद केली आहे.

महोदय, शेतकऱ्यांच्या उत्पादन वाढीसाठी सिंचन अत्यावश्यक आहे. कोरडवाहू शेती पूर्णपणे पावसावर अवलंबून असते. कमी व अवेळी पडणारा पाऊस आणि अतिवृष्टी झाली तर

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. दिलीपराव सोनवणे .....

शेतकऱ्याला मोठा फटका बसतो व त्यामुळे तो नाऊमेद होता म्हणून सिंचनावर भर देणे ही काळाची गरज आहे. त्यामुळे सिंचनावर भरणे देणे आवश्यक असून अत्यावश्यक व रखडलेले प्रकल्प आणि अपूर्ण अवस्थेतील प्रकल्प पूर्ण करणे अत्यावश्यक असून त्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करुन दिला पाहिजे अशी माझी विनंती आहे.

महोदय, शासनाने राज्यातील सिंचन क्षमता वाढविण्यासाठी या अर्थसंकल्पात 2129 कोटीची तरतूद केली आहे. त्या माध्यमातून महाराष्ट्र जलसुधार कार्यक्रम, वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रम इ. कार्यक्रमांच्या माध्यमातून सिंचन क्षमता वाढविण्याचा प्रयत्न होत आहे. यासाठी या अर्थसंकल्पात 2129 कोटी 13 लक्ष इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला त्याबद्दल माननीय उप मुख्यमंत्र्यांचे आभार मानतो. त्याचबरोबर लघु पाटबंधारे प्रकल्पांची कामे पूर्ण करण्यासाठी 80 कोटीची तरतूद शासनाने केली असून त्या माध्यमातून 16 हजार 640 हेक्टर क्षेत्रात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष पाणी वापरता येणार आहे. एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत 3 हजार शेततळी व 18 हजार खुल्या विहिरींचे बांधकामचे उद्दिष्ट असून त्यासाठी अधिकची तरतूद करणे आवश्यक आहे. अशा प्रकारे अनेक तरतुदी या अर्थसंकल्पात करण्यात आल्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा देणारा हा अर्थसंकल्प असून त्याचे मी स्वागत करतो.

महोदय, पणन विषयक पायाभूत सुविधा उभारणीसाठी 65 कोटी 56 लाख खर्च अपेक्षित आहे त्यासाठी शासनाने प्रयत्न करावेत. विदर्भातील 6 जिल्ह्यांसाठी "उत्पादन ते पणन व्यवस्था" अंतर्गत 15 कृषी आधारित उप प्रकल्पांच्या अंमल बजावणीसाठी राज्याचा हिस्सा 40 कोटी 50 लाख एवढा असून ती तरतूद देखील शासनाने केली आहे. तसेच राज्यातील 100 कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये "कार्यक्षमता व पारदर्शकता" आणण्यासाठी 415 कोटीची तरतूद शासनाने केली आहे. दुधाळ जनावरांचे गट वाटपासाठी 35.65 कोटीची इतका निधी प्रस्तावित केला आहे. राज्यात महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना राबविण्यासाठी तसेच केंद्राची महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राबविण्यासाठी आपला हिस्सा 590 कोटी एवढी तरतूद शासनाने केली आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधित प्रत / शिक्षणासाठी नाही

प्रा.दिलीपराव सोनवणे ....

म्हणून मी माननीय अर्थमंत्र्यांचे मनापासून स्वागत करतो.

सभापती महोदय, शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा, अनु. जाती, अनु.जमाती, भटक्या विमुक्त जाती या वर्गासाठी असलेल्या योजनासांठी वाढीत तरतूद करण्यात आलेली आहे हे विशेष आहे.

सभापती महोदय, सर्व शिक्षा अभियानासाठी 759 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून शालेय पोषण आहार तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थाचे बळकटीकरण करण्यासाठी अर्थसंकल्पात 2.5 हजार कोटींची तरतूद करण्यात आलेली असून शिक्षण सेवकांच्या मानधनात करण्यात आलेल्या वाढीसाठी 173 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. मॅट्रीकोत्तर योजनेअंतर्गत अनु.जाती व इतर मागास वर्गीय विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी शासनाकडून अर्थ सहाय्य दिले जाते. या अर्थसंकल्पात 1230 कोटी 30 लाख रुपयांची तरतूद केली असल्यामुळे मी माननीय अर्थमंत्र्यांचे आभार मानतो.

सभापती महोदय, आदिवासी विद्यार्थी, आश्रमशाळा व वसतिगृहांच्या इमारतीसाठी अर्थसंकल्पात 400 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. शिक्षण क्षेत्रात अजून अधिकची तरतूद करावी अशी अपेक्षा करतो. ग्रंथालयाच्या अनुदानामध्ये 50 टक्के वाढ केलेली आहे व हा विशेष महत्वाचा भाग आहे असे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, रुग्णालय व कर्मचारी निवासी इमारतींच्या बांधकामासाठी अर्थसंकल्पात 260 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. गरीब रुग्णांना आरोग्य सेवा मिळावी म्हणून राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत विमा हप्ता, आरोग्य ओळख पत्र इ. कामांसाठी अर्थसंकल्पात 324 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, नवीन वैद्यकीय महाविद्यालये पुढील पिढीसाठी निश्चितपणे महत्वाची ठरतील. सर जे.जे. हॉस्पिटल येथे सुपर स्पेशालिटी रुग्णालय इमारत बांधकामासाठी 630 कोटींची तरतूद व आवश्यक तो नियतव्यय उपलब्ध करुन दिल्याबद्दल मी माननीय अर्थमंत्र्यांना निश्चितपणे धन्यवाद देतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. दिलीपराव सोनवणे ....

सभापती महोदय, यशवंतराव चव्हाण ग्रामीण सडक योजनेला पंतप्रधान ग्रामीण सडक योजनेच्या माध्यमातून ज्या गावांना जोडणे शक्य नाही असे तालुके खेडया-वस्त्यांना जोडण्याचा अतिशय महत्वपूर्ण निर्णय घेऊन या योजनेसाठी 100 कोटी रुपयांची तरतूद माननीय अर्थमंत्र्यांनी केल्यामुळे मी त्यांचे मनापासून आभार मानतो.

सभापती महोदय, ऊर्जा क्षेत्राच्या संदर्भात सन 2012 मध्ये वीज निर्मितीसाठी अर्थसंकल्पात 1500 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. ऊर्जा हा विषय शेतक-यांच्या व सामान्य जनतेच्या दृष्टीने महत्वाचा असल्यामुळे व माननीय अर्थमंत्र्यांनी या विषयाला न्याय दिल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

सभापती महोदय, माथेरान येथे भाई कोतवाल यांचे स्मारक, पंडित भीमसेन जोशी प्रोत्साहन योजना, लहान मुलांसाठी सांस्कृतिक केंद्र व रस्ते विकासाच्या संदर्भात 2899 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. पुनरुत्थान, नदीजोड कार्यक्रमासाठी भरीव अशी तरतूद अर्थसंकल्पात केलेली आहे. हा अर्थसंकल्प सर्वसामान्यांच्या दृष्टीने व शेतक-यांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा आहे.

सभापती महोदय, मुंबईसाठी देखील या अर्थसंकल्पात तरतूद केलेली असल्यामुळे मी या अर्थसंकल्पाचे स्वागत व समर्थन करतो. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार : सभापती महोदय, अर्थसंकल्पाच्या चर्चेवरील आजचा दुसरा दिवस असून उद्या तिसरा व शेवटचा दिवस आहे. त्या निमित्ताने माझी सभागृहाला विनंती आहे की, आज कितीही वेळ सभागृहात बसण्याची माझी तयारी आहे. उद्याच्या कामकाजात प्रश्नोत्तराचा तास 11 ते 12 या वेळेत होईल. दुपारी 12 ते 1 वाजेपर्यंत इतर कामकाज घेण्यात येईल. 1 ते 2 वाजेपर्यंत सदस्यांना भाषणासाठी वेळ देण्यात यावा व त्यानंतरचा वेळ माझ्या उत्तराच्या भाषणासाठी देण्यात यावा अशी विनंती आहे. चार वाजेपर्यंत या सभागृहात उत्तर दिल्यानंतर खालच्या सभागृहात जाऊन मला उत्तर द्यावे लागणार आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, अर्थसंकल्पाच्या चर्चेसाठी उद्या सकाळी 10 ते 11 या वेळेत विशेष बैठक घेतली तर योग्य होईल.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, राज्याच्या अर्थसंकल्पावर माझे मनोगत व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

मी शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागासंबंधी माझे काही विचार व्यक्त करणार आहे. राष्ट्रीय माध्यमिक शिक्षण अभियानासाठी केंद्राच्या हिश्यासह 500 कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. माध्यमिक शिक्षण अभियान या राज्यात चांगल्या प्रकारे सुरू आहे. यासाठी विविध शाळांमधील शिक्षकांसाठी प्रशिक्षण सुरू आहे. ते अत्यंत चांगल्या पद्धतीने सुरू आहे. याचे मुख्य कारण म्हणजे यशदा मार्फत शिक्षकांना प्रशिक्षण दिले जात आहे. यशदा मार्फत आमच्या शिक्षकांचे अत्यंत चांगल्या पद्धतीने प्रबोधन होत आहे. शिक्षकांना अनेक चांगल्या गोष्टी शिकायला मिळत आहेत. आपल्या दैनंदिन अध्यापनामध्ये त्यांना त्याचा खूप चांगल्या प्रकारे उपयोग होत आहे. या सभागृहात सातत्याने वेगवेगळ्या विषयावर चर्चा करीत असतो. शिक्षण क्षेत्रामध्ये गुणवत्ता वाढली पाहिजे अशा प्रकारची शासनाकडून आमच्या शिक्षकांकडून अपेक्षा आहे आणि ती रास्त आहे. गुणवत्ता विकास करावयाचा असेल, या क्षेत्रात चांगले वातावरण निर्माण करावयाचे असेल तर यशदा मार्फतच प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे.

मध्यान्ह भोजनासाठी 1534 कोटी रूपयांची तरतूद केली आहे. ही तरतूद अनुदानित शाळांसाठी आहे. आज राज्यातील आदिवासी, ग्रामीण, झोपडपट्टी भागामध्ये शासनाचे अनुदान मिळत नसलेल्या अनेक विनाअनुदानित शाळा आहेत. त्या भविष्यामध्ये अनुदानित होतील. अशा विनाअनुदानित शाळांमध्ये शिकणारे ग्रामीण भागातील आमचे विद्यार्थी आहेत त्यांना या मध्यान्ह भोजनाचा लाभ मिळत नाही. केंद्र शासनाच्या योजनेमुळे अनुदानित शाळांच्या व्यतिरिक्त इतर शाळांना मध्यान्ह भोजन देय नसेल तर शासनाने काही तरी तरतूद करून, कुठे तरी खर्चाला कैची लावून गोरगरिबांच्या मुलांना मध्यान्ह भोजनाची सुविधा उपलब्ध करून दिली पाहिजे. पण त्यासाठी या अर्थसंकल्पामध्ये कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही.

सभापती महोदय, मला एका गोष्टीचा आनंद वाटतो. वीर हुतात्मा भाई कोतवाल यांच्या कार्याची ओळख व्हावी म्हणून त्यांच्या स्मारकासाठी एक कोटी निधीची तरतूद करण्यात आली आहे. त्यांचे माथेरान येथे निवासस्थान आहे. ते वादग्रस्त होते. काही लोकांनी त्यावर कब्जा केला

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

होता. पण नुकतेच त्यांच्या नातेवाईकांच्या ताब्यात ते घर मिळाले आहे. त्यांच्या राहत्या घराचे स्मारकामध्ये रूपांतर होईल. ते घर जतन केले जाईल. यासाठी 1 कोटी इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. उशिरा का होईना पण वीर हुतात्मा भाई कोतवाल यांचा शासनाने गौरव केलेला आहे त्याबद्दल मी मनापासून धन्यवाद देतो. वीर हुतात्मा भाई कोतवाल यांची प्राणज्योत जेथे मालवली, जेथे त्यांना वीर मरण आले त्या सिद्धगडावर त्यांचे स्मारक आहे. दरवर्षी जानेवारीला सभापती महोदय आपण आणि माननीय पालक मंत्री तसेच हजारो माणसे त्यांना वंदन करण्यासाठी सकाळी 5.45 वाजता उपस्थित असता. सिद्धगडावरील स्मारकाकडे जाण्यासाठी रस्ता आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार (खाली बसून) : यासाठी किती खर्च येणार आहे ?

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, यासाठी 5-25 लाख रुपयांचा खर्च येणार आहे. तेथे जाण्या-येण्यासाठी रस्ता करावा लागेल आणि त्याठिकाणी वीर कोतवाल यांचे जे स्मारक आहे ते महत्वाचे आहे.

श्री.अजित पवार (खाली बसून) : त्याठिकाणी मालकी कोणाची आहे ?

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, तेथील मालकी शासनाची आहे. हे स्मारक डोंगरावर आहे.परंतु दरवर्षी पावसामध्ये रस्ता वाहून जातो आणि प्रत्येक वेळी तेथे रस्ता तयार करावा लागतो त्यामुळे याबाबतीत सुध्दा विचार होण्याची आवश्यकता आहे. पण त्याचबरोबर वीर हुतात्मा कोतवाल यांच्याबरोबरचे त्यांचे सहकारी श्री.हिराजी पाटील यांचेही स्मारक उभारण्याच्या संदर्भात विचार होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, ग्रंथालयांचे परिरक्षण करण्यासाठी अनुदानामध्ये 50 टक्के वाढ केलेली आहे.यामध्ये जास्त वाढ करण्यात यावी अशी संबंधितांची अपेक्षा होती पण 50 टक्के वाढ करण्याच्या बाबतीत शासनाने विचार केलेला आहे म्हणून मी मनापासून त्यांना धन्यवाद देतो. या राज्यात अशा प्रकारे वाचन संस्कृती विकसित करणारी अनेक ग्रंथालये आहेत. आमच्या भिवंडी शहरामध्ये 150 वर्षे पूर्ण झालेले एक ग्रंथालय आहे आणि त्यांनी 150 वर्षे वाचन संकृतीचा विकास केलेला आहे. अशा अत्यंत जुन्या वर्षानुवर्षे काम करणाऱ्या ग्रंथालयांना आर्थिक मदत देणे गरजेचे आहे. याबाबतीत संबंधित ग्रंथालयांना आणि भिंवंडीमधील ग्रंथालय आपल्या मतदार संघामध्ये असल्याने या ग्रंथालयासाठी काही मदत मिळावी म्हणून मी स्वत: शासनाकडे विनंती केली होती. त्याचाही विचार करण्यात यावा.

सभापती महोदय, शिक्षण सेवकांच्या मानधन वाढीसाठी 173 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे, ही चांगली गोष्ट आहे. त्यामुळे यामध्ये जी काही वाढ झाली आहे, त्यातून शिक्षण सेवकांना त्याचा लाभ होऊ शकेल.

श्री.अजित पवार (खाली बसून) : फक्त मुलांना चांगले शिकवावे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, आम्ही मुलांना चांगले शिकवत आहोत. म्हणून मी सुरुवातीला उल्लेख केला की, खऱ्या अर्थाने गुणवत्ता विकासासाठी यशदा मार्फत आमचे प्रशिक्षण घ्यावे.आमची सर्व प्रकारचे प्रशिक्षण घेण्याची तयारी आहे.शिक्षकांच्या मानधन वाढीबरोबर शिक्षकेतर कर्मचारी सुध्दा आज कंत्राटी पध्दतीवर काम करीत आहेत. शिक्षण सेवकांचे मानधन वाढविताना ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3 चे 6 हजार केले, 4 चे 8 हजार केले आणि 5 चे 9 हजार केले. पण शिक्षकेतर कर्मचारी, जे 3 वर्षे कंत्राटी पध्दतीवर शिक्षण सेवकांसारखेच काम करतात, त्यांच्या तसेच लपिक आणि चतुर्थश्रेणी कर्मचारी यांच्या मानधनामध्ये वाढ करण्याच्या बाबतीत शासनाने निर्णय घेतलेला आहे, पण त्याची तरतूद केलेली नाही. यासंदर्भात सुध्दा तरतूद व्हावी अशी विनंती आहे. शिक्षकांचे मानधन वाढले पण शिक्षकेतर कर्मचारी सुध्दा तीन वर्षे कंत्राटी पध्दतीने काम करीत आहेत, त्यांच्या मानधनामध्ये .....

एक सन्माननीय सदस्य (खाली बसून) : ही पध्दत बंद करा.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, ही पध्दत बंद करावी हा मूळ विषय आहे. पण शासन आपले ऐकण्यास तयार नाही. पण किमान त्यांच्या मानधनामध्ये तरी वाढ करावी अशा प्रकारची मी अपेक्षा व्यक्त करतो. तसेच यामध्ये शिक्षकांना समाविष्ट केले पण शिक्षकेतर कर्मचारी राहिलेले असल्याने त्यांचाही विचार होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, औद्योगिक संस्थांच्या बळकटीकरणासाठी 28 कोटी रुपयांची तरतूद केलेली असून ही चांगली गोष्ट आहे.पंरतु एक गोष्ट मी या चर्चेच्या निमित्ताने सन्माननीय वित्त मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये ज्यांची उच्च शिक्षण घेण्याची क्षमता नाही अशा गोरगरिबांची मुले, मागासवर्गीय विद्यार्थी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये शिक्षण घेत आहेत. पण त्यांना मिळणारे विद्यावेतन हे 40 रुपये आणि 60 रुपये आहे आणि त्यातही असे आहे की, जर त्यांची उत्पन्नाची मर्यादा 12 हजार रुपयापेक्षा जास्त असेल तर समाजकल्याण विभागाचे अधिकारी मागास वर्गीयांना सुध्दा विद्यावेतन देत नाहीत. याबाबतीत त्यांचे चुकीचे इंटरप्रिटेशन आहे किंवा हे चुकीचे धोरण आहे. आपण इतर संस्थांसाठी ही मर्यादा 1 लाखापर्यंत वाढविलेली असताना औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसाठी ही मर्यादा 12 हजारापर्यंतच का ठेवण्यात आली आहे असा मुद्दा आहे. त्यामुळे याठिकाणी देखील ही मर्यादा एक लाखापर्यंत वाढवून मागासवर्गीय विद्यार्थ्यांना न्याय देण्याची आवश्यकता आहे. यासंदर्भात सुध्दा निर्णय घेण्यात यावा.

सभापती महोदय, माझा शेवटचा मुद्दा हा सीमा भागातील मराठी भाषिकांसाठी जी 5 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे त्याबाबत आहे. मात्र सीमा भागातील मराठी भाषिकांची फार मोठी अडचण झालेली आहे. तेथील मागासवर्गीयांना कर्नाटक राज्य व्हॅलिडीटी सर्टीफीकेट देत नाही, जातीचे प्रमाणपत्र मिळत नाही आणि जर जातीचे प्रमाणपत्र मिळाले तर ते लोक सीमा भागामध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते . . . .

रहात असल्यामुळे महाराष्ट्रातील अधिकाऱ्यांकडून त्यांना व्हॅलिडिटी सर्टीफीकेट मिळत नाही. त्यामुळे सीमा भागातील मागासवर्गीय विद्यार्थी जे उच्च शिक्षण घेऊ इच्छितात, त्यांच्या व्हॅलिडीटीच्या आणि जात प्रमाणपत्राच्या बाबतीत गंभीर मुद्दा निर्माण झालेला आहे. त्यामुळे अनेक जण इच्छा असूनही शिक्षण घेऊ शकत नाहीत. म्हणून या चर्चेच्या निमित्ताने मी हा विषय देखील शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. याबाबतीत शासनाने विचार करण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते...

सभापती महोदय, ज्यांनी खऱ्या अर्थाने समर्पित भावनेने काम केले, गोरगरिबांच्या मुलांच्या शिक्षणाची सोय केली, जे खऱ्या अर्थाने शिक्षण महर्षी होते ते आदरणीय कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत संस्थेस पाच कोटी रुपये दिले ही आनंदाची गोष्ट आहे. लट्ठे शिक्षण संस्थेस 60 लाख रुपये दिले हा सुध्दा स्तुत्य निर्णय आहे. परंतु या मुंबईमध्ये शिक्षणक्षेत्रात 100 वर्षांपेक्षा अधिक वर्षे काम करीत असलेली सोशल सर्व्हीस लीग संस्था आहे, या संस्थेने आतापर्यंत चांगले काम केलेले आहे. त्या शिवाय दादर येथील छबिलदास हायस्कूल आहे. या शाळेमुळे नाट्यक्षेत्राला एक वेगळे वळण मिळाले आहे. या छबिलदास हायस्कूलला देखील 100 वर्षे होऊन गेलेली आहे. सोशल सर्व्हीस लीग संस्था, जनरल एज्युकेशन सोसायटीची छबिलदास हायस्कूल, या संस्थांनी ग्रामीण भागामध्ये, आदिवासी भागामध्ये शिक्षणाचे जाळे निर्माण केलेले आहे. तेव्हा शिक्षणक्षेत्रात 100 वर्षाहून अधिक वर्षे योगदान देणाऱ्या संस्थांना शासनाने काही तरी मदत करण्याची आवश्यकता आहे, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पामध्ये शिक्षणासाठी तरतूद केलेली आहे. ज्या शाळांचा "कायम" शब्द जाऊन त्या आता विनाअनुदानित तत्वामध्ये येणार आहेत, त्या शाळांसाठी अनुदानाची तरतूद होईल अशी आमची अपेक्षा होती. माननीय उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री महोदयांना हा विषय माहीत आहे. या संदर्भात त्यांच्याशी अनेकवेळा चर्चा झालेली आहे. वेतनेतर अनुदानाचा प्रश्न अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे. आम्हाला त्यांची भूमिका सकारात्मक वाटली होती. या अर्थसंकल्पामध्ये संस्थाचालकांचे कंबरडे मोडलेले आहे. त्यांना वेतनेतर अनुदान देण्या संदर्भात खूप अपेक्षा होत्या,पण त्याचा उल्लेख अर्थसंकल्पामध्ये झालेला नाही. तेव्हा त्याबाबत विचार व्हावा अशी विनंती करतो आणि आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी सन 2012-2013 च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेवर बोलण्यासाठी उभी आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणी अहवालामध्ये जे निष्कर्ष आलेले आहेत त्यावरुन शासनाने आपल्या धोरणामध्ये काही बदल करणे गरजेचे आहे असे मला वाटते. शेतीच्या उत्पादनामध्ये घट झालेली आहे. त्याच बरोबर औद्योगिक क्षेत्रातील दर कमी जाणवत आहे.आर्थिक पाहणी अहवालातून आलेल्या निष्कर्षावरुन आपली वाटचाल योग्य नाही असे म्हटल्यावर आपणास योग्य मार्गावर जाणे हा खऱ्या अर्थाने प्रगतीकडे जाणारा मार्ग असतो. किंवा एखादे औषध लागू पडत नसेल तर औषध बदलून पाहणे मार्ग असतो. परंतु आर्थिक पाहणी अहवालातील अनेक निष्कर्ष आपल्याला न आवडणारे, अप्रिय किंवा अयोग्य असले तरी सुध्दा गेल्या वर्षी प्रमाणेच अर्थसंकल्प जाहीर केलेला आहे. आपल्यापुढे जी काही आव्हाने आहेत त्याकडे प्रथम मी आपले लक्ष वेधते.

सभापती महोदय, आज मोठ्या प्रमाणावर बनावट चलन भारतामध्ये आणि खास करुन महाराष्ट्रामध्ये आले आहे. गुप्तचर विभागाच्या सर्व्हेक्षणानुसार देशभरात 12 लाख कोटी रुपयांच्या बनावट नोटा चलनात आलेल्या आहेत. त्याचे वितरण मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर, नाशिक, सातारा, सोलापूर, ग्रामीण कोल्हापूर, वाशिम, जळगाव व नंदूरबार येथून होत आहे. बनावट चलनाच्या आधारे समांतर अर्थव्यवस्था चालविली जात असेल तर आपण कशाप्रकारे आर्थिक डोलारा उभा करणार हा महत्वाचा प्रश्न आहे.

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे. . .

सभापती महोदय, 55 कोटी रुपयाचा महसूल देणाऱ्या मुंबईची अर्थसंकल्पात उपेक्षाच झालेली आहे. सन्माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांची शिवसेना कार्यकारी प्रमुख श्री. उध्वजी ठाकरे यांनी भेट घेतली होती त्यावेळी सन्माननीय उप मुख्यमंत्री उपस्थित नव्हते. त्यावेळी मुंबईच्या संदर्भामध्ये अनेक प्रश्नावर चर्चा झाली. माननीय उप मुख्यमंत्री आज सभागृहात उपस्थित आहेत त्यामुळे त्यातील काही मुद्दे अगदी थोडक्यात या ठिकाणी मांडणे मला आवश्यक वाटते. गेल्या दहा वर्षात मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र राज्य यांची समन्वयासाठी बैठकच झालेली नाही. जे प्रश्न प्रलंबित आहेत त्यासाठीचे पंधराशे कोटी रुपये राज्य शासनाकडून मुंबई महानगरपालिकेला येणे आहे. हे येणे कशा पध्दतीने देण्यात येणार आहे, याचा खुलासा करण्यात यावा. बेस्ट बस सेवेला करातून वगळणे या मुद्यावर देखील चर्चा झालेली आहे. ज्याप्रमाणे महाराष्ट्र परिवहन महामंडळाच्या बाबतीत कनवाळू दृष्टिकोन घेत असतो त्याचप्रमाणे या मुंबई शहरासाठी बेस्ट बससेवा अधिक चांगल्या रीतीने उपलब्ध करुन देण्यासाठी या बेस्टला वेळोवेळी जी तूट आलेली आहे त्या संदर्भात राज्य शासन काय भूमिका घेणार आहे हा एक प्रश्न आहे.

सभापती महोदय, मुंबईत एमएमआरडीए तयार करण्यात आले आणि पुण्यात पीएमआरडीए तयार करण्यात आले. विशेषत: मुंबई शहरामध्ये जी कामे महानगरपालिकेला करणे शक्य आहे त्यासाठी परवानगी देण्याचा प्रश्न आहे. अर्थसंकल्पातील मुद्द क्रमांक 54 मध्ये मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाबाबत उल्लेख केलेला आहे. 5300 कोटी रुपया पैकी वांद्रे-वरळी सी-लिंक शिवाय वर्सोवा ते मरीनलाईन्स या प्रॉजेक्टसाठी काही तरतूद करण्यात आलेली आहे. एमएमआरडीएच्या माध्यमातून 710 कोटी रुपये अपेक्षित खर्च असून 355 कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे अर्थसंकल्पीय भाषणातील मुद्दा क्रमांक 55 मध्ये असे म्हटलेले आहे की,11 रस्ते, 3 रेल्वे उड्डाणपूल, 8 उड्डाणपूल व 3 पुलांची कामे हाती घेतलेली आहेत. मुंबईत वाहतुकीच्या सुविधा करीत असताना एममएआरडीए आणि राज्य शासनाने मुंबई महानगरपालिकेला विश्वासात घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील भूमीपुत्रांना जो न्याय अपेक्षित आहे तोच मुंबईतील कोळीवाडे असतील किंवा अन्य जे-जे उपक्रम असतील त्यामध्ये सुध्दा अपेक्षित आहे. त्या खेरीज मुंबईच्या पाण्याच्या योजनांचा प्रश्न प्रलंबित आहे. ठाणे जिल्ह्यातील शाई, काळू, गार्गाई, पिंजाळ आणि सुसरी या धरणांचे काम सन 2006 साली सुरु होऊन ते 2016 पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे. . .

होते. परंतु 2012 साल उजाडले तरी या एकाही धरणाचे काम सुरु झालेले नाही. नेहमी विरोधी पक्षावर अशी टिका केली जाते की, आम्ही विकासाला विरोध करतो परंतु धरणग्रस्तांचे पुनर्वसन करण्यात शासनाला अपयश आल्यामुळे ठिकठिकाणच्या धरणग्रस्तांची नाराजी किंवा राज्य शासनाबद्दल त्यांच्या मनामध्ये संशय निर्माण झालेला आहे. त्यामुळे सुध्दा पाणी प्रश्नाच्या संदर्भात मोठा संघर्ष ठिकठिकाणी उभा राहत आहे. पिंपरी-चिंचवड येथे पाण्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. पुण्यामध्ये सुध्दा बंद जलवाहिनीतून वरसगाववरुन पाणी नेता येईल. बंद वाहिनीतून पाणी नेले तर त्यासाठी किती खर्च येईल? थोडक्यात सांगावयाचे झाले तर पाण्याचा वापर चांगल्या प्रकारे करण्याच्या योजना प्रलंबित रहात आहेत त्या संदर्भात कार्यपध्दती बदलण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, पायाभूत सुविधांचा उल्लेख पुन:पुन: अर्थसंकल्पात करण्यात येतो. मोठया शहरांसाठी पायाभूत सुविधा निर्माण झाल्या पाहिजेत असे आपण म्हणतो परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, महाराष्ट्रामधील 40 शहरांचे विकास आराखडे म्हणजे डी.पी.प्लॅन मंजूरच झालेले नाहीत. 40 शहरांचे विकास आराखडे नगरविकास विभागाकडे प्रलंबित असतील तर शासन पायाभूत सुविधांसाठी जो खर्च करणार आहे तो कशा पध्दतीने प्रत्यक्षात अंमलात येईल या बद्दलचे एक फार मोठे आव्हान समोर उभे राहिलेले आहे. सामाजिक क्षेत्र देखील या अर्थसंकल्पात उपेक्षित आहे. विशेषत: मी ज्येष्ठ नागरिकांचा उल्लेख करु इच्छिते. ज्येष्ठ नागरिकांसाठी ज्या योजना अपेक्षित होत्या त्या यामध्ये घेण्यात आलेल्या नाहीत. तसेच काही नवीन योजना करावयास पाहिजे होत्या व त्याचा उल्लेख अर्थसंकल्पीय भाषणात करावयास पाहिजे होता तो केलेला दिसत नाही ही वस्तुस्थिती आहे. सन्माननीय खासदार श्रीमती सुप्रिया सुळे यांनी सर्व आमदार आणि खासदारांना एक पत्र दिले. मला असे वाटते की, त्यांचे म्हणणे माननीय उप मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहचले असेलच. कुपोषणग्रस्त भागामध्ये शासनाने काय-काय करावे याबाबतची एक मोठी नियमावली त्यांनी दिलेली आहे. याबद्दल आम्ही त्यांनाही सांगितले आणि माननीय मुख्यमंत्र्यांनाही सांगितले की, तुम्ही बहीण भावांनी मिळून ...

श्री. अजित पवार (बसून) : सन्माननीय खासदार सुप्रिया सुळे यांचे म्हणणे आमच्यापर्यंत चांगल्या रीतीने पोहचते. आमच्यामध्ये काही मतभेद नाहीत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : मतभेद आहेत असे मी म्हटलेच नाही. बहीण-भावांनी मिळून या कुपोषणग्रस्त बालकांची जबाबदारी घेतली तर महाराष्ट्राचे खूप भले होईल असे मला वाटते. मी अतिशय चांगल्या हेतूने बोलत आहे. माननीय उप मुख्यमंत्री या संदर्भात काम करणार असतील तर त्यांनी हे मनाला लावून घेण्याचे कारण नाही. सन्माननीय खासदार श्रीमती सुप्रिया सुळे यांचे निवेदन माननीय मुख्यमंत्र्यांकडे देऊन त्याची अंमलबजावणी होते की नाही या बाबत आम्हाला समजले नाही तर ते माननीय उप मुख्यमंत्र्यापुढे मांडणे हे आमचे काम आहे आणि

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

आपण ते धडाक्याने पूर्ण केले पाहिजे आणि सुप्रियाताईंचे पुढचे पत्र आले पाहिजे की, अशा अशा पध्दतीने कुपोषण कमी झाले. या मध्ये मी सरळ पध्दतीने मांडणी केलेली आहे असे मला वाटते.

उप सभापती : आपण सांगितले की, कुपोषणाच्या बाबतीत दोन्ही बहीण भावांनी जबाबदारी घ्यावी. आपण त्या दोन भावांची जबाबदारी घ्यावी.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, ते जे दोन भाऊ आहेत ते ज्यांचे ऐकतात ते शिवसेनाप्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे त्या संदर्भामध्ये समर्थ आहेत. आपण त्याबद्दल चिंता करीत आहात त्याबद्दल मी आपल्या सदिच्छेचा आदर करते.

उप सभापती : मी सद्भावनेने बोललो.

डॉ. नीलम गोऱ्हे : मी आपल्या सदिच्छांचा आदर करते. मी आपल्याला जरुर सांगेन की, त्या संदर्भात काय घडेल आणि काय घडणार नाही हे बोलण्याची ही जागा नाही. परंतु हा विषय आपल्या लक्षात आहे त्याबद्दल मी आपली आभारी आहे. सभापती महोदय, एका महत्वाच्या मुद्याची सातत्याने चर्चा होते. गेल्या अर्थसंकल्पामध्ये आपण वडापाव आणि राळ यावरचा कर कमी केला होता म्हणून काही संबंधित संघटनांनी वित्त विभागाला विचारले की, गेल्या वेळी वडापाववरची जी करमाफी झाली त्याचा राज्याच्या वित्त विभागावर एकूण काय परिणाम झाला ? हे आपल्या खात्यामध्ये कोणालाही माहीत नाही. जर माहीत नसेल तर उद्या आम्हाला विदित करुन द्यावे जेणेकरुन यावेळी आपण शैक्षणिक साहित्य, लिफाफे, रिबीन, बो, काजळ यावरचा जो कर कमी केला आहे त्यामुळे राज्य शासनाला नक्की किती तोटा होतो किंवा फायदा होतो याचे चित्र स्पष्ट दिसू शकेल.

सभापती महोदय, एक महत्वाचा मुद्दा असा आहे की, तीन महिन्याचे अन्नधान्य दिले जाणार आहे. त्याबद्दलचा हेतू चांगला आहे. फूड स्टॅम्पची एक कल्पना पुढे आलेली आहे. महिला तीन महिन्याचे धान्य कोठे ठेवणार ? कुटुंबामध्ये जर दारुडे लोक असतील तर ते धान्य विकून मोकळे होतील. म्हणून नाशिकचे एक अभ्यासक श्री. मिलिंद मुरुगकर यांनी फूड स्टॅम्पची कल्पना वारंवार केंद्र शासनाकडे आणि राज्य शासनाकडे मांडलेली आहे. त्याबद्दल सुध्दा विचार झाला पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

पोलिसांच्या संदर्भामध्ये जरी तरतूद केली असली तरी आम्ही या विधान भवनात येण्यासाठी पुण्याहून निघाल्यापासून आम्हाला सातत्याने पोलिसांचे फोन येत आहेत की, गेल्या तीन महिन्यांपासून पोलिसांना विलंबाने वेतन मिळत आहे. पूर्वी दर महिन्याच्या 1-2 तारखेला जे वेतन मिळावयाचे ते आता 15 तारखेला मिळते आणि देयकांचे संगणकीकरण केल्यामुळे हा विलंब होतो. ही अतिशय गंभीर बाब आहे. जे पोलीस दिवसरात्र आपले रक्षण करीत आहेत त्यांना वेळेवर पगार देणे ही आपली किमान जबाबदारी आहे. पुणे शहराचा विचार करावयाचा झाला तर त्या ठिकाणी पोलिसांची 1200 पदे रिक्त आहेत. पुणे आणि पिंपरी-चिंचवड मिळून आज 43 लाख लोकसंख्या आहे. पण त्या ठिकाणी 2 अपर पोलीस आयुक्त, 1 पोलीस उपायुक्त, 79 पीएसआय, 226 उपनिरीक्षक, 96 पोलीस हवालदार, 133 पोलीस नाईक आणि 850 पोलीस कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत. ही आजची वस्तुस्थिती आहे. त्यामुळे पोलिसांच्या या ज्या मागण्या आहेत किंवा त्यांच्या ज्या किमान अपेक्षा आहेत त्याकडे मी सन्माननीय अर्थमंत्र्यांचे लक्ष वेधते.

सभापती महोदय, जलनीती आणि सिंचन प्रकल्पामध्ये कामाची जी बेशिस्तता निर्माण झाली आहे त्याबद्दल बोलत असताना सांगू इच्छिते की, 16.3.2012 रोजी जल आयोगाचे अध्यक्ष आणि मुख्य अभियंता यांनी गोसीखूर्द प्रकल्पाच्या डाव्या कालव्याच्या कामाबद्दल नाराजी व्यक्त केलेली आहे. हा 450 कोटी रुपयांचा निधी रोखून धरला गेला आणि तो निधी आमच्या माहितीप्रमाणे केंद्रीय उड्डयनमंत्री श्री. अजित सिंह यांच्या मतदारसंघातील प्रकल्पाकडे वळता झाला. ही अतिशय गंभीर बाब आहे. म्हणून जल विषयक प्रकल्पांचे मॉनिटरींग चांगल्या प्रकारे झाले पाहिजे अशी आमची अपेक्षा आहे. गॅसवरची करवाढ रद्द करावी अशी मागणी सदनाच्या बाहेरुन वारंवार होत आहे तसेच विधिमंडळाच्या अनेक आमदारांनी याबाबत आंदोलनाची भूमिका घेतलेली आहे. सर्वसामान्य महिला या गॅसवरील करवाढीमुळे त्रस्त आहेत. एका बाजूला महागाईचा निर्देशांक वाढत आहे आणि त्याच वेळेला आपण गॅसवर करवाढ केलेली आहे. त्याचा आपण निश्चितपणे पुनर्विचार केला पाहिजे याकडे मला लक्ष वेधावेसे वाटते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

सभापती महोदय, महिलांच्या संदर्भात विचार करावयास लागलो तर बचत गटांची संख्या कमी झालेलीच आहे पण महिला व बाल विकास विभाग आणि राज्य महिला आयोग यांच्यासाठी सुध्दा जी आर्थिक व्यवस्था व्हावयास पाहिजे होती ती व्यवस्था अजूनही पुरेशी झालेली नाही. गेल्या वेळच्या आपल्या अर्थसंकल्पामध्ये समुपदेशन केंद्राची योजना केलेली होती आणि त्या संदर्भात घोषणा केली होती. परंतु त्याबद्दल काय अंमलबजावणी झाली आहे किंवा काय व्यवस्था झालेली आहे याचे चित्र स्पष्ट झालेले नाही.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

सभापती महोदय, माझा शेवटचा मुद्दा पर्यटनाच्या सुविधा व आपत्कालीन यंत्रणा याबाबतचा आहे. ज्या ज्या ठिकाणी पर्यटनाच्या सुविधा केल्या आहेत असे सांगितले जाते त्यांची परिस्थीती वाईट आहे. मग महाबळेश्वर, माथेरान किंवा सर्व थंड हवेच्या ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून बांधण्यात आलेले कठडे असतील किंवा वेगवेगळे अर्थर शिट असतील, जे पाईन्टस् आहेत तेथे सुरक्षितता नाही. ही वस्तुस्थिती आहे. शासन एका बाजूला पर्यटनाला चालना देण्यासाठी प्रयत्न करीत आहे. मी नुकतीच औंध येथे भेट दिली होती. तेथे एका मुलीच्या पित्याकडूनच खून झाल्यामुळे मी भेट देण्यासाठी गेले होते. तेव्हा ग्रामस्थांनी मला असे सांगितले आहे की, औंध येथील वस्तूसंग्रहालय आहे तेथे सुरक्षा रक्षकांचे पैसे पुरातत्व विभागाने भरले नाहीत म्हणून ते संग्रहालय बंद आहे. म्हणून ज्या ज्या ठिकाणी अशी संग्रहालये आहेत त्यांच्यासाठी आर्थिक तरतूद होते की नाही हे अतिशय गरजेचे आहे. म्हणून सुरक्षित पर्यटन यासारख्या मुद्यांकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे. या विषयी मी जिल्हाधिका-यांचेही लक्ष वेधले होते. त्यांनी सुरक्षा रक्षकांचे पैसे न दिल्यामुळे ते वस्तूसंग्रहालय बंद असल्याचे सांगितले आहे.

शेवटी मी असे म्हणेन की, भाकरी का करपली, घोडा का अडला, तर फिरवली नाही म्हणून असे नेहमीचे एक सुपरिचित वाक्य आहे. माननीय अर्थ मंत्री महोदय, आपण दर दरवर्षी अर्थसंकल्प मांडाल पण मॉनेटरिंग सिस्टीम किंवा ऑडिटर जनरलचे जे रिपोर्ट येतात त्यावर जोपर्यंत शासनाने केलेल्या कार्यवाहीचे अहवाल सभागृहात मांडून चर्चा करण्याची पध्दत अवलंबत नाही तोपर्यंत इकडून वारे आले आणि तिकडून निघून गेले अशी या अर्थसंकल्पांची परिस्थिती होईल असे मला वाटते. एवढे बोलून मी माझे भाषण संपविते. जय महाराष्ट्र.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.सतीश चव्हाण (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन 2012-13 या वर्षाच्या अर्थसंकल्पावरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, सन 2012-13 या वर्षासाठी माननीय वित्त मंत्री श्री.अजितदादा पवार यांनी शेती क्षेत्रात समतोल साधणारा अर्थसंकल्प मांडल्याबद्दल मी त्यांचे प्रथम आभार मानतो. महाराष्ट्राला विकासाची नवी दिशा देणाऱ्या स्व.यशवंतरावजी चव्हाण साहेबांचे जन्मशताब्दी वर्ष साजरे करण्यासाठी 100 कोटी रुपये प्रस्तावित केले आहेत त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. त्याचप्रमाणे शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त मंत्री महोदयांनी निधी देण्याचे प्रस्तावित केलेले आहे. औरंगाबाद येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाला शासनाने निधी उपलब्ध करुन देण्याचे वेळोवेळी घोषित केलेले आहे. परंतु अजूनही तो निधी मिळालेला नाही. तो निधी त्वरित द्यावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, औरंगाबाद येथे नॅशनल लॉ स्कूल स्थापन करण्याची घोषणा करण्यात आली होती. परंतु त्याबाबतच्या फाईल्स अजूनही विविध विभागांमध्ये फिरत आहेत. या स्कूलसाठी औरंगाबाद येथे जमिनीचा ताबा देण्यात आला आहे. परंतु अद्याप आवश्यक त्या पदांची प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात आलेली नाही. संचालक पदासारखे महत्वाचे पद भरण्यात आलेले नाही. नॅशनल लॉ स्कूलची घोषणा महाराष्ट्र व गुजरात सरकारने एकाच वेळी केली होती. गुजरात सरकारने संचालकाचे पद भरुन प्रवेश प्रक्रियाही सुरु केली आहे. परंतु आपण मात्र फक्त घोषणाच करीत आहोत. या स्कूलबाबत होत असलेल्या विलंबाबाबत मराठवाड्यातील जनता साशंक आहे. म्हणून शासनाने त्वरित संचालकांची नेमणूक करुन प्रवेश प्रक्रिया जाहीर करण्यात यावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, विभागीय, जिल्हा व तालुका स्तरावर क्रीडा संकुले बांधण्यासाठी या वर्षाच्या अर्थसंकल्पात 90 कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित केलेला आहे, त्याबद्दल मी माननीय अर्थमंत्र्यांना धन्यवाद देतो. परंतु अपूर्ण बांधकामे व बांधकामाची किंमत वाढल्यामुळे बरीचशी क्रीडा संकुले रखडलेली आहेत. त्याच प्रमाणे क्रीडा प्रशिक्षकांच्या सुध्दा नेमणुका झालेल्या नाहीत ही वस्तुस्थिती आहे. शासनाकडून खेळाडूंना आरक्षण व राष्ट्रीय तसेच आंतरराज्यीय पदक विजेत्या

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.सतीश चव्हाण...

खेळाडूंना शासकीय सेवेत थेट उच्च पदावर नेमून त्यांचा सन्मान करतो. परंतु विजयी खेळाडूंना क्रीडा खात्यातच सामावून घेतले पाहिजे तरच त्यांच्या अनुभवाचा फायदा उदयोन्मुख खेळाडूंना होईल. आजपर्यंत फक्त टेनिस, क्रिकेट या परदेशी खेळातील खेळाडूंना जे भाग्य लाभत होते. आता कबड्डीपटूंना प्रत्येकी 1 कोटी रुपये देऊन ते भाग्य मिळवून दिले त्याबद्दल मी माननीय अर्थ मंत्र्यांना धन्यवाद देतो.

सभापती महोदय, शिक्षण सेवकांचे मानधन वाढविल्याबद्दल मी माननीय अर्थमंत्री व माननीय शिक्षण मंत्री श्री.राजेंद्र दर्डा यांचे आभार मानतो. परंतु उच्च माध्यमिक शिक्षकांसाठी दिनांक 1.1.96 पासून पाचवा वेतन लागू करण्यासाठी या अर्थसंकल्पात कोणतीही तरतूद केल्याचे दिसत नाही. या संदर्भात सभागृहात वारंवार आश्वासने मिळाली आहेत परंतु अद्याप तरतूद झालेली नाही. शासनाने हा प्रश्न त्वरित सोडवून आवश्यक त्या निधीची तरतूद करावी अशी विनंती करतो.

यानंतर श्री.शिगम....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतीश चव्हाण....

सभापती महोदय, आज विविध खात्यातर्फे सरळसेवा भरतीसाठी परीक्षा घेण्यात येतात. प्रत्येक विभागासाठी प्रत्येक पदासाठी वेगवेगळे परीक्षा शुल्क आकारले जाते. आधीच उपासमारीने होरपळलेल्या बेरोजगारांसाठी हे शुल्क माफ करावे व मुलाखतीला जाण्यायेण्यासाठी त्यांना एस.टी.चा पास द्यावा अशी मी माननीय उप मुख्यमंत्री महोदयांना विनंती करतो. कमीत कमी महिला, मागासवर्गीय व आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गाना परीक्षा शुल्क माफ करावे अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, मागासलेल्या जिल्ह्यातील उद्योगांना सबसिडी देण्यासाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद केल्याबद्दल मी माननीय अर्थ मंत्री महोदयांना धन्यवाद देतो. औरंगाबाद येथे शेकडो एकर जमीन एसईझेडसाठी कंपन्यांना दिली आहे. करार करुन 5 वर्षे झाली तरी एकही वीट तेथे लागलेली नाही. या उद्योगांना एकरी एक ते दीड लाख रु. दराने जमीन देण्यात आली. आज त्या जमिनीचा भाव एक ते दीड कोटी रु. एकर असा झालेला आहे. उद्योजक या गोष्टीचा दुरुपयोग करण्याची शक्यता नाकारता येत नाही. दुसरीकडे लघु उद्योजकांनी केलेली हजारो भूखंडाची मागणी एमआयडीसीकडे प्रलंबित आहे. या कंपन्यांकडून कराराचे उल्लंघन झाले असेल तर ती जमीन परत घेऊन लघु उद्योगांसाठी सिनियॉरिटी प्रमाणे द्यावी जेणेकरुन हजारो नवे उद्योजक स्वत:च्या पायावर उभे रहातील आणि रोजगार देखील उपलब्ध होईल.

सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी व्हॅटचा मुद्दा येथे मांडला. आज व्हॅटचे रिटर्न वेळेवर मिळत नाहीत अशा अनेकांच्या तक्रारी आहेत. ही तक्रार दूर करावी अशी मी माननीय उप मुख्यमंत्र्यांना विनंती करतो.

सभापती महोदय, विक्रीकराचा महसूल 20 टक्के वाढविल्याबद्दल मी माननीय अर्थमंत्र्यांचे अभिनंदन करतो. परंतु त्यांना या निमित्ताने एकच विनंती करतो की, स्वयंपाकाच्या गॅसवरील प्रस्तावित 20 रु. कर रद्द करावा.

सभापती महोदय, औरंगाबाद ही महाराष्ट्राची पर्यटन राजधानी आहे. महापालिकेच्या नियोजनशून्य कारभारामुळे शहर बकाल झाले आहे. परंतु आयुक्तांनी धाडसी निर्णय घेऊन, डी.पी.प्लॅन प्रमाणे अतिक्रमणे व बेकायदा बांधकामे पाडून रस्ते रुंद केले आहेत. या रुंद केलेल्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतीश चव्हाण...

रस्त्यांसाठी 100 कोटी निधीची आवश्यकता आहे. एवढा निधी महापालिकेकडे नाही. हा निधी महापालिकेला उपलब्ध करुन दिला नाही तर पुन्हा तेथे अतिक्रमणे आणि अनधिकृत बांधकामे होतील अशी भीती आहे. ही कामे दर्जेदार होण्याच्या दृष्टीने ती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करुन घ्यावीत. याचे कारण असे की महापालिकेकडे क्वॉलिटी कंट्रोल यंत्रणा अस्तित्वात नाही.

सभापती महोदय, राज्यातील सर्व नगरपालिका आणि महापालिकामध्ये नोकरीला लागल्यापासून निवृत्तीपर्यन्त बदल्या होत नाहीत अशी खात्री झाल्याने अधिकारी मस्तवाल व मुजोर झाले आहेत. मध्यंतरी माननीय राज्यमंत्री श्री. भास्कर जाधव यांनी याबाबतीत कायदा करण्याचे सुतोवाच केले होते. तेव्हा सर्व नगरपालिका व महानगरपालिकेतील अधिका-यांच्या बदल्याबाबत त्वरित निर्णय घ्यावा अशी मी या निमित्ताने अर्थ मंत्री महोदयांना विनंती करतो.

बेरोजगारीने तरुण त्रस्त आहेत. त्यातच दर महिन्याला एक भरतीची परीक्षा देण्यासाठी जाण्यायेण्याचा खर्च या तरुणांच्या आर्थिक कुवतीबाहेर आहे. आज गोवा सरकारने बेरोजगार तरुणांना 1200 रुपये भत्ता जाहीर केला आहे. उत्तर प्रदेशचे तरुण मुख्यमंत्री अखिलेश यादव यांनी 1500 रु. बेरोजगारी भत्ता जाहीर केलेला आहे. राज्याचे अर्थमंत्री श्री. अजितदादा पवार हे बेरोजगार भत्त्याची मागणी नक्कीच मंजूर करतील अशी मला आशा वाटते एवढे बोलून आणि मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून मी माझे भाषण संपवितो.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, महाराष्ट्र सरकारने या वर्षी स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी सोहळयाची सुरुवात मोठया दिमाखाने मुंबई शहरात सुरुवात केलेली आहे. या राज्यातील शेवटचा गरीब माणूस डोळयासमोर ठेऊन राज्याचे कर्तव्यदक्ष वित्तमंत्री श्री.अजितदादा पवार यांनी अर्थसंकल्प सभागृहात मांडला आहे, त्या अर्थसंकल्पाचे अभिनंदन करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, राज्य सरकारने स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी सोहळयाच्या निमित्ताने या अर्थसंकल्पात 100 कोटी रुपयांची तरतूद करुन एका अर्थाने स्व.यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन करण्याचे काम या सरकारने केले, त्याबद्दल मी सरकारला धन्यवाद देतो. 100 कोटी रुपयांच्या माध्यमातून विविध योजना हाती घेण्यात येणार आहेत. या राज्यातील एकही गाव रस्त्याविना राहणार नाही असा संकल्प सुध्दा अर्थसंकल्पामध्ये ठेवलेला आहे या गोष्टीचा मला मनापासून आनंद आहे. केंद्र शासनाच्या माध्यमातून पंतप्रधान ग्रामसडक योजना या राज्यात राबविण्यात येत आहे. महाराष्ट्रातील अनेक गावे, अनेक वाडयापर्यंत पक्क्या रस्त्यांची सोय झालेली नाही. आपण या वर्षी स्व.यशवंतराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष साजरे करीत आहोत. येत्या दोन वर्षाच्या कालावधीमध्ये या राज्यातील एकही गाव आणि एकही वाडी रस्त्याविना राहणार नाही, ती गावे आणि वाडया डांबरी रस्त्याने जोडल्या जातील अशा प्रकारचा संकल्प शासनाने या निमित्ताने करावा अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, भारत हा कृषीप्रधान देश आहे. आपण सगळे शेतकऱ्यांचीच मुले आहोत. शेतकऱ्यांच्या आर्थिक विकास व्हावा म्हणून भरीव तरतूद माननीय वित्तमंत्र्यांनी अर्थसंकल्पात केलेली आहे. विशेष म्हणजे शेतकऱ्यांच्या वीज दरात सवलतीसाठी 85 कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात केलेली आहे. माननीय श्री.अजितदादा पवार यांच्याकडे वित्त खाते आहे, तसेच त्यांच्याकडे ऊर्जा खाते देखील आहे. माझी माननीय श्री. अजितदादा पवार यांना विनंती आहे की, शेतकऱ्यांकडे थकीत असलेल्या वीज बिलाच्या बाबतीत एकदा काही तरी ठोस निर्णय घेऊन टाका. शेतकऱ्यांची थकीत वीज बिलासाठी किती पैसे लागतील याचा विचार करु नका. परंतु शेतकऱ्यांकडे थकीत असलेल्या वीज बिलाच्या बाबतीतील जो प्रश्न आहे, त्याला पूर्णविराम देण्याचे काम आपल्या संकल्पनेतून करावे अशी माझी आपणास विनंती आहे. शेतकऱ्यांकडे थकीत असलेल्या वीज बिलाचा प्रश्न लवकर निकाली काढला पाहिजे आणि शेतकऱ्यांना त्यातून मुक्तता

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे...

केली पाहिजे अशा प्रकारची माझी पुन:श्च विनंती आहे. शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या विजेच्या बाबतीत नवीन नियमावली तयार केली पाहिजे. माननीय श्री.अजितदादा पवार साहेब, आपण शेतकऱ्यांच्या बाबतीत अतिशय सकारात्मक निर्णय घेणार म्हणून राज्यातील लाखो शेतकरी आपल्याकडे आशेने बघत आहेत. यासंबंधीचा निर्णय उशिरा घ्या. निवडणुका जवळ आल्या नंतर घ्या. परंतु शेतकऱ्यांच्या बाबतीत अतिशय सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी माझी माननीय वित्तमंत्र्यांना विनंती आहे.

सभापती महोदय, जागतिक बँक सहाय्यित महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पांतर्गत पणन विषयक पायाभूत सुविधांसाठी अर्थसंकल्पात तरतूद केलेली आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी शासनाने प्रत्येक जिल्हयात भू-विकास बँका उघडल्या होत्या, त्या भू-विकास बँका जवळपास बंद झालेल्या आहेत. त्या बँकेतील कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना आपण बसून पगार देत आहोत. त्या कर्मचाऱ्यांना राज्य सहकारी बँक, जिल्हा सहकारी बँक यांच्याकडे त्यांच्या सेवा वर्ग केल्या पाहिजेत. भू-विकास बँका बंद करुन राज्य सहकारी बँका, जिल्हा सहकारी बँका सक्षम केल्या पाहिजेत अशी देखील विनंती मी या निमित्ताने शासनास करीत आहे.

सभापती महोदय, राज्य सरकारने कोरडवाहू शेतीसाठी 200 कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी उपलब्ध करुन दिला आहे. कोरडवाहू शेतीचा विचार पहिल्यांदा करण्याचे काम माननीय वित्तमंत्री श्री.अजितदादा पवार यांनी केलेला आहे. शेतकऱ्याला समोर ठेऊन हा अर्थसंकल्प माननीय वित्तमंत्र्यांनी सादर केलेला आहे. हा शेतकऱ्यांचा अर्थसंकल्प आहे असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. शेतकऱ्यांच्या कोरडवाहू शेतीचा या अर्थसंकल्पात विचार केला गेला, त्याबद्दल मी माननीय वित्तमंत्र्यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय,आज उद्योगाच्या बाबतीत अनेक योजना आहेत. महाराष्ट्रात नॅनो प्रकल्प येणार होता, परंतु तो प्रकल्प काही कारणास्तव गुजरात राज्यात गेला. परंतु यापुढे महाराष्ट्रात नवीन प्रकल्प येतील, ते इतर राज्यात जाऊ नयेत म्हणून काळजी घेतली गेली पाहिजे. या राज्यात येणारे प्रकल्प जर दुसऱ्या राज्यात जात असतील तर ती गोष्ट आपल्यासाठी भूषणावह

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे....

नाही. महाराष्ट्रात राहणारे टाटा बाहेर राज्यात उद्योग काढतात ही गोष्ट देखील भूषणावह नाही. आज राज्यात बेरोजगारांची संख्या लक्षात घेतली तर राज्यात नवनवीन प्रकल्प उभारले गेले पाहिजेत....

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे.....

या बाबत सुध्दा धडक मोहीम राबवून त्यांना करामध्ये सवलती देण्याची गोष्ट असेल यासाठी गांभीर्याने विचार करावा लागेल. राज्यामध्ये मोठे उद्योग आले पाहिजेत यासाठी राज्याला निर्णय घ्यावा लागेल.

सभापती महोदय, शिक्षणाबाबत अनेक चांगले निर्णय झालेले आहे.

उप सभापती : सभागृहाच्या कामकाजाची वेळ 5 मिनिटांकरिता वाढविण्यात येत आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेचा कालावधी सात दिवसांवरुन तीन दिवसावर आणण्यात आला. असे असताना माननीय सदस्यांना आपले विचार मांडण्यासाठी पुरेसा वेळ न मिळणे हे योग्य नाही.

उप सभापती : ठीक आहे. सभागृहाची वेळ 8.00 वाजेपर्यंत वाढविण्यात येत आहे. माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, एज्युकेशन इज पॉवर, शिक्षण ही ऊर्जा आहे असे म्हटले जाते. शिक्षण ही शक्ती आहे असे म्हटले जाते. त्या दृष्टीने शिक्षणाला अधिक महत्व देण्याचे काम या अर्थसंकल्पामधून झालेले आहे. परंतु मला खेदाने नमूद करावेसे वाटते की, या राज्यामध्ये आज कंत्राटी पध्दत सुरु झालेली आहे. बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले असे संत वचन आहे. आज आपल्या राज्याचे नेतृत्व हे करुन दाखविणारे आहे. म्हणून माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांच्याकडे महाराष्ट्रातील तरुण वर्ग आशेने पहात आहे आणि आम्ही सुध्दा पहात आहोत. त्यांनी शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ करण्याचे सूतोवाच केले होते. तो निर्णय त्यांनी अंमलात आणला, त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. परंतु मंत्रालयात जी अधिकारी मंडळी आहेत त्यांनी प्राथमिक शाळेतील शिक्षण सेवकांचे मानधन 3 हजार वरुन 7 हजार रुपये केले, माध्यमिक शाळेतील शिक्षण सेवकांचे मानधन 4 हजार वरुन 8 हजार रुपये केले. मात्र ज्युनिअर कॉलेजमध्ये शिकविणाऱ्या शिक्षण सेवकांचे मानधन 5 हजार वरुन 10 हजार रुपये न करता 9 हजार रुपये इतके वाढविले. 1 हजार रुपयांचा फरक ठेवला आहे. अधिकारी वर्गाकडून ही चूक झालेली दिसते. त्याचा परिणाम उभ्या महाराष्ट्रातील कनिष्ट महाविद्यालयातील शिक्षकांवर झालेला आहे. ही चूक दुरुस्त केली पाहिजे. मानधन वाढविण्याचा निर्णय घेतल्यानंतर सर्व शिक्षक आनंदीत झाले होते. परंतु या चुकीमुळे कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांचे 1 हजार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे.....

रुपयांचे नुकसान झाले आहे. त्यांचे मानधन 9 हजार रुपयांऐवजी 10 हजार रुपये करण्यात यावे अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

सभापती महोदय, आज शिक्षण क्षेत्रामध्ये आपली जी कारकीर्द सुरु झाली त्याबद्दल मला मनापासून आनंद झाला आहे. शिक्षणाकडे ॲसेट म्हणून पाहिले पाहिजे. शिक्षण ही गुंतवणूक आहे. शिकेल तो टिकेल असे म्हटले जाते. एखादी व्यक्ती शिकली तर ती तीन पिढ्या घडविण्याचे काम करते. म्हणून शिक्षणावर जो काही खर्च केला जात आहे तो अतिशय कमी असल्यामुळे वाढविण्याची आवश्यकता आहे. आज आपल्या पुरोगामी राज्यामध्ये, शाहू, फुले, आंबेडकर यांच्या राज्यामध्ये ज्युनिअर कॉलेजबाबत "कायम" शब्द वगळलेला नाही. शासनाने प्राथमिक आणि माध्यमिक शाळांबाबत "कायम" शब्द काढला. परंतु कनिष्ट महाविद्यालयामध्ये 11 वी व 12 वी वर्गात शिक्षकविणाऱ्या शिक्षकांबाबत कायम शब्द न काढल्यामुळे हजारो शिक्षक आज आझाद मैदानावर उपोषणाला बसले आहेत. हे महाराष्ट्राला भूषणावह नाही. त्यामुळे शासनाने सर्व कनिष्ट महाविद्यालयांबाबत "कायम" शब्द वगळला पाहिजे अशा प्रकारची मी विनंती करतो.

सभापती महोदय, दोन महत्वाचे प्रश्न या ठिकाणी उपस्थित करावयाचे आहेत. वेतनेतर अनुदान आणि सर्व शाळा जिल्हा परिषदांकडे द्यायच्या का? मी माननीय उप मुख्यमंत्र्यांना हे सांगू इच्छितो की, बिलकूल जिल्हा परिषदांकडे द्यायला आमची हरकत नाही. जिल्हा परिषदांच्या शाळांना शासन काय देते? त्यांना जमीन द्यावी लागते, वीज द्यावी लागते, इमारत बांधून द्यावी लागते, वेतनाचा खर्च द्यावा लागतो. हे सगळे सोपस्कार शासनाला करावे लागतात. संस्थांना मात्र मान्यता देण्याचे काम शासनाकडून केले जाते. जमीन असेल, इमारत असेल, वेतनाचा खर्च असेल, सुसज्ज ग्रंथालय, संगणक प्रयोगशाळा शासनाच्या निधीतून उभारण्याचे काम केले जाते. रयत शिक्षण संस्था आणि इतर मोठ्या शिक्षण संस्था राज्यात हजारो विद्यार्थी घडविण्याचे काम करीत आहेत.

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे .....

म्हणून माझी विनंती आहे की, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षण संस्था काढून जे विचार पुढे आणले, वसंतदादा पाटील यांनी अशा संस्थांना प्रोत्साहन देऊन जे विचार पुढे आणले अशा संस्थांना वेतनेतर अनुदान सन 2004 पासून बंद केलेले आहे. शासनाकडे पैसे नसतील तर आम्ही थकबाकी मागत नाही, किमान आतापासून तरी हे अनुदान सुरु करावे. तसेच 12 टक्के अनुदान देणे शासनाला शक्य नसेल तर 5 टक्के तरी कबूल केल्याप्रमाणे द्यावे अशी माझी विनंती आहे. हे अनुदान येणाऱ्या जून महिन्यापासून देण्याचा क्रांतिकारक निर्णय शासनाने घ्यावा अशी मी सूचना करतो.

त्याचबरोबर शिक्षक आणि कर्मचाऱ्यांसंबंधीचा बिन पैशाचा प्रश्न आहे. तो म्हणजे एका एका शाळेत 50-50 वर्ग खोल्या आहेत. उदा. पुण्यातील मॉडर्न शाळेत 100 वर्ग खोल्या आहेत. अशा खोल्यांची साफसफाई कोणी करायची, त्यात शिकणाऱ्या लहान मुलांसाठी स्वच्छता कोणी राखायची हा प्रश्न आहे. शेवटी यासाठी सफाई कर्मचाऱ्याची तरतूद नसल्याने प्राथमिक शाळेतील शिक्षकांनाच हे काम करावे लागते. शेवटी शिक्षकाने नियमितपणे काम केले पाहिजे असे आपण म्हणतो. त्याने मन लावून शिकविले पाहिजे अशी अपेक्षा करतो. पण त्या शिक्षकांनी शिकविले म्हणून पिढी घडते. त्या शिक्षकांनी शिकविले म्हणून माननीय उप मुख्यमंत्री या खुर्चीत बसलेले आहेत. ही सर्व माणसे आम्ही शिक्षकांनीच घडविली म्हणून येथे आली असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

श्री. विनोद तावडे : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे हे म्हणतात ते खरे आहे. पण या निमित्ताने मला मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरु प्रि. राम जोशी यांची आठवण झाली, ती मी सांगू इच्छितो. एकदा प्राध्यापकांचा संप चालू होता त्यावेळेस त्यांच्या पुतण्याला भावाचे पत्र आले होते. प्राध्यापकांचा संप चालू असल्यामुळे काही शिकायचे असेल तर शिकून घे.

श्री. विक्रम काळे : महोदय, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेसाठी शासनाने 5 कोटीची तरतूद केली आहे, ती खरे तर कमी आहे. यामध्ये शासनाने वाढ करावी अशी मी विनंती करतो. त्याचबरोबर लठ्ठे शिक्षण संस्थेच्या हिरक महोत्सवा निमित्त 60 लाख रुपयाची तरतूद केली ही आनंदाची बाब आहे. अशा प्रकारे राज्यातील ज्या ज्या शिक्षण संस्था पुढे येऊन ध्येयाने प्रेरित होऊन गोरगरिबांना शिक्षण देण्याचे काम करीत असतील अशा संस्थांची

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे .....

गुणवत्ता तपासून घ्यावी व त्यांनाही अनुदान देण्यात यावे अशी माझी विनंती आहे. माननीय मुख्यमंत्री घोषणा करतात परंतु त्या घोषणेला आदर नसेल तर ते चुकीचे आहे. गेल्या पाच सप्टेबर 2011 रोजी माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री हे औरंगाबाद येथे आदर्श शिक्षण पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी एकत्र होते. शेवटी पशुला सुध्दा भावना असतात. गायीच्या पाठीवर हात फिरविल्यानंतर ती सुध्दा शेपूट हलविते. त्याप्रमाणे आमच्या शिक्षकाला जर पुरस्कार मिळाला तर त्याला त्याने केलेल्या कामाचे कौतूक वाटते व तो अधिक जोमाने काम करतो. असा आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्यानंतर दोन जादा वेतनवाढी देण्यात येत होत्या. पण सहाव्या वेतन आयोगात त्या बंद करण्यात आल्या, त्या पुन्हा देण्यात याव्यात अशी माझी विनंती आहे. माजी मुख्यमंत्री श्री. अशोकराव चव्हाण यांनी औरंगाबाद मध्ये तशी घोषणा केली होती.....

श्री. दिवाकर रावते : महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य आता नुकतेच बोलले की "बोले तैसा चाले....." ते आपल्याला मागे घ्यायचे असेल तर घेऊ शकता, अन्यथ कबूल करा.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, मघाशी आपण असे म्हणाला होता की, दादांचा अर्थसंकल्प कसा जे का रंजले गांजले ...असे सांगितले परंतु ते तसे नसून माझ्या मते, " जे का रंजले गांजले त्यांसी तुम्ही म्हणा आपुले, साधू तुम्ही बनावे, देव आम्हालाच म्हणावे". आपण म्हणाला होता की, "बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले" म्हटल्या बरोबर दादांनी पाय सुध्दा पुढे केले होते पण नंतर पुन्हा विषय बदलून टाकला.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, शेवटी चांगल्याला चांगले म्हणण्याची आपल्याकडे दानत असली पाहिजे. मग आपण कोणत्याही पक्षात असलो तरी. मी दादांच्या बाबतीत शिक्षण सेवकांच्या संदर्भात म्हटले होते. माजी मुख्यमंत्री श्री. अशोकराव चव्हाण यांनी औरंगाबादला घोषणा केली होती की, आदर्श शिक्षकांचा पुरस्कार ज्या शिक्षकाला दिला जाईल त्या शिक्षकांना दोन जादा वेतनवाढी दिल्या जातील. आतापर्यंत या संदर्भातील निर्णय राज्य सरकारने घेतलेला नाही, ही खेदाची बाब आहे. मला आशा आहे की, हा विषय दादांनी मनावर घेतल्यामुळे अधिवेशन संपण्याच्या आत या संदभार्तील निर्णय घेतील अशी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, उच्च शिक्षणाच्या बाबतीत शासनाने मोठया प्रमाणात तरतूद केलेली आहे. कोल्हापूर विद्यापीठालाही अनुदान दिले असल्यामुळे त्याचाही आम्हाला आनंद आहे. परंतु महाराष्ट्राची राजधानी मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिकाही नीट मिळत नाहीत. काल विद्यापीठामध्ये एका विषयाचा पेपर असतांना दुसऱ्याच विषयाची प्रश्नपत्रिका दिली गेली. मला वाटते हा प्रकार आपल्या राज्यासाठी भूषणावह नाही. यासंदर्भात सखोल चौकशी झाली पाहिजे व यातून विद्यार्थ्यांना जो त्रास झाला, ज्या विद्यार्थ्यांचे नुकसान झालेले आहे ते भरुन द्यावे, अशी मागणी मी या निमित्ताने करीत आहे.

सभापती महोदय, शिवछत्रपतींच्या संदर्भात आमच्या सर्वांच्या मनात आदर आहे. माननीय मेटे साहेब आमदार झाल्यापासून तसेच त्यापूर्वी पासून त्यांनी या संदर्भात लढायचे काम कधीही सोडले नाही. शिवछत्रपतींचे स्मारक अरबी समुद्रातच झाले पाहिजे अशा प्रकारची भूमिका घेणारे मेटे साहेब इकडच्या तिकडच्या पक्षात गेले असले तरी त्यांनी आपला मुद्दा कधीही सोडला नाही.

सभापती महोदय, मला खेद वाटतो की, या महाराष्ट्रात ज्या पक्षाने साडेचार वर्षे शिवछत्रपतींच्या नावाने राज्य केले त्या पक्षाला कार्यकाळात छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीची

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे .....

तारीख सुध्दा निश्चित करता आली नाही, हे मोठे दुर्दैव आहे. आता शिवाजी महारांजाच्या जयंतीची तारीख कोण्या मंत्र्यांने, मुख्यमंत्र्याने नाही तर इतिहासकारांनी निश्चित करुन घेण्याचे काम आघाडी सरकारने केलेले असतांना सुध्दा ही तारीख तुम्ही मानावयास तयार नाही ? आज तुम्ही शिवाजी महाराजांच्या दोन दोन जयंत्या करता ? शेवटी आम्ही सुध्दा काही तत्व घेऊन जगतो. राजकारण तरी कोठे करावयाचे याचा सुध्दा निश्चितपणे विचार झाला पाहिजे. मी फार मोठा नेता नसून एक साधा शिक्षक आमदार आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. काळे साहेब शिवाजी महाराजांच्या जयंतीच्या संदर्भात बोलत आहेत परंतु या आघाडी सरकारने शासनाच्या दिनदर्शिकेमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीचा साधा उल्लेख देखील केलेला नाही यावरुन छत्रपतींबद्दल या शासनाला किती सन्मान आहे हे दिसून येते.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, सरकारी दिनदर्शिकेत छत्रपतींच्या जयंतीचा उल्लेख करण्यामध्ये अधिका-यांची चूक झालेली आहे. त्यामुळे ही जी चूक ज्याने कोणी केली असेल त्या अधिका-यावर सुध्दा कारवाई झाली पाहिजे अशी मागणी मी या निमित्ताने करतो.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे...

सभापती महोदय, उच्च शिक्षणासंबंधी आमच्या राज्य शासनाने चांगले निर्णय घेतले आहेत. तंत्र शिक्षणाला प्रोत्साहन मिळावे म्हणून आयटीआयसाठी देखील तरतूद करण्यात आली आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

उप सभापती : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. उद्या गुरूवार दिनांक 29 मार्च 2012 रोजी सकाळी 10.00 ते 11.00 या वेळेत सभागृहाची विशेष बैठक होईल. या बैठकीत सन 2012-2013 च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा पुढे सुरू राहील. सभागृहाची नियमित बैठक सकाळी 11.15 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक रात्रौ 7 वाजून 15 मिनिटांनी, गुरूवार दिनांक 29 मार्च 2012 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही